

# रवींद्रमनन

## काका कालेलकर

REFBK-0009781

पॉप्युलर बुक डेपो, लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धि योजना
१९७०

# रवींद्रमनन

रवींद्रनाथ टागोरांच्या
५० बंगाली गीतांचें
मनन व भाषांतर

काका कालेलकर

REFBK-0009781

पॉप्युलर बुक-डेपो, मुंबई ७

सर्व हक्क स्वाधीन

प्रथमावृत्ति
जानेवारी १९५८

मुद्रक
श्रीनिकेतन ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार
मुंबई २

प्रकाशक
ग. रा. भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड
मुंबई ७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

# पाठवणी

वर्तमान युगाच्या भारतीय कवींमध्यें रवींद्रनाथांचें स्थान कांहीं औरच आहे. भारतीय संस्कृतीच्या उज्ज्वळ, आध्यात्मिक आणि रसिक परंपरेचे ते प्रतिनिधि आहेतच. परंतु नुकत्याच ओसरलेल्या शुभाशंसी जागतिक संस्कृतीचे ते उत्तम वाहक गणले जात असत. आणि भविष्यकाळच्या विचार-प्रवाहाचे दिग्दर्शक म्हणून देखील तरुणांनीं त्यांचा स्वीकार केला होता.

भारतीय संस्कृतीचा सोलीव गाभा त्यांच्या काव्यांत आपल्याला सांपडतो. सोलीव गाभा म्हणण्याचें कारण कीं पूर्वकालीन विचारांतील संकुचितता, प्रादेशिकता आणि पौराणिक संदर्भांचीं बंधनें टाळण्याची आणि भारतीय अनुभूतीला विश्वभोग्य करण्याची हातोटी त्यांना साधली होती.

रविबाबूंनीं आपली 'गीतांजलि' इंग्रजींत प्रगट केली आणि जगांतील सगळ्याच देशांच्या कवींना आणि रसिकांना तिनें मोहिनी घातली. हा छोटेखानी काव्य-संग्रह जगांतल्या लोकांना अतिशय आवडला ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. खरी आश्चर्याची गोष्ट ही कीं सर्वच ठिकाणच्या लोकांना ती आपलीशी वाटूं लागली. दरेक देशांतील जीवन-रसिक लोक म्हणूं लागले कीं रवीन्द्रनाथ आमच्याच हृदयांतील भाव अद्भुत रीतीनें व्यक्त करीत आहेत. आम्हांला ते मुळींच परके वाटत नाहींत.

जगांतील पुष्कळ लोकांना ख्रिस्ती अथवा बौद्ध धर्मसाधनेंत इहलोकविमुख, परलोकपरायण आणि सुतकी अशा जीवनदर्शनाचा कंटाळा आला होता. देवानें दिलेल्या जीवनाचा तिरस्कार करावयाचा, ‘ सर्वच असार आहे ’ असा सुतकी सूर काढावयाचा आणि मग एखाद्या काल्पनिक समाधि-सुखाचे किंवा स्वर्गीय आनंदाचे गोडवे गावयाचे ह्यांतील कृत्रिमतेचा लोकांना उबग आला होता. अशा वेळीं पौराणिक आणि काल्पनिक देव-देवींची उपासना सोडून देऊन आपली पुरी निष्ठा जीवनदेवतेला एकाग्रपणें अर्पण करणारा कवि सर्वांनाच आत्मीय आणि प्रेरक वाटला, ह्यांत आश्चर्य कसलें ?

शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध ह्यांच्या द्वारा विश्वाचा जो परिचय होतो तो आत्मसुखाला बाधकच असला पाहिजे असें काय म्हणून मानावें ? ज्या प्रभूनें ही सृष्टि निर्माण केली आणि जिच्या बंधनांत स्वतःला कायमचे गुंतवून घेण्याचें त्यानें पसंत केलें आणि जी सृष्टि आपल्या अनंत प्रकाराच्या विस्तारानें आपल्या प्रभूला एकनिष्ठपणें आळवते त्या सृष्टीचा उबग मानणें हीच खरोखर नास्तिकता आणि अनाध्यात्मिकता म्हटली पाहिजे, अशा भूमिकेवरून रचलेली कविता विश्वहृदयाला आह्लादक, आणि पोषक वाटली तर त्याचें आश्चर्य वाटायला नको.

रवीन्द्रांची कविता वाचून अत्युत्कट आनंद तर होतोच, पण त्याबरोबर आध्यात्मिक आरोग्य आणि पुष्टिहि मिळतात असा अनुभव झाल्यामुळें जीवनोपासक त्यांच्या कवितेकडे पुनः पुनः धांव घेतात आणि दर वेळा कृतज्ञतेनें म्हणतात—“ खरोखर ह्या कवीच्या काव्यात्म व्यक्तित्वावर जीवन-स्वामीचा वरदहस्त आहे ! ”

‘ गीतांजली ’च्या काव्यानंदाचा विनिमय करून तो द्विगुणित करावा अशा लोभानें रवीन्द्र-कृतींची चर्चा अनेक स्नेह्यांच्या बरोबर करत आलों आहे. अशाच एका प्रसंगीं महाराष्ट्रांतील दोन-तीन आदरणीय व्यक्तींच्या तोंडून ऐकलें कीं तुमच्या रविबाबूंची शब्दरचना आणि काव्यकौशल्य आम्हांला आवडतें. पण त्यांचा तो गूढवाद अथवा शून्यवाद आम्हांला समजत नाहीं. पटणें तर दूरच राहो. एखाद्या सुंदर फुलाला सुंदर सुगंधी प्रसन्न आणि टवटवीत म्हणून खुडून घेण्यास आम्ही तयार आहोंत. प्रियाराधनासाठीं आम्ही तें अवश्य वापरूं. पण

फूल हें विश्वस्वामीच्या प्रेमवाणीचें प्रतीक आहे, त्याच्या स्नेहलेखावरील अंतिम मुद्रा आहे, वगैरे, वगैरे गोष्टी शब्दांत यथायोग्य वाटल्या तरी आम्हांला त्याची प्रतीति होत नाहीं आणि सगळें भ्रमजाळ आहें असेंच वाटूं लागतें.

अशासारखी टीका ऐकून माझें मन उदास झालें. मला विशेष वाईट वाटलें तें अशासाठीं कीं ज्यांना महाराष्ट्रीय संतांच्या आध्यात्मिक आणि अतिवादी ( mystic ) परंपरेचा वारसा मिळाला आहे आणि बुद्धिग्राह्य अतीन्द्रिय सत्याच्या साक्षात्काराची खणखणीत वाणी ज्यांना ऐकायला मिळाली आहे त्यांनीं आत्मानुभूतीला शून्यवाद म्हणावें आणि अगम्य ठरवावें हें खरोखरच दुर्दैव होय.

औदासीन्याची ही छाया दूर करावी आणि रविबाबूंच्या काव्यकृतीचा आस्वाद घेतांना आपल्याला जें जीवन-रहस्य पटलें तें नम्रपणें नमूद करून ठेवावें असें उत्कटतेनें वाटूं लागलें. ह्या विपुल पृथ्वीवर वसणाऱ्या आणि निरवधि कालांत जन्म घेणाऱ्या महाराष्ट्रीय समाजांत कोणी ना कोणी समान-धर्मा सांपडेलच, अशा अज्ञात आत्मीय जनांना रविबाबूंच्या कृतीचा आनंद अनुभवण्यास आणि त्यांतून जीवन-रहस्य पारखण्यास थोडीबहुत मदत होईल असें वाटून ‘ गीतांजलीं ’ तील कांहीं पद्यें निवडून काढलीं. ( खरोखर ती निवड मीं न करतां माझे बंगाली-भाषा-रसिक तरुण मित्र आणि कारागृही जीवनांतील साथी श्री. शिवबालक बिसेन ह्यांनींच केली आहे. माझी जीवनदृष्टि आणि अभिरुचि थोड्या फार प्रमाणांत त्यांना अवगत असल्यामुळें त्यांनीं एखादें गीत पसंत करावें आणि त्याचेवर माझेकडून विवेचन मागून घ्यावें आणि प्रेमानें तें लिहून काढावें असा आमचा सहयोग पुष्कळ दिवस चालला होता. )

निवडून काढलेल्या गीतांचें वातावरण व्यक्त करण्यासाठीं आणि त्यांतील प्रधान सूर स्पष्ट करण्यासाठीं मी थोडेसें विवेचन लिहीत असे. पुढें गीतांतील एखादी ओळ जर कठीण वाटली किंवा भावसमृद्ध वाटली तर तिचेवर एखाद-दुसरी टीप लिहून तिचा भाव विशद करणें क्रमप्राप्त झालें.

एवढें करून मी विराम पावलों. पण शिवबालक म्हणाले कीं मूळ बंगाली गीत व त्याचें सरळ सोपें भाषांतर दिलें तरच विवेचनाचें रहस्य नीट समजूं शकेल आणि रसिकांना दुहेरी आनंद मिळेल.

त्यांची सूचना मला पटली. पण भाषांतर शब्दशः न करतां थोडेसें प्रवाही केलेलें बरें असें मला वाटलें. आम्हीं असेंहि ठरवलें कीं अगोदर विवेचन वाचून मन तयार झाल्यानंतरच मूळ गीत द्यावें आणि त्यानंतर त्या गीताचा अनुवाद द्यावा.

अनुवाद देण्याची कल्पना प्रारंभीं नसल्यामुळें विवेचनांतच गीताचा भाव कमी-अधिक दिलेला होता. तेथून तो काढणें शक्य नव्हतें आणि एकदां सारांश दिलाच आहे मग पुन्हा गीताचा अनुवाद देण्याचें कारण काय असें म्हणणेंहि शक्य नव्हतें. परिणामीं प्रस्तुत 'रवीन्द्र-मननां'त एकाच गीताचा भाव दोन-दोनदां दिलेला आढळेल.

पुस्तक छापण्याचें ठरविल्यानंतर ही पुनरुक्ति टाळावयास पाहिजे होती. पण तसें करूं जातां सगळें पुस्तक पुनः नव्यानें लिहावें लागलें असतें.

माझ्या लिखाणांतील पुनरुक्तीविषयीं माझा विषाद मी व्यक्त करीत असतां एकदां एक गुजराती स्नेही मला म्हणाले, "पुनरुक्तीचें तुम्ही वैषम्य काय म्हणून मानावें ? तुम्ही त्या त्या काळीं लिहून मोकळे होतां. पुनरुक्ति नडली तर ती आम्हां वाचकांना नडावी. माझें म्हणणें असें आहे कीं साहित्याचा आस्वाद घेत असतां एखादा आवडलेला भाग जर आपण आनंदानें पुनः वाचतों, तर एखादा वेधक विचार थोड्या बहुत निराळ्या रूपांत वाचावयास मिळाला तर त्याला पुनरुक्तिदोष काय म्हणून म्हणावें ?"

एकदां लिहिलेल्या मजकुरांत काटछाट करण्याचे आणि पुन्हा लिहून काढण्याचे श्रम वांचविणारी वरील तऱ्हेची मखलाशी मला फार आवडली आणि सोयीची वाटली, ह्यांत आश्चर्य कसचें ?

प्रत्येक गीताच्या आसपास त्यांतील भाव आणि त्याच्या मुळाशीं असलेली भूमिका त्या त्या ठिकाणीं कांहींशा विस्तारानें दिली असल्यामुळें प्रस्तावनेंत अधिक लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

कारागृहांतील रिकामपणांत 'स्वान्तःसुखाय' लिहिलेलीं हीं विवेचनें आणि हे अनुवाद महाराष्ट्र-रसिकांपुढें भीतभीत ठेवत आहें. महाराष्ट्र-रसिक चोखंदळ असतात अशी त्यांचि ख्याति आहे. साहित्यकृति किंवा साहित्यविवेचन सर्व बाजूंनीं कसून पाहण्याची अथवा कसून काढण्याची त्यांची परंपरा आहे. त्यांच्या

कसोटीला माझें मनन उतरणार नाहीं अशी भीतिच नव्हे, तर खात्रीहि आहे. तरीहि जें मनन मला स्वतःला मदतगार झालें आणि कांहीं स्नेह्यांना आकर्षक वाटलें तें पुस्तकरूपानें प्रकाशित करावयास हरकत नसावी असा मनाचा हिय्या केला. ह्यांपैकीं कांहीं मननें निरनिराळ्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालीं होतीं आणि संपादकांना व वाचकांना तीं आवडलीं होतीं एवढ्या प्रोत्साहनाच्या जोरावर ह्या पुस्तकाला रसिकजनांच्या सेवाकार्यावर पाठवीत आहें. माझेकडून ह्या मननाला आशीर्वाद आहेतच. वाचकांकडून जर ह्याला आशीर्वाद मिळाले तर तें मनन कृतार्थ होईल. भाग्यायत्तमतःपरम् ।

—काका कालेलकर

'सन्निधि', राजघाट, नवी दिल्ली,
विजया दशमी, ३–१०–५७.

बंगाली गीतें बंगाली पद्धतीनें वाचण्याचे नियम शेवटीं परिशिष्टांत दिले आहेत ते समजून घेऊन मगच गीतें पाठ करण्याचा विचार करावा. बंगाली गद्याच्या व पद्याच्या माधुर्याची प्रतीति त्यावांचून होणार नाहीं.

का. का.

# गीत-सूची

[कंसांतील नागरी आंकडे बंगाली गीतांजलींतले गीत-क्रमांक दर्शवितात व अिंग्रजी आंकडे अिंग्रजी गीतांजलींतले गीत-क्रमांक सुचवतात. आरंभीचे आंक या पुस्तकांतील गीतांचे पृष्ठ-क्रमांक सुचवतात. अिंग्रजी गीतांजलीशिवाय अन्य पुस्तकांत सांपडणाऱ्या अिंग्रजी अनुवादांचा निर्देशहि कंसांत आहे.]


६४ आज बारि झरे झर झर (२७)
४२ आजि झडेर राते तोमार अभिसार (२०) (23)
११५ आमार खेला जखन छिल तोमार सने (६८) (97)
२६ आमार नयन–भुलानो अेले (१३)
७४ आमार मिलन लागि तुमि (३४) (46)
१५१ आमारे जदि जागाले आजि, नाथ (८६)
१ आमि बहु बासनाय प्राणपणे चाअि (२) (14)
७१ आमि हेथाय थाकि शुधु (३१) (15)

६१ आर नाञि रे बेला, नामल छाया ( २६ ) ( 74 )
१६२ आरो आघात सञिबे आमार ( ९० )
१६७ अेञि करेछ भालो, निठुर ( ९१ ) ( Crossing 6 )
१४५ अेञि ज्योत्स्नाराते जागे आमार प्राण ( ८२ )
६८ अेञि तो तोमार प्रेम, ओगो ( ३० ) ( 59 )
१०३ अेकटि अेकटि करे तोमार ( ६४ )
१९१ अेकला आमि बाहिर हलेम ( १०३ ) ( 30 )
९४ अेबार नीरब करे दाओ हे तोमार ( ५९ )
११९ अै रे तरी दिल खुले ( ६९ )
१४८ कथा छिल अेक-तरीते ( ८३ ) ( 42 )
१०६ कबे आमि बाहेर हलेम ( ६५ )
३६ कोथाय आलो, कोथाय ओरे आलो ( १७ ) ( 27 )
८० कोन् आलोते प्राणेर प्रदीप ( ५१ )
१५७ चाञि गो आमि तोमारे चाञि ( ८८ ) ( 38 )
१३७ चिरजनमेर वेदना ( ७७ )
१५४ छिन्न करे लओ हे मोरे ( ८७ ) ( 6
३१ जगत् जुडे उदार सुरे ( १५ )
१२३ जतबार आलो ज्वालाते चाञि ( ७२ )
५१ जदि तोमार देखा ना पाञि, प्रभु ( २४ ) ( 79 )
४५ जानि जानि कोन् आदिकाल हते ( २१ )
१८० जेथाय तोमार लुट हतेछे भुबने ( ९६ )
१७७ डाको डाको डाको आमारे ( ९५ )
९१ तब सिंहासनेर आसन हते ( ५६ ) ( 49 )
८३ तुमि आमार आपन, तुमि आछ आमार काछे ( ५२ )

४८ तुमि केमन करे गान कर जे, गुणी (२२) (3)
१४० तुमि जखन गान गाहिते बल (७८) (2)
१७१ तुमि जे काज करछ, आमाय (९३)
१११ तोमार प्रेम जे बइते पारि (६६)
२१ तोमार सोनार थालाय साजाव आज (१०) (83)
१०० तोरा शुनिस नि कि शुनिस नि तार पायेर ध्वनि (६२) (45)
८७ नामाओ नामाओ आमाय तोमार (५३)
१८ प्रेमे प्राणे गाने गंधे आलोके पुलके (६)
१८३ फुलेर मतन आपनि फोटाओ गान (९७)
१३१ वज्रे तोमार बाजे बाँशि (७४)
१३ विपदे मोरे रक्षा करो (४) (Fruit Gathering LXXIX)
१७४ विश्वसाथे जोगे जेथाय विहार' (९४)
१२८ सबा हते राखवो तोमाय (७३)
१३४ सभा जखन भांगवे तखन (७६)
९७ से जे पासे एसे बसेछिल (६१) (26)
१८६ हे मोर देवता, भरिया ए देह प्राण (१०१) (65)
७७ हेथा जे गान गाइते आसा आमार (३९) (13)
५८ हेरि अहरह तोमारि विरह (२५) (84)
१९४ परिशिष्ट—बंगाली उच्चारणाचे नियम

# १

उदाहरण कांहीं केल्या सुटत नाहीं म्हणून एक मुलगी * रडत रडत आपल्या शिक्षकाला विनवते कीं ' गुरुजी, मला मदत करा, मला हें उदाहरण सोडवून द्या.' शिक्षकानें प्रेमळपणें कठोर होऊन म्हटलें,—" हें उदाहरण कांहीं तुझ्या शक्तीच्या बाहेरचं नाहीं; प्रयत्नच केला नाहींस तर तुला गणित यावं तरी कसं? उदाहरण जर खरोखर कठिणच असतं तर मीं मदत केली असती. पावलोपावलीं मदत केली तर तुझी शक्ति वाढणार कशी ? "

अशा रीतीनें कांहींच मदत मिळण्याची आशा जेव्हां उरली नाहीं तेव्हां मुलीनें स्वतःचें डोकें चालविलें, आणि उदाहरण सुटलेंही. उदाहरण सुटल्याच्या गणितानन्दांत ती पार तल्लीन होऊन गेली. नंतर ती गुरुजींकडे येऊन म्हणते, " तुम्ही किती चांगले आहांत. तुम्हीं जर माझं ऐकलं असतं आणि उदाहरण सोडवून दिलं असतं तर माझ्यांत आत्मविश्वास आला नसता आणि उदाहरण स्वतः सोडविण्याच्या आनंदाला मी पारखी झालें असतें. आतां मला अंदाज आला आहे कीं कोणत्या प्रकारचीं उदाहरणें स्वतःच सोडवावींत आणि कोणतीं उदाहरणें केव्हां तुमच्याकडे घेऊन यावींत."

---

* ' आत्मा ' हा शब्द ग्रीक वाङ्मयांत स्त्रीवाचक आहे. अरबी व फारसी भाषेंतही स्त्रीलिंगी आहे. उर्दूतही. म्हणून गाऱ्हाणें नेणारें पात्र स्त्रीवाचक घेतलें आहे.

*आमि बहु वासनाय प्राणपणे चाइ''''''''''''''''''''''''''''''''''''''''''''''''' १*

लहान मुलें पुष्कळदा आईबापांजवळ नाहीं नाहीं तें मागतात. मागितलेली वस्तु आपल्याला खरोखरी हवी आहे किंवा नाहीं ह्याचाही त्यांनीं विचार केलेला नसतो. जितक्या वस्तु मागितल्या तितक्या सगळ्या जर आईबापांनीं आणून दिल्या तर बसण्याच्या खोलींत नको असलेल्या इतक्या कांहीं वस्तूंची गर्दी होईल कीं मुलें उबग येऊन खोली सोडून पळच काढतील.

कांहीं मुलें जेवतांना दिसेल तें मागतात. आणि मग एक्तर भुकेहून अधिक खाऊन आजारी पडतात अथवा उगीचच्या उगीच मागितलेल्या पदार्थांचा ढीग ताटामध्यें सोडून उठून जातात. आणि स्वतःच स्वतःला कंटाळून अप्रसन्न होतात.

पण लहान मुलांना कां हसा? मोठ्या माणसांचें देखील मोठ्या प्रमाणांत असेंच असतें. ईश्वराकडे काय मागावें आणि काय न मागावें, आणि आपल्याला खरोखर काय हवें आहे ह्याचा अंदाजच मनुष्याला नसतो. आणि जोंवर स्वतःचें जीवन, आणि त्याच्या खऱ्या आकांक्षा वगैरेंचा परिचय झालेला नसतो तोंपर्यन्त मनुष्याच्या मागणींत निश्चिततताही नसते आणि उत्कटताही नसते. अशांचें जीवन उथळ आणि विस्कळित असतें.

अशा भक्ताला ईश्वर जेव्हां हाताशीं धरून तयार करीत असतो तेव्हां त्यानें मागितलें म्हणून चट्‌दिशीं दिलें असें तो करीत नाहीं. भक्तानें बोलविलें म्हणून लागलीच हजर झाला असेंही होत नाहीं. ईश्वराचा जणुं आग्रहच असतो कीं ज्याला आपला म्हटला तो आपल्या स्वीकाराला पात्र झालाच पाहिजे. म्हणून प्रेमामुळेंच ईश्वर कडकपणा धारण करतो आणि काय इच्छावें आणि काय इच्छूं नये हें भक्ताला दृढपणें शिकवीत असतो. आजारी मूल कितीही रडलें तरी ज्याप्रमाणें शहाणी आई मुलाला अपथ्य करूं देत नाहीं, त्याप्रमाणें ईश्वरही भक्ताच्या वेड्यावाकड्या मागण्या पुरवीत नसतो. उलट ज्या वस्तु त्याला पथ्यकर असतात—आणि ज्या मुबलक दिल्या गेल्या आहेत, त्यांविषयीं भक्ताचे ठायीं योग्य कदर नसल्यास त्या साध्या आणि सु-पाच्य आहाराची गोडी त्याला तो लावून देतो.

हें सर्व ओळखल्यानंतर भक्त आपण करून घेतलेल्या गैरसमजाविषयीं पश्चात्ताप करतो आणि ईश्वराच्या कठोर कृपेबद्दल कृतज्ञताच व्यक्त करतो. अशा प्रकारच्या भक्ताची वाणी पुढील भजनांत व्यक्त केलेली आहे.

आमि बहु वासनाय प्राणपणे चाइ,
वंचित करे बाँचाले मोरे ।
ए कृपा कठोर संचित मोर
जीवन भरे ।
ना चाहिते मोरे जा करेछ दान,
आकाश आलोक तनु मन प्राण,
दिने दिने तुमि नितेछ आमाय
से महादानेरइ जोग्य करे
अति-इच्छार संकट हते
बाँचाये मोरे
आमि [1]कखनो बा भुलि, कखनो बा चलि
तोमार पथेर लक्ष्य धरे ;
तुमि निष्ठुर सन्मुख हते
जाओ जे सरे ।
ए जे तव दया जानि जानि हाय,
[2]निते चाओ [3]ब'ले फिराओ आमाय,
पूर्ण करिया लबे ए जीवन
तव मिलनेरइ जोग्य करे
आधा-इच्छार संकट हते
बाँचाये मोरे ।

" भगवंता, मी जितक्या म्हणून वासनांना बळी पडून तुला गाऱ्हाणें घातलें त्या सगळ्या वासना जर तूं तृप्त केल्या असत्यास तर एव्हांना माझें वाटोळेंच झालें असतें. कठोर कृपेनें तूं माझें ऐकिलें नाहींस आणि मला वांचविलेंस हेंच

---

कखनो—१ कांहीं क्षण, केव्हां केव्हां. २ निते चाओ-स्वीकार करूं इच्छितोस.
३ ब'ले-म्हणून.

मोठें धन माझ्या जीवनाला परिपूर्ण करीत आहे. आज मी अभिमानानें माझ्या मनाला सांगूं शकतों कीं, ईश्वरानें मला धन्य केलें आहे. माझ्याच वेड्या वाकड्या वासनांच्या भाराखालीं चिरडून जात असतां त्यानें मला वांचविलें आहे.

जीवनाच्या प्रारंभींच ईश्वरानें मला न मागतां सर्वोत्कृष्ट देणग्या देऊन ठेविल्या आहेत. पण त्यांची मला कदर कोठें होती ? हळुहळू जेव्हां इतर गोष्टींचा मोह उतरला तेव्हांच ह्या साध्या दिसणाऱ्या गोष्टी किती महत्त्वाच्या आणि आनंद-दायक आहेत हें मला उमजूं लागलें. हें अनंत आकाश, त्यांत भरलेला हा प्रसन्न प्रकाश, सर्व प्रकारचा पुरुषार्थ करण्याला आणि सर्व प्रकारचे सात्त्विक आनंद अनुभवण्याला पात्र असें हें शरीर, या आकाशांत सर्वत्र संचार करणारें आणि प्रकाशाला पिऊन उरणारें हें माझें मन आणि वाटेल तो पुरुषार्थ करण्याची हिंमत बाळगणारा माझा प्राण ह्याहून अधिक तें मला काय हवें ? ह्या सर्व श्रेष्ठ गोष्टी देतांना–ह्यांचा पुरवठा करतांना भगवंता, तूं कोठेंही कमतरता ठेविली नाहींस. उलट ह्या तुझ्या महादानाला योग्य करण्यासाठीं धीर धरून मला तूं हळुहळू घडवीत आहेस. आणि अति-इच्छेच्या भस्मरोगापासून मला वांचवीत आहेस.

( **भस्मरोग** :—जेवढें खावें तेवढें भस्म व्हावें ; अंगीं मुळींच लागूं नये असा रोग. )

तुझ्या दर्शनासाठीं मी निघालों आहें. कधीं शिथिलता येते आणि यात्रेचा उद्देशही मी पार विसरून जातों. कधीं आठवण होते आणि मी सैरावैरा धावूं लागतों. तूं असतोस जवळच. पण जोंवर माझ्या यात्रेमध्यें निश्चितता, एकाग्रता आणि उत्कटता दिसत नाहीं तोंवर तूं कठोरपणें गुपचुप बाजूला सरतोस आणि माझी यात्रा चालूच राहते. तुला भेटण्याची मला जेवढी तळमळ आहे त्यापेक्षां मला जवळ करण्याचा तुझा कळवळा अधिक आहे. तरीही स्वतःचें वात्सल्य देखील बाजूला सारून मला योग्यप्रकारें तूं तालीम देत आहेस. आणि मिळमिळीत भक्ति, दुर्बळ तळमळ, आणि अनिश्चित साधना ह्यांच्या संकटांतून मला वांचवून तुझ्या मीलनाची, तुझ्या प्राप्तीची – तुझ्या दर्शनाची – योग्यता माझ्यांत उत्पन्न करीत आहेस. धन्य आहें मी कीं, माझें कांहींच चालत नाहीं. माझी मागणी कांहींही असो, जें माझ्या खरें हिताचें तेंच नेमकें तूं देत असतोस.

भगवंता, तुझी कृपा अपार आहे. जें कांहीं माझ्या हिताचें असेल तेंच तूं दृढपणें घडवून आणतोस. सद्‌गुरु माउली तूंच आहेस. ”

टीप १ अति इच्छार संकट ह'ते बांचाये मोरे
आधा इच्छार संकट ह'ते बांचाये मोरे

भगवंता, काय मागावें, किती मागावें आणि कसें मागावें, ह्याचा सुमारच मला नसल्यामुळें मी आपला मागत सुटलों. पण मी नादान असलों तरी दान देणारा तूं तसा नाहींस. तूं मला अतिइच्छेच्या संकटांतून वांचवितोस आणि अर्धवट इच्छेच्या – दुर्बळ, निष्प्रयोजन आणि विस्कळीत – इच्छांच्या संकटांतूनही मला वांचवितोस ; मीं मागितलेलें मला न देतां जें माझ्या हिताचें आहे तेंच मला देतोस. योग्य मुहूर्त पाहून ऐनवेळीं देतोस, एवढेंच नव्हे तर दिलेल्याचा उत्तम उपयोग करण्याची पात्रता माझ्यांत उत्पन्न करून मगच मला द्यावयाचें तें देतोस. म्हणतात ना – पुत्र कुपुत्र होऊं शकतो, पण माता कुमाता होऊं शकत नाहीं – ' कुपुत्रो जायेत, क्वचिदपि कुमाता न भवति. '

मुलाचें पोट भरलें आहे असें पाहतांच ' पुरे, आतां ऊठ ' असें म्हणून आई मुलाला पानावरून उठविते. ह्या कठोरपणांत वात्सल्य थबथबलेलें असतें. आपली आवश्यकता किती आहे ह्याची कल्पना न करतां मागत सुटणें ही अति आशा आहे – अति इच्छा आहे. ह्या हांवरेपणाला आळा घालण्याचें काम ईश्वरानें केलें म्हणून भक्त कृतज्ञतापूर्वक ईश्वराचे आभारच मानतो.

दुसऱ्या बाजूनें आपल्याला काय हवें ह्याची नीटशी कल्पना केल्यावांचून मनुष्य कांहींतरी मागत सुटतो. आंतून खरोखर तळमळही नसते आणि भूकही नसते. फक्त मागायचें म्हणून मागतो. जें मागावयाचें त्याचा उपयोग करण्याची योग्यता असली पाहिजे. तापलेली जमीन – उन्हाळ्याचे चार महिने खरखीतपणें तापलेली जमीन – जेव्हां निसासे टाकीत आकाशाकडे वृष्टीची याचना करते तेव्हां त्या याचनेंत जी एकाग्रता असते, उत्कटता असते, तिच्या योगानें तिची ती मागणी अपरिहार्य ठरते आणि मग परमपिता आकाशाला ती मागणी मान्य केल्यावांचून गत्यंतरच उरत नाहीं. जो कसरत केल्यावांचून, उपवास केल्यावांचून, निदान बराचसा वेळ जाऊं दिल्यावांचून, उगीच खावयास मागतो, त्याची ही भरलेल्या पोटीं केलेली खाऊची मागणी खरोखर व्यर्थ असते, अळणी असते ; ह्या निर्जीव मागणीला — ' आधा ' इच्छेला विश्वंभर दाद देत नाहीं ही त्याची काय थोडीथोडकी कृपा आहे ? भरल्यापोटीं मुलगा मागतो तेव्हां पांचपन्नास वस्तु मागतो आणि सगळ्याच थोड्या थोड्या चाखून वांकडें तोंड करून पानावरून उठून जातो.

त्याच मुलाला जेव्हां चरचरीत भूक लागलेली असते तेव्हां कोंड्याची भाकर त्याला दिली तरी ती त्याला गोड लागते, एवढेंच नव्हे तर त्यांतून तो शरीराला हवी असलेली सर्व प्रकाराची पुष्टि अधिकाधिक मिळवितो.

ह्यासाठीं जगन्माता आपल्या लेकरांना खऱ्या भुकेवांचूनच्या मिळमिळीत मागणीपासून देखील वांचविते आणि हांवरेपणानें वाढविलेल्या अतिइच्छेच्या संकटापासूनही वांचविते.

टीप २ ना चाहिते मोरे जा करे छो दान
आकाश, आलोक, तनु, मन, प्राण.

कुराणामध्यें अल् रहमान म्हणून एक सूरत आहे. तीमध्यें मनुष्याला ईश्वरानें दिलेलीं निरनिराळीं वरदानें—न्यामतें ह्यांचें वर्णन करून विचारलें आहे, ईश्वराचे इतके निरनिराळे कृपाप्रसाद स्वीकारीत असतां तूं त्याचा इन्कार कसा करूं शकशील ? असें सांगतात कीं, कुराणांतील हा भाग जेव्हां यक्ष-गंधर्वांनीं, जिन्न आणि फिरस्त्यांनीं ऐकला तेव्हां ते सर्व भक्ति-गद्‌गद होऊन रडूं लागले.

ईश्वरानें जें दिलें आहे तें इतकें मुबलक आहे आणि न मागतां तें दिलें आहे कीं दाता ईश्वर आहे हें आपण विसरून जातों आणि ह्या उत्तम बक्षिसांविना आपण क्षणही जगूं शकणार नाहीं हेंही विसरल्यामुळें ह्या महादानाचें महत्त्वही आपल्या दृष्टिआड झालें आहे. तसें नसतें तर एवढा कृपाप्रसाद अखंड अनुभवीत असतां मनुष्याला ईश्वराची भक्ति केल्यावांचून राहवेल तरी कसें ?

मनुष्यप्राणी फारसा कृतज्ञ नसेल ; पण तो कृतघ्न आहे असेंही म्हणतां येत नाहीं. त्याचा मुख्य दोष म्हणजे त्याचा प्रमाद आणि त्याची गफलत हाच आहे. म्हणूनच त्याला वारंवार ह्या सर्व गोष्टींची आठवण करून द्यावी लागते.

जी गोष्ट सर्वांनाच मिळाली, मनसोक्त मिळाली, अखंड आणि अखूट मिळाली तिचें महत्त्व माणसाला वाटेनासें होतें. लहान मुलाला सर्वप्रकारें सांभाळणारी त्याची आई मुलाला इतकी जवळची, नेहमींची आणि म्हणून खेळीमेळीची वाटते कीं आई ही आहेच, तिचा विचार तो काय करावयाचा ; असेंच मुलाला वाटतें. आई मरून गेल्यानंतरच आई हें सर्वश्रेष्ठ दैवत आहे, आईच्या त्यागापुढें इतरांचे सर्व त्याग तुच्छ आहेत हें मनुष्याला पटूं लागतें. पण उशीरा पटलेली गोष्ट काय कामाची ? आईच्या जिवंतपणीं तिची उपेक्षा आणि मेल्यानंतर भक्ति-पूजा हा मुलांचा जणुं स्वाभाविक धर्म होऊन बसला आहे !

आई गेल्यानंतर मुलाला आईचें महत्त्व पटतें. पण देवानें दिलेल्या सर्वश्रेष्ठ गोष्टी कधीं संपणाऱ्या नसल्यामुळें त्यांचें महत्त्व विरह-दीक्षेनें देखील ध्यानीं यावयाचें नाहीं. विचार करूनच तें महत्त्व आपल्याला पटवून घेण्याजोगें आहे.

रविबाबूंनीं अत्यंत साध्या गोष्टी ह्या महादानाच्या यादींत ग्रथित केल्या आहेत. आकाश, प्रकाश आणि तनु – मन – प्राण.

आतां हें **आकाशच** पहा. सर्वत्र, सर्वव्यापी विभु आहे. विष्णूचाच अवतार तो! पृथ्वीला आपल्या मांडीवर घेऊन तो खेळवीत आहे आणि अखंड अनिमिष लोचनानें तिच्या कल्याणाची चिंता वाहत आहे. हें आकाश जर असें पारदर्शक नसतें तर दिवसा प्रजांचा प्राणरूप सूर्यनारायण आपल्याला दिसलाच नसता. आणि जणुं काय स्वतःचें अनंत हें नांव सार्थ करण्यासाठीं रात्र पडतांच हें आकाश आपल्याला अनंतकोटि ब्रह्मांडांचा साक्षात्कार करून देतें. मनुष्याला त्याची तुच्छता पटवून देण्याला हें रात्रीचें आकाशदर्शन पूर्णपणें समर्थ आहे. आणि मनुष्य जेव्हां या विस्तारापुढें स्वतःची तुच्छता अनुभव करून अगदीं पाणी पाणी होऊन जातो, तेव्हां तें आकाश पुन्हा त्याला म्हणतें, अरे वेड्या, तुझ्या लहानशा दोन बुबुळांमध्यें हें एवढें अनंत विश्व मावूं शकतें आणि ह्याचें तूं दर्शन आणि ध्यान करूं शकतोस ही तुझी थोरवी काय कमी आहे! थोडासा अंतर्मुख होऊन हृदयाकाशांत विहार करशील तर तुझ्या अनुभवास येईल कीं त्याही आकाशाचा विस्तार आणि त्याची खोली माझ्याहून कमी नाहीं. हृदाकाश आणि महदाकाश ह्या दोन साम्राज्यांची तुला मिरास मिळाली आहे. आणि तरीही स्वतःला तुच्छ समजतोस?

आपण सर्व शरीरशुद्धीसाठीं, गृहशुद्धीसाठीं कितीतरी प्रयत्न करीत असतों. पृथ्वी, आप, तेज आणि वायु ह्यांच्या साहाय्यानें आपणास सर्व कांहीं शुद्ध करतां येतें. पण जी शोधनशक्ति आकाशाजवळ आहे ती ह्या परिमित भूतांजवळ नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. आकाश हें जड आणि चेतन ह्यांच्यामधील चिरंतन दुवा आहे. अग्नि पावक खरा पण अशा कितीतरी विषारी वस्तु आहेत कीं ज्या त्याला जाळतां येत नाहींत. वायुही पवन आणि पावन खरा पण त्याची पोंच कोठपर्यंत? ह्या पृथ्वीच्या आसपास शेंदोनशें योजनें किंवा त्याच्या दुप्पट चौपट त्याचा विस्तार म्हणतां येईल. त्याच्यापुढें वायूची गति नाहीं. याच्या उलट आकाश तर 'तद् धावतो अन्यान् अत्येति तिष्ठत्'. संकुचित मनोवृत्तींत जे कांहीं कुजके विचार येतात ते अनंत आकाशाकडे पाहून विरघळून जातात. निराशेवर जर एखादें औषध असेल

तर तें आकाशदर्शनाचेंच आहे. चारी बाजूंनीं उंच उंच भिंतींच्या कारावासांत सापडलेल्या मानवीप्राण्याला स्वातंत्र्याचें दर्शन होतें, आकाशाला पाहूनच. कितीही विघ्नें येवोत, कितीही काळाकुट्ट आकार धारण करोत, शेवटीं तीं जाणारच, वितळणारच, पाहतां पाहतां लुप्त होणारच असें आश्वासन देण्यासाठींच आकाश निरनिराळ्या मेघांचा खेळ करून दाखवीत असतें. तुफान, आँधी, पर्जन्य ह्यांचा जोर कितीही असला तरी ह्या वस्तु अल्पजीवी आहेत, शान्ति हीच काय ती स्थायी वस्तु आहे, ह्या गोष्टीचा विश्वास दृढ करण्याचें काम अगदीं प्राचीन काळापासून हें सनातन आकाशच करीत आलें आहे.

आणि विश्वव्यापी प्रकाशाच्या लहरींना कोठूनही कोठेंही नेऊन पोचवण्याचें काम आकाशखेरीज कोणाला करतां येईल ? असें हें कर्ता असूनही अकर्ता, सर्वसमर्थ असून अलिप्त, तटस्थ असून मंगलमय असें आकाश ईश्वरानें आपणाला दिलें आहे. ह्याहून अधिक भाग्य तें कोणतें ? हें आकाश आपल्याला अंतर्बाह्य, कधींच सोडीत नाहीं. सर्वत्र आपल्याबरोबर असतें. आणि तें आहे म्हणूनच ह्या अवकाशाच्या जोरावर आपला जीवनव्यापार चालतो. एक परीं विचार करतां हें आकाश भगवंताचा कृपाप्रसाद आहे, तर दुसऱ्या दृष्टीनें पाहतां त्या भगवंताची प्रत्यक्ष पण सूक्ष्मातिसूक्ष्म अशी विभूतिच आहे.

**प्रकाश** हा ईश्वराचा असाधारण प्रसाद आहे हें ओळखूनच प्राचीन ऋषींनीं ज्ञानाला उपमा दिली ती प्रकाशाची. ऋषींची सर्वोच्च प्रार्थना हीच कीं आम्हांला अंधकारापासून ज्योतीकडे—प्रकाशाकडे घेऊन जा. हा प्रकाशच आपल्याला सर्व विश्वाचा साक्षात्कार करून देतो. हा प्रकाश आहे म्हणूनच विश्वाचा आनंद आपण उपभोगूं शकतों. ह्याला जेव्हां रसिक व्हावेंसें वाटतें तेव्हां तो अनेक रंगांनीं नटतो आणि आपल्यापुढें इन्द्रधनुष्याचें रूप धारण करतो. रंगीबेरंगी फुलें, विविधवर्णी पक्षी, भूगर्भातील माणिक-पाचू-वैडूर्य आदि रत्नें, समुद्रांतील मासे आणि उभय संध्याकाळचे ढग ह्या सर्वांना मनसोक्त नटवून प्रकाश स्वतः तेजस्वी वैराग्य धारण करून लोकांना सांगत असतो, वैराग्य म्हणजे हिरमुसलेली वृत्ति नव्हे, उलट वर्ण-समन्वयाचा तो तेजस्वी व तटस्थ साक्षात्कार आहे.

ह्या विश्वामध्यें जें जें म्हणून कांहीं गतिमान् आहे त्या सर्वांची मर्यादा प्रकाशानें ठरविली आहे. एका सेकंदामध्यें एक लक्ष ऱ्यांशीं हजार चारशें वीस मैल धावणाऱ्या प्रकाशाला मागें टाकणारी एकही पार्थिव वस्तु नाहीं. विजेचा प्रवाह असो किंवा विद्युत् अणूचा वेग असो तो प्रकाशगतीच्या आंतच असतो.

प्रकाशाचा पार्थिव उपयोग सांगण्यासाठीं फोटोग्राफीपर्यन्त जाण्याची जरूरी नाहीं. प्रकाश आहे म्हणूनच वनस्पति जगूं शकते. प्रकाश आहे म्हणूनच धान्यें पिकूं शकतात. प्रकाश आहे म्हणूनच मनुष्यांमध्यें प्राणशक्ति खेळूं शकते. ह्या सर्व गोष्टी आतां सर्व-विश्रुत झाल्या आहेत. आकाशाला जें मुख्य काम करावें लागतें तें प्रकाशाचें वाहक म्हणून.

आणि मनुष्याच्या हृदयामध्यें जो प्रकाश विराजमान असतो तो ह्या बाह्य प्रकाशाहून भिन्न असतो असें प्राकृत लोकांनींच म्हणावें. अंतःप्रकाश आणि बहिःप्रकाश एकाच परम-ज्योतीच्या दोन विभूति आहेत. मनुष्य जेव्हां ध्यानांत बसून दृष्टि उलटी करतो, तेव्हां त्याला जो प्रकाश दिसतो, तो कांहीं बाहेरून आलेला नसतो. अरणीचें घर्षण पुरेसें झालें म्हणजे जसा त्यांतून अग्नि प्रगट होतो त्याचप्रमाणें ध्यानक्रिया अमुक कोटीपर्यन्त पोंचली म्हणजे अंतर्मुख दृष्टीला ज्योतीचें दर्शन आपोआप घडतें. आणि हें दर्शन एकदा घडलें म्हणजे मनुष्याला आत्मविश्वास वाटूं लागतो, कीं केव्हांना केव्हां आपणाला आत्मसाक्षात्कार हा होणारच. प्रकाश ही त्या परमात्म्याचीच एक प्राथमिक विभूति आहे.

आणि हें **शरीर!** संतकवींनीं ह्याची निंदा थोडी थोडकी केली नाहीं, ह्याला जीवात्म्याचा तुरुंग म्हणून अगदीं तुच्छ लेखिलें आहे. आत्म्याचा शत्रु म्हणून ह्याची अवहेलना केली आहे. पण ह्या शरीराहून आत्मप्राप्तीचें दुसरें साधन आपल्याजवळ आहेच कोठें ?

तसें पाहिलें तर हा देहच आपला परम आप्त. जन्मापासून मरणापर्यंत हें शरीर नेहमीं आपणाबरोबर राहणारें. आपला सर्व वेडेपणा, सर्व अत्याचार निमूटपणें सहन करून आपली अखंड सेवा करणारें. पतिव्रता स्त्रीची जर आपण एवढी महती गातों तर, तिच्याहून अनंतपटीनें निष्ठा दाखविणाऱ्या ह्या कायेची महती किती म्हणून सांगावी !

आपण लाखो आणि कोट्यवधि रुपये खर्च करून प्रयोगशाळा बांधतों आणि तेथें प्रयोगाची सूक्ष्मातिसूक्ष्म, समर्थातिसमर्थ, यंत्रें आणि उपकरणें ठेवितों. ह्यांतील एकेक यंत्र म्हणजे त्या त्या राष्ट्राच्या अभिमानाचा विषय. माउंट विल्सन येथील दुर्बीण अमेरिकेला सर्व जगांत श्रेष्ठ पदवी मिळवून देते, तर ती दुर्बीण वापरण्याची शक्ति ज्या मानवी डोळ्यामध्यें आहे त्या डोळ्याची आणि त्या डोळ्यावाटें आपला

व्यवहार करणाऱ्या शरीरयंत्राची महती किती वर्णावी! हें एक शरीर देऊन ईश्वरनें मनुष्याला ह्या विश्वाचा सम्राट् बनविलें आहे. जीभ म्हणजे लवलवणारा लहानसा मांसाचा तुकडा; पण हिची स्वादशक्ति किती सूक्ष्म आहे! आणि स्मरणशक्तिही कांहीं कमी नाहीं. अगदीं लहानपणीं एखादी वस्तु चाखली असली तर तिच्या स्वादाचें स्मरण जिभेजवळ आमरण टिकतें. जिभेबरोबर कंठ घ्या. ह्यांना जगांतल्या कितीतरी भाषा आपल्याशा करतां येतात. आणि नादब्रह्माचें आकलन करण्यांत कानाशीं ह्यांची जर साथ नसती तर जीवन म्हणजे एक फसगतच झाली असती. वाणी आहे म्हणून तर कोट्यवधि माणसांचा परस्पर सहकार शक्य झाला आहे. डोळे, कान, नाक, जीभ आणि त्वचा ह्यांच्याहून अधिक शक्तिशाली बाह्य-करणें उपकरणें अजून तयार झालीं नाहींत आणि ह्यांच्या जोडीला किंवा ह्यांच्या मदतीनें स्वतःचें काम करणारें अंतःकरण घेतलें तर आश्चर्यमुग्ध होऊन म्हणावें लागतें कीं ईश्वराच्या खालोखाल जर कोणाचें राज्य चालत असेल तर तें अंतःकरणाचें – मनाचेंच होय.

कोणत्याही पार्थिव वस्तूला प्रकाशाचा वेग मागें टाकतां येत नाहीं. पण मनोवेगापुढें प्रकाशाचा वेगही मंद ठरतो. प्रकाशाच्या रथावरून विश्वविहार करणाऱ्या देवतांनाही मन हसतें. कारण मनोरथांना अगम्य असें कांहींच नाहीं. त्यांच्यापुढें स्थळ-काळाची सीमाच नाहीं. **गच्छन् मनोरथोऽस्माकं रामः ।**

एका भक्तानें आपली एक कुचंबणा व्यक्त केली आहे. गुरु आणि गोविंद दोन्ही माझ्यापुढें उभे आहेत. आतां कुणाला नमस्कार करूं? कुणाचे पाय धरूं? दुसऱ्याच क्षणीं त्यानें ठरविलें, 'ईश्वर तर सर्वकाळ आहेच. पण आजवर मिळाला नव्हता. गुरूनीं कृपा केली म्हणूनच ह्या ईश्वराची प्राप्ति झाली तेव्हां तेच माझ्या वांट्याला श्रेष्ठ. त्यांचेच पाय धरले पाहिजेत.' ह्याच न्यायानें जीवनामध्यें ज्या ज्या गोष्टींची आपण अभिलाषा करतों, मग त्या ऐहिक असोत किंवा पारलौकिक असोत, बंधनकारक असोत किंवा मोक्षदायक असोत, ह्या मनाच्या साहाय्यानेंच त्या मिळावयाच्या आहेत. अगदीं मुक्तीलाच संतुष्ट करावयाचें असेल तरी ती देवता शेवटीं मनाचा बळी घेतल्यावांचून प्रसन्न होत नसते. ह्याहून कमी योग्यतेचा बळी तिला चालत नसतो. केवढे हे मनाचे उपकार कीं, प्रथम सर्वप्रकारें कष्ट सोसून आपल्याला भगवंताच्या दरवाज्यापर्यंत घेऊन जातें आणि तेथें स्वतःचा बळी देऊन मंदिराचे दरवाजे आपल्यासाठीं उघडून देतें. हें एक अंतःकरण

असलें तर दुसरें कोणतेंच उपकरण नको. प्रयोगपद्धतींतच बाह्य उपकरणांचें महात्म्य आहे. योगपद्धतींत फक्त ह्या एका अंतःकरणाच्याच प्रेमशक्तीवर आणि ध्यानशक्तीवर आधार असतो. असें हें मन मनुष्याला देऊन ईश्वरानें त्याला जवळ जवळ आपला साथी बनविला आहे. ईश्वर सृष्टि-रचनेची लीला करतो आणि मनुष्य ह्या सृष्टीचें रहस्य ओळखून जवळ-जवळ सृष्टि-निर्मितीचाच आनंद उपभोगतो. ही मननशक्ति जर मनुष्यांत नसती तर मंत्रांत कोणतें सामर्थ्य आलें असतें? मननात् त्राणनात् मन्त्रः सर्व भौतिक शक्ति आणि अति-भौतिक शक्ति ह्या मनाचेच खेळ होत. बुद्ध भगवानांनीं धर्मरहस्याचा प्रारंभच ‘मनोपुब्बं गमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया’ ह्या वचनापासून केला आहे. एका समर्थ रामावांचून कुणालाही शरण न जाणारे रामदास त्या रामभक्तीच्याच साधनेसाठीं ह्या मनाची खुशामत करतात आणि त्याला परोपरीनें आळवितात. अध्यात्माचा तराजू हातीं घेऊन बसलेले प्राचीन प्रयोगवीर म्हणतात ‘चित्तं एव हि संसारः’.

असें हें मन आपल्याला दिल्यानंतर ईश्वरानें आपल्याला द्यावयाचें बाकी काय ठेविलें? रावणानें आपलीं दाही शिरकमळें महादेवाच्या चरणीं वाहिलीं. तेव्हां महादेवानें त्याला आपलें आत्मलिंग काढून दिलें. आपण कोणचीही तपस्या केली नसतांना एवढेंच नव्हे तर तोंडानें मागण्याच्यापूर्वींही हें सर्वसमर्थ मनोलिंग विश्वस्वामीनें आपल्याला देऊन टाकलें आहे. आणि त्याच्याशीं कसेंही खेळलों तरी आपल्याकडून तो तें काढून घेत नाहीं. ह्याच्याहून भगवंताची मोठी कृपा ती कोणती?

आकाश ज्याप्रमाणें जड आणि चेतन ह्यांच्यामधील दुवा आहे, प्रकाश ज्याप्रमाणें चैतन्याचा प्रतिनिधि आहे, शरीर ज्याप्रमाणें चैतन्याचें अधिष्ठान आहे आणि शेवटीं मन ज्याप्रमाणें चैतन्यप्राप्तीचें समर्थ साधन आहे, त्याचप्रमाणें आपला हा प्राण सर्व जडाचें सार असूनही तो प्रत्यक्ष चैतन्याचेंच सामर्थ्य आहे. प्राण म्हणजेच चित्‌शक्ति.

भौतिक आणि रासायनिक शक्तीची परमावधि केली तरीही त्यांतून प्राण-शक्ति निघूं शकत नाहीं. कोण जाणे कोठून ती आपोआप जड वस्तूंत येऊन बसते. सर्व गति आणि प्रगतीचें रहस्य ह्या प्राणावर अवलंबून असतें. प्राण नसेल तर सर्व क्रिया व्यर्थ होतात. आणि जर प्राण तेजस्वी आणि समर्थ असेल तर हीन क्रियादेखील शुद्ध क्रिया होतात आणि जें हातीं धरावें त्याचें सोनें होतें. जें कांहीं सामर्थ्य जगांत आहे तें प्राणाचेंच. ज्याप्रमाणें चाकांतील मधल्या गड्डयामध्यें सगळ्याबाजूनें आऱ्या येऊन बसतात

त्याप्रमाणें हें सर्व विश्व प्राणामध्यें आपली मजबूती मिळवितें. प्राणशक्ति हीच चित्शक्ति आहे. ती शक्ति आहे म्हणूनच आपल्याला आपलें जीवन चालवितां येतें आणि कृतार्थही करून घेतां येतें. ज्याप्रमाणें श्रीरामचंद्रानें श्रीहनुमानाला आपल्या मागें ठेविलें आणि जगाच्या उद्धाराविषयीं निश्चिन्त होऊन आपलें अवतारकृत्य संपविलें त्याचप्रमाणें विधात्यानें हा सर्व विस्तार विस्तारून तो रहाटण्याची कामगिरी जणुं प्राणाकडे सोंपविली आणि तो विश्वकर्ता निश्चिन्त झाला. हा प्राण प्रत्येक शरीरांत, प्रत्येक हृदयांत भगवंतानें ठेवून दिला आहे. आतां ह्यानंतर त्याच्याकडून मिळण्याचें उरलेंच काय ! भगवंतानें प्राण्याला प्राण दिला त्यांतच सर्व दिलें.

# २

गणिताचेंच उदाहरण पुन्हा घेऊं. ज्यांना गणिताची गोडी आहे ते कठिण उदाहरण येतांच कच खात नाहींत. आपल्याकडून तें सोडविण्याचा शक्य तों प्रयत्न करतात. अशा प्रयत्नान्तीं गणित जरी सुटलें नाहीं तरी गणिताचें स्वरूप बाल्बाल समजतें, त्यामध्यें पेंच कोठें आहे हेंही ध्यानांत येतें आणि कोणती मदत मिळाली असतां बाकीचें आपल्याला सोडवितां येईल ह्याचाही अंदाज त्याला येतो. गणित सोडविण्यापूर्वी गणित समजणें अत्यंत जरूरीचें असतें. असेंही म्हणतां येईल कीं, गणित सोडविण्यापेक्षां गणित समजणेंच विशेष महत्त्वाचें आणि उपयोगी असतें. स्वप्रयत्नानें जर गणित समजलें तरच गणित सुटल्याचा खरा आनंद अनुभवितां येतो. ह्यासाठीं ज्ञान-रसिक गणितोपासक प्रथम आपल्या प्रयत्नाची शिकस्त करतो. कांहीं केल्या गणित सुटत नाहीं अशी खात्री झाली म्हणजेच गुरुजीजवळ जाऊन त्यांची मदत मागतो. जडपणें असें म्हणत नाहीं कीं, गुरुजी तुम्हींच आतां हें सोडवा. तो म्हणतो प्रयत्न करतां करतां ह्या गणिताची मख्खी कुठें आहे त्याची मला कल्पना आली आहे. तेव्हां ह्या एका बाबतींत मला थोडीशी मदत करा म्हणजे बाकीचें मी पाहून घेईन.

समजा गुरुजींनीं तेवढी मदत केली पण ती पुरेशी नाहीं झाली तर विद्यार्थी पुन्हा गुरुजीकडे येऊन म्हणेल, तुम्हीं दिलेल्या सूचनेच्या मदतीनें इथवर येऊन पोंचलों आहें

आतां पुनः अडचण उभी झाली आहे. इथें देखील फक्त एकच गांठ सोडवून द्या. पुढचें मी पाहून घेईन.

हें काय सांगितलें पाहिजे कीं गुरूला असेच विद्यार्थी आवडतात? असे विद्यार्थी गणिताला टाळूं पाहात नाहींत; गणितानंदाचा पूर्ण अनुभव घेऊं पाहतात. आणि विशेष म्हणजे असे विद्यार्थीच गुरुच्या अल्पस्वल्प मदतीची देखील पूर्ण कदर करूं शकतात आणि त्यांच्या गणितशक्तीला पूणपणें ओळखून त्यांचे खरे भक्त बनतात. ज्यानें स्वतःचा प्रयत्न केला नाहीं तो गणितही समजूं शकत नाहीं आणि गुरूच्या सामर्थ्याचेंही त्याला आकलन होत नाहीं.

जो गणिताला कंटाळला, जो गणितांतील गांठी टाळूं पाहतो त्याला गणिताचा साक्षात्कार होत नाहीं.

जी गोष्ट गणिताची तीच जीवनाची. जो मनुष्य जीवन टाळूं पाहतो, विरक्ति किंवा निवृत्तीच्या नांवानें जीवन-विन्मुख होऊं पाहतो आणि अनन्य शरणागताचा आव आणून आळसाचेंच पोषण करतो, त्याची गुरुभक्ति किंवा ईश्वरनिष्ठा त्याला पोषक होत नाहीं. ईश्वराजवळ मागावें पण तें जरूर असेल तेवढेंच मागावें.

जेव्हां द्रौपदीला तिच्या सासऱ्यानें तिच्या चारित्र्याची उज्ज्वलता पाहून खूष होऊन 'वर माग' असें सांगितलें, तेव्हा तिनें जास्तींत जास्त मागण्याचा लोभ न करतां कमींत कमी आणि अत्यावश्यक अशीच वस्तु मागून घेतली. ती म्हणाली, द्यूतांत सांपडून माझे पति दास झाले आहेत, त्यांना तुम्ही मुक्त करा म्हणजे बाकीचें आम्हांला जें कांहीं हवें आहे तें आम्ही आमच्या पराक्रमानें मिळवूं. जेव्हां तिला अधिक माग असा आग्रह करण्यांत आला तेव्हां तिनें मानीपणानें उत्तर दिलें कीं, मी लोभी-पामर नाहीं, क्षत्रियकन्या आहें, क्षत्रियपत्नी आहें. मागितल्यानें मिळतें तें आपलेंसें होत नाहीं आणि तें सत्त्वाचें हरण करतें. म्हणून मी अधिक मागणार नाहीं.

देवाजवळ झालें म्हणून तरी काय? जेवढें आवश्यक असेल तेवढेंच मागावें. सर्वच आयतें मिळाल्यानंतर जीवन-रस तो काय राहिला? जीवन हें नित्य नव्या नव्या रूपानें प्रगट होणारें एक कोडें आहे, उखाणा आहे. तें स्वतः सोडविण्यांतच त्याचा आनंद असतो. फार झालें तर कोणी उखाणा घातला असतां उत्तर कशापैकीं 'पंकी' आहे एवढेंच आपण विचारतों. तशीच भगवंताजवळ आवश्यक तेवढीच मदत मागितली तर ती शोभते; कारण तेवढ्यानें जीवनानंदाचा विरस होत नाहीं आणि पराक्रम मावळत नाहीं.

कवि म्हणतो :—

विपदे मोरे रक्षा करो
अे नहे मोर प्रार्थना;
विपदे आमि ना जेन करि भय।
दु:खतापे व्यथित चिते
नाअि बा दिले सांत्वना,
दु:खे जेन करिते पारि जय।
सहाय मोर ना जदि जुटे
निजेर बल ना जेन टुटे,
संसारेते घटिले क्षति
लभिले [1]शुधु वंचना
निजेर मने ना जेन मानि क्षय।
आमारे तुमि करिबे त्राण
अे नहे मोर प्रार्थना,
तरिते पारि शकति जेन रय।
आमार भार [2]लाघव करि
नाअि बा दिले सांत्वना,
बहिते पारि अेमनि जेन हय।
नम्रशिरे सुखेर दिने
तोमारि मुख लअिब [3]चिने,
दुखेर राते निखिल धरा
जेदिन करे वंचना
तोमारे जेन ना करि संशय।

१ शुधु—केवळ, फक्त. २ लाघव—कमी, हलका. ३ चिने—ओळखूं.

"संकटकाळीं माझें रक्षण कर अशी मी तुला प्रार्थना करीत नाहीं. पण संकट आलें असतांना मी भिऊन गर्भगळित न व्हावें एवढेंच माझें तुझ्याजवळ मागणें आहे. दुःख तापानें माझें चित्त व्यथित झालें असतां तूं माझी सांत्वना कर असें माझें मागणें नाहीं. पण दुःखांवर मी विजय मिळवावा अशी शक्ति मला दे. मला आवश्यक सहायता जरी मिळाली नाहीं तरी माझी हिंमत तुटूं नये, माझें बळ क्षीण होऊं नये एवढेंच मी मागतों. संसारांत मला नुकसान आलें आणि लोकांनीं मला फसवून नागविलें तरीही मला त्याची पर्वा नाहीं. पण मी हिंमत हारून 'आतां काय करूं, माझें सर्वस्व गेलें' म्हणून रडायला बसूं नये, एवढेंच मी मागतों.

मी जर विनाशाच्या प्रवाहांत सांपडलों तर माझें रक्षण कर, मला वांचीव, अशी माझी प्रार्थना नसणार ; तर प्रवाहांत तरून जाण्याची – पोहून पार जाण्याची माझी शक्ति कायम राहो एवढेंच मी तुजजवळ मागणार. माझा भार हलका व्हावा अशा प्रकारची मदत मागत नाहीं, तर जेवढा म्हणून भार डोक्यावर येऊन पडेल तो झेलण्याची आणि उचलून नेण्याची, वहन करण्याची शक्ति मला दे असेंच मी मागतों. सुखाच्या दिवसांत गर्विष्ठ न होतां नम्रपणानें तुला मीं ओळखावें आणि जेव्हां दुःखाची रात्र येऊन पडेल, सर्वत्र अंधार पसरला असेल आणि पायाखालची जमीनच जेव्हां दगा देऊं लागेल तेव्हां तशा प्रसंगीं देखील मला तुझ्याविषयीं, तुझ्या अस्तित्वाविषयीं आणि तुझ्या कृपेविषयीं मनांत संशय देखील येऊं नये एवढेंच मी तुजजवळ मागतों."

टीप नम्रशिरे सुखेर दिने
तोमारि मुख लअिब चिने,
दुखेर राते निखिल धरा, जेदिन करे बंचना।

पुष्कळ दिवसांच्या आजारानें क्षीण झालेल्या मनुष्याला जसा दुःखाचा आघात सहन होत नाहीं त्याचप्रमाणें एखादी असाधारण आनंदाची बातमीही सहन होत नाहीं. दुःखाची वेदना आणि आनंदाची उत्तेजना दोन्ही त्याला असह्य होतात. तो अस्वस्थ होतो, एवढेंच नव्हे, तर सुख-दुःख पचवण्याची त्याची शक्तिही क्षीण होते.

दुःखाचा आणि सुखाचा वेग ज्याप्रमाणें मनुष्याचा स्वास्थ्यनाश करतो त्याचप्रमाणें श्रद्धानाश करण्यासही तो समर्थ असतो. सुखांत गर्क झाला म्हणजे मनुष्य ईश्वराल विसरतो आणि दुःखांत बुडाला म्हणजे ईश्वराचा इन्कार करून बसतो. निदान ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं, त्याच्या मांगल्याविषयीं तो सांशक होतोच होतो.

आपल्या स्वभावांतील किंवा प्रकृतीमधील ही उणीव ध्यानांत आल्यानें भक्त ईश्वराची प्रार्थना करतो कीं, देवा, सुखाच्या वेळीं मी शेफारून जाऊं नये आणि दुःखाच्या वेळीं विसरून जाऊं नये असें कर. सुखाची लाट आली असतां तिच्या शिखरावर आरूढ होऊन देखील मीं नम्रच राहावें आणि हें सर्व तुझेंच देणें आहे हें ओळखून तुला शरण जावें. दुःखाच्या वणव्यांत जरी मी सांपडलों असलों आणि साऱ्या विश्वानें जरी मला दगा दिला असला; माझें असे कोणी उरलें नाहीं, सर्वच माझ्या वाईटावर असले तरी जगांत देव उरला आहे किंवा नाहीं अशी शंका माझ्या तोंडावाटे न येवो, माझ्या मनांतही न उद्भवो.

जर तुझ्यावरची माझी श्रद्धा अढळ राहिली तर कोणत्याही परिस्थितींत माझें क्षेमच आहे. म्हणून श्रद्धा टिकावी एवढी एक कृपा मजवर होऊं द्या. बाकीचें सर्व मी पाहून घेईन.

# ३

सृष्टि विविध आहे. तिचे आकर्षणही विविध आहे. सुंदरता इतक्या अनेक रूपांनीं नटूं शकते, व्यक्त होऊं शकते आणि आपल्या जीवनांत शिरून स्फुरूं शकते हें पाहून आपण आश्चर्यचकित होतों. पण ही सर्व विविधता एकच निसर्गप्रभूची लीला आहे, सर्वत्र तोच विराजित आहे हें दिसून आलें, उमगलें म्हणजे मग आनंदाला सीमाच राहात नाहीं. निसर्गाच्या साक्षात्कारानें आपल्याला 'विगलित-वेद्यांतर' अशी आनंदाची एकाग्रता लाभते. पण त्या निसर्गाच्या मुळाशीं कोणी निराळाच रसेश्वर क्रीडा करीत आहे याचा साक्षात्कार झाला म्हणजे आपल्या जीवनांत आमूलाग्र परिवर्तन होऊन आनंदाचा आस्वाद घेत असतांनाच आपण त्याच्याशीं एकरूप, एकरस होऊन जातों. आपल्याला तादात्म्याची समाधि लागते.

प्रकृति परमसुंदर आहे हें ओळखल्यानंतर तिला अनुप्राणित करणारा पुरुषही रसेश्वर आहे हें अनुभवास येतें. केवळ पुरुषाचा साक्षात्कार होणें कठिण. आणि झालाच तर तवढ्यानें जीवन सौंदर्यमय होणेंहि कठिण. म्हणूनच प्रथम प्रकृतीचा साक्षात्कार करून घ्यावा आणि त्यांतूनच या आदिमायेच्या महेश्वराला ओळखावें ही उत्तम साधना आहे. प्रमादी मनुष्याला प्रकृति आपल्या मायेच्या जाळ्यांत गुरफटून टाकते. पण डोळस आणि

स्मृतिमान[1] मनुष्याला परात्पर पुरुषाचा साक्षात्कार करून घेण्याचें आपण एकमात्र साधन आहोंत असें ती अनुभवास आणून देते.

जो विलासी असेल तो प्रकृतीच्या जाळ्यांत सांपडेल. पण जो कलात्मा असेल तो अलिप्तपणें प्रकृतीचें ध्यान धरीत धरीत परमेश्वराच्या चरणीं सरळ पोंचेल. यासाठींच तादात्म्य आणि ताटस्थ्य[2] यांच्या पायावर उभारलेला कलायोग मनुष्याला मिळाला आहे. हा योग साधला म्हणजे बघावें तेथें भगवद्दर्शनच घडतें. चालावें ती यात्राच ठरते. बोलावें तें ईश्वरकीर्तन होऊन जातें आणि जीवन-सकल जीवनस्वामीच्या अखंड प्राप्तीची उपासना होऊन बसते

प्रेमे प्राणे गाने गन्धे आलोके[1] पुलके
प्लाबित[2] करिया निखिल द्युलोक-भूलोके
तोमार अमल अमृत पड़िछे झरिया ।
दिके दिके आजि टुटिया सकल बन्ध
मुरति धरिया जागिया उठे आनन्द;
जीवन उठिल निबिड़ सुधाय भरिया ।
चेतना आमार कल्याण-रस-सरसे
शतदलसम फुटिल[3] परम हरषे
सब मधु तार चरणे तोमार धरिया ।
नीरव आलोके जागिल हृदय प्रान्ते
उदार उषार उदय-अरुण कान्ति,
अलस आँखिर आबरण गेल सरिया ।

"हे हृदयेश्वरा, तुझें अमल अमृत प्रेमाच्या द्वारा—आणि प्राणांच्या द्वारा, गायनांमधून, गंधामधून आणि प्रकाशामधून झरूं लागतें. माझ्या शरीरावरील

---

१ स्मृतिमान— गफलतींत नसलेला असा ( बौद्ध परिभाषेचा शब्द ).

२ ताटस्थ्य— आखाड्याच्या हौदाच्या तटावर बसून प्रेक्षकाची भूमिका धारण करणाऱ्याला जो आनंद मिळतो तोच खरा कलानंद होय.

१ आलोके—प्रकाशांतून, २ प्लावित—बुडवून, ३ फुटिल—फुललें, विकसित झालें.

रोमवालि असो किंवा हरिततृणरूपी तुझ्या विराट विग्रहावरील रोमराजी असो. त्यांतून त्याच अमृताचा साक्षात्कार होतो. हा आमचा भूलोक आणि त्याच्या आसपास विस्तरलेला हा अद्भूत द्युलोक हे दोन्ही एकसारखे अखंड घुसळले जात आहेत आणि त्या मंथनांतून तुझ्या प्रेमाचें तें अमल-धवल नवनीत किंवा अमृत एकसारखे बाहेर पडत आहे.

कोणत्याही दिशेनें पाहा, सर्व बंधनें तटातट तुटूं लागलीं आहेत. आणि तुझा आनंद प्रत्यक्ष मूर्तिमंत होऊन दर्शन देऊं लागला आहे. आणि माझें हें जीवन पाहा कसें तुझ्या प्रेमसुधेनें—वात्सल्य दुग्धामृतानें परिपूर्ण भरून गेलें आहे.

या आनंदघन स्थितीमध्यें तुझ्या त्या कल्याण-रस-सरोवरामध्यें माझी चेतना शतदलपद्माप्रमाणें हर्षोत्फुल्ल होऊन उमलली आहे आणि माझें चेतनापद्म स्वतःची ओंजळ करून आपला सर्व मधु तुझ्या चरणीं अर्पण करीत आहे. आणि तुझ्या या शान्त प्रकाशांत माझ्या हृदयाकाशांत उदार* उषेची उदय-अरुण-कान्ति पसरली आहे. माझ्या झोंपाळू डोळ्यांवरचें सर्व आवरण आतां दूर झालें आहे. आतां अखंड दर्शनानन्द, अखंड स्पर्शानन्द, अविरत गानानन्द आणि चैतन्य परिपूर्ण अनुभूतीचा अलौकिक आनन्द सर्वत्र उसळूं लागला आहे."

---

*संस्कृतामध्यें उदार शब्द अनेक अर्थानें येतो. उदाहरणार्थ 'उदारः कल्पः' फार सुन्दर, योग्य कल्पना किंवा सूचना. अगदीं नेमकी बसणारी उपमा सुचली तरी तिला ही संस्कृत कवि उदारच म्हणावयाचे. ज्या वस्तूच्या योगानें हृदय एकदम उत्फुल्ल होतें आणि खुशखुश होऊन भेटावयाला पुढें येतें त्या वस्तूला उदार हें विशेषण लावितां येतें.

मनुष्य कोणत्याही मनःस्थितींत असो, सबंध रात्र त्यानें विषाद आणि चिंतेंत जागून काढली असो, उषेचें दर्शन होतांच त्याचा तो विषाद आणि त्याची ती चिंता रात्रभर कितीही खरी वाटली तरी तत्काळ खोटी ठरते आणि नवीन आशा आणि नवीन उत्साह आणि नवीन विश्वास यांचा त्याच्या हृदयांत ‹ ‹रण संचार होतो. अशा उषेला 'उदार' सोडून दुसरें कोणतें विशेषण लावतां ‹ ‹ल !

# ४

जगन्मातेची पूजा करावयास निघालेला भक्त मनांत विचार करतो कीं, मातेनेंच दिलेल्या वस्तु घेऊन मातेचीच पूजा करणें यांत कांहीं स्वारस्य नाहीं. गंगेचें पाणी घेऊन गंगेलाच अभिषेक करण्यासारखें किंवा फुलवात पेटवून अग्नीला ओवाळण्यासारखें तें होणार आहे. पूजा करावयाची किंवा नैवेद्य दाखवायचा तर जें कांहीं स्वतःचें म्हणून असेल तेंच काढून दिलें पाहिजे. अशा विचारानें शोधतां शोधतां स्वतःचें असें कांहींच सांपडेना. जगन्मातेच्या वैभवाला साजेल असा कांहीं तरी उपहार दिला पाहिजे आणि तोही स्वतःच्या कमाईचा. असें या जगांत आहे तरी काय? म्हणून शोधूं जातां भक्त गोंधळून जाऊन दुःखांत बुडाला. पण तेथें त्याला दिसून आलें कीं, स्वतःचें दुःख ही मात्र आपली स्वतःचीच कमाई आहे खरी. पश्चात्तापाचे – उपरतीचे अश्रु हेच जर मातेच्या चरणीं अर्पण केले तर आपण कांहीं तरी पूजा केली असें खचित होईल. त्रिलोकींचें वैभव जरी मातेच्या चरणीं लोळण घेत असलें तरी माझ्या भक्तीचे हे अश्रु कांहीं औरच आहेत. माता याची कदर अवश्य करील आणि यांचा स्वीकार करून आपला स्वतःचा कृपाप्रसाद अवश्य देईल. या विचारांचेंच एक स्तोत्र रचून भक्त म्हणतो —

तोमार सोनार थालाय साजाव आज
दुखेर अश्रुधार ।

जननी गो, गाँथब तोमार
गलार मुक्ताहार ।
चन्द्रसूर्ज पायेर काछे
माला हये जड़िये आछे,
तोमार [1]बुके शोभा पावे आमार
दुखेर अलंकार ।
धन धान्य तोमारि धन,
की करबे ता कओ ।
दिते चाओ तो दियो आमाय,
निते चाओ तो लओ ।
दुःख आमार घरेर जिनिस,
[2]खाँटि रतन तुमि तो [3]चिनिस—
तोर प्रसाद दिये तारे [4]किनिस,
ए मोर [5]अहंकार ।

आई, चंद्रसूर्य ज्यांचेवर जडविले आहेत असे तोडे तर तूं आपल्या पायीं धारण केले आहेस. तुझ्या गळ्यासाठीं त्याहून अधिक किंमती हार तुला घातला पाहिजे. या जगांतील धन-धान्य आदि सर्व वस्तु तुझ्याच आहेत. तुझी इच्छा होते तेव्हां तूं त्या देतेस आणि काढून घेण्याची इच्छा झाली म्हणजे त्या परत घेतेस. अशा तुझ्या वस्तु तुला देण्यांत स्वारस्य तें कोणतें? पण माझें दुःख ही माझी स्वतःचीच कमाई आहे. आणि तें अस्सल रत्न आहे हेंही तूं जाणतेस. तेव्हां त्याची कदर करून स्वतःच्या कृपाप्रसादाच्या मोबदल्यांत तूं तें घे म्हणजे झालें. केवढी ही माझ्या दुःखाची थोरवी!! माझ्या दुःखाची—विरह-भक्तीची त्वां अशी कदर केलेली पाहून मी अभिमानानें फुलून जाईन. माते, माझ्या जीवनरूपी सोन्याच्या थाळींत माझ्या दुःखाचे मणि मौक्तिक भरून तुझ्यासाठीं त्यांचा एक

१ बुके—वक्षःस्थलावर, छातीवर. २ खाँटि—अस्सल. ३ चिनिस—ओळखतेस.
४ किनिस—विकत घ्यावेस. ५ अहंकार—गर्व, अभिमान.

मुक्ताहार बनवीन आणि तो तुझ्या गळ्यांत घालीन. मी याहून दुसरें तें काय तुला अर्पण करणार बरें !!!

टीप  दु:ख आमार घरेर जिनिस
तोर प्रसाद दिये तारे किनिस
ऐ मोर अहंकार

एकदां एका शाळेंत धार्मिक ज्ञानाचा वर्ग चालला होता. इतक्यांत इन्स्पेक्टरसाहेब तेथें आले. मुलांना आडवे तिडवे प्रश्न विचारण्याची हौस या निरीक्षकांना असतेच. त्यांनीं विचारलें—' सांगा मुलांनो, मनुष्याजवळ अशी एखादी वस्तु आहे का कीं, जी ईश्वरानें त्याला दिली नाहीं, जी त्यानें आपण होऊन मिळविली आहे, जिला त्याची स्वत:ची कमाई म्हणतां येईल ? ' सर्व मुलांनीं ठराविक उत्तर दिलें—' कांहीं नाहीं. सर्व कांहीं ईश्वरानेंच दिलेलें आहे. ' एका मिरचीएवढ्या लहान मुलीनें पाणीदार डोळ्यांनिशीं उत्तर दिलें, ' होय. पाप. हें कांहीं ईश्वरानें मनुष्याला दिलें नाहीं. ही त्याची स्वत:चीच कमाई आहे. '

पुण्य-पाप दोन्ही ईश्वराच्याच प्रेरणेनें संभवतात असें तत्त्वतः म्हणतां येईल. पण त्या मुलीचें उत्तर धार्मिक आणि समर्पक होतें याविषयीं कोणालाही शंका वाटावयाची नाहीं.

कवीनें येथें अशाच दृष्टीनें आणि वृत्तीनें जगन्मातेला म्हटलें आहे—माते, तुझ्या पूजेसाठीं मी कोणतें द्रव्य घेऊन येऊं ? जें कांहीं येथें आहे तें सर्व तुझेंच आहे. हें सर्व धन-धान्य, हिरे-मोती, माणिक-पाचू, जें कांहीं दिसतें तें सर्व तुझेंच आहे. तुझी मर्जी असेल तोंपर्यन्त तें मजकडे राहील. मर्जी नसेल तेव्हां तूं तें घेऊन जाशील. यांतूनच कांहीं तरी काढून तुला देणारा मी कोण ?

पण माझें वैभव तरी केवढें ? सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्र, तारा यांचे तर नूपुर आणि तोडे बनवून तुझ्या चरणीं अर्पण केले जातात. मी तुला काय अर्पण करणार ? पण एक वस्तु आहे कीं जी खरोखर माझी घरची आहे. मला ती कशीही मिळाली असो पण ती माझीच आहे, याविषयीं कोणालाही शंका नाहीं.

मला जें दु:ख होतें तें सर्व माझेंच आहे, दु:खाला कारण कोणीही होवो. वाटून घेणें न घेणें माझ्या हातचें आहे. तेव्हां हें जें स्वत:चें दु:ख, माझ्या कमाईचें रत्न, हें तुझ्यापुढें

नैवेद्य म्हणून ठेवण्याचा माझा अधिकार आहे. मला ठाऊक आहे कीं ही माझी मौलिक वस्तु तुझ्या दृष्टीनें मूल्यवान आहे. माझ्या दुःखाश्रूंचा हार जीवनरूपी सुवर्ण तबकांत भरून तुझ्यापुढें ठेवला तर त्याची कदर करून तो तूं आपल्या गळ्यांतच घालणार आणि मग त्याचा मोबदला म्हणून आपला सर्वश्रेष्ठ वरप्रसाद मला देणार.

दुःखानेंच मनुष्याचें जीवन समृद्ध होतें. जीवनांत जें कांहीं साररूप आहे तें जीवनावर दुःखाचा तेजाब घातल्यानेंच प्रगट होऊन निघतें. सुख उथळ असतें, मायारूप असतें, क्षणजीवी असतें आणि मोहक म्हणजे सुंदर तर खरेंच. पण मोह उत्पन्न करून भ्रमांत टाकणारें हाच त्या मोह-क शब्दाचा खरा अर्थ आहे. दुःखाचें तसें नाहीं. दुःख जीवनामध्यें जागृति आणतें. जीवनाला पारमार्थिक आणि गंभीर बनवितें. खरोखरच 'दुःखं जन्तोः परम् धनम्.' ज्याची जेवढी वेदनाशक्ति असेल, ज्याला जेवढी हृदयसिद्धि साधली असेल, तितकेंच दुःख त्याला होणार. जो देह-बुद्धींतच मग्न आहे, त्याला आपल्या शारीरिक कष्टानें, स्वार्थ-नाशानें, संकल्प-घातानें मनस्वी दुःख होणार. पण जो परोपकारी आहे, विश्वात्मैक्य भाव ज्याच्यांत बाणला आहे तो दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी होतो आणि जसजसें त्याचें दुःख वाढतें, तसतसें त्याचें आत्मौपम्यही खोल होत जातें. ही दुःखाची मात्रा कमी करणें अथवा अधिक करणें ही मनुष्याच्या स्वतःच्या साधनेवर अवलंबून असलेली गोष्ट होय. येथें भगवान फार तर साहाय्यक होईल. पण आत्म-साधनेचें क्षेत्र हेंच काय तें आत्म-स्वातंत्र्याचें, परिपूर्ण आत्म-स्वातंत्र्याचें क्षेत्र आहे, आणि म्हणून येथें ईश्वर स्वतः होऊन कसलीच ढवळाढवळ करीत नाहीं. हें खातें मनुष्याला तोडून दिलेलें आहे आणि म्हणून या खात्यांतील सर्व धन मनुष्याच्याच हिशेबीं जमा होत असतें. आणि मग मनुष्यानें त्याचें महत्त्व ओळखून तें भगवंताला अर्पण केलें म्हणजे हृदय-समृद्धीच्या त्या पारख्याला असाधारण संतोष होतो. याचा मोबदला म्हणून जें द्यावें तें थोडेंच असें त्याला वाटूं लागतें.

सामान्य लोक जें कांहीं ईश्वराला अर्पण करतात तें ईश्वराचेंच घेऊन त्याला अर्पण करतात. या रोजच्या अनुभवामुळें ईश्वराचा उत्साह जणुं मरून गेलेला असतो. पार मावळलेला असतो. अशा स्थितींत जेव्हां कधीं कोणी दुःखरूपी मौलिक चीज देवाला अर्पण करतो तेव्हां त्यालाही, 'झालों एकदां आज आपण कृतार्थ' असें वाटूं लागतें. धनधान्याचा व्यापार करणारे कुशल व्यापारी जगांत पुष्कळ आहेत. स्वतःच्या हार्दिक दुःखाचा व्यापार करणारा जीवन-वणिक् विरळाच असावयाचा!

नित्य मिष्टान्न खाणाऱ्याला आपण जर एखादे दिवशीं कांहीं अपरूप वस्तु देऊं शकलों तर त्याला ज्याप्रमाणें आनंदाश्चर्याचा अनुभव होतो, त्याप्रमाणें देणाऱ्यालाही कृतार्थता वाटून आत्मगौरवाचा आणि सात्त्विक अहंकाराचा अनुभव झाल्यास नवीन नाहीं. सूर्य-चन्द्राचे नूपुर आणि पैंजण पायांत घालणाऱ्या जगज्जननीला देखील अपरूप वाटावें आणि तिनें आपण होऊन पुढें येऊन आपल्या दुःखरूपी मुक्ताहाराचा स्वीकार करावा याहून मनुष्याला अधिक धन्यता ती कोणती ! राजानें एका टवटवीत फुलाला हिऱ्यामोत्यांहून देखील अधिक किंमत दिली तेव्हां फूल उगविणारा फूलप्रेमी म्हणतो—माझ्या फुलाची किंमत मी काय जाणत नव्हतों ? मला ठाऊकच होतें कीं त्या कदरदान राजपुरुषाची नजर पडण्याचाच अवकाश, माझ्या फुलाला एवढी किंमत मिळाल्यावांचून रहाणारच नाहीं. माझ्या दृष्टीनें फुलाला जें महत्त्व आहे तें महत्त्व कबूल करून राजानें मला लोकसमुदायांत धन्य केलें. मी खरा पारखी ठरलों. अभिमान वाटायला ही गोष्ट काय थोडीथोडकी आहे ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# ५

राजा यावयाचा असतो तेव्हां केवढा उत्सव होतो. लोकांच्या मनांत कौतुक, औत्सुक्य, आशा आणि भीति सर्व एकवटून तऱ्हेतऱ्हेचे मिश्रभाव उत्पन्न करतात. राजाच्या कृपाकटाक्षामध्यें प्रसाद असतो तर त्याच्या क्रोधाग्नीमध्यें मरण पसरविणारा दावानल असतो. भौतिक अग्नि आसपासचें जाळून शांत होतो. राजाचा क्रोधाग्नि अनेक पिढ्यांचा नाश करूनही शांत न झाल्याचीं उदाहरणें आहेत. राजा कितीही चांगला असला तरी लोक त्याला भिण्याचें विसरत नाहींत. राजा म्हणजे अग्नि, केव्हां पेट घेईल हें सांगतां येत नाहीं.

पण जेव्हां एखादा सन्त संचाराला निघतो तेव्हां लोकांच्या हृदयांत कोणच्या प्रकारचे भाव उमटूं लागतात ? तेथेंही कौतुक असतें, उत्सुकता असते. वैराग्याला अनुकूल अशी आशा असते आणि आपले हातून कांहीं चूक होणार नाहींना अशी भीतिही असते. सन्त क्षमावान असतो एवढ्याचसाठीं ही भीति विशेष जागी असते. सन्त जेथें जाईल तेथें आपली शीतल छाया पसरवीत जातो. सन्त म्हणजे कृपेची मूर्ति, ईश्वराचा प्रत्यक्ष आशीर्वाद. त्याचें आगमन सर्वांना इष्टच.

असा सन्तपुरुष माणसांमध्यें विचरत असला तरी माणसांतील नसतो. लोकांना तो आपलासा वाटत नाहीं. तेजामुळें राजा जसा दुरावला असतो तसाच सन्तही विरक्तीमुळें दुरावलेला असतो.

पण श्रीकृष्ण जेव्हां वृंदावनामध्यें गोपींच्या मेळ्यांत जात असे तेव्हां त्या अबोध ललनांच्या मनामध्यें अशा प्रकारचे कांहीं भाव जागृत होत असतील काय? गोपींच्या वांट्याला श्रीकृष्ण राजाही नव्हता आणि विरक्त साधुही नव्हता. महायोग्यांना श्रीकृष्ण दुष्प्राप्य असो. गोपींना तो रासेश्वर रोजचा होता – खेळीमेळीचा होता. कधीं त्या त्याच्या हातचें खेळणें होत आणि कधीं त्याला 'तनिक तनिक दधि दे के' हातांवरही नाचवीत. श्रीकृष्ण आला म्हणजे त्यांचें हृदय उचंबळून येई, त्या आपलें भान विसरून जात आणि एकाच वेळीं त्याला बाहेरही पाहात आणि हृदयांतही त्याचें दर्शन करीत.

ज्या भक्त कवीच्या वांट्याला हें सर्व विश्व वृंदावन झालें आहे त्याला नयन-मोहन श्रीकृष्ण मनांत आणतांच प्रत्यक्ष दिसूं लागतो आणि त्याचें यत्किंचित् ध्यान करतांच त्याचा तो स्वच्छंद विहारही दृष्टिगोचर होवूं लागतो.

कवि म्हणतो —

आमार नयन-भुलानो एले।
आमि की [1]हेरिलाम हृदय [2]मेले।
[3]शिउलितलार पाशे पाशे
झरा फुलेर राशे राशे
[4]शिशिर-भेजा घासे घासे
अरुणरांगा चरण फेले
नयन-भुलानो एले।

[5]आलोछायार आँचल खानि
लुटिये पड़े बने बने,
फुलगुलि ऐ मुखे [6]चेये
की कथा कय मने मने।

---

१ हेरिलाम – पाहिलें. २ मेले – उघडून. ३ शिउलि – पारिजात. ४ शिशिर-भेजा – दंवानें भिजलेल्या. ५ आलो-प्रकाश. ६ चेये – पाहून.

तोमाय मोरा करब बरण,
मुखेर ढाका करो हरण,
ऐटुक ऐ मेघाबरण
दु हात दिये[७]फेलो ठेले—
नयन-भुलानो एले।

बनदेवीर द्वारे द्वारे
शुनि गभीर शंखध्वनि,
आकाशवीणार तारे तारे
जागे तोमार [८]आगमनी।

कोथाय सोनार नूपुर बाजे,
बुझि आमार हियार माझे,
सकल भावे सकल काजे
[९]पाषाण-गाला सुधा ढेले—
नयन-भुलानो एले।

"माझ्या डोळ्यांना मुग्ध करीत तूं आलास. मी माझें हृदय उघडून तुला पाहिलें आणि कसें अद्भुत दर्शन मला घडलें ! पारिजातकांच्या झाडाखालीं जेथें फुलांचा ढीग खचलेला होता आणि शिशिरऋतूच्या दंवामुळें जेथें सर्व गवतें भिजून चिंब झालीं होतीं त्या ठायीं अरुणाचा लाल रंग लावून घेऊन जणुं का मेंदीची किंवा अळत्याचीं पावलें उमटवीत नयनमनोहर असा तूं आलास. वनामध्यें वृक्षांच्या शाखांतून जी किरणें गालिच्याप्रमाणें जमिनीवर पसरलीं होतीं तीं जणुं लाल, हिरव्या, अंजिरी शालूचा अंचलच सरकून खालीं पडला असावा अशीं दिसत. आणि या प्रकाशांतून सूर्याचें ध्यान धरणारीं फुलें कोण जाणे मनांत कायशीं बोलत होतीं. तींही कदाचित् माझ्याप्रमाणेंच मुग्ध-

७ ठेले फेलो – दूर सार. ८ आगमनी – स्वागतगीत. ९ पाषाण-गाला – दगडांनाहि विरघळविणारी.

पणें म्हणत असतील—सूरजमामा, आम्हांला तुमचें स्वयंवर करावयाचें आहे. तेव्हां तोंडावरचा बुरखा दूर करा. जो थोडासा मेघखंड तुमच्या चेहऱ्यावर पसरलेला आहे तो दोन हात उचलून जरा बाजूला सारा पाहूं. नयनमनोहर मूर्ति डोळ्यांसमोर उभी राहिली आहे खरी.

आणि आसपास पाहावें तों! वनदेवीच्या प्रत्येक दरवाजावर हीं वनवाळें (पांखरें) गंभीरपणें शंखध्वनि (विजयाचें स्वागतगान) गात आहेत. तें ऐकूं येतें आणि आकाशरूपी वीणेमध्यें जणुं कांतीची प्रत्येक तार तुझें स्वागतगीत छेडीत आहेत.

आणि सोन्याच्या नूपुरांचा हा रुमझुम रुमझुम आवाज कोठून ऐकूं येत आहे? मला वाटतें हा नूपुरझंकार माझ्या हृदयांतूनच उठला आहे. अरे केवळ हृदयांतूनच नव्हे तर माझ्या प्रत्येक भावनेमध्यें आणि प्रत्येक कर्मामध्यें हें नवें संगीत पसरलें आहे. कोठेंच कसलीच कठोरता उरली नाहीं. सर्वत्र नूपुरांचा निनादच ऐकूं येत आहे. माझें हृदय, माझ्या भावना आणि माझीं कर्में अशा रीतीनें संगीतमय आणि मुखरित झालीं याचें आश्चर्य काय? मोठे मोठे पाषाणही विरघळून जातील अशा सुधेचा पाट सोडीत तूं नयनमनोहर चित्तचोर आला आहेस.

*　　　*　　　*

सूर्य कसा अगदीं साळसुदासारखा उगवतो आणि हळूहळू आकाशाचा जिना चढतो. पण तो जादूगर आहे. स्वतः जणुं कांहींच करीत नाहीं, पण आल्याबरोबर सर्व जग मात्र बघतां बघतां पालटून जातें. याला अगदीं साधा भोळा म्हणावें तर याला पारिजाताच्या फुलांचा सडा पाडण्याची उठाठेव कुणीं सांगितली होती? रात्रभर गवतावर अमृतबिंदु पसरले होते त्यांच्यामध्यें बिंदुबिंदूंतून इन्द्रधनुष्याचे रंग खेंचून काढण्याचें त्याला कोणीं शिकविलें होतें? आणि किरणरूपी आपले पाय एखाद्या नटाप्रमाणें मेंदीनें किंवा आळत्यानें रंगविण्याचें याला काय म्हणून सुचलें?

याला पाहतांच वन्यवनिता आपली शालीनता विसरून गेली. आपला अंजिरी पदर सरकून खालीं पडला याचें तिला भानही राहिलें नाहीं आणि यौवनानें मुसमुसणारीं हीं फुलें थोड्या वेळापूर्वीं किती भोळीं दिसत होतीं, पण सूर्याला पाहतांच धीट होऊन गुजगुज

गोष्टी करूं लागलीं आणि म्हणतात काय कीं आम्हीं स्वयंवरासाठीं आलों आहोंत. चेहऱ्यावरील तो लहानसा पडदा, पातळ झिरझिरीत मेघांचा हातरुमाल, जरा बाजूला सारा ना. एखाद्या नटानें दोन्ही हातांनीं पडदा दूर सारून रंगभूमीवर यावें त्याप्रमाणें जरा पुढें या ना. वाटतें ! कीं या फुलांच्या डोळ्यांना देखील वेड लावीतच हा आला आहे.

आणि जर मुग्ध फुलांची ही कथा तर वनदेवीचे भाट आतां मूकपणें कसे बसतील ? त्यांनीं तर गळ्यांमध्यें शंख धारण करून वनदेवीच्या प्रत्येक दरवाज्यासमोर प्रत्येक तोरणाखालीं जयगान सुरू केलें आहे आणि एरव्ही शांत गंभीर दिसणारें हें आकाश आतां पहा कसें आपल्या ब्रह्मवीणेच्या तारांमधून तुझ्या स्वागतगीताला निनादित करीत आहे.

जेथें सर्वच जग पालटलें तेथें माझ्या हृदयानें स्वस्थ कसें बसावें ? त्यानेंही नाचायला सुरुवात केली आणि मग त्याचा नूपुरझंकार मनांतून, विचारांतून, कल्पनांतून आणि भावनांतून किंबहुना माझ्या सर्व कर्मांतून निनादित होऊन उठला. धोंड्यांना देखील विरघळून सोडणारी तुझी सुधा आतां लोटली आहे. तेव्हां आतां काय काय होणार नाहीं ? फक्त तूं मात्र आहेस तसाच अगदीं सरळ, साधा, शुद्ध आणि अलिप्त वर चढूं लागला आहेस. तुझ्याबरोबर तुझें तेजही चढूं लागलें आहे. धन्य मी कीं मला तुझें दर्शन घडलें आणि तुझी ही चेतोहारी जादूही मी ओळखूं शकलों.

उधो सो मूरत हम देखी ।
शुक सनकादिक अरु ब्रह्मादिक
इन्द्र चन्द्र नहि पेखी ।
खोजत फिरत जुगोजुग योगी
सो हम गृह गृह नाच नचाई
तनिक तनिक दधि देके ।

# ६

आजकालच्या जगाला अखंड गांजणारा असा एक कूट प्रश्न आहे. व्यक्ति आणि समाज यांच्यांत जें द्वैत आहे, जो विरोध आहे तो दूर कसा करावा ? व्यक्तीला महत्त्व दिलें तर स्वार्थ माजून सामाजिक कल्याण संकटांत पडतें. आणि शेवटीं व्यक्तीचाही क्षय होतो. आणि जर समाजाला महत्त्व द्यावें तर व्यक्तिस्वातंत्र्य उरत नाहीं आणि व्यक्तित्व क्षीण झालें म्हणजे समाजही आपोआप निःष्प्राण होतो. या दुविधेमधून रस्ता कसा काढावयाचा ? व्यक्ति आणि समाज यांच्या अधिकाराची विभागणी निरनिराळ्या प्रकारें माणसानें करून पाहिली पण अजून जम बसत नाहीं. ह्या एका प्रश्नापायीं मनुष्यानें मानवजातीचें रक्त कमी वाहवलें नाहीं.

त्याचप्रमाणें मनुष्य श्रेष्ठ का प्रकृति श्रेष्ठ हाही एक प्रश्न महत्त्वाचा आहे. व्यवहारी मनुष्यानें जरी हा सोडविण्यासाठीं हातीं घेतला नसला तरी सत्पुरुषांनीं, सन्तांनीं तो ओळखला आहे आणि कधींतरी जगाला तो सोडवावा लागणारच.

आपल्या भारतीय समाजशास्त्रानें पहिला प्रश्न सोडविण्याचा उपाय दाखविला आहे. व्यक्ति म्हणजे प्रत्यक्ष जीवात्मा. त्याचें स्वातंत्र्य नेहमींच अबाधित राहिलें पाहिजे. पण जीवात्म्याला शिक्षणाच्या योगानें – साधनेच्या साहाय्यानें शिकविलें पाहिजे कीं, त्याचें निराळें अस्तित्व भासमान आहे. परमात्म्याहून तो भिन्न नाहीं. व्यक्तीमध्यें सामाजिक सद्गुणांचा

विकास करून तिला पटविलें पाहिजे कीं, समाजहिताला अनुकूल वागण्यांतच व्यक्तीचा खरा विकास आहे. जें व्यक्तिस्वातंत्र्य समाजहिताला संभाळत नाहीं तें स्वातंत्र्य नसून तो स्वच्छंद आहे. व्यक्तित्वाची ती विकृति आहे. विकृतिपासून व्यक्तित्वाचा नाशच होणार.

ज्या क्षणीं व्यक्ति नैतिक शिक्षणाच्या द्वारा संस्कारी होईल आणि समाजहिताला बाधक असा व्यक्तिगत स्वार्थ पूर्णपणें विसरून जाईल त्या क्षणीं प्राधान्य व्यक्तीला का समाजाला हा प्रश्न आपोआप विरघळून जाईल आणि समाज आणि व्यक्ति यांमधील द्वैत नाहींसें होईल.

मनुष्यानें आपण निराळे आणि 'सृष्टि निराळी असें द्वैत अहंकारामुळें उत्पन्न केलें आहे. स्वतःमध्यें सुप्त असलेल्या चैतन्याला तो कबुली देतो, पण जगामध्यें ओतप्रोत भरलेल्या चैतन्याला तो ओळखतही नाहीं. यामुळें त्याचें जीवन जड आणि अदूरदर्शी होऊन पावलोपावलीं तें पराभूत होत आहे.

जेव्हां मनुष्याला साक्षात्कार होईल कीं सर्वत्र चैतन्यच भरलेलें आहे तेव्हां त्याच्या हृदयांतील द्वैत नष्ट होईल आणि त्याला दुर्मुखलें राहाण्याचा प्रसंग येणार नाहीं. बाह्य सृष्टि जशी आनंदी असते, बेपर्वा असते आणि एक प्रकारें उन्मत्त-प्रसन्न असते तसेंच जीवन मनुष्याला जगतां येईल.

हा आदर्श एकदा बुद्धीला समजला, हृदयाला पटला आणि जीवनाला इष्ट वाटला म्हणजे त्या प्रकारची साधना अथवा साधनेची तळमळ सुरू होते.

सामान्य समजूत अशी आहे कीं साधना म्हणजे तपस्या. ती कठिणच असावयाची. जीवाचा हिय्या करून, तोंड हिरसुसलें करून, संकल्पशक्तीच्या जोरावर कशीबशी ती पुरी करावयाची. पण विश्वात्मैक्याची साधना म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून युगानुयुगें सांचलेलें आणि मोहानें उराशीं कवटाळलेलें अज्ञान आणि त्यांतून उत्पन्न होणारा संकुचितपणा धुऊन काढणें आहे. यांत दुःख तें कसलें असणार? आंघोळींत जसा निर्मलानंद आहे, निरनिराळ्या शास्त्रांत प्रगति करण्यांत जसा विद्यानंद आहे तसाच या साधनेंतही क्षणोक्षणीं, पदोपदीं अद्वैतानंद अनुभवावयास मिळत असतो, फक्त डोळे उघडून डोळस झालें पाहिजे. मिटलेलें हृदयकमळ फुलवून उत्फुल्ल होवूं दिलें पाहिजे.

आळसांत निजलेल्या मुलाच्या कानीं संवगड्यांच्या खेळांतील आनंदाच्या आरोळ्या पडतांच तो जसा साखरझोपेचा मोह सोडून देऊन ताडकन् उठतो आणि

कशीबशी चूळ भरून खेळांत सामील होतो, त्याप्रमाणें व्यक्तीनें आपला आंधळा एकलकोंडेपणा सोडून देऊन विश्वाच्या मेळ्यांत आनंदित होण्यासाठीं धावावयाचें असतें. समोर परक्या लोकांचा जमाव आहे अशा भ्रमांत राहून एका कोपऱ्यांत बसणाऱ्या मनुष्याला जर कळलें कीं समोरचा थवा परक्यांचा नसून इष्टमित्रांचाच आहे तर तो जसा इतका वेळ फुकट गेला याचा पश्चात्ताप करीत आपल्या इष्टमित्रांत मिसळण्यासाठीं धांवतो, त्याच प्रकारची विश्वाशीं आत्मैक्य साधण्याची साधना असते. हिला कठिण किंवा त्रासदायक कोण म्हणेल ?

विश्वात्मैक्याच्या साधनेंत आणखी एक आनंद असतो. जगत् आणि जीव यांचें अद्वैत अनुभवास येतांच जेथें तेथें ईश्वर, परमात्मा प्रगट होऊन जगत् आणि जीव यांनाही आपल्यांत विरघळून सोडतो. आणि मग जो अद्वैतानंद माजतो त्याचें वर्णन कुणीं करावें ? करणारा कुणी उरेल तर ना ! ! उरतो फक्त आनंदस्वरूप परमात्मा.

प्राचीन आर्यांनीं बाह्य जगाचें निरीक्षण करून ब्रह्माचा साक्षात्कार केला आणि हृदया-मध्यें उतरून आत्मतत्त्व ओळखलें. बाह्य जगाचें निरीक्षण करून आणि अंतरात्म्याचें ध्यान धरून जीं परमतत्त्वें त्यांना सांपडलीं तीं अंतीं एकच आहेत हें जेव्हां त्यांना समजलें तेव्हां त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. आत्मा आणि ब्रह्म एकच आहेत, बाह्य जगत् आणि आंतर जगत् यांचेमध्यें द्वैत नाहीं, सर्वत्र एकच एक तो भरलेला आहे असें जेव्हां त्यांना समजलें तेव्हां त्यांच्या सर्व हृदयग्रंथी तुटल्या, भय नाहींसें झालें आणि सर्वत्र समाधान प्रस्थापित झालें.

आर्य ऋषिमुनींनां हा जो परम साक्षात्कार झाला तोच प्रत्येक व्यक्तीला भिन्नभिन्न साधनेच्या द्वारें स्वतःच्या जीवनांत अनुभवावयाचा असतो. कारण खरा आनंद ज्याला मिळाला तो त्यानें कोणत्या ना कोणत्या रूपानें व्यक्त केलाच आहे. जें संगीत या जगांत वर्षत आहे तेंच माझ्या हृदयांत फुवारत आहे, विश्वसंगीत आणि हृदयसंगीत वस्तुतः एकच आहेत असें ज्या दिवशीं कळून येतें त्या दिवशीं या जगांत कोठेंच परकेपणा राहात नाहीं. सर्वच स्वकीय, सर्वच आत्मीय होऊन जातें. विशाल पृथ्वीवर राहणाऱ्या माणसाला तरल जल, चंचल पवन, प्रज्वलित तेज आणि विश्वव्यापी आकाश व्यापकतेची दीक्षा देतात. या सर्व महाभूतांमध्यें स्वतःचीच विभूति व्यक्त होत आहे असा प्रेमाचा साक्षात्कार झाला म्हणजे जो सहज अद्वैतानंद आंतून स्फुरूं लागतो तो पंचप्राणांना उल्हसित करतो

आणि सर्व विश्वाशीं आपला संबंध गोड करून टाकतो. असें झालें म्हणजे ईश्वर सर्वत्र आहे ही सहज जागृति कायमची स्थिर होते आणि मग आपल्या सर्व कर्मामध्यें या ईश्वराचाच जयजयकार होत राहातो.

जगत [1]जुड़े उदार सुरे
आनन्दगान बाजे,
से गान कबे गभीर रबे
बाजिबे हियामाझे।
[2]बातास जल आकाश आलो
सबारे कबे [3]बासिबो भालो,
हृदयसभा जुड़िया तारा
बसिबे नाना साजे।
नयन दुटि [4]मेलिले कबे
परान हबे खुशि,
जे पथ दिया चलिया जाब्रो
सबारे जाबो तुषि।
रयेछ तुमि, ए कथा कबे
जीवनमाझे सहज हबे —
[5] आपनि कबे तोमारि नाम
ध्वनिबे सब काजे॥

" या सर्व जगांत भरून आनंदगान अद्भुत सुरांत वाजूं लागलें आहे, प्रवाहूं लागलें आहे. तेंच गान तितक्याच गभीर नादानें माझ्या हृदयांत केव्हां वाजूं लागेल? हा वारा आणि हें पाणी, हें आकाश आणि हा प्रकाश हीं सर्व माझींच भावंडें आहेत, असें ओळखून सर्वांवर प्रेम करावयास मी केव्हां

१ जुड़े – भरून. २ बातास – वारा. ३ भालो बासिबो – प्रेम करीन.
४ मेलिले – उघडतांच. ५ आपनि – आपण होऊन, स्वतः

शिकेन ? आणि हे सर्व जसे बाहेर अनेक रूपानें विश्वाचा दरबार नटवीत आहेत त्याचप्रमाणें अनेक रूपें धारण करून हे सर्व माझ्या हृदयसभेंतही केव्हं विराजमान होतील ?

दोन डोळे उघडल्याबरोबर जें विश्व नजरेस पडतें तें दुसरें तिसरें कांहीं नसून माझा प्राणसखाच आहे असें ओळखून माझा प्राण आनंद-व्याकुळ होईल आणि मग माझें हलन चलन, माझें वागणें करणें आपोआप सर्वांच्या कल्याणाचें, सर्वांच्या समाधानाचें आणि सर्वांच्या आनंदाचेंच होइल. माझ्या हातून कुणाचें वाकडें होणारच नाहीं. उलट माझ्या सर्वच क्रिया, माझी सगळी जीवनयात्रा ' जगतः सुखाय, जगतो हिताय ' होत राहील.

आणि मग परमात्मा आहे, सर्वंत्र भरला आहे, तो सर्वरूप आहे या वस्तूचें ज्ञान निराळें मिळवावें लागणार नाहीं. त्याची तर सहज-सिद्धिच अनुभवास येईल.

तेव्हां माझी क्षुद्रता गळून जाऊन विश्वात्म्यैक्याची ही स्थिति मला केव्हां प्राप्त होईल ? हे जीवनस्वामी, तूं आहेस, या जगांत आणि माझ्या जीवनांत अखंड भरलेला आहेस ही गोष्ट मला केव्हां सहज होईल ? तसें झालें म्हणजे तुझें नांव माझ्या सर्व कर्मांत अखंड गुंजत राहील. मला गावें लागणार नाहीं; उलट माझें जीवनच गायनरूप होऊन जाईल. माझें हृदय म्हणजे आपोआप वाजणारी आणि सर्व प्रकारचे राग छेडणारी चैतन्यतंत्री होऊन जाईल.

"कधीं ऐसे भाग्य लाहतां होईन ।<br>
अवघे देखे जन ब्रह्मरूप ॥"

# ७

एका गीतांत * कवि म्हणतात —

> "वासना मोर जारेइ परश
> करे से
> आलोटि तार [1]निबिये फेले
> निमेषे।
> ओरे सेइ अशुचि दुइ हाते तार
> जा एनेछे [2]चाइ ने से आर,
> तोमार प्रेमे बाजबे ना जा
> से आर आमि सइब ना।"

वासना मलिन असल्याकारणानें हृदयज्योतीला कशी विझवून टाकते याचें वर्णन वरील गीतांत केलें आहे. खालील गीतांत तसल्या वासनेचा उल्लेख नाहीं. हृदयाच्या

---

(बं. गी. १०५ इं. गी. ९) १ निबिये फेले–मालवून टाकते. २ चाइ ने–(मी) इच्छित नाहीं.

कोनाकोपऱ्यांतील देखील अशुद्ध वासना जाळून टाकणाऱ्या पावक विरहानलाचें तेथें वर्णन आहे. [ इंग्रजीमध्यें दोन्हीं ठिकाणीं desire शब्द वापरल्यामुळें समजुतीचा घोटाळा होण्याचा संभव आहे. मुळांत ( बंगालींत ) तसा घोटाळा नाहीं. ]

वासना-मात्र अपवित्रच असते. तिनें ज्या कशाला स्पर्श केला त्यांतील तेज नष्ट झालेंच म्हणून समजावें.

पण जेव्हां वासनेप्रमाणें प्राप्ति होत नाहीं आणि विप्रलंभ सुरू होतो, विरहानल मनुष्याला नखशिखांत जाळूं लागतो, तेव्हां सर्व वासना हळूहळू जळून जातात आणि फक्त प्रेमच उरतें. वासनांनीं हृदयदीप मालवून टाकला म्हणजे विरहानल पेटतो; त्याचा धूर सहन करून धूराचीच ज्वाला करावी लागते. तीच प्राणाची ज्वाला पुढें प्रेमदीपाला पेटवते आणि मग खालपासून वरपर्यन्तचा सर्वच अनुभव मिळाल्यामुळें जीवन कृतार्थ होतें.

पणती किंवा समई तयार आहे, त्यांत तेल ( स्नेह ) भरलेलें आहे, पण ज्योत मात्र प्रगटली नाहीं असा दिवा काय कामाचा ? जीवनामध्यें सर्व प्रकारची समृद्धि आहे, अनुभवाचा गभीर सागर भरलेला आहे, पण जर ईश्वरप्राप्तीची तळमळ नाहीं तर तें जीवन काय कामाचें ? यापेक्षां मरण आलेलें बरें. जीवन-व्यापार कसाही चालो ही जाणीव अखंड कायम राहिली पाहिजे कीं जीवनेश्वराचें अजून दर्शन झालें नाहीं, त्याची प्राप्ति झाली नाहीं. आणि धूप जळत रहावा त्याप्रमाणें हृदय विरहानलानें अखंड जळत रहावें. हें जळणें उत्कट झालें म्हणजे त्यांतून आपोआप ज्वाला प्रगट होईल आणि सर्व प्राण प्रज्ज्वलित होतील.

वेदना-दूती समजावीत आहे कीं, "एका बाजूला भगवान स्वतः तळमळत आहे कीं, या भक्ताची मला प्राप्ति केव्हां होईल ? तूं निजला आहेस पण भगवान जागा आहे. जागा आहे एवढेंच नव्हे तर एकांतांत येऊन मिळण्यासाठीं तुला बोलावीत आहे. जे पामर आहेत त्यांना दुःख कोण देईल ? भगवंतानें मानलें आहे कीं, तूं प्रेमाचा अधिकारी आहेस म्हणूनच तो तुला तुझ्या झोपेंतून उठवतो, तुला सतावून तुझी कदर करतो, तुला स्वतःच्या प्रेमाच्या योग्य मानतो." ही झाली एका बाजूची स्थिति.

दुसऱ्या बाजूला, पावसाळ्याची रात्र आहे, सगळें आकाश मेघानें भरून गेलें आहे. पाऊस एकसारखा पडत आहे आणि माझा प्राण कांहींतरी चुकलें आहे, कांहींतरी सांडलें आहे, कांहींतरी मिळालें पाहिजे असें म्हणून चुटपुटत आहे—कासावीस होत आहे. मध्येंच चकचकन

वीज चमकते आणि आसपासच्या अंधःकाराला अधिकच काळा गडद करून टाकते. मेघगर्जना होते आणि प्राण उत्सुक होतात. आतां स्वस्थ बसून कसें चालेल. मेघ बोलवितात, हवा ढकलते, आतां जर धांव घेतली नाहीं तर मुहूर्त निघून जाईल; अभिसाराची वेळ टळून जाईल. अंधःकारांत रस्ता दिसत नसेल तर विरहानलाची चुडी पेटव आणि प्राणाला प्रेमदीप पाजळू दे. प्रेमाची पणती घेऊनच त्याच्याकडे पोंचतां येईल.

[1]कोथाय [2]आलो, कोथाय ओरे आलो।
विरहानले ज्वालो रे तारे ज्वालो।
रयेछे दीप ना आछे शिखा,
एई कि भाले [3]छिल रे लिखा—
[4]इहार चेये मरण से जे [5]भालो।
विरहानले प्रदीपखानि ज्वालो।
वेदनादूती गाहिछे, 'ओरे प्राण,
तोमार लागि जागेन भगवान।
निशीथे घन अन्धकारे
[6]डाकेन तोरे प्रेमाभिसारे,
दुःख दिये राखेन तोर मान। *
तोमार लागि जागेन भगवान।
गगनतल गियेछे मेघे भरि।
बादल-जल पड़िछे झरि झरि।
ए घोर राते किसेर लागि
परान मम सहसा जागि
एमन [7]केनो करिछे मरि मरि,
बादल-जल पड़िछे झरि झरि।

---

१ कोथाय-कुठें. २ आलो-प्रकाश. ३ छिल–होतें. ४ इहार चेये–यापेक्षां. ५ भालो–चांगलें, बरें. ६डाकेन-बोलावीत आहेत ७ केनो–कां.

विजुलि [1]शुधु क्षणिक [2]आभा हाने,
निबिड़तर तिमिरं [3]चोखे आने।
जानि ना कोथा अनेक दूरे
बाजिल गान गभीर सुरे,
सकल प्राण [4]टानिछे पथपाने।
निविड़तर तिमिर चोखे आने।
कोथाय आलो, कोथाय ओरे आलो।
बिरहानले ज्वालो रे तारे ज्वालो।
डाकिछे मेघ, हाँकिछे हावा,
समय गेले हबे ना जावा,
निबिड़ निशा निकषघन कालो।
परान दिये प्रेमेर दीप ज्वालो।

"सर्वत्र अंधार पसरला आहे, जावें कसें? दिवा आणा, अरे दिवा कोठें आहे? मशाल कुठें आहे? विरहानलाच्या ज्वालेनें मशाल पेटवा.

दिवा हातीं आहे पण त्याच्यांत ज्योति नाहीं. अशीच स्थिति का माझ्या कपाळीं लिहिली होती? याचेपेक्षां मरण कितीतरी चांगलें. विरहानलाच्या चुडीनें प्रेमदीप पेटवा.

वेदनादूती म्हणते— 'अरे प्राणा, भगवान तुझ्यासाठीं जागत आहे. निशीथ-कालीं घनअंधकारांतून तो तुला प्रेमाच्या अभिसारासाठीं—मीलनासाठीं बोलवीत आहे. तुला दुःख देऊन तुझा मान राखीत आहे आणि तुझ्यासाठीं सगळी रात्र तो जागून काढीत आहे.'

सगळें आकाश मेघांनीं भरून गेलें आहे. झरमर झरमर पाऊस पडत आहे. अशा या घोर रात्रीं माझा प्राण एकाएकीं जागा होऊन कुणासाठीं असा कासावीस होत आहे? पाऊस तर एकसारखा झरमर झरमर पडतच आहे. वीज

---

१ शुधु-केवळ. २ आभा हाने—चमकते. ३ चोखे-डोळ्यांवर. ४ टानिछे-खेंचत आहे.

एक क्षणभर चकूकन प्रकाशते आणि आसपासचा निबिड अंधकार डोळ्यांत अधिकच कोंबते. समजत नाहीं कीं, दूरवर कोठून हें गंभीर गायन सुरू झालें आहे. प्राणांना यात्रेच्या रस्त्याची ओढ लागली आहे आणि डोळ्यांत तर अंधकार भरून गेला आहे. अरे प्रदीप कुठें आहे–मशाल कुठें आहे? विरहानलानें दिवा पेटवा–मशाल पेटवा. पहा हे मेघ मला बोलावीत आहेत. चल, चल, म्हणून हवा मागून ढकलीत आहे. मुहूर्त टळला तर जाणें घडणार नाहीं. रात्र घनघोर पसरली आहे आणि अंधकार कृष्ण–पाषाणाप्रमाणें जाडावला आहे. अशा वेळीं सर्व प्राणशक्ति वापरून प्रेमाचा दीप पेटीव आणि अभिसाराला चल."

## दुःख दिये राखेन तोर मान

एला व्हिलर विलकॉक्स या अमेरिकन कवयित्रीनें एका कवितेंत म्हटलें आहे, जगांत फक्त दोन प्रकारचीं माणसें असतात. हे दोन प्रकार कोणते? सुखी आणि दुःखी? नाहीं, असा भेद करतां येणार नाहीं. पापी आणि पुण्यवान? नाहीं. हाही भेद व्यर्थ आहे. श्रीमंत आणि गरीब? हेंही ठरविणें कठिण आहे. मग ते दोन भेद कोणते? कवयित्री म्हणते, Those that lift and those that lean. जे लोक दुसऱ्याचें ओझें उचलतात त्यांचा एक वर्ग आणि जे आपलें ओझें दुसऱ्यावर घालून त्यांच्यावर आधारून असतात ते. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे आधार देणारे आणि आधार घेणारे असे हे दोन वर्ग आहेत.

उपनिषदकारांनीं माणसांचे दोन भेद सांगितले आहेत. ब्राह्मण आणि कृपण. जे लोक विशाल, व्यापक बृहत् अशा ब्रह्माशीं एकरूप होतात आणि जगाचें ओझें लीलेनें उचलतात ते ब्राह्मण. आणि जे लोक कृपेची याचना करतात ते कृपण. प्रभु रामचंद्राला आपल्या प्रजेविषयीं कृपा वाटली आणि तो म्हणाला, 'पाल्याः हि कृपणाः जनाः' हे कृपापात्र लोक हीन दीन आहेत. यांचें पालनपोषण केलें पाहिजे. यांना सुखी ठेविलें पाहिजे.

सीतेविषयीं असला भाव रामाच्या मनांत येणें शक्य नव्हतें. सीता स्वतःची अर्धांगि आहे, स्वतःचीच छाया आहे. स्वतःच्या अवतारकार्याचा भार प्रधानपणें तिच्यावरच आहे हें तो ओळखून होता आणि म्हणूनच तिला सुखी ठेवण्याची स्वतःची जबाबदारी आहे अशी कल्पनाही त्याला शिवली नाहीं. स्वतः आर्यपुरुष आहोंत आणि

सीता मात्र कृपण आहे, असें रामाला जर वाटलें असतें तर सीतेचा घोर अपमान झाला असता. रामाला ठाऊक होतें आणि तो म्हणालाही होता कीं – 'दुःखसंवेदनायैव रामे चैतन्यम् आहितम्.' या शरीरांत जें चैतन्य घातलें गेलें तें फक्त अखंड दुःखाचा अनुभव करण्यासाठींच. स्वतःच्या या जीवनकार्याचा वांटा जर त्यानें सीतेला दिला नसता, सढळ हातानें तिला दुःख पोंचविलें नसतें तर तो तिला कधींच — 'त्वं जीवितं त्वमसि मे हृदयं द्वितीयम्!' असें म्हणूं शकला नसता.

भगवान् ज्याला कृपण समजतात त्याला सुखांत ठेवोत; पण ज्याला स्वतःच्या अवतार-कार्याचा साथीदार समजतात, स्वतःच्या लीला-नाटकांतील महत्त्वाचा सहयोगी समजतात, त्याला दुःखाचा भरभक्कम वांटा देऊन कळवितात कीं 'तुला मी कृपण समजत नाहीं. माझा तूं सहयोगी ब्राह्मण आहेस. ब्रह्म-दीक्षेचा अधिकारी आहेस. दुःखरूपी सोमरसाचा तूंच अधिकारी आहेस. हा रस तूंच जिरवावास.'

## ८

प्रेमसंबंधांत आशुक आणि माशुक असा भेद असतो. दोघेही एकमेकांवर प्रेम करतात, दोघेही एकमेकांवांचून जगूं शकणार नाहींत, दोघांनाही एकमेक हवे असतात. पण माशुक व्यक्ति प्रेम करून, आमंत्रण देऊन आपल्याच ठायीं स्वस्थ किंवा अस्वस्थ असणेंच जाणते. मीलनाची साधना सगळी आशुकलाच करावी लागते.

भक्त आणि भगवान यांचा संबंध असाच असतो. मात्र यांपैकीं आशुक कोण आणि माशुक कोण हें सांगणें सोपें नसतें. आपल्याला वाटतें भगवान निरीह, निर्मम, पूर्ण आणि स्वस्थ आहे. तळमळ काय ती भक्तालाच आहे; तोच खडतर साधना करून भगवंताचे चरणीं पोंचतो.

भक्तिरसाचे अनुभवी, अभेद-भक्तीचे दर्दी सांगतात कीं, वस्तुस्थिति याहून उलट आहे. भक्त टाहो फोडून स्वस्थ बसतो, बाकीची सगळी साधना भगवंतालाच करावयाची असते. अभितप्त धरा स्वतःच्या निश्वासाच्या द्वारा आकाशाला स्वतःची वेदना कळविते. पुढें समुद्रांतून पाणी खेंचणें, त्याचे अनेक प्रकारचे ढग बनविणें आणि यथाकाळीं प्रेमामृताचा वर्षाव करणें हें सर्व आकाशालाच करावें लागतें. खरा अभिसार भक्ताचा नसून भगवंताचाच असतो.

आकाशाचा पुरुषार्थ जसा भगवंताला साधेल तसा भक्ताला कधीं साधला आहे काय उत्कंठा, व्याकुळता आणि एकाग्र आकांक्षा एवढें भांडवल भक्तानें पुरविलें म्हणजे बस. बाकीचें सर्व तो प्रेमनिधान पाहून घेतो.

त्याचा मार्ग सोपा नसतो. खरें म्हणावयाचें तर त्याच्यापुढें मार्गच नसतो. जिथें मार्ग नाहीं तिथें दिशा नक्की करावयाची आणि परोपरीनें साधना साधून इष्ट स्थळीं पोंचावयाचें, ही सर्व उठाठेव, ही सर्व यातायात तो न थकतां, न कंटाळतां, शिथिल न होतां अखंड चालवीत असतो. अशा रीतीनें प्रेमाचा आदर्श आपल्यापुढें मांडून तो आपल्याला प्रेमाची दीक्षा देत असतो. केवढा त्याचा तो धीर ! किती बलवती त्याची ती प्रेमशक्ति ! ! त्याच्या या शक्तीच्या जोरावरच ईश्वरविमुख आणि संसारप्रवण असें दुर्बल हृदय वितळून जातें आणि त्याच्या चरणीं भक्तीचा अभिषेक होतो.

ईश्वराच्या या साधनेचा ज्या दिवशीं आपल्याला साक्षात्कार होतो त्या दिवशींच खरेपणानें भक्ति कशी करावी हें आपल्याला समजूं लागतें आणि मगच अनन्यवृत्तीनें आपण आत्मनिवेदन करून मोकळे होतों.

आजि [1]झडेर राते तोमार अभिसार,
परानसखा बन्धु हे आमार।
आकाश [2]काँदे हताशसम,
नाइ जे [3]घुम नयने मम,
[4]दुयार खुलि, हे प्रियतम,
चाइ जे बारे बार।
परानसखा बन्धु हे आमार।
बाहिरे किछु देखिते नाहि पाइ,
तोमार पथ कोथाय [5]भावि ताइ।

---

१ झडेर–वादळाच्या. २ काँदे–रडत आहे, आक्रोश करीत आहे. ३ घुम–नीज, झोंप. ४ दुयार–द्वार. ५ भावि–विचार करतों.

सुदूर कोन् नदीर पारे,
गहन कोन् बनेर धारे,
गभीर कोन् अन्धकारे
हतेछो तुमि पार।
परानसखा बन्धु हे आमार।

"हे माझ्या प्राणसख्या मित्रोत्तमा, आज पावसाची झड लागलेली आहे आणि तूं मजकडे येण्यास निघाला आहेस. किती खडतर तुझा हा अभिसार!!

आकाश हताशाप्रमाणें अश्रु ढाळीत आहे. माझा डोळ्याला डोळा लागत नाहीं. हे प्रियतम, द्वार उघडून मी वारंवार तुझी वाट बघत आहे.

बाहेर मला कांहींही दिसूं शकत नाहीं. कोणत्या मार्गानें तूं येत असशील याचेंच मला कोडें पडतें. दूरदूर कोणती नदी ओलांडून, कोणत्या गहन अरण्याच्या बाजूबाजूनें, किती घन अंधःकारांतून, किती संकटें ओलांडून, तूं अंधःकारांतून येत असशील. खरोखर, हे प्राणसख्या, मित्रोत्तमा, प्रेम करावें त तूंच! तुझ्या प्रेमावर माझ्यासारखे लाख जीव ओवाळून टाकावेत. खरोखर प्रेम करावें तर तूंच!!"

# ९

आई ज्याप्रमाणें मुलाचे परोपरीनें लाड करते आणि त्याला तऱ्हेतऱ्हेच्या आनंदाचा अनुभव करून देते अथवा प्रियकर ज्याप्रमाणें प्रियेचें अनंतप्रकारें आराधन करतो, अनुनय करतो आणि तिला नव-नवीन प्रकारानें प्रसन्न करतो, त्याप्रमाणें परमात्मादेखील जीवात्म्याला एकामागून एक अनेक जन्म देऊन आणि निरनिराळ्या परिस्थितींत ठेवून त्याला जीवनानंदाचा आस्वाद घेण्याला समर्थ बनवितो. जीवनाच्या शेवटीं मरण येतें हें खरें, पण त्याचें दुःख कसलें? वाक्याच्या शेवटीं पूर्णविराम येतो, गाण्यांत सम येते, दिवसाचे शेवटीं निजावें लागतें, दूध पितां पितां मातेचा स्तन बदलावा लागतो, लाडू खाल्ल्यानंतर चटणी चाखावी लागते याची कोणी तक्रार केली आहे काय?

एकदां कळून चुकलें कीं आपण अनाथ, पोरके नसून आपली काळजी घेणारी, आपल्याला संतुष्ट करण्याची इच्छा बाळगणारीहि कुणी व्यक्ति आहे, आपण कुणाचे तरी माशुक आहोंत म्हणजे मगच जीवनांत काय आनंद भरला आहे याची खरी प्रचीति होते. आणि मग जीवन म्हणजे मोठें संकट आहे, एक रोग आहे, एक कारागार आहे असें न वाटतां तो एक अखंड आनंदोत्सव आहे असें पटूं लागतें.

ही गोष्ट पटल्याबरोबर कवि आनंदानें बेहाश होऊन म्हणतो –

जानि जानि कोन् आदिकाल [1]हते
[2]भासाले आमारे जीबनेर स्रोते,
सहसा हे प्रिय, कत गृहे पथे
रेखे गेछ प्राणे कत हरषन ।
कतबार तुमि मेघेर आडाले
एमनि मधुर हासिया [3]दाँडाले,
अरुणकिरणे चरण [4]बाडाले,
ललाटे राखिले शुभ परशन ।
संचित हये आछे एइ चोखे
कत काले काले कत लोके लोके
कत नव नव आलोके आलोके
अरूपेर कत रूपदरशन ।
कत जुगे जुगे, केहि नाहि जाने,
भरिया भरिया उठेछे पराने
कत सुखे सुखे कत प्रेमे गाने
अमृतेर कत रसबरषन ।

"हे प्रिय, केव्हांच्या आदिकालापासून तूं मला जीवनाच्या स्रोतामध्यें आनंदानें पोहण्यासाठीं सोडून दिलें आहेस, हें मला आतां कळून चुकलें. हे प्रिय, तूं कितीतरी घरांमध्यें आणि कितीतरी मार्गांमध्यें–जेथें जेथें मी पोंचलों तेथें तेथें माझ्या प्राणामध्यें तूं कितीतरी हर्षाचे विषय, आनंदाचे प्रसग अकल्पित रीतीनें योजून ठेविले आहेस.

किती वेळां तरी तूं मेघांच्या आड लपून गोड रीतीनें हांसत हांसत उभा राहून तुझे अरुणकिरणरूपी आरक्त हात लांबवून माझ्या ललाटावर आपला शुभस्पर्श केला आहस.

---

१ हते–पासून. २ भासाले–तरंगत सोडलेस. ३ दाँडाले–उभा राहिलास. ४ बाडाले–लांबविलास.

भिन्न भिन्न काळीं, भिन्न भिन्न ठायीं नव्या नव्या प्रकाशांत तूं जें तुझ्या अरूपी रूपाचें दर्शन दिलेंस तें एके काळीं मी विसरून गेलों होतों. पण त्यांची स्मृति आज ताजी होतांच आज मला दिसून येते कीं माझ्या या लहानशा डोळ्यामध्यें झाडून ते सारे प्रसंग जमा करून ठेविले आहेत. हा आनंदानुभवांचा संग्रह म्हणजे जगदेक-सम्राटालाही हेवा वाटावा असें समृद्ध आणि अखूट धन आहे.

कोणीही हिशेब करूं शकणार नाहीं—कितीं युगोयुगीं, कितीतरी सुख-दुःखांमध्यें आणि कितीतरी प्रेमप्रसंगीं आणि गायनप्रसंगीं माझ्या प्राणांत तुझ्या अमृत रसाची विविध वर्षा भरून उठली आहे. त्या सर्वांचें जेव्हां मी स्मरण करतों तेव्हां मला माझाच हेवा वाटूं लागतो आणि मी किती धन्य, किती धन्य असे उद्गार माझ्या हृदयांतून निघूं लागतात. जीवनाच्या आनंदस्रोतांत मला अनादिकालापासून पोहत आणि वाहत डुबत आणि क्रीडत ठेविलें आहेस. हे आनंदनिधाना, तूं माझें जीवन अंतर-बाह्य आनंदपरिपूर्ण केलें आहेस."

# १०

आपल्याहून ज्याची शक्ति थोडीशी अधिक असेल त्याचा आपल्याला हेवा वाटूं लागतो आणि आपण प्रयत्न करून त्याच्या बरोबरीचे होतों. अशा प्रकारची चढाओढ करण्यासाठीं प्रतिस्पर्ध्याची शक्ति आपल्याहून अधिक असली तरी ती आपल्या आटोक्यांतील असली पाहिजे. तासाला नऊ मैल धांवणारा मनुष्य दहा मैल धांवण्यासाठीं स्पर्धा करूं शकेल पण तासाला वीस, चाळीस किंवा ऐंशी मैल धांवणाऱ्या वाहनाबरोबर स्पर्धा करण्याचें त्याच्या मनांत देखील यावयाचें नाहीं.

केव्हां केव्हां स्वतःची शक्ति काय आहे आणि दुसऱ्याची शक्ति किती आहे याचा मुळींच अंदाज नसल्यामुळें 'लहान तोंडी मोठा घास' या न्यायानें मनुष्य भलत्याच ठिकाणीं स्पर्धा करावयास जातो आणि फजीत होतो. पण त्याचा वास्तविक यांत लाभच होतो. कारण स्वतःची शक्ति किती अल्प आहे हेंही त्याला दिसून येतें आणि उस्तादाची योग्यता किती थोर आहे याचाही त्याला अंदाज येतो.

एखादा उत्कृष्ट गायक इतक्या सहजपणें सुन्दर आलाप घेतो कीं सामान्य माणसाला वाटावें, 'यांत काय? आम्हीं देखील असें गाऊं शकूं.' पण तसा प्रयत्न करून पाहीतोंपर्यन्तच हा भ्रम टिकूं शकतो. जंग जंग पछाडलें तरी तो साधा सूर गळ्यांतून नेमका निघत नाहीं असा अनुभव आला म्हणजे खरें गाणें कसें असतें याची त्याला कल्पना

होते. अशा प्रयत्नाचें वातावरण प्रस्तुत गायनांत आहे. एकाच प्रयत्नांत मनुष्य स्वतःलाही ओळखतो आणि गुणवंताला—भगवंतालाही ओळखतो.

तुमि केमन करे गान करो जे गुणी,
अवाक् हये शुनि, केवल शुनि ।
सुरेर आलो भुवन [1]फेले छेये,
सुरेर हावा चले गगन बेये,
पाषाण टुटे व्याकुल वेगे धेये
बहिया जाय सुरेर सुरधुनी ।
मने करि अमनि सुरे गाइ,
कंठे आमर सुर [2]खुँजे ना पाइ ।
कइते की चाइ कइते कथा बाधे ;
हार मेने जे परान आमार काँदे ;
आमाय तुमि फेलेछ कोन् [3]फाँदे
चौदिके मोर सुरेर जाल बुनि ।

"हे गुणवंता, तूं कसें गातोस हें समजून घेण्याचा मी प्रयत्न करतों आणि माझी वाणी कुंठित होते आणि मी फक्त ऐकतच राहातों. केवढें हें तुझ्या गायनाचें सामर्थ्य! सुराचा प्रकाश या विश्वांत भरून गेला आहे. सुराचा वारा सबंध आकाशांत वाहूं लागला आहे. सुराची सुरधुनी-गंगा अशा कांहीं वेगानें वाहात आहे कीं, तिच्या प्रवाहांत या जगांतील सगळे धोंडे वाहून जातात—फुटतात, एकमेकांशीं घासून गुळगुळीत वाटोळे होतात आणि शेवटीं त्यांची चकाकणारी वाळू बनते. जें कांहीं जगांत कठोर होतें तेंच गायनाच्या सामर्थ्यानें सुन्दर-सुरेख आणि सुकुमार होत आहे.

हें अद्भुत संगीत ऐकतांच मनांत ऊर्मि उठते कीं, आपणही असेंच गावें; पण कितीही प्रयत्न केला तरी माझ्या कंठांतून तो आवाज निघतच नाहीं. जो नेमका सूर हवा आहे तो कांहीं केल्या लागत नाहीं, साधत नाहीं.

१ छेये फेले—भरून टाकलें आहे. २ खुँजे—शोधूं. ३ फाँदे—जाळ्यांत, पाशांत.

मी हृदयांतील भाव व्यक्त करूं जातों पण कांहीं केल्या तें साधत नाहीं. प्रयत्नांची पराकाष्ठा करून देखील जेव्हां गळ्यांतून कांहींच निघत नाहीं तेव्हां माझा प्राण पराभूत होऊन आक्रंदन करूं लागतो. भगवंता, तुझ्या या दिव्य गायनांच्या सुरांचें जाळें माझ्या भोवतीं पसरून मला कसा अगदीं तूं बंदी बनविला आहेस – जखडून टाकिला आहेस !"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८७।७६१ निबंध
२००८ ९९१२।६१
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८०९

## ११

एखाद्या राष्ट्राचें स्वातंत्र्य गेलें तरी ती मोठी आपत्ति म्हणतां यावयाची नाहीं. पण जर त्या राष्ट्राला आपलें स्वातंत्र्य गेल्याची जाणीवच उरली नाहीं, स्वातंत्र्य गेल्याची वेदना त्याला होईनाशी झाली तर मात्र त्याचा सर्वस्वीं नाश झालाच असें समजावें. गेलेलें स्वातंत्र्य यथाकाळीं पराक्रम करून परत मिळवितां येईल. पण स्वातंत्र्याची आठवणच जर बुजली, गुलामी पचनीं पडली—पामर मनाला मानवूंही लागली तर मात्र त्या राष्ट्रासाठीं कसलीच आशा उरत नाहीं.

स्वातंत्र्याच्या बाबतींत हें जसें खरें आहे तसेंच जीवनसाफल्याच्या बाबतींतही खरें आहे. आपण जन्माला येतों ते त्या आत्मारामाचा साक्षात्कार व्हावा म्हणून येत असतों. जगून जर कांहीं करावयाचें असेल तर तें हेंच कीं, स्वतःला ओळखावें, स्वतःच्या मार्फत भगवंताला ओळखावें आणि त्याच्या चरणीं लीन व्हावें. जन्मभर जर कांहीं करण्याजोगें असेल तर तें त्याच्या प्राप्तीची साधना करणें हेंच होय. प्रत्येक क्षणीं आपण यत्किंचित् जरी त्याच्या जवळ जात असलों तरी आपलें जीवन कारणीं लागलें, सफळ झालें असें म्हणतां येईल ; आणि तसें जर होत नसेल, आणि आपण उलट त्याच्या पासून दूरच जात असलों तर, जसजसें दूर जाऊं तसतसा त्याच्याकडे जाण्याचा ओढा वाढला पाहिजे. त्याच्या विषयीचा विरह—त्याच्या प्राप्तीची तळमळ हीच आपल्याला त्याच्याशीं

बांधणारी दोरी किंवा सांखळी होय. जहाज बंदराच्या धक्क्यावरील एखाद्या खांबाला बांधलेलें असतें. उलट लाटा येऊन तें जहाज बंदरापासून किती का दूर जाईना जोंवर बंदराला आणि जहाजाला एकत्र बांधणारा सोल मजबूत आहे, तोंपर्यंत जहाज किनाऱ्याला लागणार याविषयीं शंका नाहीं. सोल तुटला तर मात्र संबंध तुटला.

ध्येयच्युतीपेक्षां ध्येयविस्मृति हें अधिक भयानक संकट आहे. जगाची रहाटी अशी आहे कीं, कधीं ध्येय जवळ येतें तर कधीं तें दुरावतें. पण आपली ध्येयनिष्ठा त्यामुळें यत्किंचितही कमी होतां कामा नये. ध्येयाचें ध्यान अखंड चाललें पाहिजे आणि आपला मित्र दूर गेला असतां आपल्या हांकेचा आवाज असा वाढतो त्याप्रमाणें ध्येय दुरावलें असतां त्याचें ध्यान, त्याचें आकर्षण आणि त्याच्या प्राप्तीची धडपड आणि तळमळ त्यामानानें वाढली पाहिजे. असें जोंपर्यन्त होत असेल तोंपर्यन्त कसलीच चिंता नाहीं, तोंपर्यन्त निराश होण्याचें कारण नाहीं.

पण पुष्कळदां ध्येयाची ओळख नसल्यानें ध्येयाचें दर्शन झालें नसल्यानें पुरी ध्येयनिष्ठा अंगीं बाणलेली नसते, भिनलेली नसते. त्यामुळें "कोल्हा काकडीला राजी" व्हावा त्याप्रमाणें एखाद्या क्षुद्र रत्नाच्या प्राप्तीनें अमृतमंथन सोडून धावयास मनुष्य तयार होतो आणि अल्पलाभ स्वीकारून सर्वस्वाला राजीखुशीनें मुकतो.

हा स्वभावदोष आणि ही स्वाभाविक दुर्बळता ओळखून कवि भगवंताचे चरणीं प्रार्थना करतो कीं, "याचि जन्मीं, याचि डोळां" तुझें दर्शन मला व्हावयाचें नसेल तर भलें न होवो पण तुझ्या दर्शनासाठीं मीं अखंड साधना करावयाची आहे, ती पूर्ण झाली नाहीं, तुझें दर्शन अजून घडावयाचेंच आहे हें मीं विसरून जाऊं नये एवढें कर म्हणजे झालें. मीं उद्योग-हुन्नर करीत असलों, व्यापार-उदीम चालवीत असलों आणि धनदौलतीचे ढीग माझ्यापुढें पडत असले तरी त्यावेळीं माझी वृत्ति अशी राहो कीं, हें सर्व मला ईश्वराच्याजवळ नेणारे नाहींत. ईश्वरप्राप्ति तर अजून दूर आहे. जोंपर्यन्त ईश्वरप्राप्ति झाली नाहीं तोंपर्यंत ही धनप्राप्ति काय कामाची? इतकें धन मिळून देखील मी भिकारी आहें अशी भावना हृदयांत दृढ असो म्हणजे मिळवली.

तुझ्या दर्शनासाठीं जात असलों आणि सबंध दिवस चालून हातपाय गारठले असले, डोळ्यांत झोंप भरली असली आणि हृदयांतील उत्साह पार मावळला असला तर मला असें कधीं वाटूं नये कीं आतां पुढें कशास जावें? जिथें बसलों 'तिथेंच

आपलें 'पंढरपूर' आहे. मला अखंड जागृति असावी कीं, मी कितीही चाल्लों असलों तरी तुझ्या यात्रेचा सगळाच रस्ता अजून बाकी आहे. तुझें दर्शन झालें नाहीं तोंवर जीवनाची कसलीच सिद्धि आपल्याला मिळाली नाहीं.

माझ्या घरीं मी मोठी मेजवानी केली असली आणि तेथें समजांतील थोर थोर मंडळी गोळा झाली असली, गानतान, हास्यविनोद यांचीं कारंजीं उडत असलीं आणि सर्व मला धन्य धन्य म्हणत असले तरीही जोंवर तूं माझ्या मेजवानीला आला नाहींस, तुझा आदरसत्कार मी करूं शक्लों नाहीं, तोंवर ही गोष्ट क्षणभरही मीं विसरूं नये आणि तुझ्याविषयींची हृदयवेदना लवलेश कमी होऊं नये एवढें घडो म्हणजे झालें.

या जाणिवेनें, या वेदनेनें आणि या विरहानें मला सर्व साधना सिद्ध करण्याची शक्ति येईल. भगवंता, तुझें दान मिळणार असेल तेव्हां मिळो पण तुझें ध्यान माझ्या हातून निसटून-न जावो म्हणजे बस आहे.

जदि तोमार[1] देखा ना पाइ, प्रभु,
एबार ए जीबने
तबे तोमाय आमि पाइ नि जेनो
से कथा रय मने।
जेनो भुले ना जाइ, बेदना पाइ
शयने स्वपने।
ए संसारेर हाटे
आमार जताइ दिवस काटे,
आमार जतइ दु हात भरे ओठे धने,
तबु किछुइ आमि पाइ नि जेनो
से कथा रय मने।
जेनो भुले ना जाइ, बेदना पाइ
शयने स्वपने।

१ देखा – भेट, दर्शन.

जदि आलसभरे
आमि बसि पथेर प'रे,
जदि धुलाय शयन पाति सयतने,
जेन सकल पथइ बाकि आछे
से कथा रय मने·।
जेनो भुले ना जाइ, बेदना पाइ
शयने स्वपने ।
जतइ उठे हासि,
घरे जतइ बाजे बाँशि,
ओगो जतइ गृह साजाइ आयोजने.
जेनो तोमाय घरे हय नि आना
से कथा रय मने ।
जेनो भुले ना जाइ, बेदना पाइ
शयने स्वपने ।

"हे प्रभो, या जन्मीं जर तुझें दर्शन मला होणार नसेल, तुझी प्राप्ति माझ्या नशिबीं नसेल तर निदान मीं तुला मिळविलें नाहीं, तुझ्या चरणीं मी पोचलों नाहीं, एवढी गोष्ट माझ्या मनांत ठसून रहावी, एवढी गोष्ट मीं विसरून जाऊं नये. मी झोपेंत असो किंवा जागा असो, तुझ्या विरहाची वेदना कायम रहावी एवढी भिक्षा मला घाल.

या संसाररूपी बाजारांत माझे कितीही दिवस जावोत आणि माझे दोन्ही हात धन-संपत्तीनें कितीही भरोत, जोंवर तुझी प्राप्ति झाली नाहीं तोंवर मला कांहींच मिळालें नाहीं, मी अजून भिकारीचा भिकारीच आहें ही गोष्ट माझ्या मनांत ठसावी; मी ती विसरूं नये आणि ध्यानीं-मनीं हीच वेदना कायम असावी एवढें मला हवें आहे.

आणि जर मी थकून भागून यात्रेच्या रस्त्यावर बसलों आणि धुळींतच आपलें अंथरूण पसरलें असलें तरी त्या वेळीं, पुरे ही यातायात, येथेंच मुक्काम

करूं या, पुष्कळ झालें, खूप दूरवर आलों, असें मला वाटूं नये. माझा सगळाच मार्ग अजून चालावयाचा बाकी आहे, ही गोष्ट माझ्या मनांत बिंबून असावी, तिचा यत्किंचितही विसर पडूं नये आणि कोणत्याही अवस्थेंत असलों तरी या गोष्टीची वेदना कायम असावी एवढें वरदान मला दे.

आणि थोरामोठ्यांना बोलावून त्यांची समाराधना चालविली असतांना तिथें हास्यविनोदाच्या कितीही लाह्या फुटोत आणि सुस्वर वाद्यांचे आलाप वातावरणाला कितीही भरून टाकोत आणि घरांत कितीही सुन्दर आरास केलेली असो, तरीही तुला मीं घरीं आणलें नाहीं, तूं माझा अतिथिदेव झाला नाहींस ही गोष्ट माझ्या मनाला लागून राहावी. त्याचा विसर पडूं नये आणि तीच एक तळमळ, जागृतीं, स्वप्नीं, सुषुप्तींत, भरून उरावी म्हणजे मला कसलीच भीति नाहीं. एवढ्या भाग्याच्या जोरावर मी आपला उद्धार करून घेईन.”

टीप

जदि आलस भरे आमि बसि पथेर प'रे,
जदि धुलाय शयन पाति सयतने,
जेनो सकल पथई बाकी आछे
से कथा रय मने,
जेनो भुले ना जाइ, वेदना पाइ, शयने स्वपने ॥

मनुष्याच्या साधनयात्रेंत अनेक कषाय* असतात. प्रवाश्याला रोज संध्याकाळीं थक्वा येतो आणि तो निजून जातो. याला कोणी कषाय म्हणत नाहीं. कारण झोपेमध्यें थक्वा उतरून जातो आणि पहांटे जाग येतांच मनुष्य ताजातवाना होतो. कषाय निराळ्या प्रकारचे असतात. ही यात्राच व्यर्थ आहे. साधना करून कांहीं मिळावयाचें नाहीं. जें मिळेल त्याला फारसें महत्त्व नाहीं. उगीचच्या उगीच जिवाचे हाल कां करून घ्या, अशा तऱ्हेची अश्रद्धा मध्येंच डोकावते. हा एक कषाय आहे. येशू ख्रिस्तावर अशा प्रकारच्या कषायाची झांपड घालण्याचा प्रयत्न सैतानानें केला पण येशूनें त्याला ओळखलें आणि Get thee behind me Satan असें म्हणून त्यानें त्याला पिटाळलें. बुद्ध भगवानाच्या मार्गांत देखील असेच कषाय मारानें पाठविले होते. बुद्धांनीं त्यांचा हिशेब

* पाप, विघ्न.

केला तेव्हां ते दहा भरले. बुद्धानें मारविजय केला, हे सर्व कषाय ओलांडले म्हणूनच तो मारजित्, लोकजित् आणि जिन झाला.

केव्हां केव्हां श्रद्धा क्षीण झाली नसली तरी उत्साह क्षीण होतो. आपण पुष्कळ चाललों याहून अधिक तें किती चालावयाचें? पोचलों आहोंत हाच मुकाम काय वाईट आहे? असें म्हणून तेथेंच मनुष्य आपलें आसन घालतो, आंथरूण पसरतो आणि आरामानें निजून जाण्याची तयारी करतो. उत्साह क्षीण झाला म्हणजे हळूहळू श्रद्धाही गंजूं लागते. तिचे धागेदोरे ढिले होतात आणि मनुष्य साधक दशा सोडून आरामाला लागतो. त्याचें पोट सुटतें आणि मग हळूहळू तो घसरगुंडीला लागतो.

कवि म्हणतो—भगवंता, जर माझ्यांत आळस माजला आणि मी रस्त्यावरच "कशास जावें दूर, इथेंच अमुचें पंढरपूर" असें म्हणून अंथरूण पसरून स्थिर-स्थावर होण्याचा प्रयत्न करूं लागलों आणि तेथेंच पाया खणून आपलें कायमचें मंदिर बांधूं लागलों तर कृपावंता, निदान एवढें कर कीं मी चालून आलों हा पथ कांहींच नाहीं, मुख्य यात्रा सगळी पुढेंच आहे, पथ कांहींच कापला गेला नाहीं, सगळाच बाकी आहे एवढें स्मरण माझ्यांत कायम राहो. म्हणजे थकवा असेतोंपर्यंतच मी तेथें पडून राहीन. जास्ती स्थिर होण्याची बुद्धि होणार नाहीं. आळसाला समाधानाचे अंकुर फुटणार नाहींत आणि यथाकाळीं पुढें जाण्याचा उत्साह पुनः उत्पन्न होईल. मी झोंपेंत असलों, स्वप्नसृष्टींत रमसाण असलों तरीही एवढी जागृति कायम असावी कीं मी अजून तुला मिळविलें नाहीं. मी कृतार्थ झालों नाहीं. माझा उद्धार होणें अजून बाकीच आहे, याचें स्मरण आणि याची वेदना माझ्यामध्यें कायम असावी, ती पुसून जाऊं नये. जर दृष्टि बिघडली नाहीं, स्मृति कायम राहिली आणि व्याकुलता उरली असली तर बाकी सर्व मला यथाकाळीं मिळेल. निदान मी खडबडून उठेन आणि पुनः पुढें चालूं लागेन.

*　　　　*　　　　*

मनुष्याचें जीवन हा एकप्रकारचा गजग्राह आहे. दैवीवृत्ति एका बाजूनें खेंचते आणि आसुरीवृत्ति दुसऱ्या बाजूनें खेंचते. तत्त्वतः विचार केला तर आसुरी शक्तीपेक्षां दैवीशक्ति श्रेष्ठ आहे आणि म्हणूनच सरतेशेवटीं—अंतीं किंवा अनंतीं—दैवीशक्तींचाच विजय होणार आहे. पण आसुरीशक्ति म्हणजे देखील ईश्वराच्याच दैवीशक्तीची छाया असल्यामुळें तिच्यांतही थोडाथोडका जोम नसतो.

दैवीशक्ति आणि आसुरीशक्ति मनुष्याला परस्पर विरोधी दिशेनें खेंचतात. पण हा गजग्राह चालू असतांना मनुष्य मधल्या दोरीप्रमाणें तटस्थ असतो का? त्याचें जीवन निराग्रही असतें का? नाहीं. सुदैव म्हणा किंवा दुर्दैव म्हणा मनुष्य एका अथवा दुसऱ्या बाजूला झुकतो आणि आपलाही जोर करूं लागतो. जर तो वासनांच्या भरीस पडला असला, देहात्म बुद्धीनें भरला असला तर तो आसुरी पक्षाकडे खेचूं लागतो आणि मग दैवीशक्तीला दुःखानें म्हणावें लागतें, 'मालकच जर बिघडला तर आम्ही काय करणार. We cannot be more royalist than the king, मालकच जर उधळपट्टी करावयास बसला तर कोठारी संभाळून किती संभाळणार?'

अशा स्थितींत मनुष्य खालीं पडूं लागतो. पडतां पडतां अधःपाताचा वेगही वाढूं लागतो. सर्व पुण्यात्मे हें दृश्य पाहून हाहाःकार करतात आणि हा अधःपात कोठेंतरी थांबो अशी कल्याणकामना करतात.

अधःपात वेगानें होतो खरा, पण पापमय जीवनाचा मोकळेपणानें अनुभव घेत असतांना कधींतरी शिसारी ही येतेच. निदान पापाचरणांत प्रारंभीं जी उत्कटता असते ती वारंवार अनुभव घेतल्यानें ओसरते आणि संवय जरी बळवान असली तरी अजीर्णानें ज्याप्रमाणें तोंडाची रुचि नाहींशी होते त्याप्रमाणें पापांची गोडी कमी होते, स्वाद क्षीण होतो आणि फक्त संवय पडली आहे म्हणूनच मनुष्य पापाचरणांत वहात राहातो. असें झालें आणि आसुरी शक्तीचा जोम क्षीण झाला म्हणजे तिची खेंच ढिली पडते आणि मग मनुष्याला पश्चात्ताप करण्याची संधि मिळते. अशा वेळीं जर साधकदशेची स्मृति कायम असली तर मनुष्य खडबडून जागा होतो आणि स्वतःशीं म्हणतो – काय रे हा माझा अधःपात! मी मोक्षपदाचा यात्री ना! आणि हा कोठें येऊन पडलोंय!! कांहीं नाहीं. 'जाग आली तीच पहांट' असें समजून आतां पुन्हां वर चढावयास लागलें पाहिजे. पश्चात्तापपूर्वक असा शुभ संकल्प होतांच गजग्राहाचें पारडें बदलतें, आसुरीशक्तीची खेंच अळणी होते आणि दैवीशक्ति आपली स्वाभाविक श्रेष्ठता अनुभवास आणून देते. मनुष्यजीवन जें त्या क्षणापर्यंत अधोगामी होतें तें ऊर्ध्वगामी होऊं लागतें आणि तेवढ्यानेंच देव आकाशांत दुंदुभी वाजवूं लागतात. हा दुरात्मा आतां 'सम्यक् व्यवसित' झाला. हा पापाच्या गर्तेत कितीही खोल पडलेला असला आणि पापांनीं घेरलेला असला तरी याला उपरति झाली आहे, याची गति आतां ऊर्ध्वगामी झाली आहे. तेव्हां या क्षणापासूनच 'साधुरेव स मन्तव्यः।' कारण? कारण कीं 'सम्यग् व्यवसितो हि सः'।

# १२

आज जगांत ज्या भौतिक शक्ति नांदत आहेत त्यांमध्यें विद्युत् किंवा वीज दिवसेंदिवस सर्वतोगामी होऊं लागली आहे. विजेचें हें विश्वसाम्राज्य पाहिलें म्हणजे आधुनिक मन देखील आश्चर्यचकित झाल्यावांचून राहात नाहीं.

जी वीज पाणी तापविते तीच वीज पाण्याचें बर्फही करते आणि दूध—दहीं गोठवून दिवसांचे दिवस टिकविते. विजेनें रोग बरे होतात आणि विजेनेंच मनुष्य एका क्षणांत ठारही करतां येतो. विजेनें जहाजें चालतात. विजेनें घरबसल्या आकाशांतील विमानें चालवितां येतात. विजेनें जगाच्या एका टोकाचें संगीत दुसऱ्या टोकास पोंचवितां येतें आणि विजेनें एके ठिकाणीं बसून सर्व जगाशीं बोलतां येतें.

पण ही वीज आहे तरी कोणता पदार्थ ? वीज म्हणजे निसर्गातील एका अतृप्त वासनेची तृप्तीसाठीं चाललेली धडपड होय. विजेचे दोन प्रवाह असतात. एक धन आणि एक ऋण. हे दोन्ही एकमेकांत मिसळून तृप्त होण्याचा प्रयत्न करतात. त्यांतूनच ही सारी शक्ति उत्पन्न होते. गरम वीज थंड्या विजेला मिळाली, दोहोंच्या प्रवाहांतील सपाटीचा भेद नष्ट झाला म्हणजे ग्रंथ आटोपला. पुढें त्यांतून कांहींच कार्य उत्पन्न होऊं शकत नाहीं. या तृप्त विजेचें जेव्हां पुनः पृथक्करण होईल आणि वरचा आणि खालचा अथवा नर आणि मादी असे दोन प्रवाह उत्पन्न होतील तेव्हांच ते पुनः एकमेकांना मिळण्यासाठीं प्रचंड प्रयत्न

करतील आणि त्यांतूनच विजेच्या जगाचा सारा विस्तार नव्यानें सुरू होईल. विद्युत्-शास्त्र जाणणाऱ्या कालच्या पोराला देखील हें सर्व माहीत आहे.

पण भलभल्या तत्त्वज्ञांना देखील हें माहीत नाहीं कीं, हें जग आणि त्यांतील सर्व व्यापार हे देखील जीवात्मा आणि परमात्मा असा चैतन्यांत भेद पडल्यामुळेंच उत्पन्न झालेले आहेत. जीवात्मा परमात्म्यापासून निराळा झाला म्हणजे ताबडतोब त्याच्यामध्यें स्वस्थानीं परत जाण्याची धडपड सुरू होते आणि परमात्म्याला देखील वात्सल्याचा पान्हा फुटून तोही आपल्याकडून पुनर्मिलनाची साधना सुरू करतो.

या जगामध्यें जें कांहीं सुखदुःख आहे, प्रेम आणि प्रतीक्षा आहे, वासना आणि आकांक्षा आहेत, भय आणि उत्कंठा आहे तें सर्व या जिवा-शिवाच्या विरहांतूनच उत्पन्न झालेलें आहे. या विश्वाची उत्पत्ति आणि त्याची स्थिति या विरहामुळेंच आहे. आकाशांतील ताऱ्यांचा निस्तब्ध पिंगा घ्या किंवा श्रावणी दुर्दिनामध्यें सळसळ करणाऱ्या वृक्षपर्णांचें 'कोरस' घ्या, सर्व कांहीं त्या विरहांतूनच उत्पन्न झालेलें आहे आणि कवीच्या हृदयांत जे कल्पनांचे कारंजे उडतात आणि गायनाचे झरे वाहूं लागतात तशाच निरनिराळ्या अनुभूति – तांडव आणि लास्य – नाचूं लागतात, ते देखील या विरहामुळेंच होय.

[1]हेरि अहरह तोमारि विरह
    भुवने भुवने राजे हे ।
कत रूप धरे कानने भूधरे
    आकाशे सागरे साजे हे ।
सारा निशि धरि ताराय ताराय
    अनिमेष [2]चोखे नीरवे [3]दाँडाय,
पल्लवदले श्रावणधाराय
    तोमारि विरह बाजे हे ।
घरे घरे आजि कत वेदनाय
    तोमारि गभीर विरह घनाय

१ हेरि – (मी) पाहातों. २ चोखे – डोळ्यांनीं. ३ दाँडाय – उभा राहातो.

कत प्रेमे हाय कत वासनाय
कत सुखे दुखे काजे हे।
सकल जीवन उदास करिया
कत गाने सुरे गलिया झरिया
तोमारि विरह उठिछे भरिया
आमार हियार माझे हे।

‘हे भगवंता, मी नित्य पाहातों कीं, तुझाच विरह या चतुर्दश भुवनांमध्यें विराजमान आहे. हा विरह किती विविध प्रकारचीं रूपें धारण करून अरण्यांत आणि पहाडांत, आकाशांत आणि सागरांत शोभून उठत असतो. हाच विरह सबंध रात्र प्रत्येक ताऱ्यांताऱ्यांतून मूकपणें आणि अनिमिष लोचनांनीं व्यक्त होतो आणि तोच विरह श्रावण महिन्याच्या दुर्दिनीं पावसाच्या झडीच्या रूपानें पानांपानांतून मुखरित होत असतो. आणि तोच तुझा गंभीर विरह घराघरांतून कितीतरी तऱ्हेतऱ्हेच्या वेदनांच्यामध्यें आणि कितीतरी प्रेमाच्या आणि वासनांच्यामध्यें अनेक प्रकारच्या सुखांत दुःखांत, आणि विविध कार्यांमध्यें घनदाट झालेला दिसून येतो.

तोच विरह माझ्या सबंध जीवनामध्यें एक प्रकारची उदासीनता भरून कितीतरी गायनांच्या रूपानें विरघळून झिरपूं लागतो आणि माझ्या हृदयांतून पुनः पुनः नव्या नव्या रूपानें उतूं जाऊं लागतो.

या विश्वांत, बाह्य जगांत किंवा हृदयाकाशांत जो कांहीं म्हणून व्यापार चालूं आहे तो या विश्वविरहाचेंच एकेक रूप होय.”

# १३

परिचित आईबापांना सोडून एखादी प्रौढ कन्या विश्वासानें अपरिचित अशा आपल्या पतीच्या घरीं राहावयास जाते, तेव्हां तिच्या हृदयांत केवढी जबरदस्त प्रेमश्रद्धा उत्पन्न होत असली पाहिजे. आईबापांनीं लहानाचें मोठें केलें. सर्व जीवन त्यांच्या देखरेखीखालीं विकसलें. स्वतःच्या आशा-आकांक्षा वडिलांच्या प्रेमानें, प्रोत्साहनानें पुष्ट झाल्या आणि वेलीवर फुलें वाढावींत त्याप्रमाणें आईबापांच्या घरीं जीवनाचा विस्तार केला; पण प्रियकराचें दर्शन होतांच मुलीला वाटूं लागलें कीं, माहेरचें जीवन म्हणजे खरें जीवन नव्हे. ती जीवनाची फक्त पूर्वतयारी होती. हृदयांत आणि रोमरोमांत शिरून प्रेमानें तिला सांगितलें कीं, 'श्रद्धापूर्वक स्वतःला आपल्या प्रियकराच्या हातीं सोंपवून दे, त्याच्या बरोबर राहूनच तुझें जीवन संपूर्ण होईल – कृतार्थ होईल' आणि तावडतोब तिनें बाळपणीचा सर्व अनुभव बाजूस सारून, मातपित्यांचा निरोप घेण्याचें ठरविलें आणि श्रद्धापूर्वक स्वतःच्या प्रियकराशीं ती एकरस झाली.

अज्ञाताची मनुष्याला जशी भीति असते तसेंच त्याचें असाधारण आकर्षणहि असतें. जें ज्ञात आहे त्याचें रूप निश्चित असतें. जें अज्ञात आहे त्याला आपली श्रद्धा, भक्ति आणि कल्पना इष्ट तें रूप देऊं शकतात. यामुळेंच अज्ञात, अज्ञात असूनही अगदीं जवळचें आत्मीय वाटतें आणि सबंध जीवनावर एकाएकीं छाप पाडण्यास समर्थ होतें.

संध्याकाळ झाली आहे, नदीचा प्रवाह झुळझुळ वाहात आहे, वारा चित्ताला अस्वस्थ करीत आहे, रस्त्यावर कोणी नाहीं, अशा वेळीं एक प्रौढा नदीवर पाणी भरून आणण्यासाठीं जाऊं पाहाते. मुग्धा असती तर तिला भीति वाटली असती कीं, रस्त्यावर कोणी नाहीं अशा वेळीं अशा एकांतांत कोणी येऊन भेटला तर? या भयानें तिनें जाण्याचें टाळलें असतें. प्रौढेला याच परिस्थितीचें असाधारण आकर्षण वाटतें. ती म्हणते रस्त्यांत चिट्पांखरूंही नाहीं अशा वेळीं तो अज्ञात जादूगार भेटण्याचा संभव आहे. तेव्हां गेलेलेंच बरें. परत येतां येणार नाहीं याची भीति बाळगावयाची ती कां? असा विचार मनांत येणें हेंदेखील तितकेंच विचित्र नाहीं का? पण अभिसारिकेचें मनच लोकविलक्षण असतें.

ऐहिक जीवन हें एक प्रकारें आत्म्याचें माहेर म्हटलें पाहिजे. येथें लहानाचें मोठें होऊन जरी जीवन समृद्ध केलें असलें तरी सरते शेवटीं जीवननदीच्या घाटावर जाऊन मृत्युरूपी होडींत बसून पैलतीराला घेऊन जावयाचें आमंत्रण वाजविणाऱ्या मुरलीधराचें ओझरतें जरी दर्शन झालें तर मग आत्म्याचे पाय माहेरी टिकूं शकत नाहींत. त्या मुरलीचा स्वर ऐकला, तिचें आमंत्रण स्वीकारलें म्हणजे परत येतां येणार नाहीं हें ठाऊक असूनही आपला देहरूपी घट घेऊन नव्यानें जीवन भरण्यासाठीं आणि पैलतीरीं जाण्यासाठीं पाय नदीकडे धांवतात.

जीवनसंध्येच्या वेळीं प्रत्येकाची जर पैलतीरीं जाण्याची अशीच तयारी झाली तर जीवन आणि मृत्यु यांचें द्वैत नष्ट होऊन, फुलांतून फळप्राप्ति व्हावी तशीच जीवनाची पूर्तता होईल.

आर नाइ रे बेला, नामलो[1] छाया
धरणीते,
एखन चल् रे घाटे कलसखानि
भरे निते।
जलधारार कलस्वरे
सन्ध्यागगन आकुल करे,
ओरे डाके[2] आमाय पथेर 'परे
सेइ ध्वनिते।

१ नामलो–उतरली. २ डाके–बोलावीत आहे.

चल् रे घाटे कलसखानि
भरे निते।
एखन विजन पथे करे ना केउ
आसा – जावा –
ओरे प्रेमनदीते उठेछे ढेउ,
उतल हावा।
जानि ने आर फिरबो कि ना,
कार साथे आज हबे [४]चिना
घाटे सेइ अजाना बाजाय बीणा
तरणीते।
चल् रे घाटे कलसखानि
भरे निते।

"आतां वेळ उरली नाहीं. संध्याकाळची छाया पृथ्वीवर उतरली आहे. आतां घडा घेऊन तो भरून आणण्यासाठीं घाटावर चलावें हें बरें. पहा हा संध्याकाळचा समीर जलधारेच्या कलस्वरानें कसा व्याकुळ करीत आहे आणि त्याच ध्वनीच्या मिषानें मला घर सोडून बाहेर येण्यास आमंत्रण देत आहे. चला, आतां घडा घेऊन भरून आणण्यासाठीं घाटावर जाऊं.

तिन्हीसांजची वेळ आहे. या वेळीं या निर्जन मार्गावर कोणीही ये-जा करीत नाहीं. प्रेमनदीला भरती येऊन लाटा उसळत आहेत आणि वारा धुमाकूळ घालीत आहे. आज घाटावर गेल्यावर परत येतां येईल किंवा नाहीं हें मला ठाऊक नाहीं. आज तेथें कोणाचा परिचय होईल हें कळत नाही. घाटावर, घाटावरच्या होडींत तो अपरिचित तरुण वीणा वाजवीत आहे एवढें दिसतें खरें. कसेंही असो; घडा भरण्यासाठीं घाटावर गेलें पाहिजे खरें."

---

१ आसा-जावा–ये-जा. २ ढेउ–लाट, तरंग. ३ उतल–चंचल, उत्कंठित, व्याकुळ. ४ चिना–परिचय, ओळख.

# १४

सृष्टीमध्यें सुन्दर, ललित, भीषण, रौद्र, भयानक, असे अनेक देखावे असतात. पण मनुष्याला उन्मत्त करून वेडावून सोडणारा प्रसंग म्हणजे वर्षाऋतूंतील पावसाची झड होय. या टोकापासून त्या टोकापर्यन्त आकाश दुभत्या मेघांनीं तुडुंब भरून जावें. विजेनें मधून मधून आकाशाचे अक्षांश रेखांश मोजूं लागावे. मेघगर्जनेनें आकाशाचा कटाह किती खोल आहे याचा ठाव पाहावा. जेथें पाहावें तेथें पावसाच्या सरीवर सरी येतात. मोठे मोठे पहाड म्हशीच्या पाड्याप्रमाणें स्नानानंदांत मग्न होतात. लहान लहान ओहोळ ओढ्यांना मिळतात, ओढे मिळून लोंढा होतो आणि लोंढे सर्वत्र जलाकार करून समुद्रापर्यन्त जावयाची जरूर नाहीं असें जाहीर करतात. वनस्पति सृष्टि देखील धन्यधन्य म्हणत गुदमरून जावी अशा वेळीं कोणतें निसर्गप्रेमी हृदय उन्मत्त होऊन भुतां-शिवगणांप्रमाणें तांडवनृत्य करणार नाहीं ? विजांचा कडकडाट हाच जेथें डमरू वाजत आहे असें मेघखंडाचें तांडव पाहिल्यानंतर मनुष्यालाही त्याचें अनुकरण करण्याची वृत्ति व्हावयाचीच. आणि आतां कसलीच व्यवस्था नको, कसलीच योजना नको, जगबुडती होईपर्यन्त नाचूं या आणि त्या नृत्यांतच आपणही बुडून जाऊंया असा भैरव संकल्प मनांत आल्यावांचून राहात नाहीं.

कदाचित् अशा मेघवृष्टीच्या वेळीं निसर्गानें आपल्या सर्व जटा पिंजारलेल्या पाहूनच प्राचीन कवीला गंगावतरणाचा साक्षात्कार झाला असेल.

*        *        *

खालील भजन कांहीं रूपक नव्हे, पण पावसाळ्याच्या दिवसांत जेव्हां झड सुरू होते तेव्हां ती पाहून कविहृदय कसें उन्मत्त होतें याचें तें वर्णन आहे. रूपकामध्यें एखाद्या मानसिक वृत्तीचें स्पष्ट चित्र खेंचण्यासाठीं एखाद्या भौतिक घटनेचें चित्र कल्पनेनें उभें केलें जातें. स्मरणांत त्या चित्राचें वातावरण जागृत झालें म्हणजे हृदयांतील भावना आपोआप त्या वातावरणांत स्पष्ट होऊं लागतात. पण हा सर्व प्रकार एका दृष्टीनें पाहातां कृत्रिम असतो.

येथें प्रत्यक्ष पावसाची झड चालू आहे; आणि त्या झडीमुळेंच चित्तवृत्ति उत्तेजित होऊन आपल्या स्वभावाप्रमाणें स्वच्छंद विहार करूं लागली आहे. कवि फक्त त्याचा येथें चितार देत आहे.

आज बारि झरे झर झर
भरा [1]बादरे।
आकाश-भाङा आकुल धारा
कोथाओ ना धरे।
शालेर बने थेके थेके
[2]झड दोला देय हेंके हेंके,
जल छुटे जाय [3]एंके बेंके
[4]माठेर 'परे।
आज मेघेर जटा उडिये दिये
नृत्य के करे।

---

१ बादरे–मेघाच्छन्न आकाशांतून. २ झड–वादळ. ३ एंके बेंके–वाकडेतिकडे, आडवे-तिडवे. ४ माठेर–माळावर.

ओरे वृष्टिते मोर छुँटे[५] छे मन,
लुँटे[६] छे ऐ झडे,
बुँक[७] छौपिये[८] तरंग मोर
काहार पाये पडे।
अंतरे आज की कलरोल,
द्वारे द्वारे भाङल आगल,
हृदयमाझे जागल पागल
आजि भाद्रे।
आज एमन करे के मेते[९] छे
बाहिरे घरे।

"ओथंबलेल्या ढगांतून आज पाणी कसें मोकळेपणानें झर-झर वर्षत आहे. पखालीला जर पुष्कळशीं छिद्रें असलीं तर त्यांतून पाणी गळूं लागतें आणि हळूहळू पखाल रिकामी होते. पण पखाल जर फाटूनच गेली तर पाणी वाहून जायला वेळच लागत नाहीं, सगळेंच्या सगळें पाणी बाहेर येतें. त्याचप्रमाणें आज आकाश फाटून पाणी सांडूं लागलें आहे. कोठेंही तें रोकलें जात नाहीं. पाहा, शालवृक्षांच्या वनांत थांबून थांबून तुफान जणुं काय हेलकावे घेत आहे आणि शेतांवर तर हवी तशी पाण्याची वृष्टि होऊं लागली आहे. आज, हा असा मेघांची जटा उडवीत उडवीत कोण बरें नृत्य करीत आहे.

अहाहा, या वृष्टीनें माझें मन देखील मोकळें झालें आहे आणि या तुफानाबरोबर मिसळून जात आहे. माझ्या चित्ताचा प्रवाह छाती भरून ओसंडत आहे. हा कुणाच्या पायीं पडत आहे बरें ?

आज माझ्या हृदयांत हें कसलें तुफान माजलें आहे. आज प्रत्येक घराच्या दरवाज्याची अगंळा तुटून पडली आहे आणि भाद्रपदाच्या या मस्तीनें माझ्या

---

५ छुटे छे–धांवत सुटलें आहे. ६ लुटे छे–गडबडा लोळत आहे. ७ बुक–हृदय, छाती. ८ छापिये–ओसंडून. ९ मेते छे–मातला आहे, मस्त झाला आहे.

हृदयांत एक वेडा — उन्मत्त जागा झाला आहे. अशा रीतीनें घरीं आणि बाहेर कोण हा पिसाळला आहे ?

पावसाच्या झडीनें सृष्टी अगदीं वेडावून गेली आहे आणि तिच्याबरोबर मीही पागल झालों आहें. आम्हांला अशा रीतीनें नाचविणारा कोण असेल बरें!"

## १५

चर्मचक्षूला हें सर्व विश्व विश्वरूपानेंच दिसतें. पण भक्त या विश्वाला जगन्मातेच्या प्रेमाची मुद्रा मानतो. चर्मचक्षु म्हणतो — मला झाडें दिसतात, पानें दिसतात, फुलें आणि फळें दिसतात. आकाशांत उडणारे पक्षी दिसतात आणि त्यांच्याही वर राहून स्वच्छंद विहार करणारे ढगही दिसतात. हें सर्व सर्व आहे पण त्याचें आपल्याला काय होय ? त्यांना क्षणभर पाहावें, बरे दिसतात म्हणावें आणि आपल्या कामाला लागावें. चर्मचक्षूला डोळे असून पुरतें दिसत नाहीं, विचार असून पुरतें समजत नाहीं, हृदय असून पुरतें उमगत नाहीं. कारण प्रेमाच्या स्पर्शमण्याचा त्याला अनुभव नसतो.

पण ज्या क्षणीं भक्तीचा उदय झाला, प्रेमाचें रसायन चाखावयास मिळालें, त्या क्षणीं दिव्यदृष्टि मिळालीच म्हणून समजावें. दिव्य दृष्टि म्हणजेच प्रेमदृष्टि.

एखादी लिपि शिकण्यापूर्वी हातांत पडलेलें पत्र म्हणजे नुसत्या रेघोट्या असतात. पण लिपि कळली म्हणजे त्याच रेघोट्यांचीं वाक्यें बनतात आणि वाक्या-वाक्यांतून अर्थघन-भाव स्फुरूं लागतात. मग मनुष्य म्हणावयाचा नाहीं कीं, या तर फक्त रेघाच आहेत — वळणदार रेघा म्हणा पाहिजे तर — यांतून अधिक बोध तो काय व्हावयाचा. पत्रांतील भाव दृष्टिगोचर झाल्याबरोबर हृदय मस्त होऊन म्हणेल, "अरे वेड्या, या रेघोट्या नव्हत, यांचीं सुंदर वळणें हा मुख्य भाग नव्हे, या रेघोट्यांतून प्रेमानें ओथंबलेलें हृदय

बोलत आहे. नुसतें बोलतच नव्हे पण बाहूंच्या मदतीवांचून हृदय हृदयाला आलिंगनच जणूं देत आहे. आणि जेथें प्रथम पुरेसा परिचयही नव्हता तेथें हृदयाचें ऐक्य होऊन अद्वैतानंद उपभोगावयास मिळत आहे. चर्मचक्षूला जें केवळ पत्र होतें तें प्रेमचक्षूला हृदयरसायन झालें आहे, सर्वत्र त्याचाच विस्तार आहे, सर्वत्र त्याचीच वाणी ऐकूं येत आहे, सर्वत्र त्याचाच स्पर्श होत आहे. आतां दुसरें असें कांहींच उरलें नाहीं."

एइ तो तोमार प्रेम, ओगो
हृदय-हरण।
एइ-जे पाताय आलो नाचे
सोनार वरन।
एइ-जे मधुर आलसभरे,
मेघ [1]भेसे जाय आकाश–'परे,
एइ-जे [2]बातास देहे करे
अमृत-क्षरण।
एइ तो तोमार प्रेम, ओगो
हृदयहरण।
प्रभात-आलोर धाराय आमार
नयन भेसेछे।
एइ तोमारि प्रेमेर वाणी
प्राणे एसेछे।
तोमारि मुख ऐ [3]नुयेछे,
मुखे आमार चोख [4]थुयेछे,
आमार हृदय आज [5]छुँयेछे
तोमारि चरण।

---

१ भेसे–तरंगत. २ बातास–वारा. ३ नुयेछे–वांकलें आहे. ४ थुयेछे–ठेवीत आहे, स्थिर करीत आहे. ५ छुँयेछे-स्पर्श करीत आहे.

“ हे हृदयहरण स्वामी, हा जो सोनेरी प्रकाश वृक्षाच्या आणि वेलींच्या पानांवर नाचत आहे; आणि ही जी मधुर मदालसा मेघपंक्ति आकाशांतून सफर करीत आहे; त्याचप्रमाणें हे जे शीतल वायु माझ्या शरीराला अमृतस्पर्श करून सुखवीत आहेत; हें सर्व तुझें प्रेमच आहे. हृदयहरणा नारायणा, हें सर्व तुझें प्रेमच आहे.

प्रभात समयींच्या प्रकाशाच्या झऱ्यानें माझे डोळे प्रथम भिजून चिंब होतात आणि मग प्रकाशाच्या पुरांत वाहूं लागतात; तो प्रकाशाचा पूर नसून माझ्या प्राणांत प्रेरणा भरणारी तुझी प्रेमवाणीच आहे.

किती धन्यता! हें पाहा, तुझें मस्तक खालीं वाकलें आहे, तूं आपल्या डोळ्यांनीं माझें तोंड कुरवाळीत आहेस, आणि माझें हृदय आज धन्य होऊन तुझ्या चरणाचा स्पर्श करीत आहे. हृदयहरणा, तूं त्याचा स्वीकार करून त्याला कृतार्थ केलें आहेस. सर्वत्र सर्व प्रकारें तुझ्या प्रेमाचाच अनुभव येत आहे. ”

# १६

फुलें जेव्हां फुलतात तेव्हां आपल्याला आनंद कां होतो ? फुलें कांहीं खायच्या उपयोगीं पडत नाहींत, किंवा प्यायच्या कामीं येत नाहींत. फुलें म्हणजे कांहीं कापूस नव्हे कीं, त्यांना कांतून त्यांचें वस्त्र बनवितां येईल. फुलें फक्त फुलतात, हसतात आणि सुगंध देतात. फुलांना दुसरें कांहींच करतां येत नाहीं. त्यांचा दुसरा कांहीं उपयोगही नाहीं. तरीही तीं जवळ असावींत असें प्रत्येकाला वाटतें. फुलें नसलीं म्हणजे आसपासचें सर्व कसें ओकें ओकें वाटतें. आणि हीं कुचकामाचीं फुलें आसपास असलीं म्हणजे वातावरण जणूं काय भरलेलेंसें आणि संपूर्ण होतें.

घरांत उपयोगाच्या वस्तू कितीतरी असतात. त्या मूल्यवानही असतात, शोभिवंतही असतात, त्यांचेवांचून पदोपदीं अडतें. त्या वस्तू असल्यामुळें जीवनक्रम सुखकरही होतो. पण फुलांची सर कांहीं त्यांना येत नाहीं. त्या सर्व वस्तू असूनही ‘ फुलांची निकामी गरज ’ मात्र त्यांना सारतां येत नाहीं. खोलीचा सर्व साज तयार झाल्यानंतर जेव्हां तेथें फुलें येऊन बसतात तेव्हांच सर्व गृहरचना कृतार्थ होते आणि प्रसन्न समाधानानें फुलून उठते.

त्याचप्रमाणें देवाच्या दरबारीं असंख्य कर्मवीर, ध्यानवीर आणि दानवीर असून देखील गानवीराची आवश्यकता तेथें असतेच. कवीला वाटतें कीं, आपण कांहींच कामाचे नाहीं. बाकीचे सर्वच उपयोगी आहेत. आपल्यावांचून कांहींच अडत नाहीं.

पण या त्रैलोक्याचा प्रभु स्वतः गान-रसिक असल्यामुळेंच त्यानें आपल्याला त्याच्या पदरीं आश्रय दिला आहे. गाणें गावें एवढेंच आपलें काम. वेळीं अवेळीं सूर छेडावेत आणि वातावरण हर्ष-विषादानें किंवा शृंगार-कारुण्यानें भरून टाकावें आणि केवळ सुरांची गोडी उत्पन्न करावी एवढेंच आपलें काम.

पुरुषार्थीची वेळ संपली. सर्वजण घरीं परत आले. प्रकाश मावळला आणि विश्रांतीची रात्र पसरली म्हणजे आपली संधि आली. थकून भागून आलेले लोक जेव्हां ईश्वराची आराधना करूं लागतात तेव्हां ती आराधना सुगंधित आणि मुखरित करण्याचें काम आपलें. सर्व कर्मवीरांना गाण्याच्या प्रवाहांत गोड झोंप लागावी एवढेंच आपल्याला करतां येतें. आपलें स्थान किती गौण आहे, किती नम्र आहे हें जाणत असल्यामुळें कवि फक्त एवढेंच मागणें मागतो कीं, रात्र जेव्हां संपेल आणि कर्मयुगाला पुनः प्रारंभ होईल तेव्हां मला मागें टाकूं नये — दूर लोटूं नये. स्वामींनीं आपल्या जवळपास कोठेंतरी ठेवावें. एवढें केलें म्हणजे माझी पूर्ण कदर झाली. मला सर्व मान मिळाला. मी कृतार्थ झालों. धन्य धन्य झालों. आणखी मला कांहींही नको. खरोखर. कांहींही नको !

आमि हेथाय [१]थाकि शुधु
गाइते तोमार गान,
दियो तोमार जगत्‌सभाय
[२]एइटुकु मोर स्थान ।

आमि तोमार भुवनमाझे
लागि नि नाथ, कोनो कोजे,
शुधु केवल सुरे बाजे
अकाजेर एइ प्राण ।

निशाय नीरव देवालये
तोमार आराधन,

---

१ थाकि — (मी) आहें. २ एइटुकु — इतकेंच.

[3]तखन मोरे आदेश करो
गाइते हे राजन ।
[4]भोरे जखन आकाश जुड़े
वाजवे वीणा सोनार सुरे
आमि जेन ना रइ दूरे
एइ दियो मोर मान ।

"मी येथें फक्त तुझें गाणें गाण्यासाठींच आहें. तुझ्या जगत्सभेमध्यें तूं मला एवढेंच स्थान दे. हे प्रभो, तुझ्या भुवनामध्यें दुसऱ्या कोणत्याही कामाला लावण्याजोगा मी नाहीं. फक्त माझा हा प्राण हीं अर्थविहीन व्यर्थ गाणींच गातो. हे राजन्, संध्याकाळीं किंवा रात्रीं शांत देवालयांत तुझें आराधन चालू असेल तेव्हां त्या दरबारांत गाणें गाण्याचा मला आदेश दे– गाणें गाण्याची मला फरमाइश कर; आणि सकाळीं जेव्हां आकाश उघडेल आणि विश्ववीणा सोनेरी आवाजानें झंकृत होईल आणि सर्व प्रकारच्या कर्मांचा प्रारंभ होइल तेव्हां हा दास आपल्या पायापासून दूर राहाणार नाहीं, एवढाच मान त्याला दे."

३ तखन–तेव्हां. ४ भोरे–पहाटेस.

# १७

ईश्वर आणि भक्त, शिव आणि जीव यांचा संबंध अद्‌भुत असतो. भक्त ईश्वराच्या प्राप्तीसाठीं झुरून मरतो यांत आश्चर्य नाहीं; पण ईश्वराला देखील भक्ताच्या प्राप्तीवांचून संतोष नसतो. एखादा प्रेमी आपल्या प्रियेला मिळविण्यासाठीं ज्याप्रमाणें जन्मभर धडपड करतो, त्याप्रमाणें ईश्वरदेखील आपणच उत्पन्न केलेल्या जीवांच्या हृदयांमध्यें स्थान मिळविण्यासाठीं धडपडत असतो. ईश्वर सर्वसमर्थ आहे. सर्वांच्या हृदयांत त्याला स्थान आहेच. परंतु राजा म्हणून हृदयसिंहासनावर जाऊन बसण्याचा त्याला मोह नाहीं. अतिथि म्हणून आमंत्रण मिळण्याची तो वाट पाहात असतो. आज नाहीं उद्यां कधींतरी याला ( भक्ताला ) माझें स्मरण होईलच. तो निजला असला तर तो आपण होऊन त्याला उठविणार नाहीं, तो आपोआपच उठण्याची वाट पाहाणार–पाहील. त्याचें ध्यान खेंचण्याचा तो उतावळा प्रयत्न करणार नाहीं, उलट वाट पाहील. याच्या सर्व गोष्टी जेव्हां आटपतील तेव्हांतरी निदान हा मजकडे वळेल–या विश्वासानें ईश्वर धीर धरून असतो आणि युगानुयुगें वाट पाहात असतो.

वाट पाहातच नव्हे तर वाट चालत असतो. या चिरयात्रीला जर विचारलें कीं कुठें चाललास ? तर तो म्हणेल, माझा एक भक्त फार फार दूर आहे. हळू हळू मी आमचे-

मधील अंतर कापीत आहें. कधींतरी आम्ही भेटूंच. तो जीव किती कां बेदरकार असेना माझा धीर सुटेल तेव्हांच मला चिंता होईल ना ? मी शेवटपर्यंत चालतच राहाणार.

मनुष्य जेव्हां ईश्वरविमुख असतो तेव्हां देखील त्याची ईश्वराजवळ जाण्याची साधना चालूच असते. किंवा खरें म्हणावयाचें म्हणजे मनुष्य जरी आंधळा असला तरी ईश्वर डोळस आहे. तोच मनुष्याला जवळ करण्याची साधना त्याचेकडून करवून घेतो. अथवा असें म्हटलेलें अधिक योग्य होईल कीं, ईश्वरच स्वतः साधना करीत करीत भक्ताच्या जवळ येत असतो. सरतेशेवटीं जेव्हां ईश्वरी सान्निध्याच्या भानाचा मनुष्य-हृदयांत उदय होतो तेव्हां त्याचें सबंध जीवन एकाएकीं सुगंधित होऊन जातें. त्याला आनंदाच्या उकळ्या फुटूं लागतात. आणि जीवनामध्यें कधीं न अनुभवलेली कृतार्थता त्याच्या प्रत्ययास येते. आणि मग खात्री होते कीं, आतां प्रत्यक्ष दर्शन कांहीं फारसें दूर नाहीं. पुष्कळ वर्षें, युगानुयुगें वाट चालल्यानंतर जेव्हां भेटीची संधि अगदीं जवळ येऊन ठेपते तेव्हां ईश्वर आपला दूत पाठवून सूचना देऊन ठेवितो कीं, आतां भेट होणार आणि मिठी पडणार. त्याचेसाठीं, तयार राहिलें पाहिजे. हा निरोप कानीं पडतांच हृदयाला कसा उन्माद चढत असेल !

आमार मिलन लागि तुमि
[1]आसछ [2]कबे थेके ।
तोमार चन्द्र सूर्ज तोमाय
राखबे कोथाय ढेके ।
कत कालेर सकालसाँझे
तोमार चरणध्वनि बाजे,
[3]गोपने दूत हृदय[4]माझे
गेछे आमाय डेके ।
ओगो पथिक, आजके आमार
सकल परान व्येपे

१ आसछ—येत आहेस २ कबे थेके—केव्हांपासून. ३ गोपने—गुपचुप. ४ माझे—मध्यें, आंत.

थेके थेके हरष जेन
उठछे केंपे केंपे ।
जेन समय एसेछे आज,
[5]फुरालो मोर जा छिल काज —
बातास आसे हे महाराज,
तोमार गन्ध मेखे ।

" मला भेटण्यासाठीं तूं केव्हांपासूनचा चालून येत आहेस. तुझे चंद्र आणि सूर्य तुला कुठपर्यंत झांकून ठेवतील ? कितीतरी सकाळ सांजा येऊन गेल्या. तुझीं पावलें हळूहळू जवळ येतांना ऐकू येतात. आणि आतां तर तुझा दूत हळूच येऊन माझ्या हृदयांत सांगून गेला आहे कीं, आतां भेटण्याची वेळ जवळ आली आहे. चल तयार हो.

हे चिरपांथस्था, आज माझा सर्व हर्ष माझ्या सर्व प्राणाला व्यापून टाकून कसा थरारून उठला आहे. आज मला वाटूं लागलें आहे कीं, बहुतकरून माझी साधना पुरी झाली, माझीं कामें संपलीं. आतां मीलनाची घडी जवळ आली आहे. पाहा, हवेंतून देखील तुझ्या सुगंधाची झुळूक येऊन राहिली आहे."

---

५ फुराले – संपलें.

# १८

साधकाच्या जीवनांत आशा-निराशेचे हेलकावे यावयाचेच. त्यांतही पुष्कळ वेळां आशा आणि निराशा दोन्हीही अनाठायीं असतात. आशा फोफावली म्हणजे ती जवळ जवळ मुक्कामावर पोंचल्याच्या खात्रीपर्यंत जाऊन भिडते, आणि निराशा कोरून खाऊं लागली म्हणजे ती मनुष्याला कातावून कूपर (Cowper) कवीप्रमाणें पार वेडा करून सोडते.

पण साधक केव्हां केव्हां डोळसपणें स्वतःची स्थिति स्पष्टपणें ओळखूं शकतो. आपण कोठवर पोचलों आहोंत, किती मार्ग कापावयाचा उरला आहे, याचें चित्र त्याला स्पष्टपणें दिसत असतें. अशा वेळचे त्याचे उद्गार पोकळ उत्कटतेचे नसले तरी अतिशय ताजे आणि संतोषकारक असतात. खरें नाणें जसें खणखण वाजावें त्याप्रमाणें हे उद्गार सत्याचा नाद देत असतात.

साधक अंतर्मुख होऊन स्वतःची अवस्था तपासूं लागला म्हणजे त्याला दिसून येतें कीं, आपल्या जहाजानें बंदर तर सोडलें आहे. जहाज डोलूंही लागलें आहे पण तें अजून धारेंत पोंचलें नाहीं. त्यामुळें यात्रा ऐन रंगांत आली आहे असेंही म्हणतां येत नाहीं. ज्याअर्थीं किनारा सुटला आणि जहाज चालूं लागलें त्याअर्थीं आतां यात्रा

घडणार हें निश्चित. किनारा सुटल्याबरोबर पैलतीर गांठलें असें मानणें जसें उतावीळपणाचें होईल त्याचप्रमाणें या जन्मीं आपली कसची यात्रा होते अशा निराशेला वश होणें म्हणजे देखील कृतघ्नपणाच होय. निघालों आहोंत तेव्हां पोंचणार याविषयीं शंका नाहीं. आपला तर हा नुक्ताच प्रारंभ तेवढा झाला आहे, अजून कितीतरी मार्ग कापावयाचा आहे. तेव्हां शिथिल होता कामा नये. वल्हीं थंड पडतां कामा नयेत, निदान प्रवाहाचे धारेंत पोंचेतोंपर्यंत जोर केलाच पाहिजे, अशा संकल्पानें साधक म्हणतो–

हेथा जे गान गाइते [१]आसा आमार
हय नि से गान गावा –
आजो केवलि सुर साधा, आमार
केवल गाइते [२]चावा ।

आमार लागे नाइ से सुर, आमार
बाँधे नाइ से कथा,
शुधु प्राणेरइ माझखाने आछे
गानेर व्याकुलता ।
आजो [३]फोटे नाइ से फुल, शुधु
बहे छे एक हावा ।

आमि देखि नाइ [४]तार मुख, आमि
शुनि नाइ तार वाणी,
केवल शुनि क्षणे क्षणे ताहार
पायेर ध्वनिखानि ।
आमार द्वारेर समुख दिये से जन
करे आसा – जावा ।

---

१ आसा – येणें. २ चावा – इच्छा. ३ फोटे – फुलत, उमलत. ४ तार – त्याचें.

शुधु आसन [5]पाता हल आमार
सारादि दिन धरे —
घरे हयनि प्रदीप ज्वाला, तारे
डाकब केमन करे ।
आछि [6]पाबार आशा निये, तारे
हय नि आमार पावा ।

"जें गाणें गाण्यासाठीं मी येथें आलों आहें तें माझें गाणें अजून गायिलें गेलें नाहीं. अजूनही सूर जमविण्यासाठीं मी प्राथमिक आलापच घेत आहें व गावयाची इच्छाच दृढ करीत आहें. अजूनही वीणा लावण्याचेंच काम चाललें आहे आणि मी गावें, गावें म्हणतों आहें. अजूनही नेमका सूर लागला नाहीं, अजूनही गाण्याचीं उत्तरें ( Wordings ) जमलीं नाहींत. फक्त माझ्या प्राणामध्यें गाण्याची व्याकुलताच काय ती उठली आहे.

अजूनही फूल उमललें नाहीं, कळींतून सुगंध सुटला नाहीं. मधुर हवेची एक झुळुक काय ती वाहूं लागली आहे.

अजून त्याचें मुख–कमल मला दिसलें नाहीं. त्याची अमृतवाणी कानीं पडली नाहीं. फक्त अधून मधून जेव्हां तेव्हां माझ्या दारावरून ये जा करणाऱ्या त्याच्या पावलांची चाहूल मला ऐकूं येते.

तूं येणार म्हणून सारा दिवस आसन मांडण्यांतच गेला. अजूनही मी घरांत दिवा लावूं शकलों नाहीं. "आंत ये" असें म्हणून इतक्यांत मी त्याला बोलावूं तरी कसें ? पण त्याला मिळवण्याची आशा मी उराशीं बाळगून आहें. अजून त्याचें दर्शन झालें नाहीं ही व्यथा तर आहेच, शिवाय जाणीवही आहे."

---

५. पाता – पसरणें. ६ पाबार – मिळविण्याची.

## १९

जीवात्मा जेव्हां नूतन बालकाच्या रूपानें या जगांत येतो तेव्हां त्याची वृत्ति खरोखर आश्चर्यचकित करणारी असते. जीवनाच्या तत्त्वज्ञानाचा विचार करणाऱ्या मनुष्याला तर नूतन बालकाचें आगमन वेडच लावून सोडावयाचें. कोणती साधना पूर्ण करावयाला हा प्राणी या जन्माला आला आहे, कोणत्या प्रेमयोगाची याला दीक्षा मिळाली आहे, कसलें वेड स्वतःला लावून येथें येण्याचें त्यानें पसंत केलें आहे ?

सामान्यपणें जीवमात्र सुखाला लाचावलेला असतो आणि दुःख टाळूं इच्छितो. आराम करावा, सुखांत असावें आणि कसलेही कष्ट पडूं नयेत एवढीच जीवाची इच्छा असते. पण कित्येक जीव अगदींच निराळे दिसतात. त्यांना दुःखाची परवा नसते. त्यांच्या आनंदाचा झरा दुसराच असतो. त्या आनंदाच्या उन्मादांत अशा जीवांना जगाच्या सुखदुःखाची परवाच नसते. मरण त्यांच्या खिजगणतींतही नसतें. सुख आपण होऊन धांवून बिलगलें तरी त्याला लाथ मारून ते पुढेंच जातात. जगांत कोणाचीही मदत न मिळाली तरी घाबरून न जातां ते आपल्याच मार्गानें जातात. जणूं काय एखादा अदृश्य साथीदार त्यांना धीर देत आहे आणि त्यांची सर्व काळजी वहात आहे. जेव्हां निराशेचा काळाकुट्ट अंधार पसरलेला असतो, तेव्हां अशा जीवांना कोण जाणे कोठून प्रकाशाचा एक

किरण दिसत असतो आणि त्या एका किरणाच्या अंधुक दिशेनें जात असतां अंधकाराची खोली किती आहे याची त्यांना परवा नसते. मुलाला ज्याप्रमाणें आई दिसत असली म्हणजे आसपास वाढत असलेलीं संकटें दिसत नाहींत, दिसली तरी त्यांची त्याला परवा नसते, त्याचप्रमाणें या जीवांना या जगाच्या पलीकडील आणि इंद्रियांना अगोचर असें कांहींतरी आश्वासन मिळत असल्यामुळें त्यांना कोणत्याही संकटांत उडी घालत असतां शंका म्हणून शिवत नाहीं. ज्याला अमरपट्टा मिळाला तो चिरंजीव झाला; तो ज्याप्रमाणें मरणाला भीत नाहीं आणि कोठेंही उडी घालतो त्याचप्रमाणें या जीवात्म्याची स्थिति असते.

सहजच आपल्या मनांत जिज्ञासा उठते कीं यांनीं आपली जीवन-दिवटी कोणत्या प्रकाशानें पेटवून घेतली आहे? कोणत्या आईचें स्मितवदन यांना पाहावयास मिळत आहे? कोणत्या ध्येयानें यांच्या दृष्टीला वेड लावलें आहे आणि कोण साथी यांना निर्भय बनवून हाताला धरून घेऊन जात आहे? कोणत्या आनंदसागरांत तरंगत राहण्याचें भाग्य यांना मिळालें आहे?

कोन् [1]आलोते प्राणेर प्रदीप
ज्वालिये तुमि धराय [2]आस—
साधक ओगो, प्रेमिक ओगो,
पागल ओगो, धराय आस।

एइ अकूल संसारे
दुःख-आघात तोमार प्राणे वीणा झंकारे।
घोर विपदमाझे
कोन् जननीर मुखेर हासि देखिया हास।

तुमि काहार [3]सन्धाने
सकल सुखे [4]आगुन ज्वेले बेडाओ के जाने।

१ आलोते—प्रकाशावर. २ आस—आला आहेस. ३ सन्धाने—शोधांत. ४ आगुन—आग.

एमन व्याकुल करे
के तोमारे [1]काँदाय जारे [2]भालोबास।
तोमार [3]भावना किछु नाइ—
के जे तोमार साथेर साथि [4]भाबि मने ताइ।
तुमि मरण भुले
कोन् अनन्त प्राणसागरे आनन्दे [5]भास।

"हे नवजात अर्भका, हे जीवात्म्या, कोणत्या प्रकाशांत आपल्या आशेची मशाल पेटवून तूं या पृथ्वीवर अवतरला आहेस? हे साधका, हे प्रेमयोग्या, हे पागल पथिका, तूं कोणत्या उद्देशानें या पृथ्वीवर आला आहेस? या विशाल संसारांत जे कांहीं दुःखाचे आघात होतात त्यांच्या योगानें व्याकुळ होण्याच्या ऐवजीं तुझी प्राणवीणा झंकृत होऊन उठते. आणि प्रत्येक दुःखाघातांतून नवनवीन राग काढते.

एवढ्या घोर विपत्तीनें तुला घेरलें असतां कोणत्या जननीच्या मुखारविंदाचें हास्य पाहून तूं आश्वस्त मनानें स्मित करीत आहेस?

कोण सांगूं शकेल कीं, कुणाचें ध्यान धरीत असल्यामुळें तूं सर्व सुखांवर निखारा ठेवून असा हिंडूं शकतोस? आणि ज्यांचेवर तुझें प्रेम आहे ते तुला असा व्याकुळ करून रडवितात तरी कसे?

आणि चिंता म्हणावी तर ती तुझ्या गांवींही नाहीं. त्यामुळें मला वाटतें कीं, तुला कोणता तरी सहयात्री भेटला असावा कीं ज्याच्यामुळें तूं इतका बेफिकीर आहेस. मरणाला विसरून तूं कोणत्या आनंदामुळें अनंत प्राणसागरांत असा वहात चालला आहेस? हे साधका, हे प्रेमिका, हे वेड्या उन्मत्ता, तुझ्या आनंदाचें निधान काय आहे? तुला आश्वासन कोठून मिळतें? तुझ्या ध्यानाचें ध्येय काय आहे? तुझा जीवनप्रदीप प्रज्वलित करणारा प्रकाश कसला आहे? तुझें संगोपन करणारी तुझी माता कोण आहे? हें सर्व समजेल तेव्हांच तुझा आणि तुझ्या जीवनहेतूचा कांहींतरी थांग लागेल.

---

१ काँदाय—रडवतो. २ भालोबास—प्रेम करतोस. ३ भावना—चिंता. ४ भावि—(मी) विचार करतों, मला वाटतें. ५ भास—तरंगत आहेस.

# २०

एका मुसलमान संतानें म्हटलें आहे कीं, मनुष्याजवळ कांहीं मागितलें म्हणज तो नाराज होतो. देवाचें याच्या उलट आहे. देवाजवळ जसजसें मागावें तस तसा तो प्रसन्न होतो. कारण एकतर तो सर्वसमर्थ आहे आणि दुसरें तो प्रेममूर्ति आहे. अखंड देतां यावें या आनंदासाठींच त्यानें प्राण्यांना उत्पन्न केलें आहे.

पण काय मागावें हेंच मनुष्याला पुष्कळदां सुचत नाहीं. यामुळें 'भगवंता, मीं वेड्यासारखें मागितलें तें न देऊन तूं माझें कल्याण केलें आहेस' असें म्हणण्याची माणसावर पाळी येते—'वरहि वरायासि पाहिजे समज'

अगदीं वैदिक काळापासून लोकांनीं भगवंताकडे काय काय मागितलें आहे, कसें मागितलें आहे, हें सर्व तपासण्याजोगें आहे.

आम्हांला धन-धान्य मिळो, वीरप्रसू पत्नी मिळो, आमच्या शत्रूंचा नाश होवो, असेंही ऋषींनीं मागितलें आहे. आणि आमचेजवळ पुष्कळ विद्यार्थी येत्रोत, त्यांना आम्हीं पोटभर खाऊं घालावें, अखंड शिकवावें, आमचे विद्यार्थी निःशंक व्हावेत, चारित्र्यानें दृढ व्हावेत, आपली वाणी अमृत-स्रवणारी व्हावी, सर्वज्ञान आपल्याला उपस्थित असावें, अशीही

प्रार्थना वैदिक ऋषींनीं केली आहे. आम्हांला मोक्ष नको पण प्राण्यांचें दुःख निवारणा व्हावें, त्यांना मोक्ष मिळावा आणि मुक्त होत असतांना अशा जीवांचे तोंडून जे आनंदोद्गार निघतात ते ऐकण्याची धन्यता आम्हांला प्राप्त व्हावी अशी प्रार्थना करणारे शान्तिदेवाचार्यासारखे बौद्ध साधु पण होऊन गेले आहेत.

तुकारामानें मागितलें "नलगे मुक्ति धनसंपदा, संत-संग देई सदा । हेंचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा ॥"

एक लंगोटी लावून सर्वत्र भटकत राहणाऱ्या आणि मध्याह्नाचे वेळीं भिक्षा मागून पोट भरणाऱ्या समर्थ रामदासांनींदेखील भगवंताकडे मागते वेळीं कांहीं थोडेंथोडकें मागितलें नाहीं. त्यांत 'आलाप गोडी दे दे राम' हेंही मागावयास ते विसरले नाहींत.

प्रस्तुत गीत याच परंपरेंतील आहे. आणि यांतून रवीन्द्रनाथांची विशिष्ट जीवनदृष्टि आणि त्यांचें कविहृदय पूर्णपणें व्यक्त होतें.

भगवंताचे गुणानुवाद आपण गातों ते कांहीं भगवंताला मानपत्र देण्यासाठीं किंवा त्याची आठवण ताजी करण्यासाठीं नव्हे तर आपल्याच हृदयांतील विस्मृति टाळून तेथें अखंड जागरूकता रोवण्यासाठींच.

भगवद्भक्तीची ही जागरूकता देखील भगवंताकडेच मागावी लागते. माझ्या हृदयांत तुझ्यासंबंधानें नवविधभक्तीचा उदय व्हावा असें कर अशी भगवंताकडेच प्रार्थना करावी लागते.

'सदय उदय करुनि आपण
हृदय आमुचें जागवि रामा।'

रविबाबू म्हणतात—

तुमि [1]आमार आपन, तुमि [2]आछ आमार [3]काछे,
एइ कथाटि बोलते दाओ हे बोलते दाओ ।
तोमार माझे [4]मोर जीवनेर सब-आनन्द आछे,
एइ कथाटि बोलते दाओ हे बोलते दाओ ।

१ आमार आपन – माझा स्वतःचा. २ आछ – आहेस. ३ काछे – ज़वळ. ४ मोर – माझ्या.

आमाय दाओ सुधामय सुर,
आमार बाणी करो सुमधुर—
आमार प्रियतम तुमि, एइ कथाटि
बोलते दाओ हे बोलते दाओ।

एइ निखिल आकाश धरा
ए जे तोमाय दिये भरा,
आमाय हृदय एते एइ कथाटि
बोलते दाओ हे बोलते दाओ!

दुखि जेनेइ काछे आस,
छोटो बोलेइ भालोबास,
आमार छोटो मुखे एइ कथाटि
बोलते दाओ हे बोलते दाओ।

"तूंच माझा आत्मीय आहेस—परम सखा आहेस—हृदयस्थ नारायण आहेस—आत्माराम आहेस. तूं माझ्या अगदीं जवळ आहेस एवढें माझ्या तोंडून अखंड वदव, कसेंही करून मीं अखंड असेंच बोलत राहावें असें कर. माझ्या जीवनाचा सगळा आनंद तुझ्यामध्यें सांठवलेला आहे, असें मला बोलता कर.

मला सुधामय सूर दे, माझी वाणी सुमधुर कर आणि मग 'तूं माझा प्रीतम आहेस' असें त्या वाणीनें नेहमीं गात राहावें असें कर.

ही सर्व अशेष पृथ्वी आणि हें अनंत आकाश विस्तारलेलीं आहेत त्यांत देखील तूंच भरलेला आहेस, ही गोष्ट माझ्या हृदयांतून प्रस्फुट व्हावी—हृदयानें हेंच गान गावें—असें कर.

मला दुःखी समजून तूं जवळ येतोस, तान्हुला म्हणून तूं प्रेम करतोस, ही गोष्ट माझ्या या चिमण्या मुखांतून बोलली जावी असें कर म्हणजे झालें.

हे वात्सल्यरूपा, तुझ्या या विभूतीचें अखंड स्मरण आणि अखंड कीर्तन मजकडून व्हावें असें कर."

टीप        तोमार माझे मोर जीवनेर सब आनन्द आछे
           एइ कथाटि बलते दाओ हे बलते दाओ.

जें हवें आहे तें मिळालें म्हणजे आपण धन्यधन्य होतोंच. पण हीच धन्यता पूर्णपणें ओळखून ती जर योग्य शब्दांत, योग्य काळीं, योग्य ठिकाणीं व्यक्त करतां आली, तर मूळचा आनंद द्विगुणित होतो आणि तीच एक नवी धन्यता होऊन बसते. यासाठीं ईश्वराजवळ हेंही मागून घेतलें पाहिजे कीं, मला कृतार्थ कर आणि त्याबरोबर कृतज्ञपणें माझी कृतार्थता व्यक्त करण्याचा निरुपम आनंदही मला दे. म्हणजेच मला परिपूर्ण संतोष होईल आणि मग इच्छा करण्याचें कांहींही बाकी राहाणार नाहीं.

तूं माझ्याजवळ आहेस, तूं माझा प्रियतम आहेस, तूं माझी वाणी सुमधुर केली आहेस, माझा सूर सुधामय केला आहेस. या सर्व विश्वांत तुझ्याच देणग्या पसरल्या आहेत. माझ्या दुःखांमुळें देखील तूं मला विशेष जवळ होतोस. मी सर्वांत लहान म्हणून माझ्यावर तूं विशेष प्रेम करतोस, हें सर्व तर आहेच. पण या सर्वांत तूं आहेस म्हणूनच यांचा खरा आनंद आहे.

जगांत सुगंधी फुलें कुणालाही आल्हादित करतात, पण माझ्या हातीं जें फूल आहे त्याचा मला जो इतका निरतिशय आनंद वाटतो त्याचें कारण त्या फुलाचा सौरभ, त्याची कांति, त्याचा वर्ण, त्याची कोमलता, त्याची ताजगी एवढेंच नसून मला आपल्या प्रेमानें कृतार्थ करणाऱ्या तूं तें मला दिलें आहेस हाच माझा मुख्य आनंद आहे. माझ्या जीवनांत जें जें म्हणून प्रसन्नमंगल आहे, जें जें म्हणून मला अविरत आल्हादित ठेवतें तें सर्व आनंदतत्त्व तुझ्यामध्यें भरलें आहे, तुझ्यामुळें तें सर्व मला प्रमुदित करूं शकतें एवढी गोष्ट मला नेहमीं मनाशीं बाळगून वाणींतून बोलूं दे. माझ्या आनंदाचें निधान तूं आहेस, माझ्या आनंदाचे झरे तुझ्यांतून उगम पावतात. हे सर्व आल्हादाचे जे कारंजे उडतात त्यांचा प्रारंभ, त्यांची आद्यप्रेरणा तुझ्यांतून आहे हें मला स्पष्टपणें बोलतां यावें, परोपरीनें गातां यावें आणि त्याच्याच मस्तीमध्यें मीं डोलत असावें एवढें मला दे. तुझें स्मरण आणि माझा आनंद यांमध्यें यत्किंचितही द्वैत नसावें आणि माझा हा अद्वयानंद मूक न राहतां मुखरित होऊन उठावा आणि त्यानें माझें हें सर्व जीवन आणि माझें हें संपूर्ण विश्व निनादित करून टाकावें एवढें मला दे. म्हणजे मी इतर कांहीं मागणार नाहीं.

# २१

सामान्यपणें जीवनामध्यें प्रेरक तत्त्व असतें अहंकाराचें गर्वाचें, अभिमानाचें. या प्रेरणेच्या बळानें मनुष्य कितीतरी दूरवर पोंचत असतो. पण प्रत्येक जीवनांत केव्हांतरी असा क्षण येतो कीं, जेव्हां हें सर्व व्यर्थ आहे, अभिमानाच्या जोरावर मिळविलेलें सर्व कांहीं पोकळ आहे, निःसत्त्व आहे आणि नीरसही आहे असा अनुभव येतो. अहंकाराच्या प्रेरणेनें उंच उंच आसन करावें आणि मग या सर्व दृश्यजातांचा मी स्वामी आहें अशा अहंकारानें आपण फुलून जावें. मी जगदेकराट् आहें अशी आपणच आपल्या तोंडानें बढाई मारावी आणि शेवटीं दिसून यावें कीं, ही सर्व उंची निष्फळच आहे. आसन उंच झाल्यानें हृदय उंच होऊं शकत नाहीं. डोकें वर काढल्यानें जीवनाचा उद्धार होत नाहीं. एकाकी झाल्यानें सामर्थ्य एकवटत नाहीं. असें एकदां दिसून आलें म्हणजे मनुष्य गोंधळतो आणि सगळेंच मुसळ केरांत असें म्हणून पावलें फिरवितो.

अभिमानाच्या जोसामध्यें तो इतका कांहीं दूरवर आलेला असतो कीं, आक्रमिलेला सर्व मार्ग उलट दिशेनें पुनः चालण्याची हिम्मतही त्याला करवत नाहीं. मग तो करुणपणें ईश्वराची दया मागतो कीं, देवा, माझें सर्वच चुकलें, मला आतां या उच्चासनावरून खालीं काढ आणि जेणेंकरून माझें जीवन कृतार्थ होईल अशा रीतीनें तुझ्या चरणाखालीं, तुझ्या पावन चरणरजांमध्यें मला स्थान दे. माझें मन मीं आजवर वज्रासारखें कठिण केलें

तें आतां तुझ्या कृपेच्या तेजाब्रामध्यें वितळून जाऊं दे. आणि अहंकारानें भरलेलें माझें जीवन पश्चात्तापाच्या अश्रूंच्या लोंढ्यांत वाहून जाऊं दे.

अहंकाराच्या खडकाळ उंचीवर मी जाऊन बसलों, त्या खडकाचें चूर्ण होऊं दे आणि त्याच्याच धुळींत तुझ्या चरणाजवळ मला बसूं दे.

मीं वेड्यानें कसा फुकटचा गर्व केला आणि तुझ्यापासून विमुख झाल्यामुळें भरलेल्या घरांत मी भुकेला, अकिंचन भिकारीच राहिलों. अशा रीतीनें सगळा दिवस मीं फुकट घालविला. आतां माझी जीवनसंध्या व्यर्थ जाऊं नये आणि पूजा विफल होऊं नये एवढ्यासाठीं कृपा करून मला खालीं उतरवून चांगला वांकवून तुझ्या चरणाखालीं स्थान दे.

आजलगी रह्यो गर्वमां हुं ने मागी मदद न लगार
आप-बळे मार्ग जोइने चाल्वा हाम धरी मूढ बाळ
हवे मागुं तुज आधार ॥

कवि म्हणतो :—

[1]नामाओ नामाओ आमाय तोमार
चरणतले,
[2]गलाओ हे मन, भासाओ जीवन
नयनजले !
एका आमि अहंकारेर
उच्च अचले—
पाषाण-आसन धुलाय लुटाओ,
भांगो सबले ।

१ नामाओ–वांकव. २ गलाओ–वितळवून टाक.

नामाओ नामाओ आमाय तोमार
चरणतले ।

की लये बा गर्व करि
व्यर्थ जीवने ।

भरा गृहे शून्य आमि
तोमा [1]विहने ।

दिनेर कर्म डुबेछे मोर
आपन अतले,
संध्याबेलार पूजा जेन
जाय ना विफले ।

नामाओ नामाओ आमाय तोमार
चरणतले ।

"भगवंता, मला वांकव, मला तुझ्या चरणतलापर्यन्त चांगला वांकव. माझें मन वितळून जावो आणि अश्रूंच्या लोंढ्यामध्यें माझें जीवन वाहून जाऊं दे. अहंकाराच्या उच्च पहाडावर मी अभिमानानें एकाकी बसलों. आतां माझें हें पाषाणासन तुझ्या शक्तीनें चूर्ण करून टाक आणि त्याच्याच धुळीमध्यें तुझ्या चरणतलीं मला वांकवून बसीव.

काय समजून–काय म्हणून मीं आजवरच्या या व्यर्थ जीवनाचा गर्व धरला? तुझ्याशीं विमुख होऊन या भरलेल्या गृहांत मी अकिंचन झालों. दिवसभर जीं कांहीं कामें मीं केलीं तीं सर्व माझ्या 'मी'च्याच खड्ड्यांत बुडून गेलीं. आतां हे कृपावंता, माझी जीवनसंध्याकाळची पूजा विफल न व्हावी एवढ्यासाठीं मला वांकव, चांगला वांकव, आणि तुझ्या चरणापाशीं मला स्थान दे."

---

१ विहने–विना, वांचून.

टीप

की लये बा गर्व करि
व्यर्थ जीवने ।

भरा गृहे शून्य आमि
तोमा विहने ।

एखादा सुंदर पुतळा असला आणि त्याला डोळेच नसले म्हणजे ज्याप्रमाणें तो व्यर्थ होतो, एखाद्या रमणीनें सर्व अलंकार घातलेले असावे पण कपाळाला कुंकू नसावें म्हणजे तिचें दर्शन ज्याप्रमाणें सौभाग्यविहीन व्हावें, एखादा मनुष्य धनधान्य आदि सर्व संपत्तीनें परिपूर्ण असावा आणि त्याच्या हृदयांत उदारता नसावी म्हणजे ज्याप्रमाणें सर्व व्यर्थ वाटतें, त्याचप्रमाणें सर्व प्रकारच्या समृद्धीनें जरी माझें घर भरपूर असलें पण त्यांत तूं नसलास तर माझ्या वांट्याला तें सर्व घर शून्य असल्यासारखें आहे. म्हणून म्हणतों कीं, भगवंता, अशा या माझ्या व्यर्थ जीवनाला घेऊन मीं कसला गर्व करावा ? इतर सर्व कांहीं आहे पण मुख्य वस्तु नाहीं. लग्नाची सर्व तयारी झाली आणि नवरदेव गायब, अशासारख्या परिस्थितीची विफलता समजण्याइतकी बुद्धि मला दे. आणि माझें गर्वानें वर झालेलें डोकें खालीं वांकवून मला नम्र कर. तुझ्या चरणतलापर्यंत पोंचीव. तरच मी कृतार्थ होईन, तरच माझें जीवन सार्थ होईल.

# २२

टेनिसनची एक कविता आहे- राजा आपल्या रथांत बसून जात होता. रस्त्याच्या एका बाजूनें एक भिकारीण आपल्या दैन्यानें लज्जित होऊन राजाच्या स्वारीकडे पाहात होती. राजानें भिकारिणीला पाहिलें. त्यानें तिचें हृदय ओळखलें. राजानें रथ थांबविला. तो खालीं उतरला आणि स्वतः तिचा हात धरून म्हणाला, 'चल, तुला मी माझी राणी करतों.' राजानें त्या मुलीला आपल्या रथांत बसविलें. सर्व जग आश्चर्यचकित होऊन पाहूं लागलें. आतां तिला भिकारीण कोण म्हणणार ?

ईश्वर गुणी लोकांची कदर करतो. तो स्वतः रसमूर्ति असल्यानें रसिक आणि सौंदर्याचा भोक्ता तर आहेच. पण त्याहून विशेष प्रेमाचा भोक्ता आहे. ईश्वराजवळ अधिकाधिक कदर खऱ्या प्रेमाचीच आहे. जगांतील लोक उच्चनीचाचा भेद करतात. हीन लोकांना दूर लोटावें, थोर लोकांच्या जवळ पोहोंचावें अशी धडपड प्रत्येकाची असते. भगवंताकडे असला बाजारभाव कुठून असणार ? लक्ष्मीनें ज्याला जवळ केलें तो भिकारी कसा राहील ? प्रत्यक्ष भगवंतांनीं ज्याला आपला म्हटलें त्याच्या आंतरिक वैभवाला कोणती सीमा असणार ? भगवंताला शुद्ध प्रेमाचा एक लहानसा आलाप बस होतो. खऱ्या सुवर्णाचा एक कणही पुरेसा वाटतो. देवेन्द्रानें अर्पण केलेल्या रत्नमालेपेक्षां गजेंद्रानें अर्पण केलेलें एक लहानसें कमळ घेण्यासाठीं तो स्वर्गांतून धावून येतो.

भक्त ईश्वराची करून करून केवढी भक्ति करणार ? ईश्वराला भक्ताविषयीं जें प्रेम वाटतें, जो कळवळा आणि जिव्हाळा वाटतो, त्याच्या हृदयाला जें प्रेमाचें भरतें येतें आणि जसा तो धावून येतो त्याच्यापुढें मानवी भक्तीची किंमत ती किती ?

कितीही थोडी का असेना पण खरी भक्ति असली कीं विजेनें विजेला आकर्षावें त्याप्रमाणें ईश्वराचें प्रेम भक्ताकडे धावून येतें. कारण त्याला खऱ्या प्रेमाची कदर असते.

तव सिंहासनेर आसन [1]हते
अेले तुमि [2]नेमे —
मोर विजन घरेर द्वारेर काछे
दाँड़ाले, नाथ, [3]थेमे ।
अेकला बसे आपन-मने
गाअितेछिलेम गान,
तोमार काने गेल से सुर,
अेले तुमि नेमे —
मोर विजन घरेर द्वारेर काछे
दाँड़ाले, नाथ, थेमे ।

तोमार सभाय कत-ना गान
कतअि आछेन गुणी ;
गुणहीनेर गानखानि आज
बाजल तोमार प्रेमे ।
लागल विश्वतानेर माझे
अेकटि करुण सुर,

---

१ हते–पासून. २ नेमे–उतरून. ३ थेमे–थांबून.

हाते लये [1]बरणमाला
ऍले तुमि नेमे—

मोर विजन घरेर द्वारेर काछे
दाँड़ाले, नाथ, थेमे ।

"एकटा बसून मी स्वताशींच माझें गाणें गुणगुणत होतों. इतक्यात आपल्या सिंहासनावरून खालीं उतरून विजनांतील माझ्या झोंपडीच्या दारीं हे नाथ, तूं येऊन उभा राहिलास. माझ्या गाण्याचा सूर तुझ्या कानीं पडला आणि तूं सर्व सोडून माझ्या दारीं येऊन उभा राहिलास.

तुझ्या दरबारांत मोठे पट्टीचे गाणारे कांहीं कमी नाहींत. तेथें अप्रतिम संगीत अखंड चालत असतें. पण त्या गाण्याला विंधून माझें गुणहीन गान तुझ्या हृदयाच्या प्रेमाला जाऊन भिडलें. तुझ्या हृदयांतील विश्वगायनांत माझा हा एकाकी करुण स्वर मिसळला आणि काय आश्चर्य, तो सूर कानीं पडतांच स्वयंवराची माला घेऊन या अनाथाचे दारीं तूं येऊन उभा राहिलास. उच्च सिंहासन सोडून गरिबाचे दारीं तूं आलास."

**टीप**:—वीज पडलेली आपण पुष्कळदां ऐकतों आणि केव्हां केव्हां पाहातोंही. वीज पडते म्हणजे होतें काय? वीज पडते म्हणजे स्वर्गीय प्रेम पार्थिव प्रेमाशीं एकरूप होत असतां मध्यें जो अंतराय असेल तो दूर करण्याचा उत्कट प्रयत्न होय.

आकाशांत जेव्हां वीज तयार होते तेव्हां पृथ्वींतील झोपून असलेली वीज जागृत होऊन आकाशांतील विजेला भेटण्यासाठीं उंचांतली उंच जागा पसंत करते आणि स्वर्गीय विजेच्या आधानाची वाट पाहत राहते. पृथ्वीच्या विजेचें हें आकर्षण उन्नत भागीं येऊन वाट पाहूं लागलें म्हणजे आकाशांतील विजेला मधलें अंतर असह्य होतें आणि ती मधला अंतराय कापून पृथ्वीवरील विजेला कडकडून भेटते. जुदाई तुटली, अद्वैत साधलें म्हणजेच ती शान्त होते. 'एकाकी न रमते, द्वितीयाद् वै भयं भवति, तत्र को मोहः कः शोकः एकत्वम् अनुपश्यतः'।

---

[1] बरणमाला – स्वयंवरमाला.

## २३

वेदकालीन ऋषि म्हणतात कीं, व्यवहारांत आम्ही जेव्हां बोलतों तेव्हां आम्हांला भान असतें कीं,—आम्ही बोलत आहोंत. स्वतःच्या मनांतील—हृदयांतील भावना आम्ही व्यक्त करीत आहोंत. पण जेव्हां आम्ही समाधीमध्यें मग्न होतों आणि आम्हांला वैदिक मंत्र स्फुरतात तेव्हां आम्हांला कधींही असें वाटलें नाहीं कीं, आम्ही हे मंत्र रचीत आहोंत. आम्ही मंत्रकर्ते नसून केवळ मंत्रद्रष्टे आहोंत. हे मंत्र सनातनकाळापासून होतेच. त्यांना कोणीं बनविलें नाहीं. ईश्वराच्या मूर्तीतून ते उत्पन्न होत असलेले आम्हांला दिसले. आम्ही ते मंत्र व्यक्त केले एवढेंच. म्हणून कोणींही त्यांना पुरुषकृत मानूं नये. ह्या कृति अपौरुषेय आहेत. हे मंत्र परमात्म्याचीं निःश्वसितें आहेत.

इस्लामचा पैगंबरही म्हणत असे कीं, कुराणाचीं आयतें मी बनवीत नाहीं. माझेवर तीं जाहीर होतात. वरून "वही" येते आणि मी अगदीं लाचार होऊन त्या वहीच्या ताब्यांत जातों. माझ्या तोंडांतून जें कांहीं निघतें तें माझें नव्हे ह्याची मला खात्री आहे.

मुरलीला फक्त सरळ असावें लागतें, गुळगुळीत राहावें लागतें आणि स्वतःचा कोणचाच हट्ट किंवा आग्रह न बाळगतां वाजविणाऱ्याच्या सुराला अनुकूल राहावें लागतें. मुरलीचें कार्य एवढेंच. मुरलीची एवढी साधना दिसतांच मुरलीधर त्या मुरलीला आपल्या हातीं

घेतो, अधराला लावतो आणि त्यांतून आपले दिव्य भाव फुंकतो. ती कर्तबगारी सर्वस्वी त्या मुरलीधराचीच. मुरलीचें त्यांत कांहींच नव्हतें. मुरलीचें भाग्य कीं, ती मुरलीधरानें धरली आणि स्वतःच्या गायनासाठीं पसंत केली. कोणी कधीं असें म्हणत नाहीं कीं, मुरली गात आहे, अथवा गायनाचें श्रेय मुरलीला आहे. सर्व असेंच म्हणतात कीं, मुरलीधर दिव्य आलाप छेडत आहे.

आपला कवि येथें ऋषि किंवा पैगंबरांची भूमिका धारण न करतां ईश्वरालाच म्हणतो कीं, हे हृदयस्वामी, आजवर मीं माझ्या मनचें पुष्कळ गाइलें पण आतां मला माझ्या मतें गाऊं देऊं नकोस. माझ्यांतून तूं गा; मी फक्त ऐकत राहीन. आकाशांतले ग्रह-नक्षत्र-तारे तुझें जें संगीत ऐकून निस्तब्ध झाले आणि तुझ्या गायनाच्या तालावर अखंड फेर धरूं लागले, तें तुझें गान मीं स्वस्थ बसून—सर्व कांहीं सोडून, ऐकत बसावें. आणि मग माझ्या या 'बहुशाखा ह्यनन्ताश्च' अशा विस्कटलेल्या बुद्धि तुझें हें संगीत ऐकतांच, कृष्णाची मुरली वाजतांच सगळ्या गाई धावत याव्यात त्याप्रमाणें तुझ्या चरणीं एकत्र होऊन तल्लीन व्हाव्यात; एवढीच माझी प्रार्थना आहे. माझी ही हृदयरूपी बन्सरी आजवर मीं पुष्कळ वाजविली. आतां ती तुझ्या चरणीं वाहतों आणि मी शान्त होऊन जातों. तूंच ती आतां हवी तशी वाजीव.

[1]अेबार नीरव करे दाओ हे तोमार
[2]मुखर कविरे ।
तार हृदयबाँशि आपनी [3]केड़े
बाजाओ गभीरे ।
निशीथरातेर निबिड़ सुरे
बाँशिते तान दाओ हे पुरे
जे तान दिये अवाक कर
ग्रह-शशी-रे ।

---

१ अेबार—आतां. २ मुखर—वाचाळ. ३ केडे—काढून घेऊन, हिसकावून घेऊन.

जा-किछु मोर [1]छड़िये आछे
जीवनमरणे,
गानेर [2]टाने मिलुक असे
तोमार चरणे।
बहु दिनेर वाक्यराशि
एके निमेषे जावे भासि,
अेकला बसे शुनव बाँशि
अकूल तिमिरे।

"हे हृदयस्वामी, आतां तुझ्या ह्या वाचाळ कवीला स्तब्ध कर आणि त्याची हृदयमुरली त्याचेकडून काढून घेऊन तूंच ती आपला प्राण भरून वाजव. रात्रीच्या वेळीं गंभीर आवाजानें ह्या मुरलीमध्यें तुझ्या त्या ताना भरून दे. ज्या तानांच्या योगानें ग्रह-चंद्र-तारे ह्यांना तूं अवाक् केलें आहेस.

माझें जें कांहीं जीवनांत आणि मरणांत विखुरलेलें आहे—विस्कटलेलें आहे तें सर्व तुझ्या गाण्याच्या ओढीमुळें एकत्र होऊन तुझ्या चरणीं लीन होऊं दे.

जन्मभर मीं जी बडबड केली ती सर्व एका क्षणांत हवेंत विरून जाऊं दे. मग ज्याला कांठ किंवा किनारा नाहीं (अकूल) अशा अंधकार-सागरांत एकटा बसून मी तुझें गान ऐकत बसेन."

१ छडिये आछे—विखुरलेलें आहे. २ टाने—ओढीमुळें.

# २४

वैष्णव भक्तिसंप्रदायांत परमात्मा म्हणजे श्रीकृष्ण आणि जीवात्मा म्हणजे गोपी असें समजून भक्तीचें स्वरूप आणि तिची उत्कटता व्यक्त केलेली आहे. उत्कट प्रेम, अनन्य निष्ठा आणि संपूर्ण आत्मसमर्पण हे गुण स्त्रीजातीमध्यें विशेषरूपानें व्यक्त होत असल्यामुळें जीवात्म्याचा परमात्म्याकडे जो ओढा असतो तो कृष्ण-गोपीच्या रूपकानें चांगला व्यक्त करतां येतो.

ज्याप्रमाणें पुरुष स्त्रीच्या प्राप्तीसाठीं प्रयत्न करीत असतो, त्याचप्रमाणें परमात्मादेखील जीवात्म्याला जवळ करून त्याच्या उद्धारासाठीं आपल्याकडून अखंड प्रयत्न चालवीत असतो. जर कांहीं अंतराय असेल तर तो जीवात्म्याच्या उत्कटतेचा अभाव, गफलत किंवा बेखबरी हाच होय. आणि जीवात्म्याच्या स्वातंत्र्याला परमात्मा इतका कांहीं जपत असतो कीं, स्वतःची अलौकिक आतुरता बाजूला ठेवून–धीर धरून जीवात्म्याची मुमुक्षा जागृत होईतोंपर्यंत वाट पाहाणेंच त्याला पसंत असतें.

पुष्कळदां अशी शंका येते कीं, ईश्वरप्राप्तीविषयींची जीवात्म्याची तळमळ अधिक असते कां जीवात्म्याला जवळ करण्याची ईश्वराची साधना अधिक असते? (नित्य-तृप्त पूर्ण पुरुष साधना करणारा साधक कसा असूं शकेल अशी शंका बाळगण्याचें कारण नाहीं. ईश्वर परम-कारुणिक, अखंड साधना चालविणारा साधकच आहे. तो

तसा साधक आहे म्हणूनच तर मनुष्याला साधना सुचते आणि चालवितां येते.) शेवटीं असेंच दिसून येतें कीं, ज्याप्रमाणें मुलाच्या मातृ-भक्तीपेक्षां आईचें अपत्य प्रेम अधिक किंवा शिष्याच्या निष्ठेपेक्षां गुरूचें वात्सल्य अधिक; त्याचप्रमाणें भक्ताच्या आतुरतेपेक्षां ईश्वराचीच भक्त-वत्सल साधना विशेष असली पाहिजे. असंख्य वेळां—अनेक जन्म—जरी मनुष्यानें ईश्वर-विमुख कृत्यें करण्यांत घालविले तरीही ईश्वराचा धीर कधींही संपत नाहीं.

जेव्हां जीवात्मा घोर निद्रेंत असतो, तेव्हां त्याला ईश्वराचें भान कुठून असणार? घोर निद्रा ओसरल्यानंतर जेव्हां तो पहाटेच्या साखर झोपेंत असतो तेव्हां मात्र त्याला ईश्वराच्या अस्तित्वाची आणि प्रेमळ साधनेची थोडीशी अंधुक—अस्पष्टशी कल्पना होऊं लागते. अशा वेळची स्थिति रविबाबूंच्या खालील गायनांत स्पष्ट केली गेली आहे.

गोपी स्वतःला धिक्कारून म्हणते —

से जे पाशे एसे बसेछिल
तबु जागि नि।
की [1]घुम तोरे पेयेछिल,
हतभागिनी।
असेछिल नीरव राते,
वीणाखानि [2]छिल हाते,
स्वपनमाझे बाजिये गेल
गभीर रागिणी।
जेगे देखि, दखिन हावा
पागल करिया
गंध ताहार भेसे बेडाय
आँधार भरिया।
[3]केन आमार रजनी जाय,
[4]काछे पेये काछे ना पाय,
केन गो तार मालार परश
[5]बुके लागे नि।

---

१ घुम—झोंप. २ छिल—होती. ३ केन—काय म्हणून, कशी. ४ काछे—जवळ. ५ बुके—हृदयाला, छातीला.

"तो जेव्हां जवळ येऊन बसला तेव्हां तूं जागी झाली नाहींस. हे हतभागिनी, तुला कसली झोंप लागली होती?

शांत नि स्तब्ध रात्रीच्या वेळीं तो आला. त्याच्या हातांत वीणा होती. त्याचें संगीत ऐकून मी जागी झालें नाहीं; पण माझें स्वप्न मात्र त्याच्या गंभीर रागांनीं अगदीं गजबजून गेलें आणि सारें स्वप्न असाधारण सुखमय झालें.

जागी होऊन पाहात्ये तों आपल्या सुगंधानें वेड लावणारा दक्षिणेचा मलयानिल अंधकाराची पोकळी भरून एकसारखा वाहात आहे.

काय हें माझें दुर्दैव! का, माझ्या सगळ्या रात्री अशाच फुकट जातात? तो जवळ असूनदेखील जवळ नसतो. त्याचें संगीत ऐकूं येतें, त्याचा सुगंध डोक्यांत भरतो; पण कां त्याच्या माळेचा स्पर्श माझ्या हृदयाला होत नाहीं? आतां काय करावें? कसली ही काळझोंप मला घेरून टाकते!"

टीप :— ज्यांना ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीवच नसते आणि केवळ एक विश्वजनीन प्रघात आहे म्हणूनच जे ईश्वरावर विश्वास ठेवतात आणि त्याच्याविषयीं बोलतात, त्यांना या गायनांतील रहस्य पटावयाचें नाहीं. मनुष्य सर्व प्रकारें जेव्हां पराभूत होतो तेव्हां क्षणभर त्याला ईश्वराची खरीखुरी आठवण होत असेल कदाचित्. एरव्हीं ईश्वराची नित्य पूजा करून सुद्धां आणि ईश्वराचें 'गद्य घोषे' नाम घेऊनसुद्धां त्याच्या जीवनांत ईश्वराचा प्रवेश झालेला नसतो. अशा घोर निद्रेमध्यें ईश्वराच्या सान्निध्याच्या असंख्य खुणा त्याच्या काय कामाच्या? पण पुढें जेव्हां मनुष्य अंतर्मुख होतो आणि त्याच्या जीवनांत ईश्वराचा थोडासा प्रवेश होतो तेव्हां खरी काहूर सुरू होते. ईश्वराचीं पाळेंमुळें जर यत्किंचित् देखील जीवनांत रुजलीं तर तीं तेथें घर केल्यावांचून राहात नाहींत. साधनेच्या अभावीं मनुष्य किती कां गफलतींत असेना, ईश्वराच्या सान्निध्याच्या खुणा त्याच्या दृष्टीस पडावयाच्याच; ईश्वरी कृपेचे अनुभव वेळोवेळीं यावयाचेच. आणि मग आपण इतके साधनादुर्बल कसे? अशी कल्पना मनांत येऊन मनुष्य स्वतःची निर्भर्त्सना करू लागतो. आणि ही आत्मनिंदाच एक मोठी साधना होऊन तो प्रगति करूं लागतो. जड जीवनाला जर रात्रीची उपमा द्यावयाची तर येथें वर्णिलेल्या साखरझोंपेच्या काळाला ब्राह्ममुहूर्त म्हटलें पाहिजे.

आतां झोंपेचा जोर कमी होणार आणि पूर्ण जागृतीचें सुख प्राप्त होणार, ह्याविषयीं शंका बाळगण्याचें मग कारणच उरत नाहीं.

# २५

ईश्वर सर्वव्यापी आहे. सर्वांभूतीं त्याचाच वास आहे आणि सृष्टीच्या व्यापारांत काय आणि मनुष्यसमाजाच्या व्यापारांत काय; ह्या विश्वसंस्थेंत काय आणि मनुष्यहृदयांत काय, तोच भरलेला आहे, त्याचीच लीला सर्वत्र चालली आहे– त्याचाच जयजयकार होऊन राहिला आहे.

ही गोष्ट साध्या भोळ्या जनतेला समजावून सांगण्यासाठीं संतांनीं एक युक्ति योजली आहे. ते म्हणतात–जनहो, ईश्वर तुमच्या सत्त्वाची परीक्षा पाहूं इच्छितो. तो कोण्याकाळीं कोणत्या वेषानें तुमच्यापुढें येईल आणि तुमचें सत्त्व पाहील हें सांगतां येत नाहीं. म्हणून तुम्ही अखंड जागरूक राहा आणि दरेक पिंडामध्यें त्यालाच पाहाण्याची दृष्टि वाढवा. मच्छिंद्रनाथ भिक्षेला केव्हां येतील ह्याचा नेम नाहीं म्हणून मैनावती सर्वकाळ गरम गरम सुग्रास अन्न हातांत घेऊन उभीच असे. श्रीरामचन्द्र येणार आहेत असें ऋषींनीं सांगितलें तेव्हां शबरी अबोध बालिका होती. तिनें आपलें सगळें बाळपण आणि सगळें तारुण्य रोजच्या रोज श्रीरामचन्द्राची वाट पाहाण्यांत खर्च केलें. वाट पाहातां पाहातां केस पांढरे झाले, तोंडावर सुरकुत्या पडल्या, दृष्टि मंद झाली, तरीही तिच्या हृदयांत कधीं शंकासुद्धां आली नाहीं कीं, इतकीं वर्षें होऊन गेलीं तरीही रामचन्द्र आले नाहींत; येणार आहेत कीं नाहींत कोण जाणे, सगळी तपश्चर्या फुकट तर नाहींना जाणार!

मैनावतीनें मच्छिन्द्रनाथांच्या वाडग्यांत भिक्षा केव्हांही घातली असो, शबरीला रामांचें दर्शन केव्हांही घडलें असो, पण तिच्या हृदयाला रामांचा सहवास जन्मभर घडला, मैनावतीजवळ अनन्य भक्ति आणि मच्छिन्द्रनाथांचा कृपाप्रसाद दोन्ही अखंड होतींच होतीं.

भक्त निजला असो किंवा जागा असो, त्याचें हृदय ज्ञानयुक्त असो किंवा अबोध असो, ईश्वर कांहीं निजलेला नाहीं. ईश्वराला ठाऊक आहे कीं, भक्त नकळत देखील जें करतो तें माझ्याप्रीत्यर्थच करीत आहे.

अध्यात्ममार्गातील अनुभव आहे कीं, मनुष्याच्या हृदयांत भक्तीचा उदय झाला म्हणजे पुढें भक्तानें साधना करावयाची नसते. भक्त ज्याप्रमाणें दर्शनासाठीं तळमळत असतो त्याप्रमाणें ईश्वरालादेखील भक्तापर्यंत पोंचण्याची उत्कंठा लागलेली असते. तो आपण होऊन भक्ताकडे धाव घेतो आणि परोपरीनें त्याला दर्शन देत असतो.

जीवात्म्याच्या हृदयांत भक्तीचा उदय केव्हां झाला हें त्याला कळण्यापूर्वींच ईश्वराला त्याची बातमी लागलेली असते. किंबहुना जीवात्म–दशा हें भक्तीचें एक रूपच होय. वासरांची ज्याप्रमाणें गाईकडे ओढ असते त्याचप्रमाणें जीवात्म्याला कळत नकळत ईश्वराकडे पोंचण्याची तळमळ लागलेली असते. उलट पक्षीं कासवी ज्याप्रमाणें कोठेंही असली तरी आपल्या पिल्लाचें ध्यान करते* त्याप्रमाणें परमात्माही जीवात्म्याचें ध्यान करीत असतो. मानवी जीवन म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून जीवात्मा आणि परमात्मा ह्यांचा परस्पर अखंड ओढाच होय.

[1]तोरा शुनिस नि कि शुनिस नि तार पायेर ध्वनि,
ऐ जे [2]आसे, आसे, आसे।
जुगे जुगे पले पले दिनरजनी
से जे आसे, आसे, आसे।
गेयेछि गान जखन जत
आपन–मने [3]ख्यापार मतो

---

* कासवीनें मागें वळून पाहतांच तिच्या पिल्लांना त्या दृष्टींतूनच पोषण मिळतें अशी मान्यता आहे अथवा कविसंकेत आहे.

१ तोरा–तुम्ही. २ आसे–येत आहे. ३ ख्यापार मतो–वेड्याप्रमाणें.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ... 10.8.49 ... 76291

सकल सुरे बेजेछे तार
आगमनी —
से जे आसे, आसे, आसे।
कत कालेर फागुनदिने वनेर पथे
से जे आसे, आसे, आसे।
कत श्रावण-अन्धकारे मेघेर रथे
से जे आसे, आसे, आसे।
दुखेर परे परम दुखे
तारअि चरण बाजे [4]बुके,
सुखे कखन [5]बुलिये से देय
परशमणि।
से जे आसे, आसे, आसे।

"त्याच्या पायाची चाहूल नाहीं का ऐकलीस, नाहीं का ऐकलीस? तो येत आहे, येत आहे. केव्हांपासून येतच आहे. प्रत्येक क्षणीं, दिवसरात्र, युगानुयुगीं तो येतच आहे. आजवर निरनिराळे वेळीं छांदिष्टाप्रमाणें मनांत येईल तेव्हां आणि मनांत येतील तशीं जितकीं गाणीं मीं गाइलीं, त्या सगळ्या गाण्यांतील सगळ्या सुरांत त्याचें स्वागतगीतच एकच व्यक्त झालें आहे कीं, तो येत आहे, येत आहे, अखंड येत आहे.

कितीतरी फाल्गुन आणि वसंतकालीं वनउपवनांच्या रस्त्यानें तो येत आहे, येत आहे, येतच आहे. कितीतरी श्रावणांच्या वर्षाकालीं अंधकारांतून मेघाच्या रथांत बसून तो येत आहे, येत आहे, सर्वदा येतच आहे.

प्रत्येक दुःखाचें वळीं वेदनेमागून वेदना कोसळत असतांना हृदयाला त्याचाच चरणस्पर्श होतो आणि सुखाच्या समयीं देखील त्याचाच स्पर्शमणि केव्हांशीं माझ्या हृदयाला कुरवाळून जातो. अशा रीतीनें तो येतच असतो, येतच असतो, येतच असतो."

४ बुके– हृदयांत. ५ बुलिये देय – रगडतो ; फिरवतो.

# २६

कितीतरी वेळां आपल्याला वाटतें कीं, झालेल्या चुका सर्व विसरून जाऊन घडलेल्या दोषांचें परिमार्जन करून चुकलेल्या मार्गावरून परत येऊन आयुष्याला पुनः अगदीं प्रथमपासून प्रारंभ करावा. जर पाटीवर चुकीचे आंकडे मांडले असले, गणिताचा घोटाळा झाला असला तर सगळी पाटी पुसून साफ करून पुनः प्रथमपासून उदाहरण सुरू करतां येतें. पण जीवनाचें गणित इतकें सोपें नाहीं. एक आंकडा पुसायला जावें तर तो पुसतां पुसतां नवीन आंकडे पडूं लागतात आणि पाहातां पाहातां घोटाळ्याचें जंगल माजतें.

आपण एक सतार वाजवीत आहोंत. पण कोमल, शुद्ध आणि तीव्र स्वरांचा मेळच नाहीं. एक राग वाजवूं जावें तर दुसराच राग ऐकूं येतो. अशा वेळीं काय करावें ? जर गायक-वादक कुशल असेल तर तो हळूहळू सगळ्या तारा उतरवील. सगळे पडदे सोडून मोकळे करील. जुन्या थाटाचा कसलाही मागमूस राहूं देणार नाहीं आणि मग अगदीं नव्यानें जणूं सतार अगदीं नवी कोरीच आहे अशा रीतीनें तो पुन्हा ती बांधेल आणि नव्या सतारीवर आपला सगळा जुना अनुभव जमेस धरून विशेष सुन्दर आलाप छेडूं लागेल.

जीवनाचें असे होऊं शकेल का ?

सांगतां येत नाहीं. एका वासराला म्हणे एका खांबाशीं दोन दोऱ्यांनीं बांधलें होतें. वासरूं जर खांबाभोंवतीं एका बाजूनें फिरूं लागलें तर दुसऱ्या दोरीचा पीळ वाढून त्याला गळफांस बसत असे. उलट्या बाजूनें फिरलें तर एका दोरीचे वेढे उकलत पण दुसरी दोरी काचूं लागे. जीवनाचें असेंच आहे. ह्यांतून स्वतःचा गळा सोडवून घेणें सोपें नाहीं.

पण सद्गुरु-कृपेची म्हणा किंवा उपरतीची म्हणा अशी कांहीं विलक्षण किमया असते कीं, जी रेशमाची दोरी होती ती ईश्वराच्या कृपाप्रसादानें एका क्षणांत मेणाचा धागा होऊन बसते, मग कसेही फिरा बंधन म्हणून उरतच नाहीं. बंधनाला जर टिकावयाचें असेल तर तें स्वतःला सांभाळून घेतें. उपरतीचा गुणच असा आहे कीं, सर्व जीवनांत आणि जीवनाच्या संबंधांत एकाएकीं इष्ट आणि स्थायी असें परिवर्तन होतें. आणि आपलें जुनें जीवन आपलें राहातच नाहीं. जर पोलादी सुरीला पारसमण्याचा स्पर्श झाला तर ती सोन्याची होईल. तिची धार पूर्वीइतकीच तेज असेल, पण ती कांहीं आतां पूर्वीप्रमाणें कापूं शकणार नाहीं. दुसऱ्याला कापूं जातां स्वतःच ती वांकून किंवा मोडून जाईल. पारसमण्यानें स्पर्श केल्यानंतर सुरीचा आकार कायम राहून देखील तिची हिंसाशक्ति नष्ट होते—तिला अहिंसेची दीक्षा मिळते. आतां ती सुवर्णाची झाली आहे. सुमनाप्रमाणें कोमल झाली आहे. आतां ती दिसायला जरी सुरी असली तरी तिचा उपयोग पूर्वींच्या कामीं होणार नाहीं.

जीवनरहस्य कळल्याबरोबर आणि त्यामुळें जीवनदृष्टि बदलल्याबरोबर कवि स्वतःला सांगत आहे—

[१]एकटि एकटि करे तोमार
पुरानो तार खोलो,
सेतारखानि नूतन बेंधे तोलो।
भेङे गेछे दिनेर मेला,
बसबे सभा संध्याबेला,
शेषेर सुर जे बाजाबे तार
[२]आसार समय हल—
सेतारखानि नूतन बेंधे तोलो।
[३]दुयार तोमार खुले दाओ गो
आँधार आकाश-’ परे,
सप्त लोकेर नीरवता
[४]आसुक तोमार घरे।

१ एकटि एकटि—एकएक. २ आसार—येण्याची. ३ दुयार—द्वार. ४ आसुक—येवो.

अेतदिन जे गेयेछि गान
आजके तारअि [5]होक अवसान,
अे [6]जंत्र जे तोमार जंत्र
सेअि कथाटाअि भोलो ।
सेतारखानि नूतन बेंधे तोलो ।

"एक एक करून जुन्या सगळ्या तारा ढिल्या करून उतरव आणि तुझी सतार आतां अगदीं नव्यानें बांधून तयार कर. पाहा, सबंध दिवसाचा मेळा आतां पांगला आहे. जत्रा संपली आहे. आतां रात्र पडतांच सर्व शिष्टजन संगीताच्या मैफलींत बसतील. (आतां दिवसाच्या डफ तुंतुण्याचें काम उरलें नाहीं.) आतां जो पट्टीचा गायक आहे त्याच्या येण्याची वेळ झाली आहे. त्याच्या संगीताची साथ करण्यासाठीं तुझी सतार तयार करून ठेव.

तुझें दार सताड उघडें कर आणि घरांत सर्व आकाशाचा अंधार आणि सप्त लोकांची नीरव शान्ति भरून राहूं दे. जुन्या प्रकाशाचा किंवा जुन्या शब्दांचा मागमूसही आतां येथें राहावयास नको. आजवर जीं कांहीं गाणीं म्हटलीं गेलीं तीं सर्व आतां विसरलीं जावोत. अनंत नीरवतेमध्यें त्यांचे विसर्जन होवो. आणि ही जी तुझ्या हातांत सतार आहे ती तुझी आहे हें देखील विसरून जा. तुझी सतार अगदीं नव्यानें बांधून तयार कर."

टीप :—सतारीचें–या शरीराचें–व्यक्तित्व पार विसरून गेल्यानंतर, तिचें संपूर्ण विसर्जन केल्यानंतरच आपण ईश्वरी अनुग्रहाच्या योग्य होतों. ज्या शरीराला मी माझें म्हणतों तें ईश्वराचें कसें होणार ? 'इदं न मम" म्हटल्यावांचून आहुति देतांच येत नाहीं. म्हणून आध्यात्मिक पुनर्जन्म व्हावा अशी जर इच्छा असेल तर एकदां हृदयास मरून जातां आलें पाहिजे. 'आपण' उरलों नाहीं म्हणजे मगच सर्वत्र तोच भरला जातो. त्याची तयारी करणें हें आत्महत्येइतकेंच दुर्घट आहे.

पण हें शक्य आहे काय ?

आत्मवीर म्हणतात कीं, "होय, अगदीं शक्य आहे."

आणि सामान्य लोक तोंड वासून त्यांचें म्हणणें साशंक मनानें ऐकतच रहातात.

---

५ होक–होवो. ६ जंत्र–वाद्य.

# २७

ज्याला पाहिलें ओळखलें आणि आपलें मानलें त्याचे संबंधानें आकर्षण वाटणें साहजिक आहे. ज्याचा परिचय झाला त्याचेकडे धांव घेण्याची इच्छा होणें योग्य आहे. पण मनुष्य-प्रकृति अशी कांहीं विचित्र आहे कीं ज्याला पाहिलें नाहीं, ज्याला ऐकलें नाहीं, ज्याचें नांवगांवहि माहीत नाहीं अशा एखाद्या अज्ञाताचाहि त्याला छंद लागतो आणि त्या अज्ञाताला तो आपलें जीवनसर्वस्व वाहून त्याचेसाठीं वेडाहि होतो.

आणि एकदां छंद लागला म्हणजे तो असा कांहीं अंगवळणीं पडतो कीं, आपण कुठें जात आहोंत, आपल्याला काय हवें आहे, आपल्या प्रवृत्तीचा उद्देश काय याचीहि सुधबुध त्याला रहात नाहीं. "अरे, तूं असा कां वागतोस ?" असें जर त्याला कुणी विचारलें तर तो म्हणेल, "मला तें कांहीं ठाऊक नाहीं. कधींकाळीं जर तें ठाऊक असलें तरी तें आतां विसरलों आहें. आतां तर 'पडिलें वळण इन्द्रियां सकळां' म्हणूनच मी असा वागतों. मला दुसरें असें शक्यहि उरलें नाहीं."

लहान मुलें एखादा छंद घेऊन हट्टास पेटून रडूं लागतात. कांहीं वेळ गेला म्हणजे कसला हट्ट केला होता हेंहि विसरून जातात. पण त्यांचें रडें मात्र चालूच

असतें. एकीकडे रडें चालूं ठेवून त्याबरोबर इतर दुसऱ्याहि क्रिया सुरू होतात व चालतात. पण रडें मात्र थांबत नाहीं.

भलेभले साधक आपलें घरदार, नात्यागोत्याचीं माणसें या सर्वांचा त्याग करून उग्र साधना सुरूं करतात, खडतर तपश्चर्या करूं लागतात. इतकी अलौकिक कीं, सारें जग आश्चर्यचकित होऊन जातें. पण पुढें तीच साधना अंगवळणीं पडून यंत्रवत् चालूं राहाते आणि पुढें त्यांत कांहींच राम उरत नाहीं.

मुलाला रडतां रडतां मधेंच आपल्या हट्टाची आठवण होते आणि आपण हट्टांत मंदावलों याचें भान होतांच तें स्वतःवर रागावतें आणि मग ढिलाईचा वचपा काढण्यासाठीं पुन्हा जोरजोरानें रडूं लागतें. साधकाला जेव्हां कळून चुकतें कीं, आपण मंदावलों आहोंत, आळसावलों आहोंत, आपल्या तपस्येच्या अग्नीवर अनवधानाची राख गोळा झाली आहे तेव्हां तो स्वतःवर चिडतो आणि पुन्हा स्वतःची साधना विशेष उग्रपणें चालू करतो. भक्ताचेंहि असेंच होतें.

रवीन्द्रनाथ ठाकुरांनीं पारसमण्याच्या शोधासाठीं निघालेल्या एका किमयागाराचें वर्णन केलें आहे. त्याच्या कमरेंत एक लोखंडाची सांखळी होती. तिचें त्याला सोनें बनवावयाचें होतें. जो धोंडा दिसेल, जो खडा हातीं येईल त्याला कमरेच्या सांखळीला घासून बघण्याचें त्यानें आरंभिलें. तो लहानाचा मोठा झाला, तरुणाचा वृद्ध झाला, देशदेशांतरीं फिरला तरीहि त्याचा तो छंद चालूंच होता. पुढें पुढें ध्यान एकीकडे आणि क्रिया मात्र यंत्रवत् चालूं अशी स्थिति झाली. असें करतां करतां मधेंच त्याच्या हातीं पारसमणी आला. त्यानें तो संवयीप्रमाणें लोखंडी सांखळीशीं घासला आणि टाकून दिला. सांखळीच्या लोखंडाचें सोनें झालें हेंहि त्याचे ध्यानांत आलें नाहीं. कमरेची सांखळी आतां सोन्याची झाली आहे हें नंतर किती दिवसांनीं त्याच्या लक्षांत आलें कोण जाणें! तो आश्चर्यचकित झाला, आनंदितहि झाला आणि दुःखानें रडूं लागला, "मी परीस मिळवला आणि गमावला. माझी सगळी साधना व्यर्थ गेली!"

परीस म्हणून खरोखरच एखादा पदार्थ आहे किंवा नाहीं याविषयीं प्रथम मला थोडी शंका होती. आतां खात्री झाली कीं, जगांत कुठेंतरी परीस आहे खरा. पण तो आतां मिळावा कसा? चला आतां पुन्हा परत आल्या वाटेनें, आणि लागा पुन्हा पहिल्याप्रमाणें दरेक धोंडा आणि दरेक खडा तपासायला. आतां मात्र पूर्वीप्रमाणें गफलत करतां कामा

नये. निश्चय तर केला पण आतां पूर्वींइतकी शक्ति आणि पूर्वीचें आयुष्य कुठून आणावें ? यश हातीं आलें पण तें पदरीं मात्र पडलें नाहीं !

शबरीचें मात्र असें झालें नाहीं. लहानपणीं तिला ऋषींनीं सांगितलें होतें कीं श्रीरामचंद्र कधींतरी या वनांत येणार आहेत. शबरी श्रद्धेनें प्रतीक्षा करूं लागली. प्रतीक्षा हीच तिची साधना झाली. ती लहानाची मोठी झाली तरी तिची प्रतीक्षा चालूंच होती. पुढें तारुण्य ओसरलें, केस पांढरे झाले, तोंडावर सुरकुत्या आल्या, दृष्टि मंदावली पण तिच्या प्रतीक्षेंत खंड पडला नाहीं. शेवटीं तिला श्रीरामचंद्राचें दर्शन घडलें आणि मग ती कृतकृत्य होऊन जगण्याचें कांहींच कारण न राहिल्यामुळें विदेहावस्थेला पोहोंचली.

सृष्टीला आपण जड म्हणतों, पण तेथेंहि अज्ञाताची अज्ञात साधना चालूंच आहे. प्रत्येक कळीला ठाऊक आहे कीं, आपल्याला पूर्वीं कधींहि न पाहिलेल्या अशा प्रकाशाचें दर्शन घडावयाचें आहे. डोंगरावरच्या झऱ्याला गायला कोणी शिकविलें ? पण त्याच्या आत्म्याला कधीं तरी पूर्वीं ऐकलेली सिंधुगर्जना आठवत असतें आणि तो ती आठवण काढून काढून येईल तशी गात असतो. झऱ्याला भूगोलाचें ज्ञान नसतें. कोणत्या नद्या कुठें कशा वाहतात याची त्याला बातमी नसते. तरीहि तो जीवनधर्माला जागून वाव मिळेल त्याप्रमाणें वाहत असतो. आणि शेवटीं समुद्राला जाऊन मिळाल्यानंतरच त्याची साधना संपते.

समुद्रहि भरती ओहोटीच्या रूपानें श्वासोच्छ्वास घेत असतो. आपलें हृदय जसें अखंड धडकत असतें त्याप्रमाणें समुद्राचें पाणी वर येतें आणि खालीं जातें. या साधनेच्या शेवटीं समुद्राला काय मिळवावयाचें आहे हें त्यालाहि ठाऊक नाहीं. तरीहि त्याची ही साधना लाखों वर्षें चालूंच आहे.

कामरूपिणी सृष्टि सती पार्वतीप्रमाणें अनंतप्रकारें शिवाच्या प्राप्तीसाठीं साधनाव्रत चालवीत आहे आणि गंगा जशी सागराला मिळून देखील आपले वाहाणें चालूंच ठेवते त्याप्रमाणें शिवाची प्राप्ति झाली तरी या सती सृष्टीला आपली साधना सोडावीशी वाटत नाहीं. कारण ही साधना एक अनुनयाचाच प्रकार होऊन बसतो. अद्वैताचा साक्षात्कार झाल्यानंतर देखील साधक राहाण्यांतच ती आनंद मानीत असते. ही सर्व लीला कधीं-पासूनची चालली आहे हें कोण सांगूं शकेल ? भगवान काळाला विचारलें तर तोहि कदाचित् म्हणेल —

> यो अस्य अध्यक्षः परमे व्योमन् ।
> सः अंग ! वेद यदि वा न वेद ।

कबे आमि [1]बाहिर हलेम तोमारइ गान गेये—
से तो आजके [2]नय से आजके नय।
भुले गेछि कबे थेके आसछि तोमाय [3]चेये—
से तो आजके नय से आजके नय।
झरना जेमन बाहिरे जाय,
जाने ना से काहारे चाय
तेमनि क'रे धेये एलेम
जीवनधारा बेये
से तो आजके नय से आजके नय।

कतइ नामे डेकेछि जे,
कतइ छबि[4] अेंकेछि जे,
कोन् आनन्दे चलेछि ता'र
ठिकाना ना पेये—
से तो आजके नय से आजके नय।
पुष्प जेमन आलोर लागि,
ना जेने रात काटाय जागि,
तेमनि तोमार आशाय आमार
हृदय आछे [5]छेये—
से तो आजके नय से आजके नय।

तुझें गाणें गाऊन मी घरांतून बाहेर पडलों ती कांहीं आजकालची गोष्ट नाहीं. कोण जाणें केव्हांचा मी बाहेर पडलों! तुला मी एकसारखा आजपर्यन्त शोधीतच आलों आहे हें मी आज विसरूनहि गेलों आहे. हीहि कांहीं आजकालची गोष्ट नव्हे.

---

१ बाहिर हलेम-(मी) बाहेर पडलों. २ नय-नाहीं. ३ चेये-साठीं. ४ अेंकेछि-(मीं) चितारलीं. ५ छेये-व्यापलेलें.

झरा ज्याप्रमाणें आपल्या उगमापासून बाहेर येऊन वाहूं लागतो, त्याला कोण हवें आहे तें तर त्याला ठाऊकहि नसतें, त्याचप्रमाणें मीहि माझ्या जीवनधारेंत वाहात वाहात धावतों आहें, हीहि जुनीच गोष्ट आहे.

जरी मला त्याचें ठावठिकाणहि सांपडलें नसलें तरी मी त्याला अनंत नांवांनीं बोलावीत आलों आहें, त्याचीं कितीतरी चित्रें मीं काढलीं आहेत. मी किती आनंदानें त्याचेकडे धांवत चाललों आहें! या कांहीं आजकालच्या गोष्टी नव्हेत.

ज्याप्रमाणें पुष्प प्रकाशाचें ध्यान करीत अजाणतां सबंध रात्र जागून काढतें त्याप्रमाणें तुझ्या आशेनें माझें हृदय भरलेलें आहे. हीहि कांहीं आजकालची गोष्ट नव्हे. सनातन काळापासून माझा अभिसार चालूंच आहे.

# २८

जोंवर पिल्लूं आकार धारण करून सुदृढ झालें नाहीं तोंवर त्याच्या रक्षणासाठीं अंड्याचें कवच ठेवलेलें असतें. त्याचप्रमाणें मनुष्याला तो सशक्त होईतोंपर्यंत अज्ञानाचें आवरण दिलेलें असतें.

लहान लहान अर्भकांना जर घरच्या दैन्यावस्थेची कल्पना आली तर त्या भाराखालीं तीं मरूनच जावयाचीं. पण त्यांना कसलेंच भान नसल्यामुळें तीं मोठ्या आनंदानें नाचत बागडत असतात आणि भविष्यकाळाचें ओझें डोक्यावर घेण्यासाठीं शक्ति कमावीत असतात.

एखाद्या सम्राटाच्या युवराजाला जर पोरपणींच समजलें कीं आपल्या राज्याचा विस्तार केवढा आहे आणि किती अमर्याद अधिकाराचे आपण वारस आहोंत, तर तें ज्ञान त्याला मुळींच झेपायचें नाहीं. त्याला कसलीच कल्पना नसल्यामुळें तो खेळत खेळत वडिलांच्या आणि त्यांच्या अनुभवी मंत्र्यांच्या देखरेखीखालीं मोठा होत असतो.

मोठ्या मोठ्या सरोवरांना आटवून आंतील चिखलाच्या वेड्यावांकड्या विटा करून टाकणारा प्रखर ताप त्याच सरोवराच्या कांठीं उगवणाऱ्या फुलांच्या कळ्यांना हळुवारपणें फुलवीत असतो.

जेवढी शक्ति असेल तेवढेंच ओझें घालणें हा देवाच्या घरचा नियमच आहे.

ईश्वराची कृपा म्हणजे कांहीं दूध, तूप नव्हे कीं ज्याच्या योगानें नाजुक भक्ताला न्हाऊं घालतां येईल. ईश्वराची कृपा म्हणजे शुद्ध तेजाब आहे तेजाब !! जें शुद्ध सोनें असेल तेंच त्यांत टिकावयाचें. जें हिणकस असेल तें जळून भस्म व्हावयाचें.

हा तेजाब सहन करण्याची ज्याची शक्ति नाहीं त्याच्यावर दया करून सुखदु:खाचे अनेक पडदे उभे करून, आणि धन, जन, मान यांचीं व्यवधानें मनुष्याभोंवतीं रचून ईश्वर त्याला वांचवीत असतो आणि ढगाच्या कपारींतून सूर्याच्या एखाद्या रेखेचें थोडेंसें दर्शन व्हावें त्याप्रमाणें स्वतःच्या अस्तित्वाचा थोडासा आभास भक्ताला देत असतो.

पुढें जेव्हां माता कुंतीप्रमाणें कणखर भक्ति मनुष्यामध्यें प्रगट होते तेव्हां आपलें पूर्ण दर्शन देण्यासाठीं भगवान अशा भक्ताला सर्व तऱ्हेच्या विपत्तींची देणगी देत असतो. अशा भक्ताला एक भगवंताशिवाय या दुनियेंत कांहींच उरत नाहीं. आणि भक्तही विविध प्रकारच्या अल्पस्वल्प सिद्धींचा लोभ न बाळगतां दृढतापूर्वक त्या सर्वांचा त्याग करून भगवंतालाच आपल्या हृदयांतील सर्वस्थान देण्याचा मोठा लोभ बाळगतो. त्या असीमाचाच भक्त तो ! त्याच्या लोभाला सीमा काय म्हणून असावी ! ! ! घर, दार, धन, मान, लज्जा, भय, शरम, अपमान कशाचीच तो पर्वा करीत नाहीं आणि ईश्वरही त्याच्या वांट्याला ह्या वस्तु ठेवीत नाहीं. ईर्षाळू प्रेमी लोकांप्रमाणें दोघेही म्हणत असतात, माझ्यावांचून दुसऱ्या कोणाचीही गोडी नसावी. मला फक्त तूं आणि तुला मी, असाच आपला संबंध असावा.

तोमार प्रेम जे [1]बजिते पारि
एमन साध्य नाजि ।
ए संसारे तोमार आमार
माझखानेते [2]ताजि
कृपा करे रेखेछ नाथ
अनेक व्यवधान—
दु:ख-सुखेर अनेक [3]बेड़ा,
धनजनमान ।

१ बजिते पारि—सहन करूं शकेन. २ ताजि—म्हणूनच. ३ बेड़ा—वेष्टनें.

[4]आड़ाल थेके क्षणे क्षणे
आभासे दाओ देखा—
कालो मेघेर [5]फाँके फाँके
रबिर मृदु रेखा।

शक्ति जारे दाओ बहिते
असीम प्रेमेर भार
अेकबारे सकल पर्दा
[6]घुचाये दाओ तार।

ना राख तार घरेर आड़ाल,
ना राख तार धन,
पथे अेने निःशेषे ताय
कर अकिंचन।

ना थाके तार मान अपमान,
लज्जाशरम भय।

अेकला तुमि समस्त तार
विश्वभुबनमय।

अेमन करे मुखामुखि
सामने तोमार थाका,
केबलमात्र तोमाते प्राण
पूर्ण करे राखा,

---

४ आड़ाल–आडपडदा, बंधन. ५ फाँके–फटींतून. ६ घुचाये दाओ–दूर सारतोस.

अ दया जे पेयेछे तार
लोभेर सीमा नाञि—
सकल लोभ से सरिये फेले
तोमाय [७]दिते ठाँञि।

"तुझें प्रेम सहन करावें एवढी माझी शक्ति नाहीं. तें मला जुळावयाचें नाहीं. म्हणूनच हे प्रभो, अत्यंत कृपाळू होऊन या संसारांत तुझ्या माझ्यामध्यें अनेक व्यवधानें तूं ठेविलीं आहेस. दुःख आणि सुख, धन, जन, आणि मान यांचे अनेक पडदे तूं रचले आहेस.

आणि त्यांच्या आड राहून एखाददुसऱ्या धन्य क्षणीं तूं स्वतःचें ओझरतें दर्शन देतोस. काळ्या मेघांनीं व्याप्त झालेल्या सूर्योनें मेघांच्या एखाददुसऱ्या छिद्रांतून आपली मृदुरेखा पाडावी त्याप्रमाणेंच तूं थोडेसें दर्शन देतोस.

पण तुझ्या असीम प्रेमाचा भार सहन करण्याची शक्ति ज्याला देतोस त्याच्या डोळयांसमोरील सगळे पडदे तूं एकदम दूर करून टाकतोस. त्याच्यामध्यें आणि तुझ्यामध्यें व्यवधान असें घरही त्याच्या वांट्याला तूं राहूं देत नाहींस आणि धनहि उरूं देत नाहींस. त्याला परिपूर्ण अकिंचन करून त्याचें कांहींच उरूं न देतां त्याला रस्त्यावर आणून उभा करतोस. त्याच्या वांट्याला मानही नसतो आणि अपमानही नसतो. लज्जा, शरम, भय कांहींच नसतें. या सर्व विश्वभुवनांत त्याचा असा एकटा तूंच रहातोस.

अशा रीतीनें तूं त्याला अगदीं आपल्या सन्मुख ठेवितोस. तुम्ही दोघेही एक क्षणदेखील एकमेकांच्या दृष्टिआड होत नाहीं. असा त्याच्या प्राणांत केवळ तूंच एकटा पूर्णपणें भरून राहिलेला असतोस.

आणि ही तुझी दया ज्याला लाभली त्याच्या लोभाला कसलीच सीमा उरत नाहीं. कारण तो जगांतील इतर लहान मोठे विविध प्रकारचे सर्व लोभ बाजूला सारून आपल्या हृदयांतील सर्वच स्थानांत तुला भरून ठेवितो. एखाद्या लोभ्यानें तांब्याचांदीला स्पर्श न करतां फक्त सोनेंच तेवढें घरांत भरून घ्यावें किंवा फक्त हिऱ्यामाणकांवरच हात मारावा आणि बाकीच्या गोष्टींकडे ढुंकूनही बघूं नये त्याप्रमाणें तुझा भक्त तुला सोडून इतर कशाचीही पर्वा करीत नाहीं."

---

७ दिते–देण्यासाठीं.

# २९

एकदां चार मुलें लाकडाच्या मोडक्यातोडक्या फळ्या घेऊन क्रिकेट खेळत होतीं. तिथें रस्त्यानें जाणारा एक तरुण आला व त्या मुलांना म्हणूं लागला — मला खेळांत घ्याल का ? मुलें म्हणालीं — जर तुला आमच्या इतकें चांगलें क्रिकेट खेळतां येत असेल आणि रडी खेळणार नसशील तर घेऊं तुला. एक मुलगा उदारपणें म्हणाला, अरे याला जर चांगलें खेळतां येत नसेल तर आपण शिकवूं. येरे, लाग खेळायला आमच्याबरोबर. तिसरा मुलगा म्हणाला, रडी खेळला तर जाईल आपल्या घरीं रडत. आपलें त्याच्यावांचून कांहीं थोडेंच अडलें आहे ?

सर्वांचे ठरलें आणि तो तरुण मुलांबरोबर खेळूं लागला.

त्या दिवशीं त्यांना खेळांत कांहीं औरच आनंद आला आणि मुलेंहीं त्या तरुणाकडून नकळत कितीतरी शिकलीं. खेळ संपतांच मुलें त्याला म्हणूं लागलीं— उद्यां येशील कां पुनः खेळायला ? आज तूं फार बहार केलीस. उद्यांला येच. तरुण म्हणाला—आज मी तुमच्याकडे आलों, उद्यां तुम्हीं सर्व या ना माझ्याकडे खेळायला. तो दूर टेकडीच्या पायथ्याशीं तंबू दिसतोय ना, त्याच्या जवळच मी खेळत असतों. उद्यां तुम्ही तिकडे जरूर या. 'पण' मुलें म्हणालीं, 'तिकडे आम्हांला येऊं देतील कां ?'– 'तुम्हांला कोणी नाहीं म्हटलें तर मी पडीन कीं मध्यें. तुम्हीं याच.'

मुलें गेलीं आणि कालच्या सवंगड्याला शोधूं लागलीं. जिकडे तिकडे पहारे बसलेले. मोठमोठे अंमलदार धांवपळ करीत असलेले त्यांना दिसले. पण मुलांना कोणी धमकावीना कीं अडवीना. सरते शेवटीं त्यांना तो कालचा तरुण दूर दिसला. मुलें मोठ्यानें ओरडलीं, बरा सांपडलास पण, आतां येतोस ना खेळायला? काल कबूल केलें आहेस. सर्व लोक चपापून मुलांकडे पाहूं लागले. मुलांची शेवटीं खात्री झाली कीं कालचा तरुण दुसरा तिसरा कोणी नसून आपला क्रिकेटपटु राजा रणजीतसिंगच आहे. मुलें लाजून पाणी पाणी झालीं. तीं कसचीं खेळताहेत, राजाबरोबर आतां कसचा विनोद करताहेत! त्याच्या खेळण्याच्या लकबीवर हात जोडून उभीं राहिलीं एका बाजूला. काल जीं विनोद करीत होतीं त्यांच्या तोंडून आज एक शब्दही निघेना. राजानें हसून त्यांना जितकें जवळ करावें तितकें तीं लाजून मान खालीं घालीत.

अर्जुनानें भगवंताकडे विश्वरूपदर्शनाची याचना केली. भगवंतांनीं आपल्या अलौकिक रूपाचें दर्शन दिलें तेव्हां अर्जुन म्हणतो, भगवंता, मला काय ठाऊक कीं, तूं एवढा मोठा आहेस म्हणून. मी तर हे कृष्ण, हे यादव, हे सख्या असें म्हणून अगदीं खेळीमेळीनें तुझ्याशीं बोलत होतों. एकांतांत तर तुझी थट्टा मी उडवीत असेंच, पण चारचौघांत देखील मीं कमी केलें नाहीं. एकत्र निजलों असतां तुला हलवून हलवून मीं जागे केलें; तुला सतावण्यांत मला कितीतरी आनंद वाटत असे. जेवायला बरोबर बसलों म्हणजे देखील मीं तुझी अनेक वेळां रेवडी उडविली आहे. या सर्व बेअदबीबद्दल तूं मला क्षमा करशील का? अरे, तुझें हें विश्वरूप पाहिल्यानंतर देखील तुला मी अहो जाहो म्हणून म्हणत नाहीं, देवाधिदेव म्हणत नाहीं. तुला ' तूंच ' म्हणतों. काय ही माझी सलगी! पण मी तरी काय करूं? तूं मला असा बनविलास कां? असा ठेविलास कां?

हें सर्व जाऊं द्या. आपलें यौवनच घ्या. आपण तरुण असतों तेव्हां आपल्याला त्या तारुण्याची कसलीच कदर नसते. पण पुढें जेव्हां म्हातारपण येतें, सर्व शक्ति क्षीण होतात तेव्हां वाटूं लागतें कीं, अरेरे, मी माझ्या तारुण्याला किती बेदरकारीनें वागविलें. त्यावेळची माझी ती शक्ति, माझी ती प्रतिभा, माझी ती महत्वाकांक्षा, माझा दरारा या सर्वांची मीं जी कांहीं कदर केली ती त्यांच्या योग्यतेच्या मानानें कांहींच नव्हती. जर स्वतःविषयींची ही कथा, तर ज्या परमात्म्यानें सर्व कांहीं दिलें आहे आणि जो जन्मा-

पासून आपला सांगाती म्हणून आपल्याबरोबर आहे त्याच्याकडे दुर्लक्ष केल्याचें दुःख आपल्याला किती वाटेल याचा हिशेब काढतां येईल कां ?

कवि भगवंताला म्हणतो —

आमार खेला जखन छिल तोमार [1]सने
[2]तखन के तुमि [3]ता के जानत
तखन छिल ना भय, छिल ना लाज मने,
जीवन बहे [4]जेत अशान्त ।
तुमि भोरेर बेला [5]डाक दियेछ कत
जेनो आमार आपन सखार मतो
हेसे तोमार साथे फिरेछिलेम छुटे
सेदिन कत-ना वन-वनान्त ।
ओगो सेदिन तुमि गाअिते जे-सब गान
कोनो अर्थ ताहार के जानत ।
शुधु संगे तारअि गाअित आमार प्राण,
सदा नाचत हृदय अशान्त ।
हठात् खेलार शेषे आज की देखि छवि —
स्तब्ध आकाश, नीरव शशी रवि,
तोमार [6]चरणपाने नयन करि नत
भुवन दाँड़िये आछे अेकान्त ।

"जेव्हां मी तारुण्यकाळीं तुझ्याबरोबर खेळ खेळत असे तेव्हां तूं कोण आहेस याची कुणाला जाणीव होती ! तेव्हां माझ्या मनाला नव्हती लाज कीं नव्हतें भय. एखाद्या नदीला पूर यावा तसा माझा जीवनप्रवाह आपल्याच उन्मादांत वहात होता. तूं कितीतरी वेळां पहांटे खेळगडी होऊन मला हांक

---

१ सने–सह. २ तखन–तेव्हां. ३ ता–तें. ४ जेत–जात होतें. ५ डाक–हांका. ६ चरणपाने–चरणापाशीं.

मारून उठवीत होतास आणि मी देखील हंसत-खिदळत त्यावेळीं तुझ्याबरोबर कितीतरी रानेंवनें भटकत असे.

त्याकाळीं तूं जीं गाणीं गात असेस त्यांना कांहीं गूढ अर्थ आहे हें कुणाला माहीत होतें! त्यावेळीं माझा प्राण फक्त तीं गाणीं गात आनंद करीत असे आणि माझें हृदय त्या गायनाबरोबर प्रचंड लाटांनीं उसळत असे.

आतां जेव्हां संध्याकाळ झाली आणि खेळ संपला तेव्हां एकाएकीं हें मी काय दृश्य पहात आहें! तूं आतां माझा खेळगडी उरला नाहींस. हें शान्त आकाश आणि हे नीरव रविशशी सर्व कमर वांकवून दृष्टि खालीं करून तुझ्या चरणीं लीन झाले आहेत. आणि सर्व भुवनें अवाक् होऊन हात जोडून एका बाजूला उभीं आहेत. तुझी भक्ति करीत आहेत."

---

**टीप :**— दिवसा सूर्य तळपत असतो आणि माणसें आपआपल्या कामांत गुंग असतात. केवढें मोठें आकाश डोक्यावर ताणलेलें आहे याकडे कोणाचेंच लक्ष नसतें. आपल्या नित्याच्या कामांत विश्वाचा सहयोग कसा निगडित आहे इकडेंही कोणाचें ध्यान नसतें. तें तर सर्व आहेच, त्याचा कसला विचार करायचा? अशा भावनेनें सगळे आपआपल्याला कामांत चूर असतात. संध्याकाळीं जेव्हां थकून भागून विश्रांति घेण्याची तयारी करावी तेव्हां सूर्य मावळतो, आकाशाची खोली उघडते आणि कोट्यावधि सूर्य त्या खोलींत तळपूं लागतात. आतां मात्र या अनंतकोटी ब्रह्मांडांच्या नायकाला विसरून चालत नाहीं. थकलें भागलेलें शरीर आणि मन रात्रीच्या अंधःकाराची प्रसन्न ताजगी अनुभवूं लागतें. जेथें आकाशच भगवंताचा चरणस्पर्श करण्यासाठीं सगळ्या बाजूंनें वांकलेलें असतें, तेथें नम्रतेची निराळी दीक्षा घ्यावयास नको. सर्व तारे जेथें अनिमिष लोचनानें न थकतां दर्शन घेत सुटतात तेथें दर्शनाची आठवण करून देण्याचें कारणच उरत नाहीं. जो जिथें आहे तिथेंच दृष्टि नम्र करून पहात असतो आणि जेथें पहावें तेथें त्याला भगवंताचेच चरण सांपडतात. हृदय भरून येतें, डोळे भरून येतात आणि दोन्ही वितळून भगवंताच्या चरणाला अभिषेक करतात.

(हा अभिषेक पहांटे दंवाच्या रूपानें दिसतो.)

# ३०

एकदां एक ऋषि जनकराजाच्या भेटीला निघाले. द्वारपाळानें त्यांना सांगितलें कीं आंत जाऊन परवानगी काढून येतों तोंवर थांबा. ऋषींना अर्थात् अशा स्वागताचें बरेंच वैषम्य वाटलें. पण करणार काय ? द्वारपाळानें परत येऊन राजाचा निरोप सांगितला, ' बरोबर कांहीं न घेतां एकटेच यावयाची तयारी असेल तर आपल्याला आंत येतां येईल.'

ऋषींबरोबर शिष्यांची मांदी ( टोळी ) नव्हती. मग असा निरोप कां ? त्यांनीं आपले व्याघ्रचर्म आणि कमंडलू देवडीवर ठेऊन आंत पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला पण दरवाजा उघडेना. ऋषि चकित झाले. जिवाचा हिय्या करून त्यांनीं लंगोटी काढून ठेविली तरीही दरवाजा उघडेना. मग मात्र ऋषि अंतर्मुख झाले आणि विचार करूं लागले. माझ्याबरोबर आणखी कोण कोण आंत जाऊं पहाताहेत ? त्यांच्या अंतर्दृष्टीला: अहंकार, द्वैतभाव अभिमान इत्यादि अनेक मलिन साथी तावडतोब दिसले. ऋषि लाजले. त्यांनीं तावडतोब पश्चात्ताप करून त्या सर्व साथीदारांचें तेथेंच विसर्जन केलें आणि लंगोटी घालून व्याघ्रचर्म पाठीवर घेऊन कमंडलूनिशीं आंत जाण्यास निघाले. मग मात्र दरवाजा खाडकन् उघडला आणि जनकराजा स्वत: पाद्य आणि अर्घ्य घेऊन तेथेंच सामोरे भेटले.

मनुष्य इहलोक सोडून परलोकांत जाण्याची तयारी करतो तेव्हां परलोकांत काय हवें ह्याचा विचार करण्याऐवजीं इहलोकींचें काय काय बरोबर घेण्याची इच्छा आहे याचाच विचार करतो आणि मग त्याचा जीव गुदमरतो. बाबारे, इहलोक सोडवायचा ठरलें तर मग आतां ऐहिक वस्तूंचा लोभ कशाला ठेवितोस ? पैलतीराला जावयाचें आहे ना ? तेथील गरजा निराळ्या आहेत. तेथील आनंदाची साधनेंही निराळीं आहेत. येथील सर्व बोजा घेऊन जर होडींत बसू पाहशील तर होडी तुला गांठतां यावयाची नाहीं आणि होडींत तूं आणि तुझीं गाठोडीं दोघांना जागाच नाहीं. तूं घरांतून एकेक वस्तु बंदरावर घेऊन येतोस. एकेका ओझ्याखालीं धांपा टाकत बंदरावर पोंचेपर्यन्त होडी निघून गेलेली असते. आतां दुसऱ्या होडीपर्यन्त बराच वेळ आहे तो फुकट कां घालवा, असें म्हणून आणखी ओझें आणण्यासाठीं घरीं जातोस आणि ओझें घेऊन पुनः बंदरापर्यन्त पोंचावें तर दुसरी होडीही सुटलेली !

अशी ही फजिती कुठवर करून घेणार ? तुझीं सगळीं गाठोडीं सोडून दे या प्रवाहांत आणि हांक मार त्या केवटाला. बरोबर कांहीं घेऊं नकोस. जीवनांत जें कांहीं गोळा झालें असेल तें त्याच्या पायीं अर्पण कर आणि अगदीं कोरडा होऊन होडींत जाऊन बस. मग खात्रीनें पैलतीरीं पोंचशील.

वेदान्तशास्त्र अखंड गर्जना करून सांगत आहे कीं, अहंता आणि ममता यांच्या मुळेंच मोक्ष दुरावतो. जर भवबंधांतून मुक्त व्हावयाचें असेल—आत्मस्वातंत्र्य प्राप्त करावयाचें असेल तर व्यक्तिगत अहंकार आणि मालमत्तेचा परिग्रह, दोन्ही सोडून दिले पाहिजेत.

या दोन बंधनांपैकीं विशेष भयंकर अहंता आहे. अहंकारामुळेंच दृष्टि कलुषित होते, अहंकारामुळेंच व्यापकता नष्ट होते आणि विश्वात्मैक्य मोडून जाऊन संकुचित व्यक्तित्व विशाल होऊन मोठा अंतराय उत्पन्न करतें.

पण या अहंकाराला जर मुख्य पोषण मिळत असेल तर तें मम-ते पासून होय.

“ मुळीं होता मुक्त । परी झाला बद्ध ।
घेऊनिया छंद । माझें माझें ॥ ”

जर ममतेचा परिग्रह सुटला तर अहंता इतकी कांहीं विरळ होते कीं, ती फारशी टिकूं शकत नाहीं; आणि टिकली तरी बाधूं शकत नाहीं. यासाठीं साधकानें प्रथम स्वतःच्या

मालमत्तेचें–परिग्रहाचें–ममतेचें लिगाड फेंकून दिलें पाहिजे. पाण्यांत पोहणाऱ्यानें गळ्यांत धोंडा बांधून पाण्यांत पडूं नये हें जितकें स्पष्ट तितकेंच स्वतःचा उद्धार इच्छिणाऱ्यानें परिग्रहाचें ओझें बाळगतां कामा नये हें स्पष्ट आणि अपरिहार्य आहे.

माल आणि मालक यांचा संबंध असा कांहीं विचित्र असतो कीं, मालकाला वाटतें मालाचा मी स्वामी आहें–माल माझ्या स्वाधीन आहे. पण खरें पाहूं जातां मालकच मालाच्या अधीन झालेला असतो, मालाच्या आहारीं गेलेला असतो, मालाच्या बंधनानें बद्ध झालेला असतो. मालकी टिकवावयाची तर माल सोडून जातांच येत नाहीं.

हें विचित्र बंधन ज्याला समजतें त्याला ज्याक्षणीं मुक्त व्हावेंसें वाटेल, त्याक्षणीं तो प्रथम मालाला तिलांजलि देईल आणि स्वतःला मुक्त करील.

ओ रे [1]तरी दिल [2]खुले।
[3]तोर बोझा के नेबे [4]तुले।
सामने जखन जाबि ओरे
[5]थाक–ना [6]पिछन पिछे पडे,
पिठे तारे बजिते गेलि,
एकला पडे रजिलि कूले।

घरेर बोझा [7]टेने टेने
पारेर घाटे राखलि अेने,
ताभि-जे तोरे बारे बारे
फिरते हल गेलि भुले।
डाक रे आबार [8]माझिरे डाक,
बोझा तोमार जाक भेसे जाक,
जीवनखानि उजाड करे
सँपे दे तार चरणमूले।

---

१ तरी–नाव. २ खुले–सोडून. ३ तोर–तुझा. ४ तुले–उचलून. ५ थाक–ना–राहिना. ६ पिछन–मागलें. ७ टेने–वाहून आणून. ८ माझिरे–नावाड्याला.

"अरे काय पाहातोस ; पहा ती होडी चालली, होडीनें तीर सोडला ; आतां तुझें ओझें कोण पैलतीराला नेणार ? तुला जर पैलतीराला जावयाचें असेल तर मागील वस्तु मागेंच पडून राहूं देत. त्या जर पाठीवर बांधून घेऊन जाऊं म्हणशील तर तूं एकटाच ऐलतीराला पडून राहशील.

पैलतीराला जाऊं म्हणतोस पण घरांतील चीजवस्तूंचा मोह तुला सुटत नाहीं. घरांतलीं गाडगीं मडकीं सगळीं जर आणून आणून किनाऱ्याच्या घाटावर त्यांचा ढीग करूं पाहशील तर तुला घरून किनाऱ्यावर आणि किनाऱ्यावरून घरीं किती हेलपाटे ( फेऱ्या ) करीत रहावे लागतील हें तूं विसरलास ?

आतां हा सगळा माल जाऊं दे वाहून. होडी अजून फारशी दूर गेलेली नाहीं. होडीच्या तांडेलाला हांक मार आणि एकटाच सगासाठा होडींत जाऊन बसण्यास तयार हो. स्वतःच्या जीवनांतील सर्व परिग्रह फेंकून दे, त्याला अगदीं उजाड कर आणि मग तें त्याच्या चरणीं अर्पण कर. हाच काय तो पैलतीराला जाण्याचा खरा मार्ग आहे, दुसरा नाहीं.

"नान्यः पन्था विद्यते अयनाय"

# ३१

एखादा मनुष्य पूर्णपणें निःसहाय बनला म्हणजे तो अंतर्मुख होऊन आपलें स्वतःचें खरेंखुरें भांडवल किती आहे हें तपासूं लागतो. तेथेंही निराशा झाली तर शेवटीं आहे ती स्थिति न झांकण्यांत—उलट उघडपणें कबूल करण्यांत तो एकप्रकारची स्वच्छता आणि निर्मळशक्ति अनुभवूं लागतो. आणि जगही त्याच्या हृदयाविष्करणाची कदर करूं लागतें. ज्यानें आपली खरीखुरी स्थिति उघड केली आहे त्याच्यावर प्रहार तो कसला करावयाचा? जगाचा जर हा स्वभाव तर जगन्नाथाचा स्वभाव याहून अनुदार असेल काय ? मूल ज्याप्रमाणें आईपुढें नागडें उभें राहून आईचें वात्सल्य मिळवतें त्याप्रमाणें भक्त जर आपलें हृदय आणि आपलें जीवन परमात्म्यापुढें उघडें करील तर परमात्म्याच्या कृपेलाहि असाधारण पाझर फुटल्यावांचून रहाणार नाहीं.

देवाला अर्पण करण्यासाठीं जवळ कांहींच नसलें तरी मनुष्य स्वतःची दीन अवस्था आणि स्वतःची वेदनाच सुदाम्याच्या पोह्यांप्रमाणें भगवंतापुढें ठेवूं शकतो. पूजेसाठीं जवळ दुसरें कांहींही नसलें तरी पूजा करण्यासाठीं आत्मनिवेदन करून सर्वस्व अर्पण करण्याची आपली तत्परता निदान भगवंतापुढें मांडणें शक्य आहे. आणि भावाचा भुकेला भगवान तेवढ्यावरच संतुष्ट होतो.

ज्यांचें जीवन विचारशून्य आणि उथळ आहे त्यांची गोष्ट सोडून दिली तर बाकीच्या प्रत्येक मनुष्याला जीवनांत वारंवार अनुभव येतोच कीं, आपण ज्या मोठ्या उमेदीनें अनेक प्रवृत्ति आरंभिल्या त्यांतून सार असें कांहींच निघालें नाहीं. जे जे लोक वैभवाच्या शिखराला पोंचले होते असें जगाला वाटतें ते देखील मनामध्यें असंतुष्टच होते कीं "धडपड पुष्कळ केली पण खरी सफळता पदरीं पडलीच नाहीं." मोठ्या मोठ्या सम्राटांना देखील हाच अनुभव आला आहे. धर्मसंस्थापकांनीं जगावर सत्ययुगाची स्थापना करण्यासाठीं मोठेमोठे प्रयत्न केले; पण प्रत्यक्ष ज्या गोष्टींची स्थापना झाली त्या किती उथळ आहेत हें पाहून धर्मसंस्थापकांना रडूंच आलें असलें पाहिजे. मोठमोठ्या पैगंबरांचे शिष्य किती उथळ आणि संकुचित होते हें पाहिलें म्हणजे देखील तीच खात्री होते कीं, मोठ्या उत्साहानें बाग तयार करावी आणि वेलींना फुलेंच येऊं नयेत, झाडांना फळेंच येऊं नयेत. हृदयामध्यें स्वर्गीय संगीत भरलेलें असतें, पण तें गळ्यांतून काढूं जातां गर्दभगायनच कानीं पडतें.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मनुष्य प्रसाद-प्राप्तीसाठीं धडपड करीत असतो. आणि पदरा मात्र विषादच पडला असा अनुभव करीत असतो.

या पारिस्थितीचा अनुभव जवळजवळ प्रत्येकाला असल्यामुळें हीच गोष्ट जर कोणी स्पष्ट शब्दांत मांडली तर प्रत्येकाला त्यांत आपल्या हृदयाचा विशेष प्रत्यय येऊन त्यांतच त्याला एकप्रकारचें समाधान वाटत असतें. रवीन्द्रनाथ ठाकुरांची ही प्रस्तुत कविता वाचून जवळजवळ प्रत्येक हृदयाला हायसें वाटलेंच पाहिजे, आणि तोंडांतून नकळत उद्गार निघालाच पाहिजे कीं, "कवीनें माझ्या अंतरीची गोष्टच येथें व्यक्त केली आहे. जन्मभर मला असेंच वाटत आलें आहे." या उद्गारांबरोबर या विषादाचें काव्य आणि या विषादाची भव्यता ही कविता वाचून ध्यानांत आल्यामुळें वाचकाच्या मनांत समाधान आणि कृतज्ञता एकाच वेळीं जागृत झाल्यावांचून रहाणार नाहीं.

[1]जतबार आलो ज्वालाते चाअि
[2]निबे जाय बारे बारे ।
आमार जीवने तोमार आसन
गभीर अन्धकारे ।

---

१ जतबार–जितक्यांदा. २ निबे–विझून.

जे लताटि आछे शुकायेछे मूल–
[3]कुँडि धरे शुधु, नाहि फोटे फुल,
आमार जीवने तव सेवा ताञि
वेदनार उपहारे।

पूजागौरव पुण्यविभव
किछु नाहि, नाहि लेश,
ए तव पूजारि [4]परिया एसेछे
लज्जार दीन वेश।
उत्सवे तार आसे नाञि केह,
बाजे नाञि बाँशि, साजे नाञि गेह,
काँदिया तोमाय एनेछे डाकिया
भाङा मन्दिर-द्वारे।

"जितक्या वेळीं मीं दिवा पेटविण्याचा प्रयत्न केला तितक्या वेळीं तो विझून गेला आहे. भगवंता, माझ्या जीवनांत तुला बोलावून आदराचें आसन द्यावें असा मीं किती तरी प्रयत्न केला. पण दिवा पेटवितां न आल्यामुळें माझ्या जीवनांतील तुझें आसन निबिड अंधःकारांतच आजवर राहिलें आहे. जी लता मी वाढवूं पहात आहें ती कशीबशी जीव धरून आहे. तिचें मूळ सुकत चाललें आहे. पुष्कळ प्रयत्न केला म्हणजे थोड्याशा कळ्या दिसूं लागतात; पण त्या फुटून त्यांचें कधींही फूल झालेलें नाहीं. यामुळें माझ्या जीवनांत मी तुझी सेवा करावयाची म्हणजे माझ्या वेदनेचाच तुला उपहार करावयाचा. तुला अर्पण करावयाला मजजवळ दुसरें काय आहे?

पूजा-गौरव, पुण्यविभव यांचा लवलेशही मजजवळ नाहीं. तुझा हा पुजारी लज्जेचें दीनवसन धारण करून तुझ्यापुढें उभा आहें. मीं तुझ्या पूजेचा उत्सव करावा तर तेथें कोणीच येत नाहीं. वाजंत्रीं नाहींत, आरास नाहीं. मंदिर शृंगा-

---

३ कुँडि–कळी. ४ परिया–परिधान करून, धारण करून.

रावें असेंही मजजवळ कांहीं नाहीं. फक्त माझ्या क्रंदनानें मी तुला बोलावून आणतों आणि तेंही कुठें तर मोडक्या देवळाच्या दरवाज्याकडे !

[ हीच माझ्या जीवनाची कृतार्थता. मला कोठेंही सफळता मिळाली नाहीं. माझा एकही प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. मी तुला जें कांहीं अर्पण करणार तें म्हणजे माझा पराजय, माझी निराशा, माझी विफलता. पण पूजेच्या लोभानें नव्हे, तर माझें सांत्वन करण्यासाठीं मी जसा जिथें असेन तिकडे तूं येतोस हीच काय ती जीवनांतील धन्यता ! ] ”

टीप ‘ आमार जीवने तोमार आसन गभीर अन्धकारे ! ’

वैभव किंवा दैन्य हीं दैवाधीन असतात. योग्यता असूनदेखील वैभव मिळत नाहीं आणि दैन्य जात नाहीं. केव्हां केव्हां कसलीच योग्यता नसतांना वैभव दारीं पाणी भरीत असतें आणि दैन्याचें दर्शनही होत नाहीं. म्हणूनच वैभव आणि विपत्ति दोन्ही आंधळ्या देवता आहेत असें म्हटलें आहे. पण भक्ति, अनुरक्ति आणि प्रपत्ति या सिद्धि कांहीं दैवाधीन नाहींत. त्या आत्माधीन आहेत. म्हणून जो दुर्दैवी असेल त्याला इतर सर्व आयोजनें सोडून या तिहींच्याच साह्यानें पूजा करावी लागते. ईश्वराला वाजत गाजत आमंत्रण देणें शक्य नसेल, पण क्रंदना करून त्याला खेंचून आणणें आपल्या हातचें आहे. त्याला बसण्यासाठीं रत्नजडित आसन आपल्याजवळ नसेल, पण आपलें पश्चात्तापानें शुद्ध केलेलें हृदयासन आपलेंच आहे तें त्याच्यासाठीं पसरणें केव्हांही शक्य आहे. आपल्या दुर्दैवी हातांनीं अग्नि प्रदिप्त होत नसेल, जितक्यांदा दिवा लावावा तितक्यांदा दुर्दैवाच्या वाऱ्यानें जर तो मावळला जात असेल, तर भगवंताचें आसन गंभीर अंधःकारांतच आपल्याला पसरावें लागणार. भगवान येणार आहेत म्हणून मंगल वस्तु परिधान करण्यासाठीं आपल्याजवळ दुकूल नसेल, पितांबर नसेल तर या पुण्य विभवाच्या अभावीं गौरव-शून्य लज्जेचा दीन वेशच धारण करावा लागेल आपल्याला. उत्सवांत सामिल होण्यासाठीं जर कोणीच येणार नसतील तर आपल्या दैन्य आणि दुर्दैवालाच साथी बनवून उत्सव करावा लागेल. वाजंत्रीं वाजत नसतील तर आपलें क्रंदनच खरें. भग्न मंदिरामध्यें क्रंदनाच्या नादामध्यें त्याला बोलावूं.

आणि पूजेसाठीं भगवंताला कांहीं अर्पण तर केलें पाहिजे? रत्नें बाजूला राहिलीं, सुवर्णकुंडलेंहीं नाहींत, हें तर सर्व राहूं द्या. अंगणांत जी एक वेल लाविली आहे तिचें मूळ देखील सुकत आलें आहें. वेलीला कळ्या धरतात. पण जीवनरसच आटल्यामुळें कळ्या फुलून त्यांचीं फुलें बनत नाहींत. अशावेळीं भगवंतांच्या सेवेसाठीं काय अर्पण करणार? भक्त म्हणतो अगदीं प्रामाणिकपणें आपली म्हणून अर्पण करण्यासाठीं मजजवळ एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे माझी वेदना. तीच तुझ्या चरणीं अर्पण करून आज माझी पूजा मी सांग करणार आहें.

माझ्याजवळ कसलीच मत्ता नाहीं, कसलेंच वैभव नाहीं, कोणीही साथी नाहीं. हें दैन्य तर खरें, पण यांतही एक प्रकारचा लाभ आहे. या सर्व गोष्टी असत्या तर त्या देऊन मीं स्वतःला वांचविलें असतें. आतां देण्यासारखें मजजवळ दुसरें कांहींच नसल्यामुळें भगवंता मी स्वतःलाच तुझ्या चरणीं वहात आहें. माझी जी जन्मभर सांठलेली वेदना आहे तिच्या द्वाराच मी स्वतःला तुझ्या चरणीं अर्पण करून मोकळा होत आहें.

# ३२

'माझ्या राज्यांतून चालता हो' अशी शिक्षा रागावलेल्या जनक राजानें एका ब्राह्मणाला केली. त्यानें जनकाची टवाळी करण्याच्या ( किंवा खुशामत करण्याच्या ) उद्देशानें विचारलें, ' महाराज, आपलें राज्य कुठें नाहीं ? ती जागा दाखवा म्हणजे मी तेथें जाऊन राहीन ' ; त्याला म्हणायचें होतें, ' अशी जागाच नाहीं कीं, जिथें तुमचें राज्य नसावें. '

एकदां एका गुरूनें आपल्या विद्यार्थ्याच्या हातांत एक कबुतर देऊन सांगितलें, 'जेथें कोणी पाहूं शकत नाहीं अशा ठिकाणीं जाऊन त्याची मान मोड.' शिष्य अनेक ठिकाणीं गेला पण दरेक ठिकाणीं कोणी ना कोणी होतेंच. शेवटीं अगदीं एकान्तांत गेला तरी तेथें तें कबुतर त्याच्याकडे पहातच होतें. आतां काय करावें ? विशेष विचार करतां त्याच्या लक्षांत आलें कीं, ' कोणी ' पहात नाहीं अशा ठिकाणीं जावयाचें आहे, या कोणी मध्यें मी स्वतःही आलोंच. यानें आपले डोळे झांकले तरीदेखील काम भागेना. डोळे मिटले पण कल्पना कशी मिटावी ? ती तर एकसारखी दया मागणाऱ्या या कबुतराला पाहूंच लागली. कल्पनेच्या डोळ्यानें कबुतराचे दीन डोळे पाहिले आणि कल्पना कांहीं केल्या थांबेना. शेवटीं लाचार होऊन शिष्य गुरूकडे आला आणि म्हणाला मी या प्राण्याला मारूं शकत नाहीं. कारण कोणी पहात नाहीं असें स्थानच मला सांपडत नाहीं. गुरूला संतोष झाला. कारण ईश्वर सर्वत्र आहे – आत्मा सर्वगामी आहे हेंच त्याला शिष्याच्या मनावर ठसवावयाचें होतें.

दृष्टिदोष लागूं नये म्हणून नैवेद्य झांकून ठेवतात. वाटेल त्याची नजर मूर्तीवर पडूं नये म्हणून मंदिराचे दरवाजे बंद करतात – देवासमोर पडदे ताणतात. पण त्याला कोणी पाहूं शकणार नाहीं अशी खोली एखाद्या तरी घरांत सांपडणें शक्य आहे काय ? देव जर म्हणेल माझी एकान्तांत पूजा करा तर त्याला स्पष्ट सांगावें लागेल कीं तें अशक्य आहे. देवबापा, सगळ्यांच्या समोर, सगळ्यांच्या मध्यें बसून किंवा राहून पूजा घेण्याची तयारी असेल तरच मला तुझी सेवा घडणार.

ईश्वर जसा सर्वव्यापी आहे तसाच मीही अकिंचन आहें. त्याची सेवा करण्याची साधनें मीं कोठून आणावीं, त्याला अर्पण करावें असें मजजवळ आहे तरी काय ? या जगांत जें कांहीं आहे तें त्याचेंच आहे. मीं उचलून त्याला द्यावें असें मजजवळ कांहींच नाहीं.

अथवा नाहीं तरी कसें म्हणावें ? माझें हृदय, माझें प्रेम, माझी भक्ति या गोष्टी भगवंतानें माझ्याकडे राहूं दिल्या आहेत, "या माझ्या आहेत," असें म्हणण्याची सोय त्यानें ठेवली आहे, त्याचा फायदा घेऊन तें हृदयच त्याला अर्पण करावें. प्रेमभक्तिच त्याच्या चरणीं वहावी. मी जरी असहाय-असमर्थ असलों तरी माझें प्रेम मात्र असमर्थ नाहीं. माझ्या हातांत कांहीं नसलें तरी प्रेम स्वतःमधूनच एक मुरली तयार करील. माझें प्रेम माझ्या हृदयांत बहरलें म्हणजे माझ्या जीवन-काननांत सर्व प्रकारचीं फुलें फुलूं लागतील. मग मला कमी तें काय ? मी माझी बांसरी घेऊन अनेक स्तोत्रें रचीन, भगवंताला अनेक गाणीं गाईन* आणि त्या त्या क्षणीं ज्या ज्या रंगारूपाचीं आणि वासाचीं भक्ति-कुसुमें तयार होतील तीं तीं त्याला वाहून त्याची पूजा बांधेन.

[1]सबा हते राखब तोमाय।
आडाल क'रे
[2]हेन पूजार घर कोथा पाबि
आमार घरे।

जदि आमार दिने राते
जदि आमार सबार साथे
दया क'रे दाओ धरा तो
राखब धरे।

---

*ही वाक्यरचना हिन्दी क्रिस्ति गायनांतील होय.

१ सबा हते – सगळ्यांपासून. २ हेन – अशाप्रकारचें.

मान दिब जे तेमन मानी
नाञि तो आमि,
पूजा करि से आयोजन
नाञि तो, स्वामी।

जदि तोमाय भालोबासि
आपनि बेजे उठबे बाँशि,
आपनि फुटे उठबे कुसुम
कानन भ'रे।

" सगळ्यांपासून तुला निराळे करून ठेवावें असें पूजेचें देवघर माझ्या घरांत आहेच कोठें ? म्हणून हे कृपावंता, जर तूं आमच्या सर्वांच्या मध्यें, सर्वांच्या बरोबर, आमच्याच दिवशीं आणि रात्रीं, स्वतःला धरूं देशील-पाहूं देशील, चारचौघांत तुझी पूजा करूं देशील तरच तसें करणें शक्य आहे. ( हृदय निर्दोष-निर्गुण करून तेथें तुझी स्थापना करावी असें मनानें घेतलें तरी तें मला साधणार नाहीं. गरिबांच्या घरांत अडगळ ही असावयाचीच. श्रीमंतांनीं कृपावंत होऊन अशा अडगळींतच पाहुणचार घेण्याची तयारी दाखविली पाहिजे. त्याचप्रमाणें भक्ताच्या हृदयांत ज्या कांहीं सुंदर किंवा मलिन, स्वच्छ किंवा अस्वच्छ कल्पना भरल्या असतील त्या त्याला हृदयांतून काढतां न आल्या तर त्यांचें वाईट न मानतां त्यांतच स्वतः येऊन बसण्याची भगवंतानें कृपा केली पाहिजे.

हृदयशुद्धिवांचून पूजाच होणार नाहीं असें म्हटलें तर किती लोकांना पूजा करणें शक्य होइल ? )

तुझा बहुमान करावा तर मी तितका सन्मान्य आहेच कोठें ? तुझी पूजा करावी तर हे विश्वस्वामी, पूजेचें साहित्य माझ्याजवळ आहेच कोठें ?

तरीही मी कांहीं अगदींच असहाय नाहीं. जर मीं तुझ्यावर मनापासून प्रेम केलें तर त्या प्रेमाच्या सामर्थ्यानें आपोआपच बांसरी वाजूं लागेल आणि माझें सबधं जीवन-कानन फुलांनीं फुलून निघेल-जीवन-कानन भरून फुलें जिकडे तिकडे फुलूं लागतील."

# ३३

जराशी उष्णता लागतांच मेणाचे पुतळे वितळूं लागतात. जराशी आंच लागतांच शेणाचे पुतळे जळूं लागतात आणि मग फक्त राखच मागें उरते. पण जातिवंत मातीचे पुतळे बनविले असले तर जेथें लोखंडही वितळावें अशा भट्टीमध्यें ते वज्रासारखे कठिण होतात आणि मण्याप्रमाणें चमकूं लागतात! उष्णता, ताप आणि पीडा सहन करण्याची शक्ति असली तरच मातीमधून वज्र बनण्याची पात्रता येते. म्हणूनच ईश्वराच्या सान्निध्याची; सारूप्याची आणि सायुज्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा भक्त भगवंताजवळ आराम मागत नसतो. सुखाचें नाजुक जीवन त्याला प्रिय नसतें. तो भगवंताजवळ मागतो, "भगवंता, मला ताप दे, पीडा दे, वेदना दे" आणि हें सर्व आनंदानें सहन करून साधना म्हणून स्वीकार करण्याची शक्ति दे, असेंच तो मागत असतो. आपण मातीच आहोंत हें खरें; पण आपणास नुसती मातीच राहावयाचें नाहीं हेंही तितकेंच खरें. मातीमधें 'जीवन' मिसळावें, माती चांगली तिंबून निघावी, ठोकून आणि कोरून कोरून तिची मूर्ति व्हावी आणि शेवटीं ती भट्टींत पडावी; दीर्घकालपर्यंत धुमसत असणाऱ्या आणि प्रलयाग्नीप्रमाणें भडकणाऱ्या अग्नीमधें तावून सुलाखून निघावें म्हणजेच आपल्यामधें कडकपणा येईल, चकाकी येईल, हें त्या भक्ताला ठाऊक असतें.

भगवंताला तो कसें म्हणेल कीं मला भट्टींत घालूं नको? तो असेंच म्हणणार कीं भट्टीची आंच मीं आनंदानें सहन करावी अशी शक्ति मला दे.

आपण हिंवाळ्यांत ऊन खातों. उन्हाळ्यांत थंड पाण्याची आंघोळ करतों. त्या वेळीं जें सुख होतें तसेंच सुख भट्टींत पडलें असतां अनुभवतां यावें अशी चित्तविभूति आणि जीवनविभूति मला दे असेंच भक्त मागणार.

जीवनाचा साक्षात्कार करावयाचा असेल तर, हृदयांत प्राण भरून घ्यावयाचा असेल तर मृत्यूच्या दरवाज्यांतून पसार झालें पाहिजे. चिरशांति जर अनुभवावयाची असेल तर ती स्मशानांत मिळत नसून, प्रलयकाळच्या झंझावातांत आणि पर्जन्यवृष्टींत आणि सप्तचतुर्दशभुवनें यांचा लीलेनें नाश करणाऱ्या तांडवनृत्यांत अनुभवण्यास मिळते.

[1]वज्रे तोमार बाजे बाँशि,
से की सहज गान।
सेइ सुरेते जागब आमि
दाओ मोरे सेइ कान।
भूलब ना आर सहजेते,
सेइ प्राणे मन उठबे मेते
मृत्यु माझे ढाका आछे
जे अन्तहीन प्राण।

से झड़ जेन सेइ आनन्दे
चित्तबीणार तारे
सप्तसिन्धु दशदिगन्त
नाचाओ जे झंकारे।
आराम हते छिन्न क'रे
सेइ गभीरे लओ गो मोरे
आशान्तिर अन्तरे जेथाय
शान्ति सुमहान।

---

१ वज्रे– मेघगर्जनेंत.

"मेघाच्छादित आकाशांत विजा कडाडून जी गर्जना होते त्या गर्जनेंतच तुझी बांसरी वाजत असते. तें गान काय सामान्य आहे ? हे प्रभो, मला असे कान दे कीं ज्यांच्या योगानें तुझ्या त्या वज्रगर्जनेच्या सुरानें मीं जागृत व्हावें आणि तें गान मीं सहजासहजीं विसरू नये. मृत्यूमध्यें जो अन्तहीन प्राण लपला आहे तो प्राण त्या गानाबरोबर जागृत होऊन त्याच्या योगानें माझें मन उन्मत्त होऊन उठणार आहे, हें मीं विसरूं नये.

तुझी ती वज्रगानाची झड सुरूं झाली म्हणजे त्याच्या ज्या झंकारानें सप्त-सिंधु आणि दशदिगन्त नाचूं लागतात ती झड माझ्या चित्तवीणेच्या तारेनें मीं आनंदानें सहन करावी—पचवावी यासाठीं मला माझ्या क्षुद्र आरामांतून तोडून काढून अशा गांभीर्यांत घेऊन जा कीं जिथें अशान्तीच्या कोलाहलांत सुमहान शांति नांदत असते."

# ३४

असें सांगतात कीं पूर्णता ही क्षितिजासारखी आहे. आज ज्या स्थितीला आपण पूर्णतेची स्थिति मानतों तीच स्थिति जेव्हां प्राप्त होते तेव्हां दिसून येते कीं पूर्णता अजून कितीतरी दूर आहे. मृगजळानें फसवून दूर दूर न्यावें आणि कसें फसविलें म्हणून मिस्किलपणें हंसावें त्याचप्रमाणें पूर्णता आपल्याला दूरवर खेंचून नेते, पण कधीं हातीं लागतच नाहीं. पूर्णता ही कधींही मिळालेली वस्तु बनत नाहीं. केव्हांही पहा, ती मिळवावयाचीच असते. जर पूर्णतेला विचारलें कीं तुझी वस्ती कुठें आहे, तर ती आकर्षकपणें हंसून म्हणेल, " अजून पुढेंच आहे. माझ्या जन्मभूमीचें—वसतिस्थानाचें—नांवच आहे : अजून पुढें. "

दुसऱ्या दृष्टीनें पहावें तर जगांत अपूर्ण असें—आंशिक असें कांहींच नाहीं. जें ज्या क्षणीं जसें आहे तसें तेवढ्यापुरतें पूर्णच असतें. एखाद्या फुलाची कळी पहावी. किती मोहक आणि परिपूर्ण असते ! एकदां एक पाकळी उगवली, मग दुसरी असें फुलाच्या बाबतींत होत नसतें. सगळ्याच पाकळ्या मुग्धपणें कळीमध्यें लपलेल्या असतात. क्रमाक्रमानें त्या उमलल्या तरी कोणत्याही क्षणीं फूल पूर्णच असतें.

एखाद्या बालकाचें जीवन पहा. तेंही त्या क्षणीं पूर्ण असतें—सारपूर्ण असतें. बाल्यकाळ जितका साधनरूप आहे तितकाच साध्यरूपही आहे. श्रीकृष्णाचा बाल्यकाल, त्याच्या

विविध बाल्लीलांचा विस्तार यालाच कृष्णाचा पूर्णावतार म्हणतात. प्रौढ वय जितकें पारमार्थिक असतें तितकाच बाल्यकालही पारमार्थिक purposeful असतो.

मनुष्य जेव्हां पहातो तेव्हां त्याला आपल्या जीवनांतील अपूर्णता ध्यानांत येऊन आपण पूर्ण केव्हां होऊं अशी तळमळ लागलेली दिसते. परीक्षेचा दिवस उगवला पण परीक्षेची तयारी मात्र झाली नाहीं अशा तऱ्हेची तळमळ मनुष्याला जन्मभर असते. मग शेवटीं तो निकरावर येऊन म्हणतो, नशिबांत जें असेल तें होवो. जेवढी तयारी झाली आहे तीच घेऊन परीक्षेला बसणार हें निश्चित. आजपर्यन्त झाली तीच तयारी. पूजाकालापर्यन्त जी कांहीं साधनसामुग्री एकत्र झाली तीच खरी. तीच घेऊन पूजा केली पाहिजे. पूजेचा मुहूर्त टाळतांच येत नाहीं.

सभा जखन भांगबे तखन
शेषेर गान कि जाब गेये।
[1]हयतो तखन [2]कण्ठहारा।
मुखेर पाने [3]रब चेये।

अखनो जे सुर लागे नि,
बाजबे कि आर सेअि रागिणी—
प्रेमेर व्यथा सोनार ताने
सन्ध्यागगन फेलबे छेये ?

अेतदिन जे सेधेछि सुर
दिने राते आपन-मने
भाग्ये जदि सेअि साधना
समाप्त हय अेअि जीवने —

---

१ हयतो–कदाचित्. २ कण्ठहारा–गळा रुद्ध होऊन. ३ रब–(मी) राहीन.

अे जनमेर पूर्ण वाणी
मानसबनेर पद्मखानि
भासाब शेष सागरपाने
विश्वगानेर धारा बेये ।

"राजसभा जेव्हां बरखास्त होईल तेव्हां कवि या नात्यानें शेवटचें गाणें मला गायिलें पाहिजे. पण तें माझ्या कडून गायिलें जाईल कीं नाहीं ? कदाचित् माझा कंठ रुद्ध होऊन मी राजाधिराजाच्या तोंडाकडे पहातच राहीन. आतां जो सुर लागत नाहीं तो त्यावेळीं रागिणी गाऊन दाखवील काय ? भक्तिप्रेमाची हृदयांतील व्यथा दरबाराच्या शेवटीं संध्याकाळच्या आकाशांत सोनेरी मधुर तान सोडूं शकेल काय ?

किंवा आजवर दिवसरात्र मेहनत करून जो कांहीं सुर मीं साधला तेवढ्यांतच जर भाग्यवशात् माझी साधना समाप्त होणार असेल, तर या जीवनांत जी कांहीं वाणी परिपक्व झाली असेल तिलाच, मानसवनांतील पद्माप्रमाणें विश्वगानाच्या प्रवाहामध्यें वहात सोडून सागराकडे मला पोंचवावी लागणार आहे.

नशिबांत काय आहे तें कळत नाहीं, पण नशिबांत नसलेलें जीवनांत आणावयाचें कोठून ?"

# ३५

क्लोरोफॉर्मचे दिवस नव्हते तेव्हां शस्त्रवैद्याला विचार करावा लागे कीं रोगी शस्त्रक्रियेची वेदना कितपत सहन करूं शकेल. शस्त्रवैद्य क्रिया चालवीत आहे आणि रोगी किंकाळ्या फोडीत आहे हें दृश्य शस्त्रवैद्याची देखील हिम्मत तोडण्यास पुरेसें असे. त्यामुळें केव्हां केव्हां त्याला 'झालें तेवढें सध्या पुरें आहे. रोगाचें बीज उरलें असेल आणि पुढें डोकें वर काढील तर पहातां येईल, आज येथेंच कसें बसें आटपावें.' असें ठरवावें लागे.

पण जर रोगी तसाच हिम्मतवान असला तर तो वैद्याला म्हणेल, 'अहो डॉक्टर, माझ्या किंकाळ्यांकडे लक्ष देऊं नका. आतां माझी थोडीशी दया कराल तर मला रोगीच रहावें लागेल आणि पुनः केव्हांतरी इतकीच किंवा याहून अधिक वेदना सहन करावी लागेल. त्यापेक्षां आजच सोक्षमोक्ष झालेला पत्करला. निर्दय होऊन सर्व कुजकें रक्त पिळून काढा. खूप खोलवर काप घालून सबंध जखम उघडी करा. रोगाचें बीज म्हणून राहूं देऊं नका. मी सर्व कांहीं सहन करीन. पण मागें कसलीच बाकी ठेवूं नका. मला पूर्णपणें बरे करा. तुमची सर्व कला वापरून बरा करा, पूर्ण बरा करा.'

भक्त जर कच्चा नसला तर तोही भगवंताला असेंच आळवील आणि म्हणेल, 'माझी वेदना हीच माझी यावज्जीव चालविलेली साधना आहे. ती अपुरी काय म्हणून

रहावी? मला दुर्बळ, कृपण समजून–कृपापात्र ठरवून– भगवंतांनीं अनाठायीं दया काय म्हणून करावी? या साधनेचा अग्नि भडकून उठो आणि माझ्या सर्व वासनांची एकदांची राखरांगोळी होवो. माझी तंद्रा, माझी गफलत, माझी दुर्बळता सर्व कांहीं दूर होवो. आणि एका तीव्र वेदनेच्या वेगासरशीं माझा भवरोग दूर होवो. आणि मी भगवत्प्रसादाच्या योग्य–पूर्णयोग्य–एकदमच होऊन जावो. यासाठीं जो कांहीं ताप सहन करावा लागेल तो आजच मी सहन करूं इच्छित आहें. देवा, मला हळूहळू उठवूं नकोस. तुझी हांक कानीं पडली न पडली असें होऊन मीं पुनः निद्रेंत गुरफटून जावें हें मला नको आहे. अशी जोरानें हांक मार कीं माझे पंचप्राण खडबडून जागे व्हावेत. निद्रा दूर पळून जावी. गर्व आणि अभिमान यांचा चक्काचूर व्हावा आणि मीं जें उठावें तें सरळ तुझे पायच गांठावेत. मला आतां खितपत पडणें नको.'

चिरजनमेर बेदना,
ओहे चिरजीवनेर साधना,
तोमार आगुन उठुक हे ज्वले,
कृपा करियो ना दुर्बल ब'ले,
जत ताप पाअि सहिबारे चाअि—
[1]पुड़े [2]होक [3]छाअि बासना।
अमोघ जे डाक सेअि डाक दाओ,
आर देरि केन [4]मिछे।
जा आछे बाँधन बक्ष जड़ाये।
[5]छिंडे पड़े जाक पिछे।
गरजि गरजि शंख तोमार
बाजिया बाजिया उठुक अेबार,
गर्व टुटिया निद्रा छुटिया
जागुक तीव्र चेतना।

१ पुडे–जळून. २ होक–होवो. ३ छाअि–राख, भस्म. ४ मिछे–व्यर्थ. ५ छिंडे–गळून.

“ हे माझ्या चिरजन्माच्या वेदने, अगे, चिरजीवनाच्या साधने, तुझ्या अग्नीची ज्वाळा चांगली भडकूं दे. मला दुर्बळ समजून – कृपापात्र ठरवून मजवर भलतीच दया करूं नकोस. जो कांहीं ताप येऊन पडेल तो सहन करण्याची माझी इच्छा आहे. पण माझी वासना एकदां जळून राख होवो.

आतां उगीच उशीर कां करतेस ? जी हांक अमोघ असेल, मला खडबडून जागें करील, तीच हांक दे आणि त्यासरशीं माझ्या हृदयाला जें कांहीं बंधन चिकटून राहिलें आहे तें एकदम तुटून मागें पडूं दे. यावेळीं तुझा शंख पुनः पुनः सर्व बाजूंनीं गर्जूं दे. त्याचा असा कांहीं प्रचंड घोष होऊं दे कीं, माझा गर्व आणि अभिमान तुटून जावेत, निद्रा उडून जावी आणि तीव्र चेतना एकदम जागृत व्हावी.

मला याच क्षणीं माझ्या साधनेची परमावधि करावयाची आहे–पूर्णाहुति द्यावयाची आहे. आतां फुकटचे लाड नकोत. हो कठोर आणि कर माझा एकदाच खराखुरा आणि पुरापुरा उद्धार.”

# ३६

चार मुसाफिर दूर देशाहून येऊन सम्राटाच्या राजधानींत पोहोंचले. त्यांना राजदरबारांत प्रवेश हवा होता. चारांपैकीं एक होता अद्‌वितीय धनुर्धर. त्यानें आपलें बाणकौशल्य दाखवून दरबारांत आणि सैन्यांत प्रवेश मिळविला.

दुसरा होता कवि. त्यानें वेंचीव शब्दांत कल्पनेचे कारंजे उडवून दाखविले आणि राजदरबारांत त्याला मानाचें आणि प्रेमाचें स्थान मिळालें.

तिसरा होता पंडित आणि मुत्सद्दी. त्यानें आपल्या पांडित्याच्या जोरावर मंत्रिमंडळावर प्रथम छाप पाडली आणि हळूहळू आपल्या मुत्सद्दीगिरीच्या जोरावर मंत्रिमंडळांत स्थान पटकावलें.

चौथ्याजवळ असला कसलाच गुण नव्हता. पण तो घरचा होता मोठा श्रीमंत. त्यानें दरबारी लोकांना उंची उंची नजराणे देऊन आपली प्रतिष्ठा वाढविली आणि शेवटीं बहुमोल रत्नें घेऊन तो सम्राटासमोर हजर झाला आणि त्याच्या गळ्यांतील ताईत बनला.

( ज्याच्याजवळ जें वैभव असेल त्याच्या जोरावरच तो पुढें येणार. )

ईश्वरप्राप्तीच्या बाबतींत देखील असेंच आहे. तपस्वी देहदंडन करून भगवत्कृपा मिळवितो. कर्मयोगी आपल्या जागरूक कर्तव्यनिष्ठेनें आणि उदार पराक्रमानें ईश्वराची

पूजा करतो. ज्ञानी आत्मानात्मविवेक करून अन्वय-व्यतिरेकाच्या जोरावर ईश्वरतत्त्वाचें आकलन करून घेतो. आणि कवि गायक आपल्या हृदयांतील सर्वोच्च भावना संगीताच्या आलापांच्या द्वारा व्यक्त करून स्वतःच्या काव्यगायनांत तल्लीन होऊन ईश्वराला आपलेसें करतो. तो भगवंताला म्हणतो--

" प्रेमळगीत तुम्हांला हरि, हरिणापरिस बहुत वश करितें "

आणि असा गायक-कवि-भक्त आपल्या गायनाच्या जोरावर भगवंताशीं सहज सलगीही करूं शकतो. एखादा शूर योद्धा, त्रिखंडपंडित किंवा धुरंधर राजकारणी पुरुष जेव्हां घरीं आपल्या पत्नीशीं प्रेमळपणानें गोष्टी करूं लागतो तेव्हां पत्नीला ठाऊक असतें कीं आपल्या नवऱ्याच्या भव्यतेपुढें स्वतःची कस्पटाइतकीही किंमत नाहीं ! पण ती त्याच्यावर अनन्य निष्ठा ठेवून असते. या निष्ठेनेंच ती मोठी होते. आणि निष्ठेचा भुकेला पति आपली सर्व महत्ता भुलून जाऊन आपल्या प्रियेची आराधना करूं लागतो, आणि तीही प्रेमाच्या मस्तीमध्यें येऊन पतीशीं बरोबरीच्या नात्यानें सलगीची भाषा बोलूं लागते. पतीनें जवळ केल्यानंतर तिच्या थोरवींत कोणती उणीव असणार ?

भक्त देखील भगवंताशीं अशीच सलगी करतो — आणि मग पस्तावून म्हणतो—

" मया प्रमादात् प्रणयेन वापि सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं । हे कृष्ण ! हे यादव ! हे सखेति ! तत् क्षामये त्वां । "

रविबाबू गातात —

तुमि जखन गान गाहिते बल
        गर्व आमार भरे ओठे [1]बुके;
[2]दुअि आँखि [3]मोर करे [4]छलछल
        [5]निमेषहारा चेये तोमार मुखे ।
कठिण कटु जा आछे मोर प्राणे
गलिते चाय अमृतमय गाने,
सब साधना आराधना मम
        उडिते चाय पाखिर मतो सुखे ।

---

१ बुके-हृदयांत. २ दुअि आँखि-दोन डोळे. ३ मोर-माझे. ४ छलछल करे-डबडबतात. ५ निमेषहारा-टक लावून.

तृप्त तुमि आमार गीतरागे,
भालो लागे तोमार भालो लागे,
जानि आमि अेअि गानेरअि बले
बसि गिये तोमारि सन्मुखे

मन दिये जार [1]नागाल नाहि पाअि
गान दिये सेअि चरण [2]छुंये जाअि,
सुरेर घोरे आपनाके जाअि भुले,
बंधु ब'ले [3]डाकि मोर प्रभुके ।

"तूं जेव्हां मला गाण्याची आज्ञा करतोस तेव्हां मी गर्वानें फुलून जातों. माझे डोळे पाण्यानें डबडब भरून येतात, आणि मी अनिमेष लोचनानें तुझ्या मुखारविंदाकडे पहातच रहातों.

माझ्या जीवनांत जें कांहीं कटू, वांकडें किंवा बेसूर असेल तें सर्व अमृतमय गायनामध्यें वितळून जातें आणि तें गायनच माझी साधना आणि आराधना होऊन एखाद्या पक्ष्याप्रमाणें झेंप घालून तुझ्या चरणीं पोंचण्याचा प्रयत्न करतें.

तुला माझें गाणें आवडतें. तुला माझ्या गाण्यानें संतोष होतो. या माझ्या गायनाच्या जोरावरच मला तुझ्या दर्शनाचा लाभ होतो, आणि तुझ्या समोर बसण्याचा अधिकार मला मिळतो.

ध्यान चिंतन करून ज्या तुझा ठाव मला सांपडला नसता त्या तुझ्या चरणांचा स्पर्श मला माझ्या गायनाच्या जोरावर घडतो. गाऊं लागलों म्हणजे मी उन्मत्त होऊन स्वतःला विसरतों आणि माझ्या प्रभूला "सख्या" म्हणून संबोधितों. तूं जेव्हां मला गा म्हणून म्हणतोस तेव्हां माझें हृदय अभिमानानें कसें फुलून जातें!"

---

१ नागाल–ठावठिकाणा. २ छुंये–शिवूं. ३ डाकि–बोलावतों.

टीप सुरेर घोरे आपनाके जाअि भूले
बंधु बले डाकि मोर प्रभुके ।

राजाच्या पदरीं एक वृद्ध नोकर होता. राजाच्या लहानपणापासून तो त्याला न्हाऊं घालीत असे आणि आंघोळ घालतां घालतां, ‘ बाळ नीट बस. अशी घाई करूं नकोस. चांगली मालिश केली तर प्रकृति उत्तम होईल, रक्त वाढेल. ’ वगैरे उपदेशाच्या चार गोष्टीही प्रेमानें सांगत असे. राजपुत्र पुढें मोठा झाला. राज्यकारभार त्याच्या हातीं आला. मोठे मोठे दिग्विजय करून त्यानें राज्याचा विस्तार केला. प्रजा भय आणि आदरानें त्याच्याकडे पाहूं लागली. हा नोकरही राजाला आतां महाराज म्हणूनच संबोधत असतो. त्याच्यापुढें हात जोडून उभा असतो. पण राजा जेव्हां पुष्कळ दिवसांच्या प्रवासानंतर घरीं परत येतो आणि या नोकराला बोलावून म्हणतो, “ अरे, पुष्कळ दिवस झाले. तुझ्या हातची आंघोळ मिळाली नाहीं. इतर लोक आंघोळ घालतात पण तें बरें वाटत नाहीं. कसेसेंच वाटतें. आज तुझ्या हातची आंघोळ मिळाली म्हणजे बरें वाटेल. शीणभाग जाईल. आज तूंच सर्व तयारी कर. आणि मला एका मनानें न्हाऊं घाल. आज आंघोळी-मध्यें दुसरा कसलाच व्यत्यय येऊं द्यावयाचा नाहीं. ” राजाचे हे शब्द ऐकले म्हणजे त्या वृद्ध नोकराच्या क्षीण शरीरावर देखील मूठभर मांस चढतें. त्याला आपल्या सेवेची कृतार्थता वाटते. आपल्या परिचर्या-कुशलतेविषयीं अभिमानही वाटतो आणि मग आंघोळ सुरू झाली म्हणजे सेव्यसेवक नातें विसरून प्रेमानें म्हणूं लागतो – “बाळ, जरा शांत होऊन बस ना. तुला अशी काय घाई लागली आहे. राज्याचा कारभार रोजचा आहे. आज मला तुला मनासारखें न्हावूं घालूं दे. तुझ्यामागें कामें लावणारे पुष्कळ आहेत. पण तुझ्या थकल्या भागल्या शरीराला आराम देण्याची आणि ताजेतवानें करण्याची काळजी वाहणारा माझ्यावांचून तुला आतां कोण उरला आहे ? ”

आणि राजाही त्या एकनिष्ठ सेवकाच्या भक्तीचें आणि अभिमानाचें कौतुक करून तितक्याच लडिवाळपणानें म्हणतों, ‘ पहा, म्हणूनच तर मी कसा शहाणा होऊन चुपचाप बसलों आहें. माझीं कितीतरी कामें अडून राहिलीं आहेत. पण मीं कुणाला तरी येथें बोलविलें आहे काय ? तूं सांगशील तेव्हांच स्नानागारांतून बाहेर पडेन. तोंपर्यन्त अगदीं तुझ्या हातांत आहे. जशी आंघोळ घालावयाची असेल तशी घाल. किती बरें वाटतें मला ! दुसऱ्यांना नाहीं साधत अशी अंघोळ घालणें. आतां तूं वृद्ध झालास. तुझी ही कला

कुणाला शिकवून तरी ठेव. नाहीं तर चांगली आंघोळ हवी असेल तेव्हां तुझ्या मागोमाग मलाही स्वर्गाला यावें लागावयाचें!' नोकराला हे शब्द ऐकून किती आनंद होत असे. पण तो रागानें म्हणत असे, "असं काय भलतंच बोलतोस बाळ, कोणी ऐकिलें तर ते मला काय म्हणतील?"

गायकाचा मोठेपणा फक्त त्याच्या गाण्यांत. प्रभूच्या दरबारीं गुणी पुष्कळ आहेत आणि प्रभु तर त्या सर्व गुणीजनांची कदर करणारा गुणसागर आहे. त्यांच्यापुढें गायकाला आपण अगदीं कःपदार्थ आहोंत याची जाणीव असते. पण प्रभूनें गावयास सांगितलें म्हणजे सर्व रंग पालटतो. प्रभूला हवें तसें आपल्याला गातां येतें, आपलें गाणें त्याला मनापासून आवडतें, एक्तरी अशी विभूति आपल्याजवळ आहे कीं ज्याच्यामुळें प्रभूला आपण हवेसे वाटतों, प्रभु आपल्याला आपणहून बोलावतो, या प्रसन्नतेनें आणि अभिमानानें गायकाचें हृदय कसें फुलून उठतें! तो पूर्णपणें संगीतमय होऊन जातो. त्यावेळीं संगिताशीं विसंवादी असें त्याच्यांत कांहींच रहात नाहीं. जें कांहीं त्याच्यामध्यें कठोर किंवा कठिण असेल, वक्र किंवा खरखरीत असेल तें सर्व विरघळून जातें आणि गायक अमृतमय गानाशीं एकरूप होऊन जातो आणि त्याला वाटूं लागतें कीं मी जरी तुच्छ असलों तरी गायनाशीं एकरूप झाल्यानंतर प्रभूची एक भूक निवविण्याचें सामर्थ्य माझ्यामध्यें आहे. प्रभूच्या निकट जाण्याचा मला अधिकार आहे, याची जाणीव होते आणि संगिताशीं एकरूप झाल्यानंतर संगीताच्या सुरांच्या नादानें स्वतःला विसरून जाऊन तो आपल्या प्रभूला सख्या म्हणून संबोधूं लागतो.

आणि जेव्हां ही लय उतरते, गाण्याची मस्ती ओसरते तेव्हां तो कृतज्ञतेनें आपल्या गायन विद्येचेच आभार मानूं लागतो कीं ती आहे म्हणूनच असल्या महान लोकेश्वर प्रभूचें दर्शन घडतें. इतकेंच नव्हे तर त्याच्या सानिध्यांत रहावयास मिळतें. धन्य आहे माझी गायनकला! तिचे मजवर अनंत उपकार आहेत. तिनेंच मला कृतार्थ केलें आहे. तीच माझें सर्वस्व आहे.

# ३७

मनाला हुरहुर लागण्याला, हृदय कासावीस होण्याला अनेक कारणें होतात. त्यांत ईश्वरप्राप्तीसाठीं तळमळ असणें हा एक भाग्याचा प्रसंग आहे. मन तळमळत असावें आणि भगवंताची स्वारी जवळपास आलेली असावी. मग काय विचारतां ? हृदय उचंबळून येऊन तऱ्हेतऱ्हेच्या गायनानें भगवंताला घेरूनच टाकावयाचें.

पण असें होण्याला दोन योग साधावे लागतात. आपल्या मनांत उत्कंठा असली पाहिजे आणि त्याचवेळीं जवळपास भगवंताची फेरी असली पाहिजे. आपण होऊन त्याच्या चरणीं घालून घेणें हें आपल्याला साधत नाहीं. आपण धुळींत डोकें खुपसून पडून असतों. पण तेवढ्यानें काय होणार ? तेवढ्यानें कांहीं आपल्यामध्यें स्वतःचा उद्धार करून घेण्याची शक्ति येत नसते. केवळ साधना बस नाहीं. साधनेबरोबर भगवत्कृपाही असली पाहिजे. 'यमेवैष वृणुते तेन लभ्यः।' या आत्म्याच्या मनांत जो कोणी भरेल, ज्याला तो पसंत करील त्यालाच या आत्म्याची प्राप्ति होणार. नुसती साधना करून भागत नसते. (साधना करील त्याला आत्मप्राप्ति होईलच असें नाहीं. पण जो साधना करणार नाहीं त्याच्यावर मात्र हा आत्मा कधींच तुष्ट होत नाहीं.)

जर भगवान स्वतः जवळ येऊन हात धरून उठ असें सांगेल तर मात्र सगळी साधना ताबडतोब फळास येईल आणि आपल्या प्राणाची असीम दरिद्रता त्याच क्षणीं

नष्ट होऊन जाईल. आत्मशक्ति आणि ईश्वरकृपा यांच्या जोडीनेंच मनुष्याचा उद्धार होत असतो.

एअि ज्योत्स्नाराते जागे आमार प्राण;
पाशे तोमार हबे कि आज स्थान।
देखते पाब अपूर्व सेअि मुख,
रअिबे [1]चेये हृदय उत्सुक,
बारे बारे चरण घिरे घिरे
फिरबे आमार अश्रुभरा गान?

साहस करे तोमार पदमूले
आपनारे आज धरि नाअि जे तुले,
पड़े आछि माटिते मुख रेखे
फिरिये पाछे दाओ अे आमार दान।

आपनि जदि आमार हाते धरे
काछे असे उठते बल मोरे
तबे प्राणेर असीम दरिद्रता
अेअि निमेषेअि हबे अवसान।

"आजच्या ज्योत्स्नामय रात्रीं चंद्रिकेच्या उन्मादक प्रकाशामध्यें माझा प्राण उत्सुक होऊन उठला आहे. अशा वेळीं, हे प्रियकरा, तुझें स्थान माझ्याजवळ असेल का? तुझें तें अपूर्व वदन मला पाहतां येईल का? आणि तुला पाहून माझें उत्सुक हृदय पहातच राहील आणि माझें अश्रुपूर्ण करुण गायन तुझ्या चरणांच्या आसपास पुनः पुनः घिरट्या घालीत राहील असें होईल का?

मीं आपण होऊन मोठ्या साहसानें तुझ्या चरणमूलाजवळ घालून घ्यावें हें मला शक्य नाहीं. मी आपला मातीमध्यें आपलें तोंड खुपसून पडूनच आहें. आतां तूंच मजकडे वळून एवढें दान दिलेंस तर कांहींतरी आहे.

---

1 चेये—पहात.

तूं जर आपण होऊन जवळ येऊन माझा हात धरून मला उठावयास सांगशील तर मात्र माझ्या प्राणाची असीम दारिद्रता त्याच क्षणीं नष्ट होईल.

मी नुसता उत्सुक होऊन भागावयाचें नाहीं. तूं जर जवळ असलास तर माझ्या सर्व शक्तींना भरती येईल आणि माझें उन्मत्त गायन देखील तुझ्या चरणाभोंवतीं घिरट्या घालून करुणेच्या सुरानें तुला आपलेसें करील. तुझी कृपा हेंच माझें धन. दुसरें धन मजजवळ मुळींच नाहीं."

# ३८

स्वयंपाक करतात तो जेवण्यासाठीं. नेहमींच स्वयंपाक करीत बसावयाचें नसतें. यात्रा करतों ती मुक्कामावर पोंचण्यासाठीं. घर बांधतों तें आंत रहाण्यासाठीं. त्याचप्रमाणें कर्में करतों तीं भगवंताच्या प्राप्तीसाठीं. मुक्कामावर पोंचल्यानंतर किंवा भगवंताचें दर्शन झाल्यानंतर यात्रा पुढें चालविण्याचें प्रयोजनच उरत नाहीं. कर्में करावयाचीं तीं भगवंताच्या प्राप्तीसाठीं. कर्में फळास आलीं — भगवंताचें दर्शन झालें, परमात्म्याच्या चरणीं आपण लीन झालों म्हणजे संपलें. मग कर्में करावयाचींच उरत नाहींत. जिवा-शिवाची भेट घडली म्हणजे करावयाचें काय उरलें ? मग त्या अद्वैतानंदांत निमग्न रहावयाचेंच उरतें. मंदिर गांठलें म्हणजे जसें रथांतून उतरावयाचें असतें, त्याप्रमाणें अद्वैत साधलें म्हणजे कर्मांची कटकट सोडून द्यावयाची असते.

कर्मांचा सासुरवास यथाकाळीं संपणार आहे असें आश्वासन प्रारंभींच मिळालें होतें. म्हणून तर ही दगदग कबूल केली. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सगळा वेळ प्रवृत्तींत गेला. आतां निवृत्तीची वेळ नाहीं का आली ? अखंड जगत रहाणें कुणाला बरें आवडेल ? जीवनयात्रेला विराम हा पाहिजेच. जेव्हां रस्ता संपलेला नसतो आणि फक्त दिवस आणि शक्ति संपल्यामुळें थांबावयाचें असतें, तेव्हां दुसरे दिवशीं पुनः पुढें जाण्याचा संकल्प करून आपण निजतों. पण जेव्हां अखेरचा दिवस उगवतो आणि तीर्थस्थानाला त्याच

दिवशीं पोंचण्याची आशा उद्भवते तेव्हां चालणें एकदांचें संपणार या कल्पनेचेंच समाधान असतें.

कथा छिल अेक-तरीते केवल तुमि आमि
जाब अकारणे भेसे केवल भेसे ;
त्रिभुवने जानबे ना केउ आमरा तीर्थगामी
कोथाय जेतेछि कोन् देशे से कोन् देशे ।
कूलहारा सेअि समुद्र-माझखाने
[1]शोनाब गान अेकला तोमार काने,
[2]ढेउयेर मतन भाषा-बाँधन-हारा
आमार सेअि रागिणी शुनबे नीरब हेसे ।

आजो समय हय नि कि तार, काज कि आछे बाकि
ओगो अै-जे संध्या नामे सागरतीरे ।
मलिन आलोय पाखा [3]मेले सिन्धुपारेर पाखि
आपन कुलाय-माझे सबाअि अेल फिरे ।
कखन तुमि आसबे घाटेर 'परे
बाँधनटुकु केटे देबार तरे ।
अस्तरविर शेष आलोटिर मतो
तरी निशीथ-माझे जाबे निरुद्देशे ।

"पूर्वींच ठरलें होतें कीं तूं आणि मीं कधींतरी एकाच होडींत बसून कुठल्याही बंदराचा विचार न करतां फक्त वहात जाऊं. आणि त्रिभुवनांत कोणालाही याचा मागमूस नसावयाचा कीं आम्ही कोठेंतरी यात्रेला निघालों आहोंत. आपण होडींत बसून नदी मागें टाकून समुद्रांत प्रवेश करणार आहोंत, तेथें कुठला कांठ आणि कुठलें बंदर! सर्वत्र पाणीच पाणी आणि त्या पाण्यावर आपण दोघेच एका होडींत बसून वहात आहोंत आणि लाटा जशा बंधन-

१ शोनाब–ऐकवीन. २ ढेउयेर मतन–लाटांप्रमाणें. ३ मेले–उघडून.

रहित नृत्य करीत असतात त्याचप्रमाणें भाषेच्या बंधनांतून मुक्त असें माझें गायन मी फक्त तुलाच ऐकविणार. आणि तूं माझी ती रागिणी कांहींही न बोलतां फक्त स्मितपूर्वक ऐकत रहाशील.

"हे नाथ, असा तो समय अजून आला नाहीं का? अजूनही कामें करावयाचीं बाकी राहिलीं आहेत का? पहा, सागरतीरावर संध्या उतरली आहे आणि समुद्रांतील पक्षी सिन्धूच्या परतीराहून संध्याकाळच्या मंद प्रकाशांत उडत येऊन आपापल्या घरट्यांत शिरत आहेत. आतां तूं केव्हां येशील आणि या होडीची दोरी तोडून टाकून अस्ताचा सूर्य ज्याप्रमाणें आपले किरण रात्रीच्या अंधारांत बुडवून टाकतो त्याप्रमाणें आपली ही होडी विश्रांतीच्या रात्रींत केव्हां सोडून देशील?"

टीप :—जीवनाच्या अंतीं मरण येत असतें. पण मरण म्हणजे कांहीं अंतिम विश्राम नव्हे. जीवनाच्या अंतीं जर भगवद्दर्शन घडलें आणि जीवात्मा परमात्म्यांत विलीन झाला तरच खरा विश्राम मिळायचा. आणि मग गति आणि स्थिति, विहार आणि विश्राम असा भेदच उरायचा नाहीं.

# ३९

अंधाऱ्या रात्रीं जेव्हां पाऊस झोड उठवीत आहे, विजा कडाडत आहेत आणि आकाश व्याकुळ झालें आहे ; अशा वेळीं, हे प्रियकरा, मला झोपेंतून उठविलेंस आणि आतां तूं निघून कां जातोस ? असा मला सोडून जाऊं नकोस, करुणेच्या दृष्टिपातानें मजकडे पहा. झोंप होती तेव्हां ही बाहेरची स्थिति असून नसून सारखी होती. आतां जागृत झाल्यानंतर एकटें रहाणें कसें शक्य आहे ? तूं मला उठविलें नसतेंस तर गोष्ट निराळी. पण जागविल्यानंतर मला सोडून जाणें तुझ्यानें होईल तरी कसें ?

जीवनामध्यें तुफानें अनेकवेळां येतात. पण सुप्त आत्म्याला त्यांचें महत्त्व कळत नाहीं. हीं तुफानें म्हणजे आध्यात्मिक पेरणीचे दिवस. पण जेथें जागृतिच नाहीं तेथें अशी संधि मिळाली काय किंवा न मिळाली काय सारखेंच.

पण जेव्हां भगवंताची कृपा होते आणि जीवनामध्यें जागृति येते तेव्हां मात्र जीव एक देखील संधि वाया दवडण्याला तयार नसतो. मग जें तुफान येईल ते अंतर्यामीच्या प्राप्तीचें साधन बनलेंच पाहिजे. मग जीवात्म्याला परमात्मा-प्राप्तीची तळमळ लागल्यामुळें तो परोपरीनें परमात्म्याला आळवितो आणि सायुज्यतेसाठीं प्रार्थना करीत असतो—

आमारे जदि जागाले आजि, नाथ,
फिरो ना तबे फिरो ना, करो
करुण आँखिपात ।
निबिड बनशाखार 'परे
आषाढ-मेघे वृष्टि झरे,
बादलभरा आलसभरे
[1]घुमाये आछे रात ।
फिरो ना तुमि फिरो ना, करो
करुण आँखिपात ।

बिरामहीन बिजुलिघाते
निद्राहारा प्राण
बरषाजलधारार साथे
गाहिते चाहे गान ।
हृदय मोर चोखेर जले
बाहिर हल तिमिरतले
आकाश [2]खोंजे व्याकुल बले
[3]बाडाये दुअि हात ।
फिरो ना तुमि फिरो ना, करो
करुण आँखिपात ।

" हे नाथ, जर मला आज तूं उठविलेंस तर आतां पाठमोरा होऊं नकोस, करुणार्द्र हृदयानें मजकडे पहा.

मला टाकून जाऊं नकोस. ही पहा घनदाट अरण्यांतील झाडांच्या शाखेवरून आषाढ मेघांची वृष्टि चालू आहे. आणि रात्र ढगांनीं घेरल्यामुळें आळसावून

१ घुमाये–झोपलेली. २ खोंजे–शोधीत आहे. ३ बाडाये–पुढें करून.

झोंपीं जात आहे. इकडे माझा प्राण विद्युल्लतेच्या एकसारख्या प्रहारामुळें झोंप सोडून व्याकुळ झाला आहे आणि त्याला आतां पावसाच्या जलधारांच्या तालाबरोबर गावेंसें वाटत आहे. बाहेर पाऊस पडतो आहे आणि आंत माझें हृदय डोळ्यांतील अश्रुवर्षावाबरोबर अंधारामध्यें बाहेर फुटून येऊं पहात आहे. आणि हें पहा हें आकाश अत्यंत व्याकुळ होऊन दोन हात पसरून तुला शोधीत आहे, बोलावीत आहे. अशा वेळीं नाथ, पाठमोरा होऊं नकोस, करुणार्द्र दृष्टीनें मजकडे पहा. ”

# ४०

सर्वांची जीवन-विभूति सारखी-च नसते. कोणी ईश्वरी कार्य करण्यासाठीं मोठ्या दमामानें येतात. कोणी आपल्या वांट्याला आलेलें अगदीं लहानसें काम मोठ्या भक्तीनें करतात. कुणाच्या भाग्यांत अवतार बनून धर्मग्लानि हटविण्याचें महत्कार्य असतें तर दुसऱ्या कुणाच्या वांट्याला, रस्ता चुकून भटकणाऱ्या एखाद्याच जीवाला थोडेंसें आश्वासन देण्याचें येतें. नशिबांत भगवत्सेवा कमी असो अथवा अधिक, पण ती वेळेवर घडली म्हणजे जीवन कृतार्थ झालें. परिश्रमाचें फळ मिळो किंवा न मिळो पण ईश्वर-कार्यासाठीं हातून थोडे परिश्रम घडले, एवढें जरी झालें तरी तें अहोभाग्य म्हटलें पाहिजे. देव-कार्य करीत असतां थोडासा थक्वा आला तरी जणूं जीवन कृतार्थ झालें. महत्कार्य हातून घडल्याचा आनंद भले न मिळो, पण कांहींतरी सत्कार्य हातून घडलें एवढें समाधान मिळो म्हणजे बस. थोडी वंदनाच का होईना पण ती ईश्वराच्या हातून मिळाली आहे, हें समाधान कांहीं थोडेंथोडकें नव्हे. शिवाय ईश्वर तरी भावाचाच भुकेला नाहीं का ? त्यानें सुगंधानें दरवळून जाणारीं उद्यानांतील फुलें सोडून वनमाळाच गळ्यांत नाहीं कां धारण केली ? जी कांहीं माझी अल्पस्वल्प शक्ति असेल तिचा त्यानें स्वतःच्या सेवेसाठीं स्वीकार करावा एवढीच मनींची आस आहे. तेवढी तृप्त झाली म्हणजे जीवन कृतार्थ झालें.

पुष्कळदां आपल्याला वाटतें आणखी तयारी करावी, आणखी योग्यता वाढवावी. आणि मगच देवाची, देवभक्तांची किंवा जगाची सेवा करावी. पण हा भ्रम आहे. यौवन केव्हां संपून जाईल, कार्यशक्ति क्षीण करणारें वार्धक्य किंवा आजारीपण केव्हां घेरील हें सांगतां येत नाहीं. सेवेची संधि मिळाली तर ती सोडतां कामा नये. अजूनही दिवस पुष्कळ आहे अशा भ्रमांत आपण रहावें आणि एकाएकीं सांज पडावी अशासारखी गफलत होण्याचा बराच संभव असतो. म्हणून जी कांहीं आपली तयारी असेल तेवढीच घेऊन सेवेला हजर असलेलें चांगलें. पुष्कळ तयारी केली होती ती फुकट गेली असें होण्यापेक्षां जी कांहीं शक्ति होती तिचा भगवंतांनीं वेळींच स्वीकार केला हें समाधान कितीतरी श्रेष्ठ आहे. भगवंतानें जें स्वीकारलें तें संपूर्ण झालें—कृतार्थ झालें—याहून अधिक तें काय पाहिजे?

छिन्न क'रे लओ हे मोरे,
आर विलंब नय।
धुलाय पाछे झ'रे पडि
अेजि जागे मोर भय।
अे फुल तोमार मालार माझे
ठाँअि पावे कि जानि ना जे,
[1]तबु तोमार आघातटि तार
भाग्ये जेन रय।
छिन्न करो छिन्न करो,
आर विलंब नय।

कखन जे दिन [2]फुरिये जावे
आसबे आँधार क'रे,
कखन तोमार पूजार बेला
काटबे अगोचरे।

१ तबु—तरीहि. २ फुरिये—संपून.

जेटुकु अेर रङ धरेछे,
गंधे सुधाय [3]बुक भरेछे,
तोमार सेवाय लओ सेटुकु
थाकते सुसमय ।
छिन्न करो छिन्न करो,
आर विलंब नय ।

" भगवंता, हें माझें जीवनपुष्प तुझ्या सेवेसाठीं खुडून घे, आतां उशीर करण्याची सोय नाहीं. मला भीति वाटते कीं, जर तूं आतां उशीर केलास तर हें कोमेजून मातींत मिळून जाईल. या फुलाला तुझ्या कंठांतील मालेंत स्थान मिळेल कीं नाहीं याची मला शंकाच आहे. तरीही तुझ्या हातानें याला खुडून घेतलेंस तर तेवढ्यानेंच याचा गौरव होईल. तुझ्या हातानें तोडलेंस तर तुटण्याची वेदना तुझ्या हातून मिळाली यांतच या फुलाला स्वतःचें अहोभाग्य वाटेल. म्हणून याला आतां लागलीच खुडून घे. आतां मुळींच वेळ राहिला नाहीं.

दिवस पहातां पहातां संपून जाईल, सर्वत्र अंधार होईल. आणि तुझ्या पूजेची वेळ केव्हां टळून गेली हें मला समजणारही नाहीं.

या फुलानें जो कांहीं थोडासा रंग धरला असेल, जो कांहीं थोडासा सुगंध त्याच्या पोटांत असेल, त्याचा वेळ आहे तोंवरच तुझ्या सेवेसाठीं तूं स्वीकार कर आणि त्याला खुडून घे. आतां थांबण्याची मुळीं सोयच नाहीं."

३ बुक–हृदय.

# ४१

वेदान्ती लोक नेहमीं म्हणतात कीं, मनुष्य जेव्हां विषयसुखांत गुरफटतो तेव्हां देखील त्याला खरोखर अद्वैतानंदच हवा असतो. पण तो कोठें मिळवावा, तो कसा मिळूं शकेल या बाबतींत मात्र तो जागा चुकलेला असतो. त्याला अद्वैतानंद हवा असतो पण मिळवतो मात्र वासनेची भगभग.

हीच गोष्ट उलटवून सहज म्हणतां येईल कीं, मनुष्य जरी इन्द्रिय-तृप्तीच्या व्यापारांत पडला असला तरी त्याला हवा असतो भगवत्-प्राप्तीचाच आनंद. इंद्रियें क्षणभर तृप्त होतात आणि दुसऱ्याच क्षणाला अनुभवास आणून देतात कीं इन्द्रियसुख म्हणजे केवळ मृगजळ आहे; पोकळ तर आहेच. आणि त्याच्यामध्यें तृप्ति मिळण्याचे ऐवजीं विषादच पदरीं पडतो. शेवटीं मनुष्य म्हणतो कीं, ज्या सुखासाठीं मी धडपडत आहें तें कांहीं मला येथें मिळालें नाहीं.

मनुष्य जेव्हां आत्म्याला विसरून देहाचीच उपासना चालवितो आणि आत्म्याचा द्रोह करतो तेव्हां देखील चुकीच्या मार्गानें कां होईना त्याचा आत्मशोधच चालू असतो.

एक जुनी म्हण आहे–'तुझें माझें पटेना पण तुझ्यावांचून गमेना.' ईश्वराकडे जाण्याचा रस्ता आपल्याला नकोसा वाटतो पण हवा असतो ईश्वरच. जर आपल्यांत

एवढी जागृति आली कीं खरोखर आपल्याला ईश्वरच हवा आहे तर बाकी सर्व गोष्टी आपोआपच अनुकूल होतील आणि सरतेशेवटीं सगळे रस्ते सोडून आपण ईश्वराच्याच मार्गाला लागूं. जें ध्येय गांठावयाचें आहे त्याची विस्मृति न होवो म्हणजे झालें.

[१]चाअि गो आमि तोमारे चाअि,
तोमाय आमि चाअि—
अेअि कथाटि सदाअि मने
बलते जेन पाअि।
आर जा-किछु वासनाते
[२]घुरे बेड़ाअि दिने राते
मिथ्या से-सब मिथ्या, ओगो
तोमाय आमि चाअि।
रात्रि जेमन [३]लुकिये राखे
आलोर प्रार्थनाअि—
तेमनि गभीर मोहेर माझे
तोमाय आमि चाअि।
शान्तिरे [४]झड जखन हाने
शान्ति तबु चाय से प्राणे,
तेमनि तोमाय आघात करि
तबु तोमाय चाअि।

"मी तुलाच चाहतों, तूंच मला हवा आहेस. मला तळमळ लागली आहे ती तुझीच, एवढें भान मला असूं दे म्हणजे झालें.

---

१ चाअि-(मी) इच्छितों, चाहतों. २ घुरे बेडाअि-(मी) भटकत फिरतों. ३ लुकिये-लपवून. ४ झड-वादळ.

दिवसरात्र ज्या असंख्य वासनांच्या मागें मी धांवतों त्या सर्व मिथ्या आहेत – व्यर्थ आहेत – निष्फळ आहेत हें माझ्या ध्यानांत यावें आणि मी फक्त तुलाच चाहतों ही जागृति असावी म्हणजे झालें.

सर्वत्र अंधार पसरत असतांना देखील रात्रीच्या पोटांत ( हृदयांत ) प्रकाश-प्राप्तीची प्रार्थनाच लपलेली असते. त्याचप्रमाणें मी जरी महामोहांत सांपडलों असलों तरी शेवटीं मी तुलाच चाहत असतों. तुझीच मला तळमळ लागलेली असते. तुफानानें शान्तीवर कितीही हल्ले चढवले तरी त्याला शेवटीं मनांत शान्तीच हवी असते. त्याचप्रमाणें हे प्राणनाथ, मी जरी तुझा द्रोह केला, तुझ्या हृदयावर आघात केले तरी शेवटीं मला तूंच हवा आहेस. मी तुझ्याकडेच धांव घेत आहें. ”

टीप :—कुस्तीमध्यें ज्याप्रमाणें आपला प्रतिस्पर्धी आपल्याशीं कुस्ती लढत असतांना आपली शक्ति वाढवायला मदतच करतो, कायदेमंडळांत विरुद्धपक्ष अधिकारारूढ-पक्षाचा कसून विरोध करीत असूनदेखील राज्याला मजबूतच करतो त्याचप्रमाणें मनुष्याची ईश्वरविमुख प्रवृत्तिदेखील सरते शेवटीं त्याला ईश्वराचें महत्त्व पटवून देते – त्याला ईश्वराचें ध्यान लावते आणि त्या सर्वांचा परिणाम ईश्वराची गोडी लागण्यांतच होतो. ज्यांनीं ज्यांनीं म्हणून ईश्वराविरुद्ध बंड केलें त्यांनीं त्यांनीं खरें पाहातां ईश्वराचें राज्य मजबूतच केलें आहे. आणि शेवटीं स्वतःसाठीं ईश्वर प्राप्तीच करून घेतली आहे.

हीच गोष्ट भक्तांनीं निराळ्या रीतीनें मांडली आहे —

ये ये हताः चक्रधरेण राजन्<br>
त्रैलोक्यनाथेन जनार्दनेन<br>
ते ते गता विष्णुपुरिम् प्रयाताः<br>
क्रोधोऽपि देवस्य वरेण तुल्यः ।

देवाचा क्रोध देखील जर शेवटीं वरच ठरतो तर मनुष्याचा बंडखोरपणा शेवटीं भक्तीचाच एक प्रकार कां ठरू नये ?

टीप तेमनि तोमाय आघात करि
तबु तोमाय चाअि ।

मानसशास्त्रामध्यें विरोधाला विकृत प्रेम म्हटलें आहे. ज्याच्याशीं आपण नेहमीं भांडतों त्याचा सहवास आपल्याला हवाच असतो. तसें नसतें तर पहिली संधी मिळतांच वेगळे होण्याचा प्रयत्न केला असता. भक्तीच्या अनेक प्रकारांमध्यें विरोधभक्तीलाही स्थान आहे. या भक्तीमध्यें अखंड विरोधाचें ध्यान चालू असतें. यांतील विरोध कितीही खराखुरा असला तरी शेवटीं मुळाशीं भक्तीचीच भावना आहे हें विसरतां कामा नये. तसें नसतें तर त्याला भक्तीच्या गणनेमध्यें घेतलेंच नसतें. हीच गोष्ट एका अगदीं साध्या घरगुती म्हणीमध्यें व्यक्त झाली आहे– "तुझें माझें पटेना, तुझ्यावांचून गमेना." कधीं कधीं बापलेकांचें असेंच चालत असतें. दूर असले म्हणजे एकमेकांची पुष्कळ कदर करतील. पण एकत्र आले म्हणजे कांहींना कांहीं होऊन खटका उडालाच आहे. या खटक्यामध्यें देखील न जुळणारें पण उत्कटपणें असणारें प्रेमच व्यक्त होत असतें. कधीं कधीं पतिपत्नीमध्यें देखील असा रंग जन्मभर चाललेला असतो. समुद्रामध्यें किंवा आकाशामध्यें जेव्हां भयंकर वादळ उठतें, तुफान सोसाटतें तेव्हां शान्तीचा चुराडा होतो. पण हें कुणाला ठाऊक नाहीं कीं प्रत्येक तुफान, प्रत्येक वादळ स्थायी शान्ति स्थापन करण्यासाठींच माजलेलें असतें? जे लोक बंड करतात, क्रान्ति करतात, विप्लव माजवितात त्यांना देखील त्यांच्या मनासारखें झालें म्हणजे सुव्यवस्थित आणि सुरळीत चालणारें राज्यच स्थापावयाचें असतें. प्रत्येक क्रान्तीच्या शेवटीं शान्तिच स्थापन झाली आहे. क्रान्ति जितकी जोराची आणि दीर्घकालीन त्या मानानें शान्ति देखील समृद्ध आणि स्थायी झालेली आहे.

हाच न्याय पुढें करून भक्त भगवंताला म्हणतो कीं जेव्हां मी तुझी अधिकाधिक उपेक्षा करतों तेव्हां देखील आंतून तुझी उत्कट प्रतीक्षाच चालत असते. मी अनेक उच्चावच वासनांच्या मागें लागलेलों दिसेन. पण तें सर्व खोटें आहे. तें सर्व वरकरणी आहे. आंतून माझा सर्व प्रयत्न तुझ्या प्राप्तीसाठींच आहे. रुसलेला नवरा ज्याप्रमाणें घरच्या मांजराशीं बोलतो, भिंतीशीं बोलतो, गायी-म्हशींशीं बोलतो, एक बायकोला सोडून इतर सर्वांना उद्देशून बोलतो. पत्नीला ठाऊक असतें कीं हें सर्व मलाच उद्देशून आहे. त्याचप्रमाणें भक्ता-भगवंतामधील हा व्यवहार आहे, असें येथें कवीला म्हणावयाचें आहे.

अंधारानें सर्वत्र आपलें साम्राज्य पसरून प्रकाशाला देशोधडीस लावलें, या क्षितिजापासून त्या क्षितिजापर्यन्त कोठेंही प्रकाशाला उरूं म्हणून दिलें नाहीं, तरीही ताऱ्यांच्या रूपानें पापण्या हालवत आणि दंवाच्या रूपानें आंसवें गाळीत रात्र अरुणोदयाचीच वाट पहात जागत असते आणि जर ती विशेषच रुसली असली आणि आकाशांत ढगांची पासोडी पसरून जर तिनें तारेही मिटवून टाकले असले तरीही सकाळ होतांच त्या पासोडीला एखादें छिद्र पाडल्यावांचून तिच्यानें रहावत नाहीं आणि सबंध रात्र जरी तोंड दुर्मुखलें ठेऊन तिनें काढली असली तरीही सूर्योदय होण्याची वेळ होतांच खुदकन हंसून गाल लाल केल्यावांचून तिच्यानें रहावत नाहीं. कारण जरी तिनें कबूल केलें नाहीं तरी सर्व काळ तिची प्रार्थना प्रकाशासाठींच असते. म्हणून भगवंता, जरी मीं बंडखोरपणानें तुझा इनकार केला, तुझ्या आज्ञांचें उल्लंघन केलें आणि अशा रीतीनें पदोपदीं तुला दुखविलें तरीही सरतेशेवटीं मला तूंच हवा आहेस. मी तुझाच भक्त आहें आणि इतर कसलीही उपासना चालविली तरीही मी तुझा अनन्य भक्तच आहें, इकडेच तूं पहा. आणि माझा स्वीकार करून मला कृतार्थ कर. मीं मागितलेलें मला देऊं नकोस पण त्याच्या मुळाशीं हवा असलेला तूंच माझा हो.

# ४२

एखादी लहानशी सुबक वीणा किंवा सतार हातीं आली म्हणजे मोठा पट्टीचा वाजविणारा का असेना तिला भीतभीतच वाजविणार. कुठें जोर करावयास गेलों आणि तार तुटली, खुंटी मोडली, किंवा भोपळा तडकला तर सर्वनाशच व्हावयाचा. पण जर ती वीणा दिसायला कोमल असूनही दुर्बळ नसेल, लहानशा पण परिपक्व भोपळ्याची बनविलेली असेल आणि तिच्या तारा जर उत्तम धातूच्या असल्या तर ती वाजविणाऱ्याला उत्तेजन देत म्हणेल, 'गड्या, भिऊं नकोस, मला सर्व प्रकारचे आघात सहन होतील. माझा बांधा सडपातळ असला तरी तो मजबूत आहे. आणि त्याहून विशेष म्हणजे माझ्यांत आत्मार्पणाची हिंमतही आहे. सर्वोत्कृष्ट संगीत स्वतःच्या शरीरांतून निर्माण होत असतां त्यांतच काया खपून गेली तरी तींत कृतार्थता आहे. भीतभीत कोमल राग आणि मध्यम राग काढण्यांत काय स्वारस्य? जें कांहीं भीषण आहे, उज्ज्वल आहे, तीन सप्तकांच्या पर आहे तेंही जर स्वतः-मधून एकदां—अगदीं एकदांच निघालें तरी जीवन कृतार्थ झालें. तेव्हां हे गुणी, माझ्यावर दया करून माझा अपमान करूं नकोस. तुझी जितकी हिंमत असेल तिथवर चढ. मी तुला साथ देईनच. कमी पडणार नाहीं. आपण मिळून पुरुषार्थ करूं आणि एकदां तरी संगीताचें सर्वोच्च शिखर गाठूं—पूर्णता नेहमींच अप्राप्य काय म्हणून असावी? जसा तूं अलौकिक

आहेस त्याचप्रमाणें माझीही अलौकिक होण्याची तयारी आहे. तीच आकांक्षा आहे. तेव्हां क्लीव न करतां पुढें चल. अजूनही आघात सहन करण्याची क्षमता माझ्यामध्यें आहे, हें ध्यानांत धरून आणि माझी तत्परता ओळखून जी कांहीं करामत तुला दाखवायची असेल ती या क्षणीं दाखव.'

आरो आघात सजिबे आमार
सजिबे आमारो,
आरो कठिन सुरे जीवनतारे झंकारो।
जे राग जागाओ आमार प्राणे
बाजे नि ता चरम ताने,
निठुर मूर्छनाय से गाने
मूर्ति संचारो।

लागे ना गो केवल जेन
कोमल करुणा,
मृदु सुरेर खेलाय अे प्राण
ब्यर्थ कोरो ना।
ज्वले अुठुक सकल हुताश,
गर्जि अुठुक सकल बातास,
जागिये दिये सकल आकाश
पूर्णता विस्तारो।

"हे गुणी, हें वाद्य निर्भयपणें वाजव. याहून अधिक आघात, याहून तीव्र आघात मला सहन करतां येतील. याहूनही उच्चीचे सूर माझ्या जीवनतारेंतून झंकृत करण्यास तुला कोणतीच हरकत नाहीं. जो राग माझ्या प्राणांतून जागावयाचा आहे, तो माझ्या चरमतानेंतून निघत नसला तर निष्ठुरपणें तार खेंचून हवा तो इष्ट स्वर माझ्यांतून मूर्तिमंत खडा कर. सगळे पडदे वापरल्यानंतर

शेवटची मेंड ( मूर्छना ) म्हणून तार खेंचून मूर्छना व्यक्त करणें यांतच तर वादनविद्येचा उत्कर्ष आहे. मगच रागदेवतेचा त्या गीतांमध्यें मूर्तिमंत संचार होऊं शकतो.

दया बाळगून केवळ कोमल स्वर लावलेस आणि मृदु स्वरांचाच खेळ चालविलास तर माझा प्राण – माझें जीवन व्यर्थ होईल. तसें करून माझ्या प्राणशक्तीचा अपमान करूं नकोस. माझें जीवन व्यर्थ होऊं देऊं नकोस. जसा दीपक राग आळवतांच दिवे पेटूं लागतात, मेघमल्हार छेडतांच आकाश मेघांनीं मोहरून येतें, त्याचप्रमाणें तुझा जो कांहीं रौद्र राग असेल तो छेडून आपल्या शक्तीची कमाल कर. जगांतील सर्व हुताश ( अग्नि ) पेट घेवो, वारे आणि झंझावात एकाएकीं प्रलयगर्जना करोत आणि हें विशाल आकाश आपल्या गर्जनेनें दुमदुमून जागें होवो. आणि अशा रीतीनें माझ्यामधून सर्वत्र विश्वभर पूर्णतेचा विस्तार होवो. निर्भयपणें आणि निर्दयपणें माझ्यावर आघात कर आणि माझ्यामधून सर्वोच्च झंकार मागून घे. मी कमी पडणार नाहीं. अजूनही आघात सोसण्याची माझी तयारी आहे. मला एकदां तरी तुझा पूर्ण साथ करावयाचा आहे."

टीप मृदु सुरेर खेलाय ए प्राण व्यर्थ कोरो ना ।

श्रीसमर्थ म्हणजे कांहीं लहान सहान साधक नव्हेत. बारा बारा वर्षें उग्र साधना करून त्यांनीं आपलें शरीर आणि मन दोन्ही कमावलीं होतीं आणि त्याबरोबर प्रभु रामचंद्राला आळविलें होतें. या दीर्घकालीन आणि उग्र साधनेच्या द्वारा त्यांना ज्याप्रमाणें शरीराचा आणि इन्द्रियांचा ओढाळपणा कळून चुकला होता त्याचप्रमाणें मनालाही कितीपरीनें समजावलें पाहिजे हेंही त्यांना कळून चुकलें होतें. मनाचा एकूणएक पापुद्रा त्यांनीं सोलून पाहिला असला पाहिजे. मनाला जसें लाडावून चालत नाहीं तसेंच भेडसावून किंवा छळूनही चालत नाहीं हें सर्व त्यांनीं पाहून घेतलें. ही झाली एका बाजूची तयारी. दुसऱ्या बाजूनें भगवंताच्या स्वभावाचाही त्यांना चांगलाच परिचय झाला होता. राम दासाभिमानी आहे, भक्तांची उपेक्षा करीत नाहीं इत्यादि ज्याप्रमाणें त्यांनीं अनुभवानें सांगितलें आहे, त्याचप्रमाणें साधकाची पारख करतांना, त्याला कसोटीवर कसतांना आणि त्याच्याकडून उग्र साधना करवून घेतांना देखील भगवंत आपली दया, आपला कोमलपणा

सोडत नाहीं. जरी तपासण्यासाठीं साधकाला धारेवर धरावें लागलें तरी थोडीशी चुणूक दाखवून पुनः ताबडतोब संभाळून घेण्याकडेच भगवंताची प्रवृत्ति असते हें त्यांनीं ओळखलें होतें. म्हणूनच रामदास म्हणतात — " कृपाळूपणें अल्प धारिष्टय पाहे । "

देव ज्याप्रमाणें कनवाळू असतो त्याप्रमाणें निकरावर आलेला भक्त-साधक केव्हां केव्हां अधिरेपणानें उग्र झालेला असतो. आजारी मनुष्य ज्याप्रमाणें केव्हां केव्हां डॉक्टराला सांगतो कीं, "डॉक्टर, मला भ्रमांत ठेवूं नका. तुमचें जें कांहीं निदान असेल तें आहे तसें मला स्पष्ट सांगा. मी घाबरून जाणार नाहीं. छाती फुटून जाण्याइतका मी नाजुक नाहीं. खरें काय आहे तें कळलें तर त्या मानानें मला जपतां येईल, आवश्यक व्यवस्थाही करतां येईल." रोगी केव्हां केव्हां डॉक्टरला म्हणतो एखादा सौम्य इलाज पुष्कळ दिवस चालण्यापेक्षां कांहींतरी जालिम उपाय करून जर मला ताबडतोब बरें करणें शक्य असेल तर तेंच मला हवें आहे. लवकर बरें व्हावें आणि पूर्ण बरें व्हावें हेंच मला हवें आहे. त्यासाठीं मी वाटेल ती वेदना सहन करण्यास तयार आहें.

ज्या महत्त्वाकांक्षी मनुष्याला सम्राट व्हावयाचें असेल तोही आपल्या इष्टदेवतेला म्हणेल कीं—देवी, मला दुय्यम स्थान नको आहे. साधारण राज्यानें माझी महत्त्वाकांक्षा तृप्त व्हावयाची नाहीं. मला सर्वोपरी व्हावयाचें आहे. यासाठीं जगदेकराट् म्हणवून घ्यावयाचें आहे. जें कांहीं बलिदान देणें आवश्यक असेल तें द्यावयास मी तयार आहें. माझा संकल्प असामान्य आहे यासाठीं असाधारण त्याग करावयास मी तयार आहें. मला सर्वश्रेष्ठ तरी कर किंवा माझा सर्वनाश होऊं दे. माझी दया बाळगूं नको. मला परिपूर्ण कर; पूर्णपणें कृतार्थ कर.

याच भावनेनें येथें कवि भगवंताला म्हणतो— भगवंता, तुझ्या कठोर कृपेचा मला अनुभव नाहीं असें नाहीं. पण साधनेंत मी आतां पुरा कसला गेलों आहें. आजवर जेवढे आघात केलेस त्याहूनही अधिक आघात सहन करण्याची शक्ति माझ्यांत आली आहे. माझ्या जीवनवीणेची तार पक्की पोलादी आहे. ती सहजासहजीं उतरावयाची नाहीं आणि तुटावयाची नाहीं. तेव्हां अजून थोडी खुंटी पिळलीस तरी चालेल. याच्याहून उच्चीचा स्वर लावलास तरी चालेल. या क्षणीं माझ्या हृदयांत जो राग स्फुरला आहे त्याला उच्चीचे स्वरच पाहिजेत. खुंटी पिळून तार स्वराला लावून पुनः तिला खेंचून हवेंतसें तिच्यावर मेंडकाम करण्याची तयारी ठेव. नुसते कोमल स्वर लावून चालावयाचें नाहीं. मृदु

स्वरांना सौम्यपणें खेळवून माझ्या शक्तीला निष्फळ करूं नको. माझ्या प्राणाला जितकें वर उसळतां येईल तितकें उसळूं दे. आज माझी अशी कांहीं तयारी आहे कीं सर्वोच्च संधी मला देऊन पहा. मी माझा शेवटचा डाव टाकावयास तयार आहें. सर्वस्व पणास लावून भाग्याची परीक्षा पहावयास तयार आहें. मला पूर्णतेकडेच पोंचावयाचें आहे. माझ्या जीवनामध्यें सर्वप्रकारचे हुताशन पेट घेवोत, सर्व प्रभंजन वारे जीवनामध्यें गर्जना करोत आणि माझें सर्व जीवनाकाश सर्वोच्च संगीताच्या गर्जनेनें निनादित होवो. भगवंता, या क्षणीं हिंमतपूर्वक पूर्णतेचा विस्तार होऊं द्या. मृदु स्वरांना हळुवारपणें खेळवून माझ्या जीवनाच्या आकांक्षेला विफळ करूं नको.

# ४३

पुष्कळ वेळां, सुखानें जीवन उथळ होतें. मनुष्य जर अगदींच पामर नसला तर दुःखावेगामुळें त्याच्या सर्व शक्ति जागृत होतात व कधीं कधीं तो आपल्या पुरुषार्थाची चरमसीमा गांठतो. कुंतीनें ईश्वराजवळ 'विपत्ति' मागितली; कारण विपत्तीमध्येंच ईश्वराचें स्मरण अखंड रहातें. ज्याला 'नारायण-स्मृति' नको आहे पण केवळ स्वतःचा संपूर्ण विकासच हवा आहे त्यानें देखील ईश्वराकडे विपत्तिच मागितली पाहिजे.

विपदो नैव विपदः संपदो नैव संपदः ।
विपद् विस्मरणं विष्णोः संपन्नारायण-स्मृतिः ॥

खरोखर 'दुःखं जन्तोः परम् धनम्'. दुःखाच्या भांडवलावरच जीवनव्यापार भरभराटूं शकतो. भगवंतानें ज्याला असें पौष्टिक दुःख दिलें त्यानें बेलाशक मानावें कीं, ईश्वराचा वरदहस्त आपल्यावर आहे. दुःखाच्या योगानें — संकटांच्या योगानें — मनुष्य तप्त सुवर्णाप्रमाणें निर्दोष होतो, शुद्ध होतो आणि अलौकिक तेजानें चमकूं लागतो. धूप जळाल्याशिवाय सर्वत्र सुगंध पसरूं शकत नाहीं. दिव्यानें वात आणि स्नेह जाळल्याशिवाय त्याला आपल्या आसपासचें जग प्रकाशित करतां येत नाहीं.

मनुष्य जर अचेतनासारखा पडून राहिला तर भगवान त्याला मोठा थोरला आघात करून जागें करतो. आणि चकमकीवर लोखंडाचा प्रहार करून त्यांतून आगीची ठिणगी प्रज्वलित करावी आणि कापूस जाळावा त्याप्रमाणें ईश्वर माणसावर संकट-परम्परा आणून त्याला तेजस्वी बनवितो. जे कोणी तेजस्वी असतील तेच त्याची ही कठोर–निष्ठुर कृपा समजूं शकतील; तेच उमजूं शकतील आणि तेच याची कदरही करूं शकतील. रविबाबू गातात—

अेअि करेछ भालो, निठुर,
अेअि करेछ भालो ।
अेमनि करे हृदये मोर
तीव्र दहन ज्वालो ।
आमार अे धूप [1]ना पोडाले
गंध किछुअि नाहि ढाले,
आमार अे दीप ना ज्वालाले
देय ना किछुअि आलो ।
जखन थाके अचेतने
अे चित्त आमार
आघात से जे [2]परश तब,
सेअि तो पुरस्कार ।
अन्धकारे मोहे लाजे
[3]चोखे तोमाय देखि ना जे,
बज्रे तोलो आगुन क'रे
आमार जत कालो ।

"हे निष्ठुरा, तूं जें करतोस तेंच चांगलें आहे, तेंच चांगलें आहे. अशा रीतीनें माझ्या हृदयामध्यें तीव्र आग प्रज्वलित करतोस हेंच चांगलें आहे. माझा हा

१ ना पोडाले–जाळल्यावांचून. २ परश–स्पर्श. ३ चोखे–डोळयांनीं.

धूप जळला नाहीं तर कांहीं तो आपला सुगंध पसरवूं शकणार नाहीं. तसेंच जर माझा हा दिवा पेटला नाहीं तर तो कांहीं प्रकाश देऊं शकणार नाहीं.

जेव्हां माझें हें चित्त अचेतन होऊन जडवत् पडून रहातें तेव्हां तुझ्याकडून त्याला होणारा आघात हाच जणुं मला जागें करणारा तुझा स्पर्श होय, तुझा पुरस्कार होय — वरदहस्त होय. अंधारांत मोहानें आणि लज्जेमुळें मी जेव्हां तुला डोळ्यांनीं पाहूं शकत नाहीं तेव्हां तुझ्या वज्रप्रहारानें ठिणगी पाड आणि माझ्यांत जें कांहीं काळें असेल तें उज्ज्वल करून दे. जनार्दना, तीच तुझी खरी कृपा असेल."

टीप आघात से जे परश तब सेओि तो पुरस्कार

सप्तधातूंचा रस सप्रमाण एकत्र करून घंटा तयार केली होती. तिच्यांतून अतिशय शुद्ध स्वर निघावेत, तिचें अनुरणन दीर्घकालपर्यन्त गुंजत रहावें आणि तें हवेंत दूरवर पोंचावें अशा हिशोबानें तिची जाडी आणि तिचा आकार बनविला होता. घंटेला आपली ही जीवनसाधना पूर्णपणें ठाऊक होती, पण देवळांत टांगल्या दिवसापासून कोणी तिला वाजविलीच नव्हती. घंटेच्या पोटीं पुष्कळ उमेद होती. तऱ्हेतऱ्हेचे संदेश तिला सांगावयाचे होते. कितीतरी कोमल आणि तीव्र, ललित आणि उत्कट, भीषण आणि प्रचंड भावना तिला व्यक्त करावयाच्या होत्या आणि आसपासच्या जनतेचें नेतृत्वही तिला स्वीकारावयाचें होतें. पण घंटा कोणी वाजवेल तेव्हां ना? निनादासाठीं तयार झाली असून देखील मनांतल्या मनांत मंदिरांतील देवतेची ती प्रार्थना करीत होती कीं, "मला प्रहार करणारा कोणी भेटो. माझ्या सर्व शक्तीचें चीज होईल अशा एकामागून एक प्रहारांची झड लावणारा मला कोणी भेटो आणि माझें सर्व कलेवर त्या प्रहारांनीं कंपित होवो. मगच मी माझी सर्व करामत दाखवूं शकेन. जो कोणी मला प्रहार करील, मला आपल्या पूर्ण शक्तीनें हाणील तोच माझा खरा उपकर्ता होय. त्याच्या प्रहाराचा मी उपहार म्हणूनच स्वीकार करीन.

"धूप देखील जर याचना करतो कीं मला जर कोणी भाजून काढलें तरच मी माझा गंध दिग्दिगंतीं पसरवूं शकतों, दीप देखील जर वांछा व्यक्त करूं शकतो कीं मला कोणी पेटविलें तरच मी माझ्या आसपासच्या जगाला प्रकाशित करूं शकेन,

तर मीं, या मंदिरांतील घंटेनें, प्रहाराची प्रतीक्षा कां करूं नये? असें मूक होऊन रहाण्यांत जीवनाची काय कृतार्थता आहे?"

घंटा निनादित होण्यासाठीं असते. सतारीच्या तारा स्वतःला छेडून घेऊनच कृतार्थ होत असतात. धूप किती तरी काळा असतो, पण जेव्हां तो पेट घेतो तेव्हांच तो उज्ज्वलवर्ण होऊन जगालाही उजळतो, आणि सुगंधित करतो. हें सर्व दहन, हा आघात, हीच जीवनाची कृतार्थता आहे. यांतच प्रभूची कृपा व्यक्त होते. शूराला वीर कर्माची कामगिरी सांगावी तेव्हांच त्याची कदर केल्यासारखें होतें. सेनेला युद्धावर पाठविलें म्हणजेच तिला आह्लाद वाटतो. जीवनामध्यें देखील जेव्हां मनुष्य तावून सुलाखून निघतो, सर्व तऱ्हेच्या विपत्तींतून त्याला पसार व्हावें लागतें, तेव्हांच जीवन-वीराला वाटतें कीं भगवंताचें माझ्याकडे लक्ष आहे. सुरक्षितता हा भगवंतानें केलेला अनादर आहे, त्यानें दाखविलेली उपेक्षा आहे. जीवनाला व्यर्थ करून टाकणारें सुख आणि आराम काय कामाचे?

# ४४

जगाच्या राहाटींतून निवृत्त व्हावें, एकांतांत बसावें आणि भगवंताचें ध्यान करावें, आणि तेथें जो साक्षात्कार होईल तोच परमानंद असल्यानें त्यांतच अखंड रममाण व्हावें असें पुष्कळांना वाटतें. ध्यानयोगी आणि भक्तियोगी, प्रेमयोगी आणि मुक्तियोगी हाच आदर्श स्वतःपुढें ठेवतात. या आदर्शानें हजारों वर्षे मनुष्यहृदयावर राज्य केलें, पण शेवटीं मनुष्याला दिसून आलें कीं, हें सर्व जीवनविमुख ध्यान आणि भक्तीचा हा एकांत सर्वच एकप्रकारची नशा आहे. मुक्ति जीवनविमुख असूं शकत नाहीं. ईश्वराचा साक्षात्कार होण्यासाठीं जगाचा लोप झाला पाहिजे हा आदर्श चुकीचा आहे. जर परमात्मा स्वतःच हें विश्व निर्माण करून त्याच्यामध्यें अनंत रीतीनें प्रकट होत असतो तर या विश्वाच्या बाहेर जाऊन, याला विसरून जाऊन भगवंताचें स्मरण, भजन, पूजन, ध्यान आणि दर्शन कसें करावयाचें? ईश्वराचा साक्षात्कार करावयाचा म्हणजे त्याची लीला ओळखून त्या लीलेशीं एकरूप व्हावयाचें अथवा या लीलानाटकांत ईश्वराचा साथीदार व्हावयाचें.

ईश्वराला विसरून जेव्हां आपण जगांत वावरतों तेव्हां सुखदुःख, जयपराजय, लाभ-हानि, इत्यादि द्वंद्वांत आपण सांपडतों आणि लाटांच्या तांडवांत सांपडलेल्या ओंडक्याप्रमाणें आपली स्थिति होते. पण जेव्हां त्या प्रेमसागराला ओळखून आपण

त्याच्याशीं तदाकार होतों आणि त्याचाच खेळ खेळूं लागतों तेव्हां आपली स्थिति (त्या) ओंडक्यासारखी न राहतां, मस्त होऊन तांडवनृत्य करणाऱ्या त्या लाटांसारखीच होते. मग घाबरेंघुबरें होण्याचें कारण नाहीं, अथवा असहाय वाटण्याचें कारण नाहीं. मग जय-पराजय उरत नाहीं, लाभ-हानि असत नाहीं आणि सुख-दुःख दोन्ही आनंदमय होतात.

कर्मयोगांत जी पूर्णता आहे ती नुसत्या ध्यानयोगांत नाहीं. सलोक्ता, समीपता, सरूपता या देखील मुक्ति खऱ्या. पण पूर्ण मुक्ति सायुज्यतेमध्येंच असते कीं जिथें आपण ईश्वराशीं मिळून जाऊन त्याचे सहयोगी बनतों. सर्व योगांचें अंतिम साध्य म्हणजे हा भगवत्सहयोग होय.

तुमि जे काज करछ, आमाय
सेअि काजे कि लागाबे ना।
काजेर दिने आमाय तुमि
आपन हाते जागाबे ना?
[1]भालोमन्द ओठापडाय
विश्वशालार [2]भाङागडाय
तोमार पाशे [3]दाँड़िये जेन
तोमार साथे हय गो [4]चेना।
भेबेछिलेम विजन छायाय
नाअि जेखाने [5]आनागोना
सन्ध्याबेलाय तोमाय आमाय
सेथाय हबे जानाशोना।
अन्धकारे एका एका
से देखा जे स्वप्न देखा,
डाको तोमार हाटेर माझे
चलछे जेथाय [6]बेचाकेना।

---

१ भालोमन्द–बरेंवाईट. २ भाङागडाय–मोडणें घडणें यांत. ३ दाँड़िये–उभें राहून. ४ चेना–परिचय. ५ आनागोना–येणेंजाणें, रहदारी. ६ बेचाकेना–क्रयविक्रय.

"तूं जें काम करीत असतोस त्याच कामांत मला लावणार नाहींस का? कामाचे दिवशीं तूं मला आपल्या हातानें उठवणार नाहींस का? बऱ्या-वाईटांत, उठण्यापडण्यांत, आणि या विश्वशालेमधील तोडण्याजोडण्यांत जेव्हां तुझ्याबरोबर उभा राहीन, तुझ्याबरोबर सहकार करीन तेव्हांच तुझी खरी ओळख होईल. तेव्हांच खरा परिचय आणि साक्षात्कार होईल.

"मला वाटलें होतें कीं, दूर विजन वनांत, झाडांच्या घनदाट छायेंत जेथें कोणाचीच ये-जा नाहीं अशा ठिकाणीं, दिवस मावळल्यानंतर अंधकार पसरत असतां मला तुझें दर्शन होईल—तुझा परिचय होईल. पण अनुभवास उलटेंच आलें. अनुभवानें खात्री झाली कीं, एकान्तामध्यें विजन वनामध्यें अंधारांत मीं जें पाहिलें तें स्वप्नच पाहिलें. तो केवळ दृष्टान्त होता. तेव्हां आतां हे प्रभो, जिथें क्रय-विक्रय चालू असतो, त्या तुझ्या बाजारांत-हाटांत मला बोलीव. तेथेंच तुझा खरा परिचय होईल. तुझ्या खऱ्याखुऱ्या साक्षात्कारानें मी धन्यधन्य होईन."

# ४५

चार मुलांच्या आईला एक अनुभव नेहमीं येतो. दरेक मूल म्हणतें आई माझी. मग तीं मुलें आपापसांत भांडूं लागतात आणि म्हणतात, आई तुझी नाहीं पण माझी. प्रेमाचेंच भांडण तें! मारामारीक रून त्याचा निवाडा लागायचा नसतो. मुलें शेवटीं आईला जाऊन विचारतात – खरं सांग आई, अगदीं खरं खरं सांग; तूं कुणाची? आई जर आई नसती तर चिडून म्हणाली असती—'मी कुणाचीच नाहीं, जा.' पण आई प्रेमानें हसून उत्तर देते, "अरे, मी सर्वांचीच आहें. कुणाची नाहीं असें कधीं होईल का?" कांहीं मुलें हें उत्तर ऐकून हिरमुसलीं होतात. पण कांहीं समजूतदार मुलें, आईचें म्हणणें यथार्थ आहे असें ओळखून म्हणूं लागतात—आई सर्वांची, सर्वांची ; म्हणूनच माझी. आई तुझी, माझी, सर्वांची. तुझी, माझी, सर्वांची.

आई आपल्या भावाची झाली म्हणजे तेवढीच आपली कमी झाली अशी संकुचित दृष्टि जोंवर होती तोंवर भांडण होतें. आईच्या उत्तरानें मुलांची जीवनदृष्टिच बदलली. त्यांना कळून चुकलें कीं आई आपल्या भावंडांची आहे म्हणून कांहीं ती आपली कमी झाली नाहीं. आई जर सर्वांची नसती तर आपलीही झाली नसती. ती सर्वांची आहे म्हणूनच तर आपलीही झाली आहे. आतां कुणाही मुलाला इतर भावंडें नसतांना आईला

एकटे गांठून "आई, तूं माझी ना?" असें विचारण्याचा मोह उरला नाहीं. आतां दरेक मूल म्हणतें, "आई जशी माझी आहे तशी तितकीच ती माझ्या भावंडांची आहे यांतच मला विशेष आनंद वाटतो. आई मी एकट्यापुरती घेऊन काय करूं?"

कांहीं भक्त आणि कांहीं जाति ईश्वराचा सव भक्ता आपल्यालाच मिळावा अशी धडपड प्रथम करतात—युगानुयुगें करतात. पण जेव्हां त्यांना परमेश्वराचें खरें स्वरूप कळतें तेव्हां त्यांना पटतें कीं, ईश्वर जर सगळ्यांचा नसला तर तो आपला होऊंच शकत नाहीं. ईश्वराचें यथार्थ स्वरूप समजलें म्हणजे त्याचा आपला संबंधही शुद्धपणें समजतो आणि त्यांतच असाधारण आनंद मिळूं लागतो. ईश्वराचें हें खरें स्वरूप आणि ईश्वराशीं असलेला आपला सर्वसाधारण संबंध ओळखल्यावर कवि ईश्वराला उद्देशून आपलें आनंदगान गाऊं लागतो.

तूं सर्वांचा हें मला जिथें समजलें तिथेंच तुझें दर्शन मला होतो. तूं जेथें सर्वांना कवटाळतोस तेथेंच माझ्या हृदयांत भक्तीचा उदय होतो.

बिश्वसाथे [1]'जोगे जेथाय विहार'
सेइखाने जोग तोमार साथे आमारो।
नयको बने, नय विजने,
नयको आमार आपन मने,
[2]सबार जेथाय आपन तुमि हे प्रिय
सेथाय आपन आमारो।
सबार पाने जेथाय बाहु पसार'
सेइखानेतेइ प्रेम जागिबे आमारो।
गोपने प्रेम [3]रय ना घरे,
आलोर मतो [4]छड़िये पड़े,
सबार तुमि आनन्दधन हे प्रिय,
आनन्द सेइ आमारो।

---

१ जोगे–एकरूप होऊन. २ सबार-सर्वांचा. ३ रय ना–रहात नाहीं. ४ छड़िये पड़े–पसरलें जातें.

"हे सर्वान्तर्यामी सर्वेश्वरा, या विश्वाबरोबर संकलित होऊन जेथें तूं विहार करतोस तेथेंच तुझा माझा परिचय होवो, तुझा माझा संबंध बांधला जावो.

"तुला मीं वनांत पाहूं इच्छीत नाहीं, विजनामध्यें ओळखूं पहात नाहीं. माझ्या मनांत आणि अंतःकरणांतच तुझा साक्षात्कार व्हावा हीहि माझी अभिलाषा नाहीं. पण हे प्रिय, तूं जेथें सर्वांचाच आत्मीय होतोस तेथेंच तूं माझाही आत्मीय व्हावेंस एवढेंच मला हवें आहे.

" जेथें तूं सर्वांना प्रेमपाशांत घेण्यासाठीं आपले बाहू पसरतोस त्याच क्षणीं, त्याच स्थानीं माझीहि भक्ति जागो, उचंबळून उठो, हेंच आतां मला हवें आहे. आपलें प्रेम – माझी भक्ति आणि तुझी वत्सलता – आतां एकांतांत लपल्या राहणार नाहींत. पण प्रकाश ज्याप्रमाणें सर्वत्र पसरत रहातो, त्याचप्रमाणें आपला हा प्रेमसंबंध अनंतापर्यन्त प्रकाशित होत रहाणार. हे प्रिय, तूं सर्वांचा आनन्दघन आहेस, हीच आनंदाची गोष्ट आहे. तूं सर्वांचा आनन्दरमण आहेस यांतच मला आनंद आहे. हे माझ्या हृदयसंतोषा, तुला ओळखल्यामुळेंच माझें हृदय विराट झालें आहे. आतां तुला मी कोणच्या कोपऱ्यांत पाहूं ? कोठें कोपराच उरला नाहीं. सर्वत्र अनंत आहे."

# ४६

एके ठिकाणीं मीं विनोदानें काळ्या प्रकाशासंबंधानें आणि दवळ्या अंधारासंबंधानें लिहिलें आहे. ज्यांत कमी दिसतें तो अंधार आणि ज्यांत अधिक दिसतें तो प्रकाश, अशी जर व्याख्या स्वीकारावयाची तर दिवसा फक्त सूर्य आणि पृथ्वी हीं दोनच आपल्याला दिसतात. रात्रीं अंधार पडतांच अनंतकोटि ब्रह्मांडें आपल्यापुढें प्रगट होतात. एकच नव्हे तर असंख्य सूर्य आपल्यासमोर तळपूं लागत असूनही त्यांची सत्यनिष्ठा इतकी कीं विश्वव्यापी अंधाराला ते लपवीत नाहींत. माझ्या ह्या निरूपणांत विनोदी अर्थालंकार जसा आहे तसें गूढ आध्यात्मिक तत्त्वही आहे. व्यवहाराची डोळसदृष्टि स्वतःला सर्वदर्शी समजते पण ती दिवसाइतकीच संकुचित असते, आणि आंधळी मानली जाणारी ध्येयपरायण दृष्टि ( श्रद्धा ) अगदीं रात्रीप्रमाणें अनंतांत शिरण्याला जास्तींत जास्ती मदत करते ! ह्यामुळेंच ध्येयवादी मनुष्य पुष्कळदा ‘ अंतर्बोधो बहिर्जडः ’ असा व्यवहाराला वाटतो.

उपनिषदकार म्हणतात कीं जर आत्म्याचा साक्षात्कार करून घ्यावयाचा असेल तर हिंमतपूर्वक गुहेमध्यें शिरलें पाहिजे. तेथेंच तो सांपडेल. आत्म्याचें स्वरूप अलक्षण * नेति

* अलक्षणं, अचिन्त्यं, अव्यपदेश्यं. ( ज्याची फोड करतां येत नाहीं )—मांडुक्य

नेति—आहे असें वेदान्त्यांनीं सांगितलें आहे. त्यालाच बौद्धांनीं शून्य हें नांव दिलें आहे. एवढेंच नव्हे तर आत्मा हें त्याचें नांवही त्यांनीं हिरावून घेतलें आहे. एका आधुनिक शब्दशास्त्र्यानें आत्मा शब्दाची व्युत्पत्ति 'तन् मयि' वरून केली आहे; जें गूढ तत्त्व माझ्यांत आहे तो आत्मा. त्यालाच बौद्ध शून्य म्हणतात. त्यालाच कवीनें येथें अंधकार म्हटलें आहे. कवि भगवंताची विनवणी करतो—

[१]डाको डाको डाको आमारे
तोमार स्निग्ध शीतल गभीर
पवित्र आँधारे।
तुच्छ दिनेर क्लान्ति ग्लानि
दितेछे जीबन धुलाते टानि
साराक्षणेर बाक्यमनेर
सहस्र बिकारे।

मुक्त करो हे मुक्त करो आमारे,
तोमार निबिड़ नीरब उदार
अनन्त आँधारे।
नीरब रात्रे हाराइया बाक्
बाहिर आमार बाहिरे [२]मिशाक,
देखा [३]दिक मम अन्तरतम
अखंड आकारे।

"हे प्रभो, हे अंतर्यामी, तुच्छ दिवसाच्या ह्या विविध व्यवहारामध्यें मी क्लान्त झालों, मला ग्लानि वाटते. दिवसाच्या ह्या व्यवहारानें मला मनाबरोबर भटकविलें आणि वाणीच्या हजारो विकारांमध्यें गुरफटून टाकलें, आतां मला ह्या सर्वांचा उबग आला आहे. 'उबगलें सासरा मला माहेरासी न्या हो'; म्हणून

---

१ डाको – बोलव. २ मिशाक – मिसळून जावो. ३ दिक – देवो.

मला तुझ्या प्रेमळ, शीतल, गंभीर आणि पवित्र अशा अंधरामध्यें बोलावून घे, बोलावून घे, बोलावून घे.

दिवसाच्या व्यवहाराच्या आणि प्रकाशाच्या पाशांतून मला मुक्त कर, देवा, मला मुक्त कर. आणि तुझ्या सघन, नीरव, प्रसन्न-उदार आणि अंतरतम अशा अंधारांत मला घेऊन चल.

निःशब्द रात्रीमध्यें माझी मुखर वाणी विलीन होऊं दे. आणि माझ्यांतील सर्व उत्तान आणि बाह्य तत्त्वें बाहेरच्या बाहेर उडून जाऊं देत. आणि मला आतां तुझें तें अंतरतम सत्-तत्त्व अखंडपणें, पूर्णपणें दिसूं दे. आतां मला कळून चुकलें कीं मानवी दृष्टीची ही अपरिहार्य मर्यादा आहे कीं तिला एका क्षणीं एकच बाजू दिसते. जोंपर्यन्त दृष्टीचा आधार आहे तोंपर्यन्त कोणत्याहि वस्तूच्या सर्व पैलूंचा साक्षात्कार एकाच वेळीं एकदम होऊंच शकत नाहीं.

[ मानवी भाषा देखील विश्लेषणात्मक असल्यानें ती वस्तूला क्रमशः आणि खंडशः व्यक्त करते. पहाणी आणि वाणी अशा रीतीनें स्वतः अपूर्ण असल्यानें त्यांचे मार्फत पूर्ण दर्शन किंवा पूर्ण प्रदर्शन होऊंच शकत नाहीं. त्यांच्या मदतीनें मी अंतरतमाला अखंड आकारानें पाहूं शकणार नाहीं. आणि अंतर्यामीचा साक्षात्कार खंडशः न होतां अखंडपणें होईल, तेव्हांच तो परिपूर्ण होईल आणि सायुज्यानंद * अनुभवास आणून देण्यास समर्थ होईल. हें सर्व तुझ्या त्या पवित्र, उदार आणि अनन्त अंधारांतच होणें शक्य आहे. ]

---

* दूध+साखर ह्यांचा सायुज्यानंद–अखंड आकाराचा असतो.

# ४७

विश्वजित् म्हणून एक यज्ञ असतो. ह्याच्या नांवावरूनच ह्या यज्ञाची महत्त्वाकांक्षा स्पष्ट होते. सर्व विश्व जिंकून घेण्याच्या उद्देशानेंच हा यज्ञ प्रवृत्त होत असतो.

ह्या यज्ञाचें विधान काय आहे? यज्ञ करणाऱ्यानें आपल्याजवळ जें जें म्हणून काय असेल तें सर्व, कांहींही बाकी न ठेवितां, दान करून टाकिलें पाहिजे. जो सर्वस्व अशेष देऊन टाकील त्याचाच विश्वजित् यज्ञ सांग होईल. केवढी भव्य कल्पना!! सर्व धर्मांचें रहस्य ह्या कल्पनेंत सामाविलेलें आहे. विश्वजित् यज्ञांत यजमानानें आपला पुत्रही मागें ठेवितां कामा नये असा आदर्श बाल नचिकेतानें आपल्या पित्याला सुचवून त्याला अडचणींत टाकलें. पण त्याचेकडून शेवटीं संकल्प पूर्ण करवूनच घेतला आणि अशा रीतीनें मृत्यूच्या घरीं जाऊन मनुष्यजातीसाठीं तो श्रद्धेच्या जोरावर अमरपट्टा घेऊन आला.

विश्वजित् यज्ञांत मनुष्य आपलें सर्वस्व देऊन टाकतो, पण तो कांहीं स्वतःला देत नसतो. अंतिम बलिदान देणारा एखादा शिबिराजाच तें करूं शकतो. ज्यानें स्वतःलाच

देऊन टाकलें तो विश्वजित् न होतां विश्वमय अथवा विश्वरूप होऊन जातो, ही त्यांतील खुबी आहे.

पण जो स्वतःच विश्वनाथ आहे, विश्वंभर आहे, विश्वेश्वर आहे, त्यानें कोणता यज्ञ करावयाचा ? तो जर विश्वाहून निराळाच नाहीं तर त्यानें प्रथम कोणतें दान करावयाचें आणि नंतर कोणतें ? प्रथम आपली मत्ता देऊन टाकावी आणि मग शेवटची आहुति म्हणून आत्मदान देऊन टाकावें हें माणसांसाठीं शक्य आहे. ईश्वर स्वतःला अखंड सतत देऊन टाकूनही परिपूर्ण उरतोच ह्याला काय करावें ?

भक्ताला बातमी लागली, कीं ईश्वर विश्वजित् यज्ञ करायला बसला आहे. यज्ञकंकण हातीं बांधून अनन्त हातांनीं संकल्प सोडून तो दानाच्या आसनावर बसला आहे. भक्त म्हणतो केवढी धन्य पर्वणी ही ! आतां भगवंताच्या ह्या अपूर्व यज्ञांत धांव घेऊन मनाला येईल तें मागून घेतलें पाहिजे. तो अनन्त हातांनीं देतो तेथें आपण दोन हातांनीं किती घेणार हा प्रश्नच येथें उठत नाहीं. तो जेव्हां स्वतःला देत असतो तेव्हां त्याला आपण हातांनीं घ्यावयाचें नसून चित्तानेंच घ्यावयाचें असतें. तेव्हां "माझें चित्त दानस्थानीं कसें पोहोंचेल ?" ही चिंता भक्ताला पडली आहे.

भक्त पहातो कीं सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्र, तारे सर्वच त्या यज्ञांत पोंचले आहेत आणि सोन्याचे घट भरून भरून भगवंताचा प्रकाश लुटत आहेत. भगवंताचा प्राण-प्रकाश गगनांत भरून उरला आहे आणि दानही कसें सढळ चाललें आहे. एखाद्या कारंज्यांतून नवीन नवीन फवारे उडावेत, कवीच्या प्रतिभेंतून नवीन नवीन गाणीं फुलूं लागावींत त्याप्रमाणें भगवान अनंत प्रकारें, अनन्त तऱ्हेचे रस धारण करून स्वतःचें वितरण करीत आहे. अशा ठिकाणीं माझें नांव घेऊन मला आमंत्रण मिळणार नाहीं का ? या हो सगळे या, ज्याला जें हवें तें मागून घेऊन जा. देण्याची वाटच बघूं नका. जें मनांत भरेल तें उचलूनच घेऊन जा. जें दिसेल तें आपलेंसें करा. असा 'देकार' जिथें चालला आहे तेथें माझी आठवण कुणाला होणार नाहीं का ? माझ्या चित्ताला त्या यज्ञस्थानीं पोंचतां येणार नाहीं का ?

ही हांक माझ्या कानांत पडावयाची नसून माझ्या जीवनांत पडली पाहिजे. कान ऐकण्याला उत्सुक होऊन भागावयाचें नाहीं. जीवनच उन्मुख झालें पाहिजे — अभिमुख झालें पाहिजे.

जेथाय तोमार लुट हतेछे भुबने
सेइखाने मोर चित्त जाबे केमने।
सोनार घटे सूर्य तारा
निच्छे तुले आलोर धारा,
अनन्त प्राण छडिये पड़े गगने।
सेइखाने मोर चित्त जाबे केमने।
जेथाय तुमि बस' दानेर आसने
चित्त आमार सेथाय जाबे केमने।
नित्य नूतन रसे ढेले[1]
आपनाके जे दिच्छ मेले[2],
सेथा कि डाक पड़बे ना गो जीवने।
सेइखाने मोर चित्त जाबे केमने।

"ह्या भुवनामध्यें जेथें तुझी लूट चालली आहे त्या ठिकाणीं माझें चित्त कसें पोंचेल, हीच चिंता मला लागली आहे. सूर्य तारे जेथें सोन्याचे घडे भरून भरून प्रकाशाच्या सरी घेऊन जात आहेत आणि अनन्तप्राण आकाशभर पसरूं लागला आहे, मोकाट सुटला आहे, त्या ठिकाणीं माझें चित्त कसें पोहोंचेल ?

जिथें तूं यज्ञकंकण हातीं बांधून दानाच्या आसनावर बसला आहेस तेथें माझें याचक मन कसें पोहोंचावें ?

जिथें तूं नित्यनूतन अशा नव्या नव्या रसांत स्वतःला ओतून अनन्त हातांनीं फेंकून देत आहेस, शेतकऱ्यांनीं शेतामध्यें बीज फेकावें त्याप्रमाणें तुझें वितरण जेथें चालूं आहे तेथें "यारे, या" म्हणून तुझी हांक माझ्या जीवनांत कशी पोंचेल, त्या ठिकाणीं माझें चित्त कसें पोंचेल ?

पोंचण्याचाच उशीर. तत्क्षणीं मी कृतार्थ होईन हें मला ठाऊक आहे. पण पोहोंचावें कसें ?"

---

१ ढेले—ओतून; २ मेले—सिसळवतोस.

# ४८

गंगेचेंच पाणी घेऊन आपण गंगेला अभिषेक करतों आणि शेवटीं म्हणतों, कीं मीं आणलेल्या या पाण्यानें यथामति – यथाशक्ति अभिषेकाची सेवा केली आहे. देवी, गोड करून घे. आणि गंगामाता देखील ह्या बाल्लीलेला सेवा म्हणून स्वीकारून आपल्याला आशीर्वाद देते. पारिजातकाचीं फुलें घेऊन पारिजातकालाच वहावीं, तुलसीदल खुडून तुलसीलाच वहावें त्याप्रमाणें ईश्वरी प्रेरणेनें जें गायन आपल्याला स्फुरलें असेल तें स्वतःचें मानून आपण ईश्वराला अर्पण करतों. आणि ईश्वरही ती गोष्ट गोड करून घेऊन आपला मान राखतो. आईबापांकडून पैसे मागून घेऊन त्यांची पूजा करून त्यांना लहान मुलांनीं दक्षिणा द्यावी आणि त्यांनींही त्या दक्षिणेचा संतोष व्यक्त करावा अशांतलाच हा प्रकार आहे.

कठोपनिषदांत जीवनरहस्य समजावतांना मृत्यु म्हणतो, "अनित्यैः द्रव्यैः प्राप्तवान् अस्मि नित्यं।" अनित्य द्रव्यांच्या मदतीनें मी नित्य वस्तु प्राप्त करूं शकलों आहें.

खरोखर ईश्वराची लीला अशीच आहे, कीं क्षणभंगुर साधनांच्या साहाय्यानें मनुष्य अविनाशी तत्त्व मिळवूं शकतो. फूल उगवतें आणि संध्याकाळपर्यन्त कोमेजून जातें, पण तेवढ्या काळांत जी धन्यता तें आपल्याला अर्पण करतें ती कायमची टिकते. गाण्याचे

आलाप उत्पन्न होतात आणि त्याचक्षणीं अनंतांत विलीन होतात. कोणच्याही क्षणीं सबंध गाणें अस्तित्वांत नसतेंच. त्या त्या क्षणीं एकेक सूरच काय तो जागृत असतो. तसें पाहूं जातां सबंध गाणें देखील एक घटकेहून अधिक टिकत नसतें. पण त्या इवल्याशा गाण्यांत एक भावनासृष्टि सामावलेली असते. आणि एकच गायन जीवन-परिवर्तन करावयालाही पुरेसें असतें. सान्तामध्यें अनंत पूर्णपणें मावूं शकतें; ह्याहून मोठा चमत्कार मनुष्याला कोणचा हवा ! आणि हें क्षणभुंगर, नश्वर शरीर जर चांगलेंपणानें वापरलें तर त्याच्या मदतीनें आपल्याला अनंत जन्मांचें सार्थक करून घेतां येतें. ह्याहून मोठी भगवत्कृपा मनुष्याला कोणची हवी आहे !

फुलेर मतन आपनि फुटाओ गान,
हे आमार नाथ, एइ तो तोमार दान।
ओगो से फुल देखिया आनन्दे आमि [1]भासि,
[2]आमार बलिया उपहार दिते आसि,
तुमि निज हाते तारे [3]तुले लओ स्नेहे हासि,
दया करे प्रभु राख' मोर अभिमान।

तार परे जदि पूजार वेलार शेषे
ए गान झरिया धरार धुलाय मेशे
तबे क्षति किछु नाइ—तव करतलपुटे
अजस्र धन कत लुटे, कत टुटे,
तारा आमार जीवने क्षणकालतरे फुटे
चिरकालतरे सार्थक करे प्राण।

"ज्याप्रमाणें एखादें फूल आपोआप फुलावें त्याप्रमाणें हीं माझीं गाणीं मला स्फुरतात. हेंच तर प्रभो तूं मला दिलेलें दान आहे. भगवंता, तें फूल पाहून,

---

१ भासि—(मी) वाहतों. २ आमार बलिया—माझें म्हणून. ३ तुले लओ—उचलून घेतोस.

तें स्फुरलेलें गायन ऐकून मी आनंदप्रवाहांत वाहूं लागतों आणि हें माझें फूल आहे असें समजून तें तुला मी अर्पण करतों. ह्या संकल्पानें मी तुझ्याकडे येतों आणि तूंही दयाळूपणानें माझा मान राखून मोठ्या प्रेमानें प्रसन्नपणें स्मित करून दिलेलें फूल मोठा अनुग्रह समजून आपल्या हातीं घेत असतोस.

आतां कृतार्थ व्हावयाचें तें काय उरलें ! पुढें पूजाकाल संपल्यानंतर त फूल कोमेजलें, तें गायन सुकून जमिनीवरील धुळींत मिसळून गेलें तरी कसलीच क्षति नाहीं. तुझ्या हातावर पद्म आहे. तुझ्या हातून कितीतरी दान दिलें जातें, कितीतरी धन सांडतें; पण जितकें जाईल त्याच्या दुप्पट तुझ्या हातांत तयारच असतें.

हीं फुलें आणि हीं गाणीं आमच्या जीवनामध्यें क्षणकाळासाठीं येतात आणि फुलतात. पण चिरकालासाठीं आमचा प्राण आणि जीवन ह्यांना कृतार्थ करून जातात.

# ४९

हें विश्व निर्माण कां झालें हें कोणी सांगूं शकेल काय ? ज्यानें तें निर्माण केलें तो सांगेल म्हणावें तर तो स्वतः या विश्वांतच लपून राहिला आहे. विश्व बाजूला सारून त्या विश्वस्वामीला पहावें आणि त्याला ओळखून विचारावें तेव्हांच ह्याचें रहस्य कळणार. किंवा त्याच्याकडून दीक्षा मिळाल्यामुळें आपणही आपल्या शक्तीप्रमाणें लहानमोठ्या विश्वाची – स्थायी किंवा अस्थायी सृष्टीची रचना करतों. त्यांत आपला उद्देश काय असतो हें शोधून काढून त्यावरून ह्या विश्वाच्या उत्पत्तीचें रहस्य अनुमानावें लागतें.

स्त्री-पुरुषांना एकाकी राहवत नाहीं. एकाचे अनेक व्हावें असें वाटूं लागतें. कवीला ही सृष्टि पाहून आणि अंतःसृष्टींत बुड्या मारून काव्य निर्माण करण्याची अदम्य इच्छा उत्पन्न होते आणि तो गाऊं लागतो. त्याचें गायनच त्याला खेंचत खेंचत अनेक क्षेत्रांत घेऊन जातें आणि तो एक नवलाईची शब्दसृष्टि आणि नादसृष्टि उत्पन्न करतो आणि तिच्याशीं रममाण होतो. चित्रकार विश्वभर पसरलेलें सौंदर्य पहातो. सृष्टीकडून त्याला सौंदर्याची दीक्षा मिळते. पण तेवढ्यानें त्याला संतोष होत नाहीं. त्याला वाटतें, जेवढें आपण बाहेर पाहिलें आणि हृदयांत उतरविलें तितकीच एक नवी सृष्टि आपणही तयार करावी

आणि ती भावनासृष्टि ह्या ब्रह्मदेवाच्या सृष्टीला अर्पण करावी. ह्या विश्वाकडून आपल्याला जितकें मिळालें तितकेंच अथवा त्याहून अधिक निर्माण करून जर आपण परत दिलें तरच आपलें भिकारीपण फिटेल आणि आपलें स्वातंत्र्य कायम राहील. म्हणून कवि, चित्रकार, गायक, समाज-व्यवस्थापक आणि धर्मप्रेरक आपआपल्या परीनें प्रयत्न करीत असतात.

ज्यांनीं जन्म दिला त्यांचें आपल्यावरील ऋण फेडावयाचें म्हणजे त्यांचें मिशन—त्यांची साधना अकल्पित रीतीनें पुढें चालविणाऱ्या उत्साही प्रयोगवीरांना जन्म देणें आणि त्यांचें अनुशासन ( शिक्षण ) पुढें चालवून त्यांना संस्कारसंपन्न करणें हेंच होय,* असें गृहस्थ-धर्म म्हणतो. व्यापक विश्वधर्मही ह्याहून भिन्न नाहीं.

ज्या देवांकडून आपल्याला हें विश्व मिळालें आहे आणि ह्यांत राहण्याची मोकळीक मिळाली आहे त्यांची उपासना करणें म्हणजे त्यांचें अनुकरणच केलें पाहिजे. त्यांच्या-सारखें व्हावें, आपल्या मर्यादेंत राहून त्यांनीं केलेलींच कर्मे करावीं आणि ज्या त्यांच्या सृष्टीचा आपण उपभोग घेतों त्या सृष्टीला लुटून फस्त न करतां—दरिद्री आणि क्षीण न बनवितां आपल्यापरी तींत कांहींतरी भर घालावी हेंच आपलें जीवितकर्तव्य होय.

ज्यानें सृष्टि निर्माण केली आहे त्याचेंच अनुकरण करतां करतां त्याच्यासारखीच एक लहान किंवा मोठी सृष्टि निर्माण केल्यानेंच हें विश्व कां बनविलें गेलें ह्याचा आपल्या हृदयांत उलगडा होतो. ऋषींनीं ह्या मार्गानें जाऊन आपल्यावरून जग ओळखलें एवढेंच नव्हे पण आपल्यावरून जगन्नियंत्याचें हृदयही समजून घेतलें. ते म्हणतात—' एकाकी न रमते ' एकट्याला करमत नाहीं, एकट्याला स्वतःचा परिचयही होत नाहीं. एकाचे अनेक व्हावें आणि अनेक होऊन देखील एकतत्व तुटत नाहीं; उलट तें एकत्वच अनेकप्रकारें अनुभवास येतें. आणि प्रकाराप्रकारांत नवनवा आनंद मिळतो म्हणून भगवंतानें सृष्टिरूपी विराट अवतार धारण केला आणि अशा रीतीनें तो आपल्या अनंत विभूतीचा साक्षात्कार करून घेत आहे; हाच त्याचा आनंद आहे.

जो विश्वस्वामी आहे तोच आपला जीवनस्वामी आहे असें ओळखल्यानंतर आणि त्याच्या आनंदाचें मूळ सांपडल्यानंतर कवि म्हणतो—

हे मोर देबता, भरिया अे देह प्राण
की अमृत तुमि चाह करिबारे पान ।

---

* पुत्रं अनुशिष्टम् लोक्यम् आहुः । बृ. १–५–१६.

आमार नयने तोमार विश्वछवि
देखिया लइते [1]साध जाय तव कवि–
आमार मुग्ध श्रवणे नीरब रहि
शुनिया लइते चाह आपनार गान ।
हे मोर देवता, भरिया ए देह प्राण
की अमृत तुमि चाह करिबारे पान ।

आमार चित्ते तोमार सृष्टिखानि
रचिया तुलिछे विचित्र एक वाणी ।
तारि साथे प्रभु मिलिया तोमार प्रीति
जागाये तुलिछे आमार सकल गीति,
आपनारे तुमि देखिछ मधुर रसे
आमार माझारे निजेरे करिया दान ।
हे मोर देवता, भरिया अे देह प्राण
की अमृत तुमि चाह करिबारे पान

"हे जगन्नियंत्या आत्मारामा, माझ्या ह्या तनुमनप्राणांत कसलें अमृत भरून त्याचें पान करण्याची तुझी इच्छा आहे ? हे कवि, असें वाटतें कीं हें विश्व निर्माण करून त्याचें माझ्या डोळ्यांवाटें दर्शन करावें अशी तुला वासना झाली आहे. माझ्या मुग्ध श्रवणांत नीरवपणें राहून तूं स्वतःचें गायन ऐकूं इच्छितोस.

[ चित्रकार होऊन भावगम्य चित्रें तर तूं काढतोसच पण तेवढ्यानें तुझें समाधान होत नाहीं. माझ्यासारख्या भोळ्या प्रेक्षकाला तीं चित्रें पाहून कसा आनंद होतो हेंही तुला अनुभवावयाचें आहे म्हणून तूं माझ्या डोळ्यांच्या हृदयांत जाऊन बसतोस. नव्या-नव्या भावना आणि कल्पना व्यक्त करण्यासाठीं तूं स्वतःचें विश्वसंगीत चालवतोस, पण तेवढ्या आनंद-व्यक्तीनें ( व्यक्तीकरणानें ) तुझें समाधान होत नाहीं. पण माझ्या-

१ साध – इच्छा.

सारख्या भोळ्या कानांत ते नाद पडतांच त्याच्या हृदयाची कशी कालवाकालव होते, त्याची वाणी कशी कुंठित होते ह्याचाही आनंद तुला अनुभवावयाचा आहे. म्हणून तूं लपून छपून तेथें स्वतःचें अधिष्ठान ठेवतोस आणि तेथून स्वतःचें तें विश्वसंगीत ऐकत असतोस. ]

"तुझी ही विविधरूपिणी सृष्टि एक अद्भुत विचित्र वाणी माझ्या चित्तामध्यें रचत असते आणि हे प्रभो, तूं त्या वाणींत स्वतःची प्रीति मिसळून त्याचें संगीत बनवितोस आणि मग तूं स्वतःलाच मला अर्पण करून माझ्यामध्यें मधुररसानें स्वतःलाच पाहूं इच्छितोस.

× × ×

किती गोड आहे ही तुझी आनंदलीला!"

टीप

आपनारे तुमि देखिछ मधुर रसे
आमार माझारे निजेरे करिया दान।

कवीनें एक काव्य लिहिलें, पण तें समजण्याची शक्ति कुणांतच नव्हती. शेवटीं कवीनें चार होतकरू तरुणांना बोलावून त्यांना साहित्याचें शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यांच्यामध्यें रसिकता उत्पन्न केली. त्यांना व्युत्पत्ति शिकविली आणि असें करीत करीत शेवटीं आपल्या काव्यांतील सर्व माधुरी, सर्व ध्वनि आणि इतर सर्व काव्यकळा समजण्याची योग्यता त्यांच्यांत उत्पन्न केली. नंतर जेव्हां त्यांनीं कवीचें तें महाकाव्य वाचलें तेव्हां त्यांतील ती अद्भुत प्रतिभा पाहून आणि सर्व रसांचा उन्मेष अनुभवून ते सर्व चकित झाले. आणि शेवटीं कविही आपल्या काव्याचा रसास्वाद घेणारे वाचक मिळाले म्हणून कृतार्थ झाला. काव्यही लिहावें आणि त्याचा आस्वाद घेणारा वाचकवर्गही तयार करावा. केवढी मोठी कामगिरी!

एका मनुष्याला ईश्वरानें मदनासारखें यौवन आणि रूपलावण्य दिलें. पण तें त्याला स्वतःला दिसावें कसें? पाण्यामध्यें स्वतःचें प्रतिबिंब पाहून त्याला कांहींशी कल्पना आली खरी. पण तेवढ्यानें तृप्ति न होतां त्याची उत्कंठाच वाढली. शेवटीं त्यानें मोठ्या प्रयासानें

एक चांदीचा पत्रा तयार केला. ठोकून ठोकून त्याला अगदीं सरळ केला आणि पुढें घासून घासून इतका कांहीं चकचकीत केला कीं शेवटीं त्याचा आरसा बनला. अशा तऱ्हेनें स्वतः आरसा बनवून त्यांत त्यानें आपलें रूप पाहिलें आणि त्याला त्याची धन्यता वाटली.

एका खेळाड्यानें एका नव्या खेळाची कल्पना केली. पण खेळगडी मिळाल्यावांचून खेळाचा आनंद कसा मिळणार ? म्हणून त्यानें चौघांना बोलावून खेळाचे सर्व नियम समजावून दिले. त्या नियमांप्रमाणें लोक जेव्हां खेळामध्यें प्रवीण झाले तेव्हां त्याला तो खेळ खेळण्याचा खरा आनंद मिळाला. रासनृत्याचेंही असेंच आहे. आणि प्रेमतंत्राचेंही असेंच आहे. 'एकाकी न रमते' ईश्वराची अशी स्थिति आहे. एकट्याच्यानें करमेना, आत्मानुभूतीचा आनंद एकटयाच्यानें घेववेना म्हणून त्यानें आपल्या घ्यानतपाच्या सामर्थ्यानें ही सर्व सृष्टि उत्पन्न केली. तिच्यांत तो शिरला. स्वतःच आशक आणि माशुक बनला. नाटकही आपणच, नाटककारही आपणच आणि नाटक पाहून आनंदाचा अनुभव घेणारा प्रेक्षकही आपणच. पण इतका विस्तार केल्यावांचून त्याला आनंद कसा मिळावयाचा ? एकाकी न रमते. ईश्वरानें सृष्टि निर्माण केली पण तिचें निरीक्षण करून सृष्टीचें रहस्य नव्या नव्या दृष्टीनें ओळखणारा कुणी हवाच होता. एवढ्यासाठीं त्यानें सृष्टींतच मनुष्य निर्माण केला आणि त्याला प्रतिभा दिली आणि सांगितलें, आतां ह्या सृष्टींतून नित्यनूतन रहस्यें शोधत जा आणि पहात जा.

ईश्वरानें मनुष्याला निर्माण केला पण मनुष्यामध्यें ह्या सृष्टीचें रहस्य आणि तिचें माधुर्य ओळखण्याची शक्ति कोठें होती ? तसें करावयाला ईश्वरी सामर्थ्य पाहिजे. तेव्हां ईश्वरानें दयाळू होऊन किंवा स्वतःच्याच इच्छेची तृप्ति करण्यासाठीं मनुष्याला स्वतःच्या हृदयाचें दान केलें. अशा रीतीनें जेव्हां मनुष्याला ईश्वरी हृदय प्राप्त झालें तेव्हां त्या हृदयशक्तीच्या जोरावर त्यानें ईश्वराला ओळखलें. ईश्वराचें सौंदर्य तो समजू शकला, त्या सौंदर्यरसाचें पान करून तो कृतार्थ झाला, परितृप्त झाला. आणि मनुष्याच्या त्या तृप्ती-मधूनच ईश्वरालाही पहिल्यानें आत्मपरिचय प्राप्त होऊन एका नव्या माधुर्याचा अनुभव मिळाला.

# ५०

एका भक्तानें आपला अनुभव सांगितला – आपण पापी आहोंत, पतित आहोंत, भगवंत आपला केव्हां आणि कसा उद्धार करील ह्या चिंतेनें व्याकुळ होऊन मी ओक्साबोक्सीं रडूं लागलों – हृदय जणूं फाटून गेलें. इतक्यांत कोठूनसा अहंकार जागृत झाला आणि म्हणूं लागला—

धन्य आहे माझी. माझ्यासारखा पश्चात्ताप क्वचितच कोणाला होत असेल. कशी ही अश्रधारा अखंड चाललेली आहे! माझा अनुताप आहे खरा तसाच लोकोत्तर. इतक्या पश्चात्तापानंतर भगवत्प्राप्ति न झाली तर अध्यात्मशास्त्रच खोटें म्हटलें पाहिजे. आतां जर मला दर्शन न घडलें तर भगवंताचा कौलच व्यर्थ आहे असें म्हटलें पाहिजे. मीं पापें केलींत खरीं; पण पापें कोण करीत नाहीं? पण माझीं पातकें धुऊन काढण्यासाठीं माझा प्रयत्नही कांहीं थोडथोडका आहे का? ज्याप्रमाणें तेजाबांत दागिना घातल्याबरोबर त्यांतील कचरा व हीनकस वितळून जातो तद्वतच माझ्या पश्चात्तापाच्या – उपरतीच्या आणि विषादाच्या अश्रूंमध्यें महापापें देखील जळून भस्म होतील. मी आहेच तसा भक्त!!

बस, जेवढा म्हणून कांहीं पश्चात्ताप मीं केला त्यावर पाणी फिरलें आणि पश्चात्तापाच्या ऐवजीं अहंकार-वृद्धिच झाली. पापांचें निर्मूलन करणें सोपें होतें, पण ह्या अहंकाराचें

निर्मूलन कसें करावें हेंच मला समजत नाहीं. जें कांहीं करावें तें बिघडून टाकावयाला हा तयार. दान करावें तर त्याचें श्रेय घेण्यास हा आपला हजरच. त्याग करावा तर तेथें मोठ्यामोठ्यानें म्हणूं लागतो – पहा हो जगाचे लोक, मी किती त्यागी आहें. हरिश्चंद्र, शिबी, बुद्ध, महावीर ह्यांच्या कोटींतच आतां माझी गणना झाली पाहिजे. प्रेम करावयाला जावें तर हा मला म्हणतो, इतरांवर हवें तेवढें प्रेम कर, पण प्रथम आणि सर्वांहून अधिक स्वतःवर प्रेम करावयास विसरूं नकोस. तुझी दुनिया ही तुझी आहे. केन्द्रांतला सूर्य तूं आहेस. ही दुनिया तुझ्याभोंवती फिरत असते. हें तूं कसें विसरणार ? ज्याप्रमाणें एखाद्या उत्कृष्ट फळझाडांत कीड पडावी आणि फळ पाडास आलें न आलें तों तें कुजून जावें, त्याप्रमाणें माझी सगळी साधना ह्या अहंकारामुळें कुजून जात आहे. ह्याला करावें तरी काय ?

आणि ह्याचा नाश करावा म्हणावें तर तेंही शक्य नाहीं. कारण हा अहंकार म्हणजे माझ्याच आत्म्याची छाया होय. आत्म्याच्या अमरत्वाचा थोडासा भाग ह्यालाही मिळाला आहे. ह्याचा अमरपट्टा काढून तरी कसा घ्यावा ?

भगवंता, ह्याचा नाश मला करतां येत नाहीं. तेव्हां ह्याला निदान तुझ्या चरणीं वाहून मोकळे होण्याची शक्ति मला दे किंवा तूंच तुझ्या शक्तीनें ह्याचा इलाज कर. मी ह्याचे पुढें हरलों आहें.

अकला आमि बाहिर [1]हलेम
तोमार अभिसारे,
साथे साथे के चले मोर
नीरव अन्धकारे।
[2]छाड़ाते चाअि अनेक करे,
[3]घुरे चलि, जाअि जे सरे,
मने करि आपद गेछे—
[4]आबार देखि तारे।

---

१ हलेम –( मी ) झालों, निघालों. २ छाडाते चाअि – टाळूं इच्छितों. ३ घुरे – वळून, तोंड वळवून. ४ आबार – पुन्हा.

धरणी से काँपिये चले,
विषम चंचलता।
सकल कथार मध्ये से चाय
कअिते आपन कथा।
से जे आमार आमि, प्रभु,
लज्जा ताहार नाइ जे [५]कभु,
तारे नियें कोन् लाजे बा
जाब तोमार द्वारे।

"एकांतामध्यें तुझें मीलन व्हावें म्हणून अभिसारिका होऊन मी घरांतून बाहेर पडलें. पण ह्या नीरव अंधःकारामध्यें माझ्याबरोबर हा कोण चालला आहे? त्याला टाळावें, त्याला झुंकांडी द्यावी म्हणून मी अनेक उपाय करतें. आडवळणानें जातें. क्षणभर तो दृष्टिआड होतो. मला वाटूं लागतें, कीं गेली पिडा एकदाची. पण जरा वळून पहावें तों स्वारी पुनः हजरच.

मला अगदीं गुपचुप कसलाच आवाज न करतां जावयाचें असतें; पण तो मध्यें लुडबुड करून दणदण आवाजानें चालूं लागतो. मीं जर हळूच कांहीं बोलावयास जावें तर तो मध्येंच तोंड घालून आपल्याच गोष्टी मोठमोठ्यानें बोलूं लागतो.

प्रभो, किती लाजेची गोष्ट, कीं तो दुसरा तिसरा कोणी नसून माझाच निर्लज्ज 'मी' आहे; त्याला लाज कशी ती माहीतच नाहीं. त्याला बरोबर घेऊन तुझ्या मीलनासाठीं तुझ्या द्वारीं येतांना मला लाज वाटते. आणि त्याला तर टाळतां येत नाहीं. आतां मी काय करूं?"

---

५ कभु—कधीं.

## परिशिष्ट

# बंगाली उच्चारणाचे नियम

बंगाली भाषा संस्कृत कुटुंबांतीलच आपली भगिनी आहे. ते लोक स्वतःच्या भाषेला बंगाली म्हणत नाहींत, बांग्ला म्हणतात. ह्या भाषेंत संस्कृत शब्दांचें प्राचुर्य मुबलक आहे. पण त्या शब्दांचें उच्चारण संस्कृत परंपरेला धरून नाहीं. कारण सगळीच बांग्ला भाषा प्राकृत परंपरेनें प्रभावित आहे. विद्वानांनीं लिहितांना शब्दांचीं रूपें संस्कृतासारखीं ठेवावयाचीं, आणि उच्चार मात्र आपल्या पद्धतीचा करावयाचा असें द्वैत पसंत केलें आहे. हे लोक लिहितील 'लक्ष्मी' व बोलतील 'लोक्खी'. लिहितील 'आत्मा' आणि बोलतील 'आत्ता'. त्याचप्रमाणें युग–जुग, प्राण–प्रान इ.

बांग्ला भाषेची मुख्य खुबी तिच्या अचा ऑसारखा, ओसारखा, आणि एचा केव्हां केव्हां ॲसारखा उच्चार होतो ही आहे. एकटा ( ॲकटा ), अरविंद ( ओरोबिंदो ), जाब ( जाबो ) इ. त्याचप्रमाणें पुष्कळदां जोडाक्षरांतील दुसरें अक्षर गाळून पहिल्या अक्षराचें द्वित्व करावयाचें. जसें, सत्य=शोत्त.

लिहिण्यांत जो शुद्ध ण असतो त्याचें उच्चारण न च करतात. श, ष, स हा भेद लिहिण्यांत बिनचूक दाखवतात. बोलतांना मात्र सगळेच श.

बोलतांना युक्ताक्षरापूर्वीच्या ऱ्हस्व स्वराला आपण कधीं कधीं दीर्घ करतों, पण पुष्कळदां ऱ्हस्व उच्चारणावर भार देऊन त्याला दीर्घाइतका वेळ देतों. बंगालींत असें करतांना ऱ्हस्व अक्षरावर आपल्यापेक्षां अधिक भार दिला जातो. त्यामुळें उच्चारणांत विशेष गोडी येते आणि थोडसें वक्तृत्वहि येतें. उदाहरणार्थ, 'चित्त जेथा भयशून्य' ह्या ओळींतील पहिला शब्द चित्त्त असा वाचला जातो.

त्यांतच जर युक्ताक्षरांत अनुस्वार सांपडला तर त्याचें ringing उच्चारण करतांना मोठी मौज वाटते.

बंगाली लोक बोलूं लागले म्हणजे त्यांचें बोलणें समजण्यास वर सांगितलेल्या दोनचार गोष्टी ध्यानांत असल्या म्हणजे बस. पण छापलेलीं गीतें बांग्ला ढबेनें

वाचावयाचीं म्हणजे कांहीं अधिक नियम ध्यानांत ठेवले पाहिजेत. ते ह्याखालीं दिले आहेत. तेवढ्यानें तूर्त भागेलसें वाटतें.

हीं सर्व गीतें जर बांग्ला उच्चारणाप्रमाणें आपल्या लिपींत छापलीं असतीं तर वाचकांची सोय झाली असती हें खरें. पण बंगालींत जसें लिहितात तसेंच नागरी अक्षरांत छापणें अपरिहार्य होतें आणि मूळ संस्कृत शब्द ओळखले गेल्यानें गीतांचा अर्थ सोपा जातो. बंगाली लोकांनीं लेखन-उच्चारणाचें जें द्वैत स्वीकारलें तें आपणहि स्वीकारल्यावांचून गत्यंतर नाहीं. अचा उच्चार जेथें ऑा अथवा ओ होतो तो तसा दाखविणें कदाचित् अपरिहार्य आहे. पुढील प्रकाशनांच्या वेळीं ह्याबाबतींत कांहीं तरी निर्णयावर येऊं.

बांग्ला कविता, इग्रंजीप्रमाणें, सिलेब्लचा विचार करून चालते हें मात्र प्रथम-पासूनच ध्यानांत ठेवलें पाहिजे.

नमुन्यादाखल एक गीत उच्चारणाप्रमाणें दिलें आहे. त्यावरून बरीचशी कल्पना होऊं शकेल.

**स्वर :—**

अ — बंगालींत अकाराचे दोन प्रकारचे उच्चार होतात.

( १ ) साधारण उच्चार – ऱ्हस्व ओकारासारखा. जसें – कथा, चला, अधीर. – कोथा, चोला, ओधीर इ.

( २ ) ओकारासारखा उच्चार. त्याचे ठळक नियम पुढीलप्रमाणें आहेत.

पुढील व्यंजन जर इकारान्त किंवा उकारान्त असेल, किंवा पुढें यकारान्त जोडाक्षर किंवा क्ष, ज्ञ असतील तर मागील अचा ओकारवत् उच्चार करावा. जसें – अति = ओति, बसु = बोशु, करि=कोरि, चलुक=चोलुक्, तात्पर्य्य=तात्पोर्जो इत्यादि.

जेथें शब्दाच्या प्रारंभीं अ किंवा अन् नकारार्थी येतें तेथें मात्र पुढें इकारान्त किंवा उकारान्त व्यंजन येऊनहि अचा उच्चार असारखाच होतो. जसें–अ-थिर अ-धीर, अकूल, अतुल इ. ( अतुल शब्द विशेषनाम असेल तर त्याचा उच्चार

ओतुल होतो. ) त्याचप्रमाणें शब्दाच्या प्रारंभीं सहित किंवा संपूर्ण ह्या अर्थी स किंवा सम् असेल तर त्यांच्यामधील अचें उच्चारण ओकारवत् होत नाहीं. सविनय, समृद्ध, संपूर्ण इ.

कांहीं दोन अक्षरी शब्दांचा (विशेषणांचा, सर्वनाम विशेषणांचा) अन्त्य अ ओसारखा उच्चारण करतात. जसें, छोट = छोटो, बड़ = बड़ो, काल (काळा) = कालो, भाल = भालो, मत = मतो, जेन = जॅनो, केन = कॅनो, हेन = हॅनो, एत = एतो, जत = जतो, कत = कतो.

बंगालींत शब्द जरी मोठा लांबलचक असला तरी उच्चारणाच्या सोयीसाठीं साधारणतः दोन दोन अक्षरांच्या तुकड्यांत त्याची विभागणी करतात. ह्या प्रत्येक तुकड्याच्या शेवटीं जर अ असेल तर त्याचा उच्चार ओकारवत् होतो; जसें, अनवरत = अनो-बरो-तो.

दोन अक्षरी (Syllables) शब्दाच्या दुसऱ्या अक्षराच्या पोटांत जर अ असेल तर त्याचा उच्चार ओसारखा होतो. जसे, अनल = अनोल्, अेमन = अॅमोन्, कखन = कखोन्, तेमन = तॅमोन् इ.

कांहीं न किंवा णकारान्त एक-अक्षरी शब्दांच्या पहिल्या अक्षराच्या अंतीं अ असेल तर त्याचा ओसारखा उच्चार होतो. जसें, पण (परिमाण) = पोन, मन = मोन, बन = बोन, धन = धोन, जन = जोन. परंतु पण (प्रतिज्ञा) रण, गण, सन इत्यादि शब्दांत अचा शुद्ध उच्चारच होतो.

संख्यावाचक शब्दांच्या अंतींच्या अचा ओसारखा उच्चार होतो. जसें, अेगार = अेगारो, बार = बारो, तेर = तेरो इ.

अ (नित्य वर्तमान किंवा अनुज्ञा), इत-त, (इतेछिल), इब-ब, (इयाछ), (इयाछिल), इल-ल प्रत्ययान्त क्रियापदांच्या अन्त्य अचा उच्चार ओसारखा होतो. जसें, आस = आशो, कर = करो; जेत = जेतो, जानत = जानतो, गांथब = गांथबो, साजाब = शाजाबो, करेछ = करेछो, नितेछ = नितेछो; पेयेछिल = पेयेछिलो, जागिल = जागिलो, फुटिल = फुटिलो इ.

साधारणतः बंगालींत मराठीप्रमाणेंच शब्दांतील अन्त्य अक्षराचा उच्चार हलन्त होतो. जसें, राम, हात, कान, सलिल, इ.

ह्याला असलेले कांहीं अपवाद वर आले आहेत. उच्चारणभेदामुळें अनेकदां अर्थभेद उत्पन्न होतो. जसें, काल = समय, कालो = काळा; बार् = वार, बारो = बारा इ.

तत्सम शब्दांत साधारणतः अन्त्य अकाराचा लोप होतो. जस – विचार, धीर, अनुपम, असुर इ. परंतु—

( १ ) अन्त्य अक्षर जर जोडाक्षर असेल तर अन्त्य अचा लोप होत नाहीं. जसें, 'भक्त, चिह्न, न्याय्य, सूर्य, चन्द्र' इ०. अन्त्य अक्षराच्या पूर्वी अनुस्वार किंवा विसर्ग असल्यासही अन्त्य अचा लोप होत नाहीं. जसें, 'हंस, वंश, दुःख' इ०

( २ ) इकार किंवा एकारानंतर य अक्षर येत असेल तर त्या यमधील अकाराचा लोप होत नाहीं. जसें, 'प्रिय, देय, पेय, मैत्रेय' इ. ( परंतु – विषय्, न्याय्, उपाय् इ. )

( ३ ) विशेषण शब्दाच्या शेवटीं 'ढ, ह' असल्यास अन्त्य अचा लोप होत नाहीं. जसें– 'दृढ, गाढ, देह, स्नेह, अनुग्रह' इ.

( ४ ) 'त' किंवा 'इत' प्रत्ययांत विशेषणाच्या अन्त्य अचा लोप होत नाहीं. जसें– 'पुलकित, गत, नत, गीत, मत, रक्षित' इ.

( ५ ) तर,तम प्रत्ययान्त विशेषणांच्या अन्त्य अचा लोप होत नाहीं. जसें– 'उच्चतर, निम्नमर' इ.

ऋ, ॠ — ऋ व ॠ चा उच्चार बंगालींत अनुक्रमें रि व री असा होतो.

ए — ए चे बंगाली दोन प्रकारचे उच्चार होतात. ( १ ) सर्वसाधारण उच्चार. जसें 'देश, वेष' इ. ( २ ) विकृत उच्चार अॅ, किंवा यॅसारखा. जसें, अेक = अॅक्, देखेन = द्यॅखेन इ. अेकाराचें हें विकृत रूप बहुतेक शब्दाच्या प्रारंभींच पहावयास मिळतें. ह्या बाबतींत सवसाधारण नियम असा आहे :— पुढें येणाऱ्या अक्षरांत 'आ, अे, ओ किंवा अ' असेल तर मागील एचें उच्चारण विकृत अॅसारखें होतें. परतु पुढें 'इ , उ' येत असतील तर मागील एचा उच्चार

स्वाभाविक होतो. जसें, देखा = द्यॅखा; देख, देखो = द्यखो ; देखे = द्यॅखे ; परंतु देखि, देखुक, स्वाभाविक उच्चार. एक = ॲक, एका = ॲका, एकूटा = ॲकटा ; परंतु एकटि, एकटु मधें एचा उच्चार स्वाभाविक.

**ऐ** — ऐचें उच्चारण बंगालींत जणूं 'ओ' व 'इ' चें अेका मागोमाग घाअीघाअीनें उच्चारण केल्यासारखें होतें. जसें, ऐक्य = ओइक्को, चैतन्य = चोइतन्नो, धैर्य्य = धोअिर्जो इ.

**औ** — औचें बंगालींत उच्चारण ओ व उ मिळून होतें. कौरव = कोअुरब, इ.

**व्यंजन** :-

**ड़** – हिंदीप्रमाणें बंगालींत ड़चा वापर होतो. ह्याचा उच्चार अड किंवा साधारण ळसारखा होतो.

**ण, न** – ण, न चा उच्चार एकच नप्रमाणें करतात. जसें, प्राणे = प्राने, उच्चारण = उच्चारन इ.

**व** – वचा उच्चार सर्वसाधारणपणें बसारखा करतात. जोडाक्षरांत अन्त्य व असेल तर त्याचा उच्चार होत नाहीं. केवळ पूर्ववर्ती व्यंजनाचें द्वित्व होतें. तसेंच, शब्दाचें आद्य अक्षर व-कारान्त जोडाक्षर असेल तर त्या वचा उच्चारच होत नाहीं. जसें, पक्व = पक्क, अद्वय = अद्दय, स्वत्व = शत्त, द्वित्व = दित्त.

आह्वान, जिह्वा आदि शब्दांत वचें खरें उच्चारण थोडेंसें आढळतें.

वसाठीं स्वतंत्र वर्ण नाहीं व वचा शुद्ध उच्चार तर हवा आहे अशा ठिकाणीं 'ओय' रूपानें वचें उच्चारण दाखवलें जातें. जसें, 'पाओया = पावा, जाओया = जावा, हाओया = हावा, रेलओये = रेलवे, इ. [ आम्ही नागरी लिप्यंतरांत 'ओय' असें रूप न ठेवतां 'व' च ठेवलें आहे. बहुतेक शब्दांच्या शेवटींच असें रूप पावा, चावा, जावा अशा शब्दांत आलेलें असल्यामुळें शब्दाच्या अन्तीं असलेल्या वाचें शुद्ध उच्चारण करावें. जसें–पावा, जावा इ. बाकीच्या ठिकाणीं वरील नियमाप्रामाणें वचा ब वाचावा.]

**श, ष, स** – श, ष, स साठीं एकच शचें उच्चारण सर्वांस वापरलें जातें. जसें, बातास = बाताश, असो = ॲशो, से = शे, पाषाण = पाशान, इ.

केवळ ‘ त, थ, न, र, ल ’ ह्या व्यंजनांच्या पूर्वी ‘ श, स, ’ असल्यास दन्त्य सचा उच्चार होतो. जसें, श्री = स्री. श्लील = स्लील, स्नान = स्नान, समस्त = शोमोस्तो, संसार = संसार इ.

**जोडाक्षर —**

बंगालीमध्यें जोडाक्षरांचे उच्चार फार विचित्र आहेत. ‘व’ अन्तीं असलेल्या जोडाक्षरांच्या उच्चारणाबद्दल वर ‘व’ च्या उच्चारणाच्या नियमांत माहिती आलीच आहे. आतां इतर कांहीं जोडाक्षरांचे नियम ध्यानांत घेऊं.

क्षचा उच्चार बंगालींत ख्य किंवा क्खसारखा करतात. लक्ष = लख्य ( पश्चिम बंगाल ) [ लोक्खो ], ( पूर्व बंगाल ) [ लइक्ख ]; रक्ष = रख्या = ( पश्चिम बंगाल ) [ रोक्ख्या ], ( पूर्व बंगाल ) [ रइक्खा ] इ.

ज्ञचें उच्चारण बंगालींत ग्यँसारखें होतें. जसें, विज्ञ = विग्ग्यँ = विग्यँ; ज्ञान = ग्याँन् ; आज्ञा = आग्ग्याँ इ.

संयुक्त-अक्षराच्या प्रारंभीं क-वर्ग, च-वर्ग, ट-वर्ग, त-वर्ग व प-वर्ग ह्यांच्यापैकीं पहिल्या चार अक्षरांपकीं कोणतेंहि अक्षर किंवा श, ष, स असेल व अंतीं ‘ म ’ कार असेल तर त्या म-काराचा चंद्रबिंदूसारखा ( अनुस्वारासारखा ) उच्चार होतो व पूर्वीच्या व्यंजनाचें द्वित्व होतें ( क्वचित मकाराचा पूर्ण लोपहि होतो ). जसें = रुक्मिणी = रुक्किँनी; महात्मा = महात्ताँ, पद्म=पद्द किंवा पद्दो, भीष्म = भीश्शँ, श्मशान = शँशान् किंवा शशान, अकस्मात् = अकोश्शाँत् इ.

य-कारान्त जोडाक्षराच्या पूर्वीच्या अक्षराचें उच्चारणाच्या वेळीं द्वित्व होतें. व पूर्ववर्ती अक्षरांत अ असल्यास त्याचा ओकारवत् उच्चार होतो. जसें, सख्य = शोक्खो, पथ्य = पोत्थो, विक्रिय = विकूक्रय, योग्य = जोग्ग इ.

शब्दाच्या आरंभीं किंवा ह, य किंवा र ह्यांपुढें य आला असतां यचा उच्चार नेहमीं ज होतो. कार्य्य = काज्ज, साहाय्य = साहाज्ज.

[ उच्चारणाच्या दृष्टीनें अेक बंगाली गीत येथें दिलें आहे. ]

विपदे मोरे रोक्खा करो
ए नहे मोर् प्रार्थना ;
विपदे आमि ना जॅनो कोरि भय् ।

दुक्खतापे ब्येथित चित्ते
नाइ बा दिले शांत्तना,
दुक्खे जॅनो कोरिते पारि जय्।

शहाय मोर् ना जदि जुटे
निजेर बल्र ना जॅनो टुटे
संसारेते घोटिले क्खोति
लोभिले शुधु बंचना
निजेर मने ना जेनो मानी क्खोय्।

आमारे तुमि कोरिबे त्रान
ए नहे मोर् प्रार्थना,
तोरिते पारि शकति जॅनो रय्।

आमार भार लाघब कोरि
नाइबा दिले शांत्तना,
बोहिते पारि अेमूनि जॅनो हय्।

नम्रशिरे शुखेर दिने
तोमारि मुख लोअिबो चिने,
दुखेर राते निखिल धरा
जे दिन करे बंचना
तोमारे जॅनो ना कोरि संशय्।

७४५७१
२००
११।३।७१
८७१.

REFBK-0009781
REFBK-0009781

कविवर्य रविबाबूंच्या गीतांजलीचा
व आचार्य श्री. काकासाहेब कालेलकरांच्या
रसिक भाषाशैलीचा मराठी वाचकांना
नव्यानें परिचय करून देण्याची आवश्यकता नाहीं.
गीतांजलींतील प्रत्येक गीतांत व्यक्त झालेल्या
रविबाबूंच्या जीवनतत्त्वज्ञानाची आचार्य कालेलकरांनीं
आपल्या सोप्या, रसिक मराठी शैलींत
मनन लिहून फोड करून दाखविली आहे.
त्याशिवाय गीतांतील ज्या ओळी विशेष आवडल्या
किंवा महत्त्वाच्या वाटल्या
त्यांच्यावर विस्तृत टीपा लिहिल्या आहेत.
रविबाबूंचें गूढ मानलें जाणारें तत्त्वज्ञान
सोप्या साध्या भाषेंत मराठी वाचकांपर्यंत
पोंचवण्याच्या हेतूनेंच
हें पुस्तक लिहिलें गेलें आहे.
प्रस्तुत पुस्तकांत मूळ बंगाली गीत,
त्यांतील भाव विशद करणारें मनन,
गीताचा स्वैर अनुवाद
व कठीण बंगाली शब्दांचे अर्थ देण्यांत आले आहेत.
त्याशिवाय बंगाली गीतें
बंगाली पद्धतीनें वाचतां यावींत
म्हणून बंगाली उच्चारणाचे नियमहि दिले आहेत.
प्रस्तुत पुस्तकांत
निवडक पन्नास गीतें घेण्यांत आलीं असून
उरलेल्या गीतांवरचें मनन
पुढें दोनतीन भागांत प्रसिद्ध होईल.